# मविप्र पत्रिका

शिक्षणातून सामाजिक समृद्धीकडे
वर्ष : तिसरे | अंक : दुसरा | ऑगस्ट २०२६

रोजगार विशेषांक

# बेरोजगारीचा करावया अस्त
# मोहीम करु फत्तेशिकस्त



# कर्मवीरांच्या त्यागाला नमन...
# त्यांच्या विचारांना कृतीतून वंदन...

आद्य संस्थापक व स्फूर्तिस्थान


कर्मवीर रावसाहेब थोरात


कर्मवीर गणपत दादा मोरे


कर्मवीर डी. आर. भोसले


कर्मवीर काकासाहेब वाघ


कर्मवीर भाऊसाहेब हिरे


कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे


कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे


कर्मवीर ॲड. विठ्ठलराव हांडे


कर्मवीर डॉ. वसंतराव पवार

कर्मवीरांचा वारसा केवळ स्मरणात नाही...
तो आज हजारो हातांना काम देण्याच्या प्रयत्नांत जिवंत आहे!

मविप्र
उज्ज्वल भविष्याकडे



बहुजन समाजातील, तळागाळातील हजारो तरुणांना शिक्षणाची संधी देऊन, त्यांच्या हाताला काम आणि जीवनाला स्वावलंबनाची दिशा देण्यासाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेले

# कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे

यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या प्रेरणादायी कार्याला कृतज्ञ अभिवादन म्हणून
हा 'मविप्र पत्रिका- रोजगार विशेषांक' सादर अर्पण.

# अनुक्रमणिका


**कौशल्य शिक्षण आणि रोजगार : वास्तव आणि भविष्य**

१. (संपादकीय) युवाशक्तीला बळ : रोजगार आणि कौशल्य विकास : ॲड. श्री. नितीन बाबुराव ठाकरे पान क्र. ५
२. जनशिक्षण संस्थान : स्वावलंबनाचा कौशल्यमंत्र : श्री. बाळासाहेब रामनाथ क्षीरसागर पान क्र. ८
३. बेरोजगारी : चिंतन आणि कृतीची गरज : श्री. विश्वास बापुराव मोरे पान क्र. ११
४. कौशल्य ते करिअर, व्हाया प्लेसमेंट: श्री. देवराम बाबुराव मोगल पान क्र. १२
५. गावच्या मातीला रोजगाराचा सुगंध : श्री. दिलीप सखाराम दळवी पान क्र. १४
६. नव्या युगाचे शिक्षण: कौशल्य ते रोजगार : प्राचार्य डॉ. दिलीप पुंडलिक पवार पान क्र. १६
७. शिक्षणापासून रोजगारापर्यंत : श्री. सुनील धोपावकर पान क्र. १८
८. भारतीय उद्योग महासंघ (CII ): औद्योगिक विश्वातील अढळ तारा : श्री. जॉय अलूर पान क्र. २०
९. सीआयआयची ग्लोबल झेप... पान क्र. २२
१० आढावा सीआयआय मॉडेल करिअर सेंटरचा : श्री. सागर शिरसाठ पान क्र. २४
११. आयटीआय : स्थानिक रोजगाराचा भक्कम आधार : प्राचार्य श्री. आर. बी. पाटील पान क्र. २६
१२ . कौशल्यविकास ते रोजगार, नवी आशा-नवी दिशा : प्राचार्य श्री. प्रशांत एम. पाटील पान क्र. २९
१३. अपना सपना : मविप्रने भरले स्वप्नांमध्ये बळ : प्राचार्य डॉ. मधुकर एन. शेलार पान क्र. ३१
१४. कौशल्यविकासाचा रोडमॅप : बॉश टेक्निकल स्किल सेंटर : श्री. नीलेश खालकर पान क्र. ३३
१५. सक्षम आणि गतिशील व्यावसायिक प्लॅटफॉर्म : डॉ. संदीप बोरसे पान क्र. ३६
१६. मविप्र माजी विद्यार्थी संघ: विकासाचा सेतू : डॉ. धनंजय चव्हाण पान क्र. ३८
१७. इलेट्रॉनिक विभाग म्हणजे नवनवीन प्रयोगांची शाळा : सौ. प्रतीक्षा शिंदे पान क्र. ४०

**सकारात्मकता, आशा, आनंद आणि बरंच काही**

१८. नोकरीसाठी हाक त्यास मविप्रची साद पान क्र. ४३
१९. मेळाव्यांची पालकांमध्येही उत्सुकता पान क्र. ४४
२०. खुले झाले रोजगाराचे भव्य दालन पान क्र. ४६
२१. रोजगाराच्या नव्या क्षितिजाकडे पान क्र. ४७
२२. नोकरीचे रेड कारपेट पान क्र. ५०
२३. कौशल्य पाठीशी, रोजगार हाताशी पान क्र. ५२
२४. डेन्मार्क, जपानमधील कंपन्यांचाही सहभाग पान क्र. ५४
२५. पॉलिटेक्निकचा पंच पान क्र. ५६
२६ शोध रोजगाराचा, मार्ग मविप्रचा पान क्र. ५८

**प्रतिसाद, समाधान आणि बरंच काही**

२७. स्वप्नातील करिअरची नवी दिशा पान क्र. ६१
२८. माध्यमांमध्येही उमटली रोजगारक्रांती पान क्र. ७४

**शासकीय उपक्रम आणि योजना**

२९. कौशल्य विकास : काळाची गरज पान क्र. ७६
३०. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना पान क्र. ७७
३१. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना पान क्र. ७८
३२. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना पान क्र. ७९
३३. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान पान क्र. ८०

**रोजगार विशेषांक**
**मविप्र पत्रिका**
वर्ष : तिसरे | अंक: दुसरा | ऑगस्ट २०२६

मुख्य संपादक
**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**
(सरचिटणीस, म. वि. प्र. समाज, नाशिक)

कार्यकारी संपादक
**प्राचार्य डॉ. दिलीप पुंडलिक पवार**

सल्लागार मंडळ :
म. वि. प्र. समाज, नाशिक
कार्यकारी मंडळ पदाधिकारी
**डॉ. सुनील उत्तमराव ढिकले** (अध्यक्ष)
**श्री. विश्वास बापुराव मोरे** (उपाध्यक्ष)
**श्री. बाळासाहेब रामनाथ क्षीरसागर** (सभापती)
**श्री. देवराम बाबुराव मोगल** (उपसभापती)
**श्री. दिलीप सखाराम दळवी** (चिटणीस)

कार्यकारी मंडळ तालुका सदस्य
**ॲड. संदीप गोपाळराव गुळवे**
**श्री. रवींद्र शंकर देवरे**
**डॉ. सयाजीराव नारायणराव गायकवाड**
**श्री. प्रवीण एकनाथ जाधव**
**ॲड. लक्ष्मण फकिरा लांडगे**
**श्री. शिवाजी जयराम गडाख**
**श्री. अमित उमेदसिंग बोरसे**
**डॉ. प्रसाद प्रभाकर सोनवणे**
**ॲड. रमेशचंद्र काशिनाथ बच्छाव**
**श्री. नंदकुमार बालाजी बनकर**
**श्री. कृष्णाजी गणपत भगत**
**श्री. विजय पोपट पगार**
**श्री. रमेश पांडुरंग पिंगळे**
**श्रीमती शोभा भागवत बोरस्ते** (महिला सदस्य)
**श्रीमती शालन अरुण सोनवणे** (महिला सदस्य)

सेवक सदस्य
**प्रा. डॉ. संजय खंडेराव शिंदे**
(उच्च माध्य. व महाविद्यालयीन विभाग)
**श्री. चंद्रजित दयाराम शिंदे**
(प्राथमिक व माध्यमिक विभाग)
**श्री. जगन्नाथ मधुकर निंबाळकर**
(प्राथमिक व माध्यमिक विभाग)

शिक्षणाधिकारी
**प्रा. डॉ. भास्कर ढोके**
**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे**
**प्रा. डॉ. नितीन जाधव**
**प्रा. श्री. दौलत जाधव**
**प्रा. डॉ. कैलास शिंदे**
**प्रा. डॉ. विलास देशमुख**
**प्रा. डॉ. अजित मोरे**
**प्रा. श्री. शशिकांत मोगल**

संपादन
**सौ. सारिका गुजराथी**
**श्री. नितीन कवसकर**

मुखपृष्ठ संकल्पना व
अंकांची मांडणी
**श्री. सुनील धोपावकर**

प्रकाशक :
**सरचिटणीस, म. वि. प्र. समाज, नाशिक**
मुद्रक :
**मराठा विद्या प्रसारक समाज,**
**प्रिंटिंग प्रेस, नाशिक**



# आभार...

कर्मवीरांची फलद्रूप होताहेत स्वप्ने आणि आशा !!
रोजगारातून देऊ पदवीधरांच्या जीवनाला नवी दिशा !!
मविप्र पत्रिका
मुख्य संपादक आणि सल्लागार मंडळ


**डॉ. सुनील उत्तमराव ढिकले**
(अध्यक्ष)


**श्री. विश्वास बापुराव मोरे**
(उपाध्यक्ष )


**श्री. बाळासाहेब रामनाथ क्षीरसागर** (सभापती)


**श्री. देवराम बाबुराव मोगल**
(उपसभापती)


**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**
(सरचिटणीस)


**श्री. दिलीप सखाराम दळवी**
(चिटणीस)


**ॲड. संदीप गोपाळराव गुळवे** (इगतपुरी)


**श्री. रवींद्र शंकर देवरे**
(कळवण व सुरगाणा)


**डॉ. सयाजीराव नारायणराव गायकवाड** (चांदवड)


**श्री. प्रवीण एकनाथ जाधव** (दिंडोरी व पेठ)


**ॲड. लक्ष्मण फकिरा लांडगे** (नाशिक शहर)


**श्री. शिवाजी जयराम गडाख** (निफाड)


**श्री. अमित उमेदसिंग बोरसे** (नांदगाव)


**डॉ. प्रसाद प्रभाकर सोनवणे** (बागलाण)


**ॲड. रमेशचंद्र काशिनाथ बच्छाव** (मालेगाव)


**श्री. नंदकुमार बालाजी बनकर** (येवला)


**श्री. कृष्णाजी गणपत भगत** (सिन्नर)


**श्री. विजय पोपट पगार**
(देवळा)


**श्री. रमेश पांडुरंग पिंगळे**
(नाशिक ग्रामीण)


**श्रीमती शोभा भागवत बोरस्ते** (महिला सदस्य)


**श्रीमती शालन अरुण सोनवणे** (महिला सदस्य)


**प्रा. डॉ. संजय खंडेराव शिंदे** (सेवक सदस्य)
उच्च माध्य. व
महाविद्यालयीन विभाग


**श्री. चंद्रजित दयाराम शिंदे**
(सेवक सदस्य)
प्राथमिक व
माध्यमिक विभाग


**श्री. जगन्नाथ मधुकर निंबाळकर**
(सेवक सदस्य)
प्राथमिक व माध्यमिक विभाग

# युवाशक्तीला बळ: रोजगार आणि कौशल्य विकास

विद्यापीठ शिक्षणातून ज्ञान व कौशल्य यांच्या जोरावर पदव्या मिळवून विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याबरोबरच उद्योग, व्यवसाय, विज्ञान, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांशी समन्वय साधून उत्तम मनुष्यबळाच्या जोरावर राष्ट्र विकासासाठी योगदान देणे हे देखील शिक्षण क्षेत्राचे महत्त्वाचे कार्य आहे. 'योग: कर्मसु कौशल्यं' अर्थात कृतीत कौशल्य ओतले की ते निराळे व अलौकिक ठरते. आज कौशल्य विकास व उद्योजकतेच्या दृष्टीने विचार करता वर्तमान डिजिटल युगात सोशल मीडिया, ऑनलाइन मार्केटिंग आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या साहाय्याने स्थानिक उत्पादने जागतिक बाजारपेठेत पोहोचविणे शक्य झाले आहे. त्यामुळे उत्पन्नवाढीच्या नवीन वाटा खुल्या झाल्या आहेत. "उद्योगाचे घरी रिद्धी सिद्धी पाणी भरी" या उक्तीला कृतीत आणण्याची गरज निर्माण झाली आहे. आज उद्योग-व्यवसायातून अर्थार्जनाच्या असंख्य संधी उपलब्ध असून त्यासाठी कौशल्य, मेहनत, नियोजन आणि सातत्य आवश्यक आहे. "नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा बनणे" हीच आजच्या काळाची गरज आहे. उद्योजकता (Entrepreneurship ) आणि उद्योगशीलता (Industriousness) स्वीकारून युवक स्वतःचा तसेच देशाच्या आर्थिक विकासाचा मजबूत पाया उभारू शकतात हा विश्वास जपण्याची गरज आहे. या अंकातील लेखांतून हा विचार प्राधान्याने मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पदवी प्राप्त करणे पुरेसे राहिलेले नाही. उद्योगविश्वाच्या अपेक्षांनुसार पदवी बरोबरच आवश्यक कौशल्ये प्राप्ती आणि रोजगारक्षम व्यक्तिमत्त्व घडण ही काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्याच्या दृष्टीने मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने माजी सरचिटणीस ॲड. बाबुरावजी ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने "कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर" या मध्यवर्ती रोजगार केंद्राची स्थापना केली. कारण ॲड. बाबुरावजी ठाकरे यांनी लीगल ॲडव्हायझर व संस्थाचालक या नात्याने जिल्ह्यातील हजारो तरुणांना जिल्ह्यातील कारखाने, उद्योगसमूह, करन्सी नोट प्रेस, मविप्र आदी संस्थांमध्ये नोकरीच्या मोठ्या संधी निःशुल्क उपलब्ध करून दिल्या होत्या. म्हणून त्यांच्या नावाने सुरू झालेल्या या सेंटरच्या माध्यमातून विविध तालुक्यांना केंद्रीभूत मानून तेथील मध्यवर्ती महाविद्यालयांमध्ये Confederation of Indian Industry (CII) च्या सहकार्याने गेल्या वर्षभरात १३ नोकरी/ रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास उपक्रम आयोजित केले गेले. हे सर्व मेळावे विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देणारे आणि प्राप्त पदव्यांतून आशा पल्लवीत करणारे ठरत आहेत. आजवर संस्थेने विविध महाविद्यालयांमध्ये आयोजित या मेळाव्यांमध्ये मुलाखतीद्वारे नामवंत उद्योग समूहांमध्ये ६००० हून जास्त विद्यार्थ्यांना जागेवर ऑफर लेटर प्रदान करून नोकरीची मोठी संधी उपलब्ध करून दिलेली आहे. अनेक गुणवंत विद्यार्थ्यांची एकापेक्षा जास्त संस्थांतर्फे निवड झाली ही उल्लेखनीय बाब आहे. शिक्षण पूर्ण करत असतांनाच नोकरीचे पत्र मिळणे ही अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बाब ठरली आहे.

म. वि. प्र. समाज संस्था गेली ११२ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी महाराष्ट्रातील एक अग्रगण्य आणि लौकिकप्राप्त संस्था आहे. ही संस्था नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना पारंपरिक तसेच कालसुसंगत व्यावसायिक ,कलात्मक ज्ञान देणाऱ्या जवळपास सर्वच विद्या शाखांचे (केजी टू पीजी ) गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याचे कार्य अत्यंत जोरकसपणे करत आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून संस्थेने केवळ शैक्षणिक ज्ञानावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि उपक्रमांना विशेष प्राधान्य दिले आहे. या उपक्रमांमध्ये रोजगार मेळावे, उद्योग-शिक्षण संवाद, व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा, संवाद कौशल्य प्रशिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षक मुलाखत तंत्र आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांचा समावेश आहे.

हे सर्व रोजगार मेळावे पदवीधर विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनण्यासाठी वरदान ठरत आहेत. ज्ञानाच्या उपयोजनाचे साधन ठरत आहे. संस्थेशी सामंजस्य करार केलेल्या सव्वाशेहून अधिक नामवंत औद्योगिक समूह, उत्पादन क्षेत्रातील कंपन्या, सेवा क्षेत्रातील संस्था आणि तंत्रज्ञान कंपन्या या मेळाव्यांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट उद्योग प्रतिनिधींशी संवाद साधता येतो. त्यातून विद्यार्थ्यांना शिक्षणानुसार त्यांच्या आवडीच्या

## संपादकीय

**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे,**
मुख्य संपादक, मविप्र पत्रिका



क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध होते. तर काहींना उद्योगांच्या अपेक्षा आणि कार्यपद्धती समजून घेण्याचा मौल्यवान अनुभव मिळतो आहे.

आज उद्योग क्षेत्राला केवळ शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार नको आहेत, तर समस्या सोडविण्याची क्षमता, संघभावना, नेतृत्वगुण, संवादकौशल्य, डिजिटल साक्षरता आणि व्यावसायिक दृष्टिकोन असलेले कुशल कर्मचारी अपेक्षित आहेत. जे ज्ञान, कौशल्य, श्रम, सेवा, संशोधन यांचे वाहक आणि पूजक असतील. त्यामुळे कौशल्य विकास हा रोजगाराचा महत्त्वाचा पाया बनला आहे. हे सर्व मेळाव्यांनी विद्यार्थ्यांना वरील अपेक्षांसाठी सक्षम बनवले आहे. त्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरवले आहे.

रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास यांची सांगड घातल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. नोकरी मिळाल्यामुळे जीवनात एक स्थिरता प्राप्त व्हायला मदत होते. ज्यांना निवड प्रक्रियेत अपयश येते त्यांना नव्याने संधी दिली जाते. प्रशिक्षणातून विद्यार्थी उद्योगांच्या गरजांनुसार स्वतःमध्ये आवश्यक बदल घडवून आणतात आणि रोजगार मेळाव्यांमध्ये त्या कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण करू शकतात. त्यामुळे रोजगार मिळविण्याची शक्यता अधिक वाढते. ही प्रक्रिया विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

ग्रामीण व शहरी भागात या सर्व मेळाव्यांना प्रचंड प्रतिसाद लाभला. अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या कंपन्यांविषयी किंवा रोजगाराच्या आधुनिक संधींबाबत माहिती नव्हती. रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगक्षेत्रांची ओळख झाली. काहींना उद्योगविश्वातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या करिअरविषयक दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडलेले दिसले. त्यामुळे मेळाव्यांविषयी विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया केवळ बोलक्या नाहीत तर अनेकांना उभारी देणाऱ्या आहेत. हीच या उपक्रमांची फलश्रुती आम्ही मानतो.

मराठा विद्या प्रसारक समाज संचलित जन शिक्षण संस्थान, नाशिक या संस्थेद्वारे विविध स्तरांतील निरक्षर, निम्नशिक्षित लोकांना सक्षम केले जाते. अकुशल, निमकुशल कामगार, शालाबाह्य महिला युवक, युवती व आर्थिकदृष्ट्या मागास कामगार यांच्यासाठी स्वयंरोजगार उपलब्ध केला जातो. त्यासाठी गावोगावी अल्पमुदतीचे व कमी खर्चाचे प्रशिक्षण दिले जाते. परिणामी दरवर्षी १८०० याप्रमाणे आजवर संस्थेच्या माध्यमातून मागील तीस वर्षात १,२५,००० महिला व पुरुषांचे व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. हे सर्व लोक स्वतःच्या व्यवसाय व नोकरीतून चांगली अर्थप्राप्ती करीत आहेत.

संस्थेच्या शरदचंद्रजी पवार कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नाशिक या संस्थेतून वास्तुकला व डिझाईन या क्षेत्रातील व्यावसायिक शिक्षण देताना उद्योगाभिमुख कौशल्य विकास शिक्षण पद्धतीवर भर दिला जातो. हॅकॅथॉन स्टार्टअप च्या माध्यमातून मुलांना वेगळेपण सिद्ध करण्याची संधी दिली जाते. एखादे उत्पादन तयार करून स्टार्टअप च्या माध्यमातून मुले व्यवसाय करतात .

संस्थेच्या लोकनेते मालोजीराव मोगल व्यवस्थापन संशोधन आणि तंत्रज्ञान संस्था, (आय. एम. आर. टी. ) नाशिकमध्ये उद्योगाभिमुख अभ्यासक्रम व प्रायोगिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करून नेतृत्व, उद्योजकता आणि व्यवस्थापन संशोधनातील उत्कृष्टतेद्वारे अग्रगण्य व्यवस्थापन ज्ञानप्राप्तीसाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. येथे MBA- HRD, PGDBM , PGDCM , MBA - IT अभ्यासक्रमाद्वारा उद्योजक घडवले जातात. विविध उद्योग-संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षण, इंटर्नशिप व प्लेसमेंट ची सोय केली जाते.

संस्थेच्या 'सेंटर फॉर कोलॅबोरेशन ॲण्ड एक्सलन्स (CCE)' मार्फत सुरू असलेल्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रशिक्षण उपक्रमांनी शालेय शिक्षणामध्ये सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम साधला आहे. IISER पुणे यांच्या सहकार्याने सुमारे ३०० विज्ञान व गणित विषयाचे शिक्षक STEM कार्यशाळेमध्ये प्रशिक्षित झाले. याशिवाय, ५६ ग्रामीण व आदिवासी शाळांमध्ये IUCAA ह्यांच्या प्रशिक्षणाद्वारे नवीन दुर्बिणी वितरित केल्या गेल्या. 'तारांगण' या नावाने सुरु करण्यात आलेल्या या विशेष उपक्रमाद्वारे २,००० हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांना आकाश निरीक्षणाची संधी मिळाली ज्यामुळे विज्ञानाबद्दलची उत्सुकता आणि गोडी निर्माण झाली. Joto Abrasives Pvt. Ltd. च्या सहकार्याने या प्रकल्पाला व्यावसायिक टेलिस्कोप उपलब्ध झाले. NISM बरोबर झालेल्या MoU अंतर्गत विद्यार्थी Securities Market संबंधित प्रमाणित प्रशिक्षण घेत आहेत. British Council आणि MVP यांच्या संयुक्त विद्यमाने ‘Innovative English Teaching’ या विषयावरील कार्यशाळेत २० शिक्षकांनी सहभाग घेतला. MVP आणि MSFDA यांच्या सहकार्याने १२ फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम्स (FDPs) आयोजित केले. त्यात MVP शाळांमधील ५०० हून अधिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमांनी शिक्षकांच्या शैक्षणिक कौशल्यात लक्षणीय सुधारणा घडवून आणली. अध्यापन पद्धती अधिक प्रभावी व विद्यार्थी-केंद्रित होण्यासाठी मदत झाली आहे. TDK Electronics आणि Megafine Pharma च्या सहकार्याने ३२ नव्या विज्ञान प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आली. संबंधित शिक्षकांना उपकरण प्रशिक्षण देण्यात आले. मेगाफाईन फार्मा यांच्या सहभागातून ग्रामीण शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळा तसेच शैक्षणिक खेळणी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. याशिवाय, Mahindra Accelo यांच्या सहकार्याने घोटी येथे अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे, जी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक वैज्ञानिक शिक्षणाचे उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे. Tech Mahindra Foundation ने त्यांच्या SMARTH कार्यक्रमांतर्गत नर्सिंग आणि वैद्यकीय कौशल्यवृद्धी केंद्र स्थापन केले. Magic Bus (Reliance Foundation) बरोबर एक वर्षाचा MoU करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि जीवन कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे.

BASF च्या सहकार्याने ChemAmaze उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळाले. BASF कंपनीच्या "WeChemy" या विशेष कार्यक्रमाद्वारे संस्थेतील B. Sc. वर्गातील १६ विद्यार्थिनींची निवड करून महिला सक्षमीकरण करण्यात आले. Genchi Global Pvt. Ltd. या कंपनीने आपल्या ट्रस्टच्या १५ शाळांसाठी शैक्षणिक लाकडी खेळण्यांचे प्रयोजन केले. या खेळण्यांमुळे प्राथमिक विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनात्मक समज वाढीस लागली आहे. Sandoz Biopharmaceuticals यांच्या CSR उपक्रमांतर्गत डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास व्हेंटिलेटर आणि डायालिसिस मशिन्स प्रदान करण्यात आल्या आहेत. या उपकरणांच्या सहाय्याने रुग्णसेवा व प्रशिक्षणासाठीही भरीव आधार मिळाला आहे. Bosch Ltd. च्या सहकार्याने MVP ITI आणि RSM Polytechnic मध्ये कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आली. Tata Digital Impact Square (DISQ), Sahyadri Farms आणि MVP समाज यांच्या संयुक्त विद्यमाने “आयडिया बॉक्स” नावाची नाविन्यपूर्ण स्पर्धा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकडून ३८०० हून अधिक कल्पना प्राप्त झाल्या. यापैकी १५३ कल्पना आणि १३१ विद्यार्थी विजेते ठरले . त्यामधून ७३ विद्यार्थ्यांनी सह्याद्री फार्म्स, नाशिक येथे आयोजित तीन दिवसांच्या निवासी 'आयडिया बॉक्स बूटकॅम्प' मध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. या बूटकॅम्पमध्ये त्यांनी व्यवसाय विकास, वित्त व्यवस्थापन, टीमवर्क आणि सर्जनशील विचारसरणी यांसारख्या कौशल्यांवर आधारित प्रशिक्षण घेतले.

टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स (IIS) आणि म. वि. प्र. समाज यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचा उद्देश कौशल्याधारित शिक्षणास चालना देणे व विद्यार्थ्यांची नोकरीयोग्यता (employability) वाढविणे हा आहे.

या सर्व उपक्रमांमुळे सेंटर फॉर कोलॅबोरेशन ॲण्ड एक्सलन्स (CCE) ही व्यापक आणि



दूरगामी शिक्षण चळवळ केवळ वर्तमान पिढीला नव्हे तर भविष्यातील उज्ज्वल आणि सक्षम समाजनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरणारी आहे.

संस्थेच्या माजी विद्यार्थी संघाच्या प्रयत्नांतून 'शाळा तिथे प्रयोगशाळा' उपक्रमांद्वारे ३५ हून अधिक मराठी शाळांमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. दर्जेदार शिक्षणासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले गेले. विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोग स्वतः करता यावे यासाठी प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देण्यात आले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्येही कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षणाला रोजगार आणि उद्योग क्षेत्राशी जोडण्यावर भर देण्यात आला आहे. म. वि. प्र. समाज संस्थेचे रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास कार्यक्रम हे या धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असल्याचे दिसून येते. त्यामुळे विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारे न राहता रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनण्याची प्रेरणाही त्यांना मिळते. कौशल्य विकास प्रशिक्षण, रोजगार मेळावे आणि उद्योगसंस्थांशी असलेली भागीदारी यांमुळे तरुणांना उद्योगक्षेत्राच्या गरजा समजून घेता येतात. शासनाच्या विविध योजना, मुद्रा कर्ज, स्टार्टअप इंडिया, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यामुळे देखील उद्योजकतेला चालना मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर संस्थेने राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालयात आठवड्यातून एक दिवस यशस्वी उद्योजकांशी सुरू केलेल्या संवाद उपक्रमामुळे हजारो विद्यार्थ्यांना रोजगार क्षेत्राचे ज्ञान मिळत असून स्व उद्योग निर्मितीला चालना मिळत आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डिलिजंट बॅचच्या माध्यमातून अत्यल्प फी मध्ये JEE, NEET व CET परीक्षांसाठी स्वतंत्र वर्गांचे आयोजन केले जाते. २०२५ पासून मविप्र संस्था आणि सात्विक कर्मा फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'अपना सपना 'या उपक्रमाच्या अंतर्गत JEE आणि CET या परीक्षांच्या परिपूर्ण तयारीसाठी ज्यांना अत्यल्प फी देखील भरणे शक्य नाही, अशा गरजू, होतकरू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांची परीक्षेद्वारे निवड केली जाते. या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्ष मोफत मार्गदर्शन वर्ग आयोजित केलेले आहेत. यात तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाबरोबरच विद्यार्थ्यांना संबंधित विषयांच्या नोट्स व सराव परीक्षांची सामग्री देखील विनाशुल्क पुरवली जात आहे. यातून भविष्यात देशासाठी उत्तम अभियंते तयार होणार आहे.

आज बेरोजगारी हा देशासमोरील मोठा प्रश्न मानला जातो. मात्र रोजगाराच्या संधी उपलब्ध असूनही आवश्यक कौशल्यांच्या अभावामुळे अनेक युवक त्या संधींपासून वंचित राहतात. या पार्श्वभूमीवर रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास उपक्रम हे बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रभावी साधन ठरत आहेत. उद्योग आणि शिक्षण यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याचे कार्य अशा कार्यक्रमांद्वारे घडत आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटरद्वारे CII आणि विविध औद्योगिक समूहांच्या सहकार्याने राबविलेली ही चळवळ केवळ रोजगार उपलब्ध करून देणारी नाही. ती विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची, आत्मनिर्भरतेची आणि राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया आहे. भविष्यात अधिकाधिक उद्योग संस्थांचा सहभाग वाढवून अशा उपक्रमांचा विस्तार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि उद्योग-संस्थांमधील सहकार्य यामुळे रोजगारक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि सक्षम युवा पिढी घडेल असा आम्हाला विश्वास आहे.

शेवटी शिक्षण, कौशल्य आणि रोजगार या त्रिसूत्रीची यशस्वी सांगड घालण्याचे कार्य मराठा विद्या प्रसारक समाज संस्था करत आहे. हीच दिशा भारताच्या युवा शक्तीला सक्षम बनविणारी आणि विकसित राष्ट्राच्या स्वप्नांना साकार करणारी ठरणार आहे. रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास हे केवळ कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रवेशद्वार आहेत या निर्धाराने आमचे कार्य सुरू आहे व यापुढेही सुरूच राहील.

धन्यवाद. . . .

# जनशिक्षण संस्थान: स्वावलंबनाचा कौशल्यमंत्र




**स्थापना आणि उद्देश :**

जन शिक्षण संस्थान, नाशिक हे पूर्वाश्रमीचे 'श्रमिक विद्यापीठ' असून संस्थेची स्थापना ४ एप्रिल १९९५ रोजी करण्यात आली. सुरुवातीला संस्थेचे कामकाज उदाजी मराठा बोर्डिंग, गंगापूर रोड, नाशिक येथे सुरू झाले. स्थापनेपासून आजपर्यंत संस्थेने बेरोजगार युवक-युवती, कुशल व निमकुशल व्यक्ती, महिला, ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिक यांना स्वयंरोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे.

गेल्या तीन दशकांत संस्थेने सुमारे सव्वा लाख प्रशिक्षणार्थींना विविध व्यवसायाभिमुख कोर्सेसचे प्रशिक्षण दिले असून, त्यातून अनेक महिला व पुरुषांनी स्वतःचे उद्योग-व्यवसाय उभे केले आहेत. त्यामुळे हजारो कुटुंबांच्या आर्थिक उन्नतीला हातभार लागला आहे. अनेकांमधील हस्तकला, कौशल्य व नैपुण्याला नवे व्यासपीठ मिळाले आहे.

बेरोजगारांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविणे या उद्देशाने शहरातील बचत गट, झोपडपट्टी परिसरातील गरजू बांधव, ग्रामीण खेडी आणि आदिवासी पाड्यांपर्यंत संस्थेने आपले कार्य विस्तारले आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींना शॉप ॲक्ट, उद्यम नोंदणी, फूड लायसन्स, आर्टीसन कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, योजना कार्ड, आभा कार्ड, श्रम कार्ड आदी आवश्यक कागदपत्रांसाठी मार्गदर्शन व विशेष कॅम्प आयोजित केले जातात. तसेच त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी विविध प्रदर्शनांमध्ये स्टॉलची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

**स्वयंरोजगाराभिमुख प्रशिक्षणाची व्यापकता :**



**-श्री. बाळासाहेब रामनाथ क्षीरसागर**

अध्यक्ष, जन शिक्षण संस्थान, नाशिक,
सभापती, मविप्र समाज, नाशिक

संस्थेमार्फत शहरी व ग्रामीण भागात विविध व्यवसायाभिमुख कोर्सेस राबविले जातात. त्यामध्ये टेलरिंग, ब्युटीशियन, फूड प्रोसेसिंग, कॉम्प्युटर कोर्सेस, एम्ब्रॉयडरी वर्क, टेक्सटाईल प्रिंटिंग, प्लंबिंग, मधुमक्षिका पालन, सोलर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, वेल्डिंग, दुचाकी दुरुस्ती इत्यादी कोर्सेसचा समावेश आहे.

शिवणकाम प्रशिक्षणामध्ये शिवण मशीन चालविण्यापासून फॅशन ब्लाऊज, ड्रेस डिझायनिंगपर्यंत परिपूर्ण प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाते. ब्युटी व वेलनेस कोर्सअंतर्गत बेसिक व ॲडव्हान्स ब्युटिशियन, ब्रायडल मेकअप, नेल आर्ट, मेहंदी आदी प्रशिक्षण देऊन महिलांना स्वतःचे ब्युटी पार्लर सुरू करण्याइतपत सक्षम केले जाते. त्यामुळे अनेक युवतींना विवाहसोहळे, मेकअप व मेहंदीच्या ऑर्डर मिळून रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

**'गाव तिथे प्रशिक्षण' उपक्रम:**

नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील विविध गावांमध्ये संस्थेचे प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत. ग्रामपंचायत इमारती, आदिवासी भागातील केंद्रे, मविप्रच्या शाळा व महाविद्यालयांचा उपयोग प्रशिक्षणासाठी केला जातो. एखाद्या गावात २० प्रशिक्षणार्थींचा गट तयार झाल्यास त्या ठिकाणी प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. प्रशिक्षण कालावधी साधारणतः ६० ते १२० दिवसांचा असतो. प्रशिक्षणादरम्यान व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य विषयक व्याख्याने, कर्ज योजना माहिती शिबिरे आणि यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते. त्यामुळे प्रशिक्षणार्थींचा आत्मविश्वास वाढून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते.

**तृतीयपंथीयांसाठी प्रेरणादायी उपक्रम :**

संस्थेमार्फत तृतीयपंथीयांसाठी ब्युटी पार्लर प्रशिक्षणाचे यशस्वी वर्ग राबविण्यात आले. तृतीयपंथीयांसाठी असे उपक्रम राबविणाऱ्या संस्था कमी आहेत. जन शिक्षण संस्था हे उपक्रम राबवत असल्याचे समाधान आहे. कारण सर्वसामान्यांप्रमाणे या घटकांना देखील स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे आणि हा स्वाभिमान त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्याशिवाय मिळणार नाही. मात्र जगण्याच्या प्रवाहात या घटकांना नेहमी उपेक्षा मिळते, त्यांचा उपहास केला जातो. म्हणूनच या घटकांसाठी हे प्रशिक्षण म्हणजे जगण्याची संधी आहे.

या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या दिलीप गांगुर्डे (दीपा) यांनी वणी रोड, आंबेडकर नगर येथे 'दिव्या ब्युटी पार्लर' सुरू केले. आज त्यांना दरमहा सुमारे २५ ते ३० हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. त्यांच्या यशोगाथेची निवड कौशल्य विकास मंत्रालय, नवी दिल्ली स्तरावर करण्यात आली असून पंतप्रधानांनी 'मन की बात' कार्यक्रमात त्यांचा उल्लेख केला. तसेच 'सरकार आपल्या दारी' कार्यक्रमात मा.

मुख्यमंत्री यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

**फूड प्रोसेसिंग व इलेक्ट्रिशियन, सोलर पी. व्ही. इन्स्टॉलेशन प्रशिक्षण :**

फूड प्रोसेसिंग कोर्स पूर्ण केलेल्या अनेक प्रशिक्षणार्थींनी डिजिटल माध्यमांचा वापर करून ऑनलाइन विक्री सुरू केली आहे. केक, नानकटाई, बिस्किटे व बेकरी उत्पादनांचा व्यवसाय करून अनेकांनी स्वावलंबन प्राप्त केले आहे. सोलर पॅनल जोडणी, इलेक्ट्रिशियन कोर्स पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनी घरगुती उद्योग तसेच इलेक्ट्रिकल दुकाने सुरू करून स्वतःचे उदरनिर्वाहाचे साधन निर्माण केले आहे.

**आदिवासी भागातील बांबू प्रशिक्षण :**

नाशिक जिल्ह्यातील पेठ, हरसूल, देवरगाव, त्र्यंबकेश्वर आणि सुरगाणा या आदिवासी भागात रोजगारासाठी हस्तकला हे महत्त्वाचे साधन ठरू शकते. त्या उद्देशानेच या भागांतील कारागिरांना बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. मशीनरीच्या सहाय्याने तयार होणाऱ्या या वस्तूंना वन विभागाच्या 'अरण्यक' वनधन विक्री केंद्रांमध्ये विक्रीची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

**कारागृहातील बंदिजनांसाठी कौशल्य विकास :**

नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह येथे 'संकल्प' प्रकल्पाअंतर्गत १९८ महिला व पुरुष बंदींना अप्लिक वर्क, बांबू प्रशिक्षण, सुतारकाम, वेल्डिंग, मधुमक्षिका पालन, रोपवाटिका मदतनीस इत्यादी प्रशिक्षण देण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

**धरती आबा जनजातीय कौशल्य विकास केंद्र :**

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात संस्थेला 'धरती आबा' जनजातीय कौशल्य विकास केंद्र मंजूर झाले. संपूर्ण भारतातील केवळ ३० जनशिक्षण संस्थांमध्ये नाशिकची निवड झाली असून महाराष्ट्रातून तीन जन शिक्षण संस्थानबरोबरच नाशिकला पण हा मान मिळाला आहे. ही खूप अभिमानास्पद बाब



आहे.

या केंद्रामार्फत त्र्यंबकेश्वर, पेठ, हरसूल, सुरगाणा, कळवण, अभोणा, इगतपुरी या आदिवासी भागांमध्ये टेलरिंग, ब्युटीशियन, सोलर, प्लंबिंग, संगणक, आरोग्य जनजागृती, सफाई मित्र, अगरबत्ती तयार करणे, बांबू प्रशिक्षण यांसारखे कोर्सेस राबविले जात आहेत. या २०२५-२६ कालावधीत सुमारे ९०० आदिवासी महिला व पुरुषांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. २०२६-२७ या वर्षात गांडूळ खत निर्मिती, कुक्कुटपालन, अगरबत्ती तयार करणे, पापड-लोणचे-मसाला निर्मिती यांसारखे प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. प्रशिक्षणार्थींना उपजीविकेच्या माध्यमातून स्वयंरोजगार व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच त्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे ब्रँडिंग, प्रचार करून त्यांना शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण करून देणे हेच ध्येय आहे.

**सामाजिक संस्थांच्या सहकार्याने उपक्रम :**

- **गुंज फाउंडेशन:** यांच्या आर्थिक सहकार्याने डीजीपी नगर-१ येथील घरेलू कामगार महिला व युवतींना शिवणकाम प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर काही महिलांना शिवण मशीन वाटप करण्यात आल्या, तसेच जिल्हा रुग्णालयातील नवजात बालकांसाठी झबले व लंगोट शिवण्याच्या ऑर्डर्स त्यांना मिळाल्या. त्यामुळे महिलांना नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले.
- **उमंग योजना:** हरसूल, दलपतपूर, हट्टीपाडा आणि चिखलपाडा येथील १६० महिलांना शिवणकाम व फूड प्रोसेसिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. तिथे उमंग योजनेअंतर्गत २७ महिलांना व्यवसायासाठी पाच लाख रुपये खर्च करून साहित्य आले आहे. त्या अंतर्गत आर. एस. फॅशनच्या माध्यमातून गांधी टोपी शिवण्याची मोठी ऑर्डर मिळाली. या उपक्रमामुळे महिला सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली.
- **यश फाउंडेशन:** सातपूर व मालेगाव येथेही यश फाउंडेशनच्या सहाय्याने ४० महिलांना शिवणकाम प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना शिवण मशीन देऊन १५,००० कापडी पिशव्या तयार करण्याची ऑर्डर देण्यात आली. महिलांनी ही ऑर्डर यशस्वीरित्या पूर्ण करून आर्थिक उत्पन्न मिळवले.
- **सोलर व आधुनिक कौशल्य प्रशिक्षण :**

NIESBUD Delhi यांच्या सहकार्याने 'पीएम सूर्यघर योजना' अंतर्गत सोलर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नाशिक जिल्ह्यातील ३० ते ४० प्रशिक्षणार्थींनी या नऊ दिवसीय कार्यशाळेत सहभाग घेतला. सदर प्रशिक्षण विनामूल्य आयोजित करण्यात आले होते. तसेच प्रशिक्षणार्थींना जेवण व निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

**अल्पसंख्याक व पोलीस कुटुंबांसाठी विशेष प्रशिक्षण :**

फैजाने अवलिया फाउंडेशनच्या माध्यमातून



जुन्या नाशिकमधील ८० मुस्लिम महिलांना ब्युटीशियन, शिवणकाम व हँड एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण देण्यात आले. तसेच नाशिक पोलीस आयुक्तालय येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील १२० महिला व युवतींना असिस्टंट ड्रेस मेकर, फॅशन ब्लाऊज, मेहंदी आदी प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर त्यांना उद्योग आधार नोंदणीसाठीही मार्गदर्शन करण्यात आले.

**सामान्यांशी जुळलेली नाळ :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये शिक्षण व आर्थिक पाठबळाचा अभाव असल्यामुळे अल्पकालीन व कमी खर्चिक कोर्सेसकडे मोठ्या प्रमाणावर कल दिसून येतो. जन शिक्षण संस्थानने याच घटकांना केंद्रस्थानी ठेवून कौशल्य विकासाच्या माध्यमातून त्यांना रोजगारक्षम बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. आज संस्था केवळ प्रशिक्षण देणारी संस्था नसून हजारो कुटुंबांच्या स्वावलंबनाचा आधारस्तंभ बनली आहे. महिलांचे सक्षमीकरण, आदिवासी विकास, तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणणे, कारागृहातील बंदीजनांचे पुनर्वसन आणि ग्रामीण युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे या सर्व क्षेत्रांत संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे.

**भविष्यातील योजना :**

जन शिक्षण संस्थान, नाशिक ही संस्था कौशल्य विकासाच्या माध्यमातून समाजातील महिला, युवक-युवती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वावलंबी बनविण्याचे कार्य सातत्याने करत आहे, भविष्यातही अधिक व्यापक स्तरावर कार्य विस्तार करण्याचे संस्थेचे ध्येय आहे. संस्थेच्या पुढील वाटचालीत विविध नव्या उपक्रमांद्वारे रोजगार निर्मिती व उद्योजकता विकासावर विशेष भर दिला जाणार आहे.

संस्थेच्या भविष्यातील महत्त्वपूर्ण योजनांमध्ये महिला बचत गटांची स्थापना करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या बचत गटांच्या माध्यमातून महिलांना लघु उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देऊन




त्यांना व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक आर्थिक व तांत्रिक मदत पुरविली जाणार आहे. तसेच विविध बँकांच्या सहकार्याने कर्ज सुविधा उपलब्ध करून देऊन महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत केली जाणार आहे. यासोबतच प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक-युवतींना नाशिक जिल्ह्यातील अंबड एमआयडीसी परिसरातील विविध कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. इलेक्ट्रिशियन, सोलर टेक्निशियन, कॉम्प्युटर टेक्निशियन यांसारख्या कोर्सेसमधून प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांना औद्योगिक क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा भर असेल.

भविष्यात सोलर कार्यशाळा, हेल्थकेअर, फंडामेंटल क्लाऊड किचन, अगरबत्ती उत्पादन, तसेच इतर अनेक व्यावसायिक प्रशिक्षण कोर्सेस सुरू करून विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण देण्याचे संस्थेचे नियोजन आहे. या प्रशिक्षणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ कौशल्यच नव्हे, तर स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची क्षमता देखील विकसित केली जाईल. याशिवाय उद्योजकांसाठी विशेष सोलर कार्यशाळांचे आयोजन करून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे व व्यवसाय विस्तारासाठी मार्गदर्शन करणे हे देखील संस्थेच्या भविष्यातील उपक्रमांमध्ये समाविष्ट आहे. रोजगार मेळावे आयोजित करून विविध कंपन्या आणि प्रशिक्षणार्थी यांच्यामध्ये थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देण्याचेही नियोजन आहे.

अशा प्रकारे जन शिक्षण संस्थान, नाशिक ही संस्था भविष्यात कौशल्य विकास, रोजगार निर्मिती आणि उद्योजकता विकास या त्रिसूत्रीच्या आधारे समाजातील प्रत्येक घटकाला सक्षम बनविण्याच्या दिशेने ठोस व व्यापक वाटचाल करत राहणार आहे.

जन शिक्षण संस्थान, नाशिकचे मुख्य कार्यालय उत्तम नगर, सिडको बस स्टॉप समोर, कर्मवीर शांताराम कोंडाजी वावरे महाविद्यालयाशेजारी कार्यरत आहे. ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागातील युवक-युवती, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विविध व्यवसायाभिमुख व स्वयंरोजगार आधारित प्रशिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्था सातत्याने करत आहे.

या संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर समाजातील गरजू विशेषतः महिला वर्गासाठी कौशल्यविकास व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यावर भर दिला. टेलरिंग, ब्युटीशियन, फूड प्रोसेसिंग, संगणक प्रशिक्षण, हस्तकला, मेहंदी, फॅशन डिझाईन, बांबू हस्तकला, सोलर प्रशिक्षण अशा अनेक रोजगाराभिमुख कोर्सेसच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. संस्थेच्या उल्लेखनीय कार्याची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली असून संस्थेला अनेक राष्ट्रीय पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. समाजातील वंचित, गरजू आणि बेरोजगार घटकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्थेने केलेले कार्य प्रेरणादायी ठरले आहे. बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य तसेच मविप्र संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे संचालक श्री. राहुल भागिनाथ ठाकरे व सर्व प्रोग्राम स्टाफ समर्पित भावनेने काम करत असून प्रशिक्षणार्थींना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

"कौशल्य विकासातून स्वावलंबन" हे ध्येय समोर ठेवून जन शिक्षण संस्थान, नाशिक समाजातील सर्व घटकांना सक्षम बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यशस्वीरित्या पार पाडत आहे.





# बेरोजगारी: चिंतन आणि कृतीची गरज

**भारतात बेरोजगारी ही केवळ आर्थिक समस्या नव्हे तर मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक परिणाम करणारी गंभीर बाब बनली आहे. अनेक वर्षे शिक्षणक्षेत्रात काम करत असताना समाजाचे निरीक्षण केल्यावर असे दिसते की बेरोजगारीमागची वेदना फक्त पैशाची कमतरता नाही; आत्मसन्मानाची हानी, जीवनाच्या उद्देशाची हरवलेली जाणीव आणि भविष्यातील निराशा हेही त्याचे महत्त्वाचे घटक आहेत.**




**-श्री. विश्वास बापुराव मोरे,**
उपाध्यक्ष, मविप्र समाज, नाशिक


आजच्या काळात शिक्षणातील तीव्र स्पर्धा, पालकांचा अपेक्षांचा दबाव आणि बदलत चाललेला अभ्यासक्रम हे सर्व घटक विद्यार्थ्यांमध्ये तणाव वाढवतात. दीर्घकाळ कष्ट करूनही उपयुक्त नोकरी न मिळणे तरुणांच्या मनात अपयशाची भावना निर्माण करते. पदवी मिळवूनही बेरोजगार राहण्याचा अनुभव त्यांच्या आत्मविश्वासाला हात घालतो. परिणामी चिंता, नैराश्य आणि कधी कधी आत्महत्येचे विचारही उद्भवतात. ही स्थिती वैयक्तिकच नाही तर कुटुंब आणि समाजासाठीही धोकादायक आहे.

अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या सर्वेक्षण अहवालानुसार भारतात २०२६ मध्ये २०-२९ या वयोगटातील पदवीधरांची संख्या जवळपास ०६.३० कोटी इतकी आहे परंतु दुर्दैवाने यात बेरोजगारी  जवळपास ३९.५०  टक्के आहे. ज्यात अभियांत्रिकी व तांत्रिक शिक्षण घेतलेल्या पदवीधरांची संख्याही लक्षणीय आहे.

कौशल्यांच्या अभावामुळे पदवी प्राप्त केल्याबरोबर नोकरी मिळणे कठीण होते. पदवी ते नोकरी यात एका वर्षाहून जास्त कालावधी लोटल्यास परिस्थितीजन्य नैराश्य या तरुणांमध्ये निर्माण होते. काही प्रसंगी कमी, तुटपुंज्या पगाराची नोकरी स्वीकारणे अपरिहार्य होते. नोकरी नसल्यामुळे कौटुंबिक जीवनावरही प्रतिकूल परिणाम होतो. विवाह, घरगुती स्थिरता आणि मुलांच्या भविष्याशी संबंधित निर्णय उशीरा होतात किंवा थांबतात. आर्थिक अस्थिरतेमुळे घरातील तणाव वाढतो, नातेसंबंध खराब होतात आणि एकल पालक किंवा दुर्गम भागातील घरांमध्ये परिस्थिती अधिक बिकट होते. समाजात आर्थिकदृष्ट्या अवलंबून नसलेल्या व्यक्तींना द्वितीय दर्जाची वागणूक मिळण्याचा अनुभव देखील त्यांना खालच्या पातळीवर ढकलतो.

बेरोजगारी आणि गुन्हेगारी किंवा व्यसन यांच्यातील संबंध देखील चिंताजनक आहे. रोजगार नसल्याने काही तरुण अयोग्य मार्गांकडे वळतात, गुन्ह्यात सहभाग वाढतो. राष्ट्रीय आकडेवारीनुसार बेरोजगारीमुळे अनेक आत्महत्याचे प्रकार घडत आहेत. हा आकडा आपण गंभीरपणे घ्यायला हवा; कारण ती तरुण पिढी आपल्या देशाच्या भविष्याची हमी आहे.

यावर उपाय शोधण्यासाठी शैक्षणिक व्यवस्थेत आमूलाग्र बदल करणे अनिवार्य आहे. फक्त पदवी देणे हे करिअर नाही; विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये, उद्योजकता आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या दिशेने पावले उचलत आहे; परंतु धोरणे केवळ कागदावरून निघून पोहोचली नाही तर ती प्रत्यक्षात समृद्ध आणि परिणामकारक पद्धतीने अमलात आणणे आवश्यक आहे.

याच दृष्टीने मविप्र-सीआयआय सारख्या संस्थांचे काम विशेष महत्त्वाचे ठरते. आम्ही गेल्या चार वर्षांपासून सुरू केलेले रोजगाराभिमुख प्रशिक्षण, पॉलिटेक्निक व आयटीआयतील आधुनिक अभ्यासक्रम, प्रयोगशाळा आणि दर्जेदार प्रशिक्षक हे तरुणांना भविष्यातील रोजगारासाठी सज्ज करतात. विनामूल्य प्रशिक्षण आणि स्थानिक पातळीवर ज्या लोकांना संधी कमी मिळते त्यांना आधार मिळणे हा या उपक्रमांचा मोठा फायदा आहे.

*(उर्वरित पान क्र. ३५ वर)*

# कौशल्य ते करिअर व्हाया प्लेसमेंट



**मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर-**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने गेल्या दोनतीन वर्षात विद्यार्थीकेंद्रित, उद्योग व रोजगाराभिमुख आणि कौशल्यविकासक धोरण स्वीकारले आहे. आद्य कर्मवीरांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अथक प्रयासाने जिल्हाभर विविध विद्याशाखांचे जाळे विणले. त्यातून अनेक ज्ञानसंपन्न पिढ्या घडल्या. राष्ट्र सूत्रधार निर्माण झाले. पारंपरिक शिक्षणाला व्यवसाय शिक्षणाची जोड देखील दिली गेली. त्यातून अभियंते, स्थापत्य विशारद, डॉक्टर्स, उद्योजक, शिक्षक, कलावंत घडू लागले. उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती अशी स्थिती कधी आली ते कळाले देखील नाही. तीस चाळीस वर्षांपूर्वी शिक्षणाचे अल्प प्रमाण असल्यामुळे सर्वच क्षेत्रात नोकऱ्यांची सहज उपलब्धता होती. पण विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात कामगार नोकरदार यांची जागा यंत्राने घेतली. तंत्र शिक्षणाची निकड भासू लागली. सर्वच क्षेत्रात अकुशल नोकर कपातीचा धडाका सुरू झाला. दुसरीकडे दरवर्षी विद्यापीठांमधून पदवीधरांचे लोंढे बाहेर पडतच होते. या सर्व हातांना काम हवे होते. गुणवंतांना ते मिळत होते पण उरलेल्यांचे काय? वाढती बेरोजगारी, कौशल्याचा अभाव, नोकऱ्यांची वाणवा या चक्रव्यूहात अडकलेल्या पदवीधरांना ज्ञानाच्या उपयोजनासाठी अपेक्षित पर्यायांची गरज भासू लागली. मविप्र समाज संस्थेत मर्यादित स्वरूपात व आवश्यकतेनुसार सभासद पाल्य व अनेक गरजू अभ्यासूंना नोकरी मिळत होती. संस्थेच्या महाविद्यालयांतून हजारो पदवीधर तयार होत होते परंतु त्यांना नोकरीसाठी खास व्यासपीठ नव्हते. तरुणाईचा व्यवस्थेवरील विश्वास उडायला हेही कारण पुरेसे ठरत होते.

या पार्श्वभूमीवर मविप्र समाजाच्या विद्यमान कार्यकारी मंडळाने मविप्रचा " नोकरी देणारी संस्था " असा नावलौकिक निर्माण करण्याचा निर्णय घेतला. श्री. राजीव बाबुराव ठाकरे आणि श्री. विवेक भामरे यांनी भारतीय उद्योग महासंघ (CII) नाशिक झोनचे माजी अध्यक्ष श्री. जॉय अलुर यांच्याशी असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधांच्या बळावर मविप्रच्या माध्यमातून कार्यकारी मंडळाने CII मधील विविध कंपन्या आणि मराठा विद्या प्रसारक समाज संस्था यांच्या अंतर्गत MOU घडवून आणण्यात यश मिळवले. हजारो पदवीधरांसाठी रोजगाराचे व नोकरीचे नवीन प्रवेशद्वार खुले झाले. घेतलेल्या शिक्षणाचे चीज झाले. कर्मवीरांचे रोजगाराचे स्वप्न सत्यात आले.

संस्थेचे माजी सरचिटणीस कर्मवीर ॲड. बाबुराव गणपतराव ठाकरे यांचे २०२५-२६ हे जन्मशताब्दी वर्ष आहे. ते मविप्र संस्था व नाशिक वकील संघामध्ये कार्यरत असताना



**-श्री. देवराम बाबुराव मोगल**
उपसभापती, मविप्र समाज, नाशिक

नाशिक महानगरपालिका, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), महिंद्रा अँड महिंद्रा लि. , जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, जिल्हा परिषद नाशिक, करन्सी नोट प्रेस नाशिकरोड आदी संस्थांवर लीगल ॲडव्हायझर म्हणून कार्यरत होते. त्यामुळे त्यांचा जिल्हाभर मोठा जनसंपर्क होता. या सर्व सेवाभावी संस्थांमध्ये त्यांनी जिल्ह्यातील हजारो पदवीधरांना मोफत नोकऱ्या मिळवून दिल्या. त्यांची जीवने उभी केली. त्यांच्या कार्याचे हे वेगळेपण लक्षात घेऊन संस्थेचे स्वतंत्र मध्यवर्ती रोजगार केंद्र असावे या हेतूच्या पूर्तीसाठी संस्थेने कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटरची स्थापना केली.

**खालील उद्दिष्टपूर्तीसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर कटिबद्ध आहे:**

- विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी आवश्यक कौशल्य विकास, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, गटचर्चा (GD) आणि मुलाखत (Interview) आदी प्रशिक्षणे देणे.
- सभासद पाल्य, आजी-माजी सेवकांचे पाल्य, आजी-माजी विद्यार्थी, संस्था हितचिंतकांचे पाल्य व पदवीधरांना नोकरी मेळावे व कॅम्पस प्लेसमेंटद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध करून देणे.
- CII आणि मविप्रसंस्था यांच्यातील सामंजस्य करारा अंतर्गत उत्तम प्रशिक्षण देऊन देशांतर्गत नोकऱ्यांबरोबरच परदेशात नोकऱ्यांसाठी पदवीधरांची मानसिकता बनवणे. त्यासाठी विशेष प्रशिक्षणांचे आयोजन करणे.
- विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप संधी व करिअर मार्गदर्शन व समुपदेशन करणे.
- उद्योजकता आणि स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.

या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आजवर CII आणि मविप्र संस्थेच्या या सेंटरच्या माध्यमातून सुमारे सव्वाशे नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे ६००० हून अधिक पदवीधरांना मेळाव्यास्थळी जागेवर ऑफर लेटर देण्यात आले.

या उपक्रमाची सुरुवात करण्यापूर्वी CII–Model Career Centre, Nashik यांच्या वतीने नाशिक शहरातील विविध महाविद्यालयांचे सविस्तर सर्वेक्षण करण्यात आले. महाविद्यालयांतील विद्यार्थीसंख्या, उपलब्ध मनुष्यबळ आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी यांचा अभ्यास केल्यानंतर मराठा विद्या प्रसारक समाजाच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकची भागीदार संस्था म्हणून निवड करण्यात आली. सामंजस्य करारादरम्यान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प, उद्योग-संलग्न प्रशिक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम, प्लेसमेंट ड्राइव्ह, करिअर मार्गदर्शन आणि रोजगारनिर्मिती यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या उपक्रमांचा मोठा लाभ मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विद्यार्थ्यांना मिळणार असून भविष्यातही हा लाभ अधिक व्यापक स्वरूपात मिळत राहील.

पुढील वर्षभरात १०वी, १२वी, पदवी आणि पदव्युत्तर झालेल्या पात्र अशा पंचवीस हजार विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट मराठा विद्या प्रसारक समाज आणि सी. आय. आय मॉडेल करिअर सेंटर यांनी संयुक्तपणे निश्चित केले असून, ते यशस्वीपणे पूर्ण करण्याचा दृढ संकल्प करण्यात आला आहे.

सी. आय. आय मॉडेल करिअर सेंटरमार्फत नाशिक जिल्ह्यातील युवक-युवतींना पूर्णपणे मोफत रोजगार सेवा, करिअर मार्गदर्शन, कौशल्य प्रशिक्षण आणि विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी अधिक सुलभ पद्धतीने उपलब्ध होत आहेत. या मेळाव्यांसाठी कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जात नाही. तसेच केवळ मविप्र संस्था संचालित महाविद्यालयांपुरते हे मेळावे मर्यादित नाहीत. त्यामुळे मागेल त्याला नोकरी हे ब्रीद घेऊनच मेळावे आयोजित होत आहेत. जिल्हाभरातील युवक युवतींसाठी ही सोनेरी संधी यातून मिळत आहे.

थोडक्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास, प्रशिक्षण आणि रोजगाराच्या सुवर्णसंधी निर्माण करणारा सक्षम व उद्योगाभिमुख असे हे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर आहे. ज्याचे लाभार्थी सभासद, शुभचिंतक व सेवक पाल्य, माजी विद्यार्थी पाल्य, आजी विद्यार्थी आणि अठरापगड जातीचे गरजू पदवीधर असणार आहे.

त्यामुळे चला पदवीधरांनो, कौशल्यातून करिअर करूया आणि करिअर मधून यशाची प्राप्ती करूया अर्थात नोकरी आणि उद्योगाचे मानकरी होऊया. आत्मनिर्भर होऊन राष्ट्र निर्माणाला हातभार लावूया. . . .

# गावच्या मातीला रोजगाराचा सुगंध



**-श्री. दिलीप सखाराम दळवी**
चिटणीस, मविप्र समाज, नाशिक

**ग्रामीण भाग म्हटलं की डोळ्यांसमोर शेत, मळा, गावच्या वेशीलगतची झाडे, गुरेढोरे आणि साधे सरळ जीवन उभे राहते. अलीकडे गावात शहरी जाणिवांचे अथवा आधुनिकतेचे वारे वाहतेय हे जरी खरे असले तरीही या सगळ्या गावगाड्याच्या, वाड्यावस्त्यांच्या चित्रामागे आज तिथल्या तरुणांच्या शिक्षणाचा आणि रोजगाराचा एक मोठा प्रश्न उभा आहे. सटाणा, मालेगावसह नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात हुशार आणि कष्टाळू मुले-मुली मोठ्या संख्येने आहेत. परिस्थितीशी दोन हात करत ही मुले शिक्षण घेतात, जिद्दीने पदव्या मिळवतात; पण शिक्षण पूर्ण झाल्यावर अपवाद वगळता पुढे काय, हा प्रश्न त्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या डोळ्यांसमोर आवासून उभा राहतो.**

आपल्या भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. पण शेतीवर सगळ्यांचे पोट चालेलच असे नाही. पावसाचे गणित, बाजारभावाची अनिश्चितता आणि वाढता खर्च यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेऊन काहीतरी वेगळे करण्याची इच्छा असते. काही जण शहराकडे वळतात. काही पुणे, मुंबई, नाशिक अशा शहरांमध्ये नोकरीच्या किंवा करिअरच्या शोधात जातात. काहींना परदेशातील जग खुणावते तर काही जण गावातच राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करत बसतात किंवा शेतीमध्ये स्वतःला जुंपून घेतात.यामागे अनेक वेळा योग्य मार्गदर्शन, योग्य माहिती आणि नोकरीच्या संधी यांचा अभाव हे कारण स्पष्ट जाणवत राहते.

ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांची मानसिकता समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गावाकडच्या अनेक मुलांना शिकायची इच्छा असते, पण आपल्याला नेमकं काय करायचं, कोणत्या क्षेत्रात संधी आहेत, त्यासाठी कोणत्या कौशल्याची गरज आहे, याची माहिती नसते. काही विद्यार्थ्यांना वाटते की सरकारी नोकरी मिळाली तरच आयुष्य स्थिर होईल. त्यामुळे अनेक वर्षे मोठ्या शहरांत ते स्पर्धा परीक्षांच्या तयारीत खर्ची घालतात.त्यातील निवडकांच्या हाती यशाची माळ पडते.बाकीच्यांचे काय?हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. सरकारी नोकरी मिळाली नाही की मग पुढं काय करायचे ? याचे उत्तर त्यांच्या हातात नसते.

दुसरीकडे काही विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडतात; पण या पदवीचा उपयोग नेमका कुठे करायचा? कंपनीत मुलाखत कशी द्यायची, स्वतःची ओळख कशी करून द्यायची? बायोडाटा कसा तयार करायचा? इंग्रजी किंवा संगणकाचे ज्ञान किती असावे ? याबाबत त्यांना अडचणी येतात. परिणामी, "आपल्याला नोकरी मिळणार नाही.ते आपले काम नाही.ते आपल्याला जमणार नाही" असा न्यूनगंड त्यांच्या मनात निर्माण होतो. काही जण तर शिक्षण झाले तरी पुन्हा शेती किंवा छोट्या-मोठ्या कामाकडे वळतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाबरोबरच रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांच्या दारांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील युवकांसमोर आणखी एक मोठी अडचण म्हणजे नोकरीसाठी घरापासून आणि गावापासून दूर जावे लागणे होय. अनेक मुले-मुली नोकरीच्या शोधात पुणे, मुंबई किंवा देशातील इतर मोठ्या शहरांकडे जातात. पण तिथे राहण्याचा खर्च, जेवणाचा खर्च, प्रवासाची अडचण आणि अनोळखी



शहरात राहण्याची भीती यामुळे अनेक जण नोकरीची संधी असूनही मागे हटतात. विशेषतः मुलींना सुरक्षित निवास आणि कुटुंबापासून दूर राहण्याची चिंता अधिक असते. त्यामुळे आपल्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा यावरचा एक चांगला उपाय ठरू शकतो. मालेगाव आणि नाशिक परिसरातील कंपन्यांना रोजगार मेळाव्यांमध्ये सहभागी करून घेतले, तर स्थानिकांना रोजगार या तत्त्वानुसार युवकांना घरापासून फार दूर न जाता नोकरी मिळू शकते. त्याचबरोबर कंपन्यांनी जवळच्या ग्रामीण भागातून येणाऱ्या युवकांसाठी बसची सुविधा, सुरक्षित वसतिगृह किंवा निवासाची व्यवस्था केली, तर ही अडचण आणखी कमी होईल. घराजवळ नोकरी मिळाली तर युवकांचा प्रवासाचा वेळ आणि खर्च वाचेल, कुटुंबाची साथ मिळेल आणि नोकरी टिकवून ठेवण्याचे प्रमाणही वाढेल. अधिकच्या देश विदेशातील मोठ्या संधी मिळण्यासाठी त्याच्या कुटुंबाची मानसिकता तयार व्हायला मदत होईल. त्यामुळे रोजगार मेळावे हे केवळ नोकरी देणारे उपक्रम न राहता, युवक आणि उद्योग यांच्यातील अंतर कमी करणारे प्रभावी माध्यम ठरू शकतात.

याच विचारातून मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटरच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले रोजगार मेळावे ग्रामीण भागातील युवकांसाठी आशेचा किरण ठरत आहेत. रोजगार मेळावा म्हणजे फक्त एका ठिकाणी कंपन्या बोलावून मुलाखती घेणे आणि नोकऱ्या देणे एवढंच नाही. तर हा ग्रामीण भागातील युवक आणि उद्योगविश्व यांच्यातला एक महत्त्वाचा दुवा आहे. गावाकडच्या पोराला नोकरीसाठी पुण्या-मुंबईला धावपळ करावी लागू नये, कंपनी कुठं आहे, तिथं अर्ज कसा करायचा, मुलाखत कशी द्यायची, यासाठी वणवण फिरावे लागू नये, यासाठी असे रोजगार मेळावे मोठं काम करतात. एकाच ठिकाणी अनेक कंपन्या येतात. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांतील नोकरीच्या संधी समजतात.स्वतःच्या क्षमता समजतात. आपल्या शिक्षणाला आणि कौशल्याला कोणती नोकरी योग्य आहे, याची कल्पना येते.

याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनातला "आपल्याला नोकरी मिळणार नाही" हा गैरसमज दूर होतो. आपल्या गावाजवळ, आपल्या आणि शेजारच्या,जिल्ह्यात आणि आपल्या राज्यातही चांगल्या संधी आहेत, हे त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून कळतं. एखाद्या विद्यार्थ्याला पहिल्याच प्रयत्नात नोकरी मिळाली नाही तरी तो निराश न होता पुढच्या मुलाखतीसाठी स्वतःला तयार करू लागतो. हे रोजगार मेळावे विद्यार्थ्यांना नोकरी देतातच, पण त्याचबरोबर नोकरी मिळवण्यासाठी काय करावे लागते, हेही शिकवतात.

अशा मेळाव्यांमुळे पालकांच्या विचारांतही बदल होतो. "माझ्या मुलाला नोकरीसाठी मोठ्या शहरातच जावे लागेल" असं वाटणाऱ्या पालकांना आपल्या परिसरातही रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत, याची जाणीव होते. मुलगा किंवा मुलगी स्वतःच्या पायावर उभी राहते, घरच्यांना हातभार लावते आणि आत्मविश्वासाने आयुष्य जगते, याचा आनंद पालकांना मिळतो.




याशिवाय रोजगार मेळावे विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्वही समजावून देतात. आजच्या काळात केवळ पदवी पुरेशी नाही. संगणकाचे ज्ञान, संवादकौशल्य, इंग्रजीचे मूलभूत ज्ञान, तांत्रिक कौशल्य, टीममध्ये काम करण्याची सवय आणि मुलाखतीला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास या गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या कौशल्यांची गरज समजते आणि त्यानुसार स्वतःमध्ये बदल करण्याची प्रेरणा मिळते.

सटाणा, मालेगाव आणि नाशिक परिसरातील युवकांमध्ये क्षमता कमी नाही. उलट, ग्रामीण भागातली मुले परिस्थितीशी झगडून पुढे आलेली असतात. कष्ट करण्याची तयारी, जिद्द आणि शिकण्याची इच्छा त्यांच्या अंगात असते. गरज असते ती फक्त योग्य दिशा दाखवणाऱ्या हाताची. ही दिशा जर शिक्षणसंस्था, उद्योग आणि समाज यांच्या एकत्रित प्रयत्नातून मिळाली, तर आपल्या भागातील हजारो तरुणांचं आयुष्य बदलू शकतं.

आज रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच त्या संधी युवकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे . "नोकरी नाही" असं म्हणून हातावर हात ठेवून बसण्यापेक्षा "आपल्याला काय शिकता येईल आणि कोणत्या क्षेत्रात पुढे जाता येईल?" असा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. त्यासाठी मविप्र स्थापित कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटरसारख्या उपक्रमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

गावाकडच्या पदवीधरांच्या डोळ्यांत मोठी स्वप्ने आहेत. कुणाला चांगली नोकरी हवी आहे, कुणाला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे, तर कुणाला आई-वडिलांना सुखात ठेवायचे आहे. ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्यांना संधीची गरज आहे. रोजगार मेळावे ही संधी त्यांच्या जवळ घेऊन येतात.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की , ग्रामीण भागातील युवकांना फक्त रोजगाराची गरज नाही, तर त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवणाऱ्या व्यवस्थेची गरज आहे. योग्य शिक्षण, योग्य कौशल्य आणि योग्य वेळी मिळालेली रोजगाराची संधी मिळाली, तर सटाणा, मालेगाव आणि नाशिकच्या ग्रामीण भागातील हीच पदवीधर पोरं उद्याच्या महाराष्ट्राची ताकद बनतील. त्यांच्या हाताला काम आणि डोळ्यांत स्वप्नं असतील.नोकरी आणि शिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू बनतील.परिणामी आपल्या गावाचा आणि आपल्या समाजाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. ■



# नव्या युगाचे शिक्षणः कौशल्य ते रोजगार

**मानवी कल्याण,उज्ज्वल भविष्य घडण,भाषा,कला व संस्कृती जतन, तंत्रज्ञान उपयोजन ,सामाजिक परिवर्तन यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या २०३० च्या कृती कार्यक्रमातील चौथ्या उद्दिष्टामध्ये सर्वांसाठी समावेशक, समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षण ही केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे आणि समाजाच्या प्रगतीचे प्रभावी साधन आहे. याच व्यापक दृष्टिकोनातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने भारतीय शिक्षणव्यवस्थेसमोर नवी दिशा ठेवली आहे. ज्ञानासोबत कौशल्य आणि कौशल्यातून रोजगारनिर्मिती हा या दिशेचा नवा केंद्रबिंदू आहे.**

आजच्या बदलत्या रोजगारविश्वात शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी ही मोठी चिंता आहे. पदवीधारकांची संख्या वाढत असताना उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये असलेले मनुष्यबळ उपलब्ध होणे हे आव्हान आहे. त्यामुळे शिक्षण घेतल्यानंतरही अनेक युवकांना रोजगारासाठी मोठा संघर्ष करावा लागतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणपद्धती अधिक व्यावहारिक, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने ही गरज ओळखून शिक्षणाला कौशल्यांशी जोडण्यावर भर दिला आहे.

या धोरणातील व्यावसायिक शिक्षणाचा मुख्य प्रवाहाशी समन्वय हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांना लहान वयापासून विविध कौशल्यांची ओळख व्हावी, प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा आणि स्थानिक गरजांशी संबंधित व्यवसायांचे प्रशिक्षण मिळावे, हा त्यामागील व्यापक उद्देश आहे. अजूनही मुख्य प्रवाहातील शिक्षणापेक्षा व्यावसायिक शिक्षण हे हलक्या दर्जाचे मानले जाते. त्या त्यादृष्टीने गुणवत्तापूर्ण व्यावसायिक शिक्षणाचे उच्च शिक्षणात एकात्मीकरण करण्याचे धोरण आहे. या धोरणानुसार प्रत्येक मुलगा मुलगी किमान एक व्यवसाय शिकेल आणि इतर अनेक

व्यवसायांची त्याला ओळख करून दिली जाईल. व्यावसायिक क्षमतांचा विकास शैक्षणिक किंवा इतर क्षमतांच्या विकासाबरोबरच केला जाईल. शाळांमध्ये हब आणि स्पोक मॉडेल नुसार कौशल्य प्रयोगशाळांची स्थापना व निर्मिती केली जाईल. उच्च शिक्षण संस्था स्वतःहून किंवा उद्योग आणि स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीने व्यावसायिक शिक्षण देतील. बहुशाखीय पदवी अभ्यासासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात येतील. व्यावसायिक शिक्षणाच्या एकात्मीकरणासाठी राष्ट्रीय समिती NCIVE उद्योगक्षेत्राच्या सहकार्याने स्थापन केली जाईल. ज्यामुळे व्यावसायिक शिक्षणाचा आवाका वाढेल.

भविष्यात स्वतंत्र शेती , कायदा , आरोग्यशास्त्र , तांत्रिक आदी विद्यापीठे बहुशाखीय शिक्षण देणाऱ्या संस्था बनतील. त्यामुळे व्यावसायिक शिक्षण हे उच्च शिक्षण व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग बनेल.कृषी शिक्षणाची रचना ही व्यावसायिक दृष्टिकोनातून केली जाईल. त्यामुळे त्या संस्थांचा स्थानिक समुदायाला थेट फायदा होईल. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, स्थापत्यकला, नगररचना औषधनिर्माण, हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये उच्च पात्रता असलेल्या मनुष्यबळाची खूप मागणी असेल. एवढेच नव्हे तर या क्षेत्रांमधील नाविन्यपूर्ण उपक्रमाने संशोधनाला चालना देण्यासाठी उद्योगधंदे आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये अधिक चांगल्या सहकार्याची सुद्धा आवश्यकता निर्माण होईल. याशिवाय सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता, 3D मशिनिंग,बिग डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग इत्यादी वेगाने प्रगती करणाऱ्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये व्यावसायिक तयार करण्यात भारताने आघाडी घेणे आवश्यक असेल अशा व्यावसायिक शिक्षणविषयक खास बाबी या धोरणात नमूद करण्यात आलेल्या आहेत.त्यातून कौशल्य शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते.त्यासाठी शिक्षणसंस्थांनी या सर्वच क्षेत्रातील उद्योगाच्या संधी शोधल्या पाहिजे.देशविदेशातील उद्योगजगताशी संवाद वाढवून विद्यार्थ्यांना बदलत्या रोजगारक्षेत्राची ओळख करून देणे ही आजची गरज बनली आहे.

कोणतीही प्रगत शिक्षण संस्था अथवा ज्ञानकेंद्रे कौशल्य विकासातून रोजगारापर्यंत पोहोचण्यासाठी उद्योग-शैक्षणिक संस्थांशी करार, अभ्यासक्रमात अनुभव व कौशल्याधारित शिक्षण समावेश , स्किल डेव्हलपमेंट कार्यशाळा आयोजन, भाषा व संवाद कौशल्य विकास,रोजगाराभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम, स्टार्टअप आणि उद्योजकता प्रोत्साहन, NSS, NCC, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम, करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंट सेल आदी मार्गांचे



**प्राचार्य डॉ.दिलीप पुंडलिक पवार**
कार्यकारी संपादक, मविप्र पत्रिका

प्रभावी अवलंबन करू शकते.

याच भूमिकेचे प्रभावी कृतिशील उदाहरण म्हणून मराठा विद्या प्रसारक समाजाने गेल्या चार वर्षांत राबविलेल्या विद्यार्थी कौशल्यविकास उपक्रमांकडे पाहता येते. विद्यार्थ्यांच्या केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर भर न देता त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ व्हावी, विविध कौशल्यांची ओळख व्हावी आणि बदलत्या रोजगारविश्वासाठी त्यांना तयार करता यावे, या उद्देशाने संस्थेने कौशल्यविकासाला शिक्षणाचा अविभाज्य भाग बनविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार करीत तांत्रिक, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्याचे नैपुण्य अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांसाठी कौशल्यवाढीच्या संधी उपक्रमांद्वारे उपलब्ध केल्या आहेत.

कौशल्यविकास, रोजगार मेळावे, करिअर मार्गदर्शन, उद्योजकांशी संवाद, व्यावसायिक प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांना रोजगाराच्या प्रत्यक्ष संधी उपलब्ध करून देणे, अशा विविध माध्यमांतून हा उपक्रम अधिक प्रभावी करण्यात आला आहे. विशेषतः कौशल्यविकासातून रोजगारनिर्मितीकडे जाणारा आत्मनिर्भरतेचा मार्ग विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट करण्याचे काम या उपक्रमांतून झाले आहे. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील 'शिक्षणातून कौशल्य आणि कौशल्यातून रोजगार' या संकल्पनेला संस्थात्मक पातळीवर प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाली आहे.

विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य शिक्षण परिवर्तनकारी ठरू शकते. प्रत्येक विद्यार्थ्याला मोठ्या शहरात जाऊनच रोजगार मिळेल असे नाही. स्थानिक उद्योग, शेतीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, सेवा क्षेत्र आणि स्वयंरोजगाराच्या संधींशी शिक्षण जोडले, तर गाव आणि तालुका पातळीवरच रोजगारनिर्मितीची नवी केंद्रे उभी राहू शकतात. त्यामुळे कौशल्य विकास हा केवळ रोजगार मिळविण्याचा मार्ग नसून स्थानिक अर्थव्यवस्था बळकट करण्याचे साधनही ठरतो.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि नव्या उद्योगव्यवस्थेमुळे रोजगाराचे स्वरूप वेगाने बदलत आहे. त्यामुळे केवळ पारंपरिक ज्ञान पुरेसे राहिलेले नाही. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता, संवादकौशल्य, डिजिटल साक्षरता, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि संघभावना विकसित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. भविष्यातील रोजगार बाजारपेठेत यशस्वी होण्यासाठी 'काय शिकले?' यापेक्षा 'काय करता येते?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शिक्षणाच्या संधींमध्ये समानता निर्माण करण्याचा प्रयत्न. विद्यार्थी शहरात राहतो की दुर्गम खेड्यात, आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे की वंचित घटकातून येतो, यावर त्याच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी अवलंबून राहू नयेत. उपेक्षित, वंचित आणि अल्पप्रतिनिधित्व असलेल्या समूहांना विशेष संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची सामाजिक जबाबदारी आहे.

मात्र कोणतेही धोरण कितीही व्यापक असले तरी त्याची खरी कसोटी अंमलबजावणीत असते. शाळा-महाविद्यालयांमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, प्रशिक्षित मनुष्यबळ, उद्योगांशी भागीदारी, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि रोजगाराशी जोडलेली अभ्यासक्रमरचना आवश्यक आहे. शिक्षणसंस्था, उद्योग, शासन आणि समाज यांनी एकत्रितपणे काम केल्याशिवाय कौशल्याधारित शिक्षणाची संकल्पना पूर्णत्वाला जाणार नाही. मविप्रसारख्या संस्थांनी गेल्या काही वर्षांत घेतलेला कौशल्यविकासाचा पुढाकार या सामूहिक प्रयत्नांना दिशादर्शक ठरतो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे केवळ शिक्षणातील बदलांचे धोरण नाही; ते भारताच्या युवा शक्तीला सक्षम, आत्मनिर्भर आणि रोजगारक्षम बनविण्याचे राष्ट्रीय अभियान आहे. ज्ञान, कौशल्य आणि मूल्ये यांचा समन्वय साधणारी शिक्षणव्यवस्था उभी राहिली, तर विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारे न राहता नोकरी निर्माण करणारे उद्योजकही बनतील.

खऱ्या अर्थाने शिक्षणाचे अंतिम यश पदवीत नसून स्वावलंबी, सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्यात आहे. 'कौशल्यातून रोजगार' आणि 'रोजगारातून आत्मनिर्भरता' ही दिशा भारताच्या शैक्षणिक परिवर्तनाची पुढची निर्णायक पायरी ठरू शकते. आणि या परिवर्तनाच्या वाटचालीत मराठा विद्या प्रसारक समाजाने विद्यार्थी कौशल्यविकासाच्या माध्यमातून उचललेले पाऊल हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांना स्थानिक पातळीवर कृतीची जोड देणारे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.म्हणूनच ते बेरोजगार युवकांना उज्ज्वल भवितव्याच्या दिशेने नेणारे क्रांतिकारक पाऊल ठरत आहे. एवढेच नव्हे तर कौशल्य विकासातून रोजगाराकडे जाणारी मळवाट पक्की करीत आहे.

# शिक्षणापासून रोजगारापर्यंत

**शंभर वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील बहुजन समाजासमोरचा सर्वांत मोठा प्रश्न कोणता होता? दारिद्र्य? होय. सामाजिक विषमता? होय. संधींचा अभाव? तोही होता. पण या सगळ्या प्रश्नांच्या मुळाशी एकच गोष्ट होती—शिक्षणाचा अभाव. शिक्षणाची दारं सर्वांसाठी खुली नव्हती. गावातील शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाजातील मुलामुलींसाठी शिक्षण ही अनेकदा कल्पनेपलीकडची गोष्ट होती. त्या काळात काही दूरदृष्टीच्या समाजधुरीणांनी एक सत्य ओळखलं—समाज बदलायचा असेल, तर शाळा उभाराव्या लागतील; भविष्य घडवायचं असेल, तर शिक्षण घराघरांत पोहोचलं पाहिजे.**

याच अस्वस्थतेतून मराठा विद्या प्रसारक समाजाचा जन्म झाला. ही केवळ संस्था नव्हती; ती समाजपरिवर्तनाची चळवळ होती. कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर गणपतदादा मोरे, डी. आर. भोसले, कर्मवीर काकासाहेब वाघ आणि त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांनी शिक्षणाला दानधर्म म्हणून नाही, तर सामाजिक न्यायाचं सर्वांत प्रभावी साधन म्हणून स्वीकारलं. साधनं नव्हती, पैसा नव्हता, सरकारी पाठबळ नव्हतं; पण मनात एक ध्यास होता— बहुजन समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचलं पाहिजे. त्या ध्यासाला तळमळ होती, पोटतिडीक होती आणि समाजाविषयी अपार प्रेम होतं. म्हणूनच त्या काळात उभारलेलं छोटंसं रोपटं आज शेकडो शैक्षणिक संस्थांच्या विशाल वटवृक्षात रूपांतरित झालं आहे.

परंतु समाजकारणाचं वैशिष्ट्य असंच असतं. ते एका युगापुरतं मर्यादित राहत नाही. प्रत्येक काळ नवे प्रश्न घेऊन उभा राहतो आणि प्रत्येक पिढीला त्या प्रश्नांची उत्तरं शोधावी लागतात. एकेकाळी शिक्षणापासून वंचित राहणं ही सर्वांत मोठी शोकांतिका होती. आज परिस्थिती बदलली आहे. शिक्षणाची दारं खुली झाली आहेत. लाखो विद्यार्थी पदवीधर होत आहेत. पण शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन्मानजनक रोजगार मिळवणं हा नव्या काळातील तितकाच गंभीर सामाजिक प्रश्न बनला आहे. म्हणूनच आजची लढाई शिक्षणासाठी नाही; तर शिक्षणाला रोजगाराशी जोडण्याची आहे.

आज ग्रामीण भागात एखाद्या घरात मुलगा किंवा मुलगी पदवीधर होते, तो दिवस त्या कुटुंबासाठी दिवाळीपेक्षा कमी नसतो. प्रमाणपत्र हातात घेऊन स्टेजवर उभा असलेला विद्यार्थी एकच असतो; पण त्या प्रमाणपत्रावर अनेक अदृश्य स्वाक्षऱ्या असतात. आईच्या त्यागाची... वडिलांच्या घामाची... भावंडांच्या समजुतीची... आणि संपूर्ण कुटुंबाच्या संघर्षाची. अनेकदा आईने स्वतःसाठी साडी घेतलेली नसते. वडिलांनी शेतीसाठी लागणारी नवीन अवजारे पुढच्या वर्षावर ढकललेली असतात. घरातलं सोनं गहाण ठेवलं गेलेलं असतं. शिक्षणासाठी कर्ज घेतलेलं असतं. एका मुलाच्या पदवीमध्ये त्याचं शिक्षण जितकं असतं, तितकाच त्या घराचा त्यागही मिसळलेला असतो.




म्हणूनच पदवीदान समारंभ संपला की त्या घरात फक्त आनंद नसतो; एक नवं स्वप्न जन्माला येतं. आता दिवस बदलतील... आता घराला हातभार लागेल... आता आईच्या चेहऱ्यावरची काळजी कमी होईल... आता वडिलांच्या कष्टांना अर्थ मिळेल... या अपेक्षा अवास्तव नसतात. त्या आयुष्यभर केलेल्या संघर्षाचं स्वाभाविक स्वप्न असतं.

पण वास्तव अनेकदा वेगळंच असतं. पदवी मिळते... आणि सुरू होतो प्रतीक्षेचा प्रवास. रेझ्युमे तयार होतो. अर्ज भरले जातात. मुलाखती दिल्या जातात. प्रत्येक सकाळ एका नव्या आशेने उगवते. प्रत्येक फोन वाजला की वाटतं—कदाचित कंपनीचा असेल. प्रत्येक ई-मेल उघडताना हृदयाची धडधड वाढते. सुरुवातीला उत्साह असतो. आत्मविश्वास असतो. "आज नाही तर उद्या नक्की होईल," अशी खात्री असते… दिवस आठवड्यांत बदलतात. आठवडे महिन्यांत बदलतात. उत्तरंही बदलू लागतात.

"आम्ही पुढे कळवू..."

"आपली निवड झालेली नाही..."

"अनुभव आवश्यक आहे..."

अशा वाक्यांची संख्या वाढू लागते आणि मनातील आशेची जागा हळूहळू अनिश्चितता घेऊ लागते. इथेच बेरोजगारीचा खरा प्रश्न सुरू होतो. कारण बेरोजगारीची सुरुवात खिशातून होत नाही... ती मनातून होते.

मानसशास्त्र सांगतं की प्रत्येक माणसाला केवळ अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची गरज नसते; त्याला स्वतःचं अस्तित्व अर्थपूर्ण असल्याची जाणीवही तितकीच आवश्यक असते. आपण कोणासाठी तरी उपयोगी आहोत, आपल्या कामामुळे कोणाचं तरी भलं होतं आहे, समाजाला आपली गरज आहे—ही भावना माणसाला जगण्याची ऊर्जा देते.

म्हणूनच समाज एखाद्या तरुणाला भेटला की पहिला प्रश्न विचारतो—

"काय करतोस?"

हा प्रश्न वरवर साधा वाटतो. पण तो फक्त व्यवसाय विचारत नाही. तो त्या माणसाची ओळख विचारतो. लहानपणी आपण वडिलांच्या नावाने ओळखले जातो. मोठेपणी मात्र आपली ओळख आपल्या कामाने निर्माण होते. म्हणूनच रोजगार म्हणजे केवळ पगार मिळवण्याचं साधन नसतं. तो स्वाभिमानाचा पाया असतो. स्वतःच्या अस्तित्वाला अर्थ देणारा आधार असतो. म्हणूनच सतत नकार मिळत राहिले की त्याचा परिणाम केवळ आर्थिक होत नाही; तो मानसिक होऊ लागतो. पहिल्या नकारानंतर तरुण पुन्हा प्रयत्न करतो. दुसऱ्या नकारानंतरही आशा टिकवून ठेवतो. तिसऱ्या-चौथ्या नकारानंतर स्वतःला धीर देतो. पण महिनोनमहिने अपयश येत राहिलं की एक दिवस तो स्वतःलाच विचारू लागतो—

"माझ्यातच काहीतरी कमी आहे का?"

हा प्रश्न अत्यंत धोकादायक असतो. कारण तो क्षमतेवर नाही, तर स्वतःच्या अस्तित्वावर शंका निर्माण करतो. यालाच न्यूनगंडाची सुरुवात म्हणतात. तो एका दिवसात निर्माण होत

नाही. तो हळूहळू मनात साचत जातो. मित्रांच्या यशाच्या बातम्या ऐकताना वाढतो. सोशल मीडियावर त्यांच्या नियुक्तीपत्रांचे फोटो पाहताना वाढतो. नातेवाईकांच्या प्रश्नांना उत्तर देताना वाढतो. प्रत्येक अपयशानंतर तो आणखी थोडा वाढतो. आणि मग एक दिवस असाही येतो... जेव्हा तरुण नोकरी शोधणं थांबवत नाही... पण स्वतःवर विश्वास ठेवणं थांबवतो.

याच क्षणी बेरोजगारी ही आर्थिक समस्या राहत नाही; ती मानवी वेदना बनते. ..आणि तेव्हाच बदलायला लागतं ते फक्त त्या तरुणाचं मन नाही; बदलायला लागतं ते संपूर्ण घर.

पूर्वी आई दररोज विचारायची, "आज काही फोन आला का?" आता ती विचारणंच टाळते. कारण प्रत्येक "नाही" हे उत्तर तिच्या मनालाही तितकंच टोचत असतं. ती देवापुढे दिवा लावते; पण आता मागणं बदललेलं असतं. "माझ्या मुलाच्या हाताला काम लागू दे." तिची प्रार्थना फार मोठी नसते; ती फक्त मुलाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा हसू पाहू इच्छित असते.

वडिलांचं जगणंही बदलतं. ते मुलासमोर धीर देतात. "होईल रे... अजून वेळ आहे," असं म्हणतात. पण रात्री उशिरा खर्चाचा वहीतला हिशेब करताना त्यांना जाणवत असतं की शिक्षणासाठी घेतलेलं कर्ज अजून फेडायचं आहे. घरातली जबाबदारी अजूनही त्यांच्या खांद्यावरच आहे. वय वाढत चाललं आहे; पण ओझं कमी झालेलं नाही.

घरातले संवादही बदलतात. पूर्वी भविष्यासंदर्भात चर्चा व्हायची; आता शांतता वाढते. बहिणीला पुढच्या शिक्षणासाठी पैसे मागताना संकोच वाटतो. लहान भाऊ स्वतःच्या गरजा मागे घेतो. प्रत्येकजण एकमेकांना वाचवण्याचा प्रयत्न करतो; पण तीच न बोललेली काळजी संपूर्ण घरात पसरत जाते.

नातेवाईकांचाही हेतू वाईट नसतो. ते सहज विचारतात, "काय मग, अजून काही झालं नाही?" पण हा प्रश्न प्रत्येक वेळी त्या तरुणाच्या मनावर नवा ओरखडा उमटवतो. काही दिवसांनी तो समारंभ टाळू लागतो. मित्रांना भेटणं कमी करतो. सोशल मीडियावर इतरांच्या यशाच्या पोस्ट पाहणं बंद करतो. त्याला लोकांपासून नव्हे, तर स्वतःच्या अपूर्णतेच्या भावनेपासून लपायचं असतं.

अनेकदा आपण समजतो की बेरोजगारी म्हणजे काम नसणं. प्रत्यक्षात बेरोजगारी म्हणजे हळूहळू कमी होत जाणारा आत्मविश्वास. स्वतःवरचा विश्वास हरवणं ही तिची सर्वांत मोठी किंमत असते.

यामध्ये आर्थिक वास्तवही तितकंच कठोर असतं. मुलाखतीसाठी शहरात जायचं म्हणजे प्रवासाचा खर्च. राहण्याची सोय. योग्य पोशाख. प्रमाणपत्रांच्या प्रती. इंटरनेट. अर्जाची फी. हे सर्व मिळून एका मुलाखतीमागे अनेक घरांचा आठवड्याचा खर्च दडलेला असतो. ज्यांच्या घरात रोजचा उदरनिर्वाहच कष्टाने चालतो, त्यांच्यासाठी ही प्रत्येक मुलाखतही एक आर्थिक धाडस असतं.




**-श्री. सुनील धोपावकर**

प्रसिद्धी प्रमुख, मविप्र समाज, नाशिक


म्हणूनच अनेकदा गुणवत्तेपेक्षा संधी महत्त्वाची ठरते. ग्रामीण भागात असंख्य तरुण बुद्धिमान असतात. मेहनती असतात. शिकण्याची तयारी असते. पण उद्योगविश्वापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेली माहिती, मार्गदर्शन, संपर्क आणि संधी यांचा अभाव त्यांना मागे ठेवतो. क्षमता आणि संधी यांच्यामधलं अंतर किलोमीटरचं नसतं; ते व्यवस्थेचं असतं.

समाजशास्त्र सांगतं की एका व्यक्तीला रोजगार मिळाला, तर त्याचा परिणाम फक्त त्या व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. त्याच्या उत्पन्नातून घर चालतं. बहिणीचं शिक्षण सुरू राहतं. आई-वडिलांच्या औषधांचा खर्च भागतो. शेतीत गुंतवणूक होते. घरातली पुढची पिढी अधिक मोठी स्वप्नं पाहायला धजावते. म्हणूनच एका तरुणाचा रोजगार म्हणजे एका कुटुंबाचा विकास, आणि हजारो तरुणांचा रोजगार म्हणजे समाजाच्या प्रगतीचा पाया.

याच ठिकाणी मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कार्याचा नवा अध्याय सुरू होतो. शतकापूर्वी मविप्रच्या कर्मवीरांनी समाजाचा प्रश्न ओळखला होता—तो होता शिक्षणाचा. त्यांनी शिक्षण गावोगावी नेलं. कारण त्या काळात शिक्षण हीच सर्वांत मोठी सामाजिक क्रांती होती. आजचा काळ वेगळा आहे. शिक्षणाची दारं उघडली आहेत. पदवीधरांची संख्या वाढली आहे. पण शिक्षणानंतर रोजगाराची दारं अजूनही अनेक तरुणांसाठी बंद आहेत. त्यामुळे आज समाजापुढचा प्रश्न बदलला आहे.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विद्यमान कार्यकारी मंडळाने ही काळाची हाक अचूक ओळखली. ज्या तळमळीने, ज्या पोटतिडकीने आणि ज्या सामाजिक बांधिलकीने पूर्वसुरींनी बहुजन समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचं ऐतिहासिक कार्य केलं, त्याच भावनेतून आज शिक्षणाला रोजगाराशी जोडण्याचं नवं सामाजिक दायित्व स्वीकारलं आहे.

रोजगार मेळावा हा म्हणून केवळ भरतीचा कार्यक्रम नाही. तो शिक्षण आणि उद्योग यांच्यामधला पूल आहे. तो गुणवत्ता आणि संधी यांची भेट घडवणारा मंच आहे. तो ग्रामीण विद्यार्थ्याला शहरातील उद्योगविश्वाशी थेट जोडणारा दुवा आहे. तो "माझी ओळख नाही" या वाक्याचं रूपांतर "माझी निवड झाली आहे" या वाक्यात करणारा क्षण आहे.

या उपक्रमाचं आणखी एक मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्याची पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता. नोकरीच्या मुलाखतीसाठी येताना कोणाचीही चिठ्ठी लागत नाही, कोणाच्या वशिल्याची गरज भासत नाही. उमेदवाराची ओळख त्याच्या आडनावाने किंवा शिफारशीने नव्हे, तर त्याच्या गुणवत्तेने आणि कौशल्याने ठरते. नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही आणि प्लेसमेंटची संपूर्ण प्रक्रियाही पूर्णपणे मोफत असते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल किंवा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही समान संधी उपलब्ध होते. समाजात संधींची समानता हा ज्या मूल्यांचा पाया आहे, त्या मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी या रोजगार मेळाव्यात दिसून येते.

मविप्र आणि भारतीय उद्योग महासंघ (CII) यांच्या संयुक्त प्रयत्नातून उभ्या राहिलेल्या या चळवळीने हजारो तरुणांच्या आयुष्याला दिशा दिली आहे. हा अंक छापून तुमच्या हातात पडेपर्यंत ६,००० हुन अधिक तरुणांच्या हातात नोकरीची ऑफर लेटर्स मिळाली आहेत. अनेकांना करिअरची पहिली संधी मिळाली. पण या उपक्रमाचं खरं यश केवळ आकड्यांत मोजता येणार नाही. त्याचं खरं मोजमाप त्या आईच्या डोळ्यांत आहे, जिने अनेक महिन्यांनंतर निर्धास्त श्वास घेतला. त्या वडिलांच्या चेहऱ्यावर आहे, ज्यांना वाटलं—"आता माझ्या मुलाच्या आयुष्याला दिशा मिळाली." त्या तरुणाच्या पावलांत आहे, ज्याने पुन्हा एकदा अभिमानाने समाजात उभं राहायला सुरुवात केली.

रोजगार म्हणजे केवळ पगाराची सुरुवात नसते. तो स्वाभिमानाचा पहिला दिवस असतो. तो एका कुटुंबाच्या संघर्षाला मिळालेलं उत्तर असतो. तो समाजाच्या प्रगतीकडे टाकलेलं एक ठाम पाऊल असतो.

शंभर वर्षांपूर्वी मविप्रच्या कर्मवीरांनी बहुजन समाजाच्या हातात शिक्षणाची लेखणी दिली. त्या लेखणीने लाखो आयुष्यांचं भविष्य लिहिलं. आज त्याच परंपरेचा वारसा जपत, विद्यमान कार्यकारी मंडळ शिक्षित हातांना रोजगाराची संधी देण्याचा ध्यास घेत आहे. कारण शिक्षणाशिवाय समाज घडत नाही; आणि रोजगाराशिवाय शिक्षण पूर्णत्वाला जात नाही.

म्हणूनच "शिक्षणापासून रोजगारापर्यंत" हा केवळ एक Event नाही, तर मविप्रच्या शतकाहून अधिक वर्षांच्या समाजकारणाचा स्वाभाविक विस्तार आहे. ही परंपरा माणसं घडवण्याची आहे. ही चळवळ आयुष्यांना दिशा देण्याची आहे आणि म्हणूनच... जेव्हा एखाद्या तरुणाच्या हातात ऑफर लेटर येतं, तेव्हा नोकरी फक्त एका व्यक्तीला मिळत नाही... उभं राहतं एक कुटुंब.उजळतं एक घर... बळकट होतो एक समाज... आणि अधिक समर्थ, अधिक स्वाभिमानी भारताच्या स्वप्नाला मिळतो एक नवा आधार !

■

# भारतीय उद्योग महासंघ (CII): औद्योगिक विश्वातील अढळ तारा




**भारतीय उद्योग महासंघ (CII) ही एक अग्रगण्य, नफाविरहित आणि उद्योगांचे नेतृत्व करणारी संस्था आहे. ही संस्था भारताच्या विकास प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. जागतिक पातळीवर भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढवणे आणि देशांतर्गत उद्योगस्नेही वातावरण (Ease of Doing Business) तयार करणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे.**

***स्थापना व इतिहास :***

CII चा इतिहास खूप जुना आणि रंजक आहे. याची स्थापना १८९५ मध्ये झाली, केवळ ५ सदस्यांनी मिळून 'असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग अँड आयर्न इंडस्ट्रीज' (AEII) ची स्थापना केली होती. काळानुरूप या संस्थेच्या स्वरूपात आणि नावात अनेक बदल झाले. १९१२ मध्ये या संस्थेचे नाव 'इंडियन इंजिनिअरिंग असोसिएशन' (IEA) झाले तर १९७४ मध्ये तिचे रूपांतर 'असोसिएशन ऑफ इंडियन इंजिनिअरिंग इंडस्ट्री' (AIEI) मध्ये झाले. त्यानंतर अखेर १ जानेवारी १९९२ रोजी भारताने आर्थिक उदारीकरणाचे (Liberalization) धोरण स्वीकारल्यानंतर, या संस्थेची व्याप्ती वाढवून संस्थेचे नाव 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री' (CII) म्हणजेच भारतीय उद्योग महासंघ असे केले.

***CII ची रचना आणि व्याप्ती :***

CII चे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. ही संस्था लोकशाही पद्धतीनुसार चालवली जाते आणि तिचे नेतृत्व आघाडीचे उद्योगपती करतात.

- सदस्य संख्या: CII मध्ये खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील (PSUs) हजारो लहान, मध्यम आणि मोठ्या कंपन्या थेट सदस्य आहेत. याशिवाय, अप्रत्यक्षपणे विविध प्रादेशिक आणि राष्ट्रीय क्षेत्रातील असोसिएशनच्या माध्यमातून लाखो कंपन्या याच्याशी जोडलेल्या आहेत.
- प्रादेशिक कार्यालये: भारतात CII ची अनेक प्रादेशिक कार्यालये (उदा. मुंबई, चेन्नई, कोलकाता, चंदीगड) आणि उप-कार्यालये आहेत.
- जागतिक उपस्थिती: भारताबाहेरही अनेक देशांमध्ये (जसे की अमेरिका, ब्रिटन, सिंगापूर, जर्मनी, ऑस्ट्रेलिया) CII ची आंतरराष्ट्रीय कार्यालये आहेत, जी भारतीय कंपन्यांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यात मदत करतात.

***मुख्य उद्दिष्टे आणि ध्येय :***

- धोरणात्मक सल्लागार: केंद्र आणि राज्य सरकारांना औद्योगिक आणि आर्थिक धोरणे आखताना उद्योगांच्या बाजूने सल्ला आणि शिफारसी देणे.
- जागतिक स्पर्धात्मकता: भारतीय कंपन्यांना आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्ये आणि जागतिक दर्जाचा दर्जा (Quality Standards) स्वीकारण्यास प्रवृत्त करणे.
- शाश्वत विकास: उद्योगांचा विकास करताना पर्यावरण पूरक (Green Business) आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब करणे.
- उद्योग आणि शिक्षण संस्थांमधील समन्वय: शैक्षणिक संस्था आणि उद्योग जगतामध्ये समन्वय साधून तरुणांना रोजगाराभिमुख कौशल्ये प्रदान करणे.

**CII ची मुख्य कार्ये :**

अ) सरकार आणि उद्योग यांच्यातील दुवा : CII सरकार आणि व्यापारी जगतामधील संवाद सुलभ करते. अर्थसंकल्प (Budget) जाहीर होण्यापूर्वी CII सरकारला उद्योगांच्या अपेक्षा आणि कर रचनेबाबत महत्त्वपूर्ण सूचना मांडते.

आ) व्यापार प्रदर्शने आणि परिषदांचे आयोजन : CII देशात आणि परदेशात विविध मोठ्या व्यापारी प्रदर्शनांचे (Trade Fairs) आयोजन करते. यामध्ये'Auto Expo' (ऑटो एक्स्पो) आणि'IETF' (इंटरनॅशनल इंजिनिअरिंग ट्रेड फेअर) सारख्या जागतिक स्तरावरील प्रदर्शनांचा समावेश आहे. यामुळे भारतीय कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांचे जागतिक प्रदर्शन करण्याची संधी मिळते.

इ) कौशल्य विकास आणि सामाजिक जबाबदारी ( CSR) : CII केवळ नफा कमावण्यावर लक्ष केंद्रित करत नाही, तर 'CII फाउंडेशन' च्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात काम करते. तसेच देशभरात अनेक स्किल ट्रेनिंग सेंटर्स चालवून तरुणांना रोजगारक्षम बनवण्याचे कार्य ही संस्था करते.

ई) एमएसएमई ( MSME) क्षेत्राला पाठबळ : भारतातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) पतपुरवठा, नवीन बाजारपेठ शोधणे आणि तंत्रज्ञान अद्ययावत करण्यासाठी CII विशेष उपक्रम आणि प्रशिक्षण सत्रे राबवते.

**CII चे महत्त्व आणि योगदान :**

भारताला 'आत्मनिर्भर' बनवण्याच्या प्रवासात आणि भारतीय अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलियन डॉलर्स (5 Trillion Dollar Economy) बनवण्याच्या ध्येयात CII चा वाटा मोठा आहे. 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया' आणि 'स्टार्टअप इंडिया' या सरकारी मोहिमा यशस्वी करण्यासाठी ही संस्था आघाडीवर राहून काम करत आहे.

***CII ची सविस्तर संस्थात्मक रचना :***

CII चा कारभार अत्यंत लोकशाही मार्गाने आणि व्यावसायिक पद्धतीने चालवला जातो. या संस्थेचे कामकाज मुख्यत्वे तीन पातळ्यांवर विभागलेले आहे:

- राष्ट्रीय परिषद (National Council): ही CII ची सर्वोच्च धोरण-निर्णायक समिती आहे. यामध्ये भारतातील आघाडीच्या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEOs) आणि व्यवस्थापकीय संचालक (MDs) यांचा समावेश असतो. राष्ट्रीय अध्यक्ष (National President) हा या परिषदेचा प्रमुख असतो.
- प्रादेशिक परिषदा (Regional Councils): भारताच्या भौगोलिक विविधतेचा विचार करून CII ने देशाची विभागणी ४ मुख्य प्रांतांत केली आहे –उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम. मुंबई हे पश्चिम प्रांताचे (Western Region) मुख्य केंद्र आहे.
- विशेष कार्यगट : संरक्षण (Defence), माहिती तंत्रज्ञान (IT), पायाभूत सुविधा (Infrastructure), आरोग्य, आणि कृषी अशा ६० पेक्षा जास्त क्षेत्रांसाठी स्वतंत्र समित्या आहेत, ज्या त्या क्षेत्रातील विशिष्ट समस्यांवर काम करतात.

**CII ची प्रमुख केंद्रे आणि स्वायत्त संस्था :**

उद्योगांना केवळ सल्ला न देता त्यांच्यात गुणात्मक सुधारणा करण्यासाठी CII ने देशात अनेक विशेष केंद्रे (Centres of Excellence) स्थापन केली आहेत:

- CII-सोहराबजी गोदरेज ग्रीन बिझनेस सेंटर (Hyderabad) : हे केंद्र भारतात हरित इमारती (Green Buildings) आणि पर्यावरणपूरक उद्योगांना चालना देते.
- CII इन्स्टिट्यूट ऑफ क्वालिटी (Bengaluru) : भारतीय उत्पादनांचा दर्जा जागतिक दर्जाचा (Six Sigma, TQM) बनवण्यासाठी हे केंद्र कंपन्यांना प्रशिक्षण देते.
- CII-त्रिवेणी वॉटर इन्स्टिट्यूट : उद्योगांमध्ये पाण्याचा कार्यक्षम वापर आणि पुनर्वापर (Water Auditing) कसा करावा, याचे मार्गदर्शन हे केंद्र करते.

**आर्थिक उदारीकरण (१९९१) आणि CII ची बदललेली भूमिका :**

१९९१ पूर्वी भारताची अर्थव्यवस्था 'लायसन्स राज' (License Raj) खाली दबलेली होती. पण १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर CII ने



**-श्री. जॉय अलूर**
माजी अध्यक्ष, सीआयआय, नाशिक झोन

आपली भूमिका पूर्णपणे बदलली:

- 'ग्लोबल इंडिया' संकल्पना : भारतीय कंपन्यांना परदेशी स्पर्धेला तोंड देता यावे म्हणून CII ने तंत्रज्ञान हस्तांतरण (Technology Transfer) आणि संयुक्त उपक्रमांवर (Joint Ventures) भर दिला.
- जागतिक व्यासपीठ : जागतिक आर्थिक मंच (World Economic Forum - Davos) सारख्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये 'इंडिया इव्हेंट' आयोजित करून भारताला गुंतवणुकीचे उत्तम केंद्र म्हणून सादर करण्याचे काम CII ने सातत्याने केले आहे.

***प्रमुख उपक्रम आणि सामाजिक योगदान :*** CII केवळ नफा कमावणाऱ्या मोठ्या कंपन्यांसाठी काम करत नाही, तर समाजाच्या शाश्वत विकासासाठीही कार्यरत आहे. नैसर्गिक आपत्तींच्या वेळी (उदा. पूर, भूकंप) मदत कार्य करणे आणि ग्रामीण भागात शिक्षण व आरोग्याचा दर्जा सुधारणे, दिव्यांग बांधवांना उद्योगांमध्ये रोजगाराच्या समान संधी मिळवून देणे, २५ ते ४० वयोगटातील तरुण उद्योजक आणि व्यावसायिकांना एकत्र आणून त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणे, कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व आणि त्यांचे नेतृत्व वाढवण्यासाठी काम करणे असे अनेक उपक्रम संघटना राबवते. त्यासाठी इंडिया बिझनेस ट्रस्ट (IBDN) 'यंग इंडियन्स' (Yi) IYW (Indian Women Network) अशा विविध घटक संस्था काम करत आहेत.

***महाराष्ट्र आणि CII :***

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत CII चा मोठा वाटा आहे.

- मुंबई आणि पुणे ही CII च्या पश्चिम विभागातील मुख्य उपक्रम केंद्रे आहेत.
- महाराष्ट्र सरकारच्या 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' (Magnetic Maharashtra) सारख्या गुंतवणूक परिषदांमध्ये CII हा मुख्य भागीदार (Knowledge Partner) राहिलेला आहे.
- राज्यातील ऑटोमोबाईल (Automobile), मॅन्युफॅक्चरिंग आणि आयटी (IT) क्षेत्रातील धोरणे ठरवण्यात CII राज्य सरकारला नियमितपणे सहकार्य करते.

***आव्हाने आणि भविष्यातील वाटचाल :***

२१ व्या शतकात CII समोर प्रामुख्याने खालील आव्हाने आणि उद्दिष्टे आहेत:

- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ऑटोमेशन : भारतीय कामगारांना नवीन तंत्रज्ञानानुसार कुशल (Upskilling) बनवणे.
- कार्बन उत्सर्जन कमी करणे : २०७० पर्यंत भारताचे 'नेट झिरो' (Net Zero Carbon Emission) चे लक्ष्य गाठण्यासाठी उद्योगांना सज्ज करणे.
- ग्रामीण अर्थव्यवस्था:कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन ग्रामीण भागात उद्योजकता निर्माण करणे.

**CII आणि मविप्र: सामंजस्यातून उत्कर्ष**

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक ही शिक्षणसंस्था कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, वैद्यक, ललितकला, अभियांत्रिकी, स्थापत्य, उद्योग, कृषी, शिक्षणशास्त्र यांसह सर्वच विद्याशाखांचे पदवीधर घडविण्याचे काम करते. दोन लाखांहून अधिक विद्यार्थी असलेल्या या संस्थेतून दरवर्षी हजारो पदवीधर उत्तीर्ण होतात. या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाव्यात, CII ची मदत व्हावी या उद्देशाने माझे स्नेही व मविप्रचे हितचिंतक श्री. राजीव ठाकरे व श्री. विवेक भामरे यांनी मविप्र संस्थेच्या वतीने CII सोबत चर्चा केली. CIIच्या मुख्य कार्याचाच एक भाग म्हणून CII मॉडेल करिअर सेंटरने मविप्रच्या कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर या रोजगार माध्यम केंद्राशी नाते जोडले. पर्यायाने अनेक कंपन्या या अंतर्गत मविप्र संस्थेशी जोडल्या गेल्या आणि हजारो विद्यार्थ्यांना एकाच छताखाली रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या, ही कौतुकास्पद बाब आहे. विकसीत भारताच्या वाटचालीत मविप्र आणि CII या दोन्ही संस्था महत्त्वाचे योगदान देऊ शकत आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो.

***निष्कर्ष :***

थोडक्यात सांगायचे तर, भारतीय उद्योग महासंघ (CII) ही केवळ एक व्यावसायिक संघटना नसून ती भारताच्या आर्थिक प्रगतीचा एक मजबूत स्तंभ आहे. भारतीय उद्योगांचा आवाज जागतिक स्तरावर बुलंद करण्याचे आणि देशांतर्गत उद्योजकतेला नवी दिशा देण्याचे काम CII अविरतपणे करत आहे. १८९५ मधील एका छोट्या असोसिएशनपासून सुरू झालेला हा प्रवास आज देशाच्या धोरणांना दिशा देणाऱ्या एका महासंघात (Confederation) रूपांतरित झाला आहे. भारताला $5 ट्रिलियन च्या ध्येयपूर्तीमध्ये (Trillion) आणि त्यानंतर 'विकसित भारत' बनवण्याच्या प्रवासात CII हा एक अत्यंत महत्त्वाचा सारथी आहे.




# सीआयआयची ग्लोबल झेप...

**देशभरात कार्यरत असलेल्या ५९ सीआयआय मॉडेल करिअर सेंटरच्या माध्यमातून सुमारे ९००० रोजगार मेळावे आयोजित करून सीआयआयने हजारो युवक-युवतींना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवले आहे. पण आता सीआयआय मॉडेल करिअर सेंटरच्या माध्यमातून थेट परदेशात नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. एरवी परदेशात नोकरी म्हणजे आयआयटीयन्स, इंजिनिअर्स यांचीच मक्तेदारी असे समीकरण होऊन बसले होते. मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये गलेलठ्ठ पगाराचे पॅकेजेस, आलिशान जीवनशैली हे स्वप्न पाहण्याचा अधिकारही मध्यमवर्गीय, सर्वसामान्यांना नव्हता. पण सीआयआय मॉडेल करिअरने ही चौकट मोडून काढत परदेशातील नोकरीची दारे सर्वसामान्यांना खुली करून दिली आहेत. त्यासाठी विद्यार्थी, पालक यांना ना नोकरी शोधायची गरज आहे, त्या संदर्भातील औपचारिकता पूर्ण करण्याची. सीआयआय मॉडेल करिअर सेंटरवर तुम्ही एकदा का विश्वास आणि जबाबदारी सोपवली की तुम्ही फक्त तुमच्या स्वप्नपूर्तीसाठी आवश्यक ती मेहनत घ्यायची तयारी ठेवायची. बाकी सर्व सीआयआय मॉडेल करिअर सेंटरवर सोपवून द्यायचे.**

सीआयआय मॉडेल करिअर सेंटरच्या माध्यमातून आता थेट जपान आणि डेन्मार्कमध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जपान हा उगवत्या सूर्याचा देश मानला जातो. तसेच सर्वाधिक आयुष्यमान लाभलेले लोक जपानमध्ये आहेत. तसेच तंत्रज्ञानाच्या दृष्टीनेही जपान प्रगत राष्ट्र ठरले आहे. जगातील सर्वात जास्त कार्यशील देश म्हणूनही जपानचा लौकिक आहे. पण फक्त यामुळेच जपानमध्ये तुम्ही नोकरी करावी असे सीआयआयचे म्हणणे नाही. तर जपानमध्ये केवळ पाचच दिवसांचा वर्किंग वीक असतो. म्हणजेच आठवड्यातील केवळ पाचच दिवस तुम्हाला काम करायचे असते. तसेच जपान हा जगातील वेगाने आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या प्रगती साधणारा देश आहे. येथील अर्थव्यवस्था देखील चढत्या आलेखाची, स्थिरता लाभलेली आहे. महिन्याला एक लाख रुपये पगार जपानमध्ये तुम्हाला तुमच्या कौशल्यांसाठी सहज मिळतो. शिवाय जपानमध्ये निवासस्थानांनाही शासनाचे अनुदान प्राप्त होत असते. त्यामुळे जपानमध्ये राहणे हे तुमच्यासाठी टेन्शन नसते. अशा जपानमध्ये युवकांना नोकरीची संधी आयती उपलब्ध करून दिली आहे. जपानमध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देताना

सीआयआय मॉडेल करिअर सेंटर नेमके काय करणार ?

१) तर तुम्हाला जपानी भाषा शिकवणे, त्यासंदर्भातील वर्ग, सराव, संभाषण कौशल्ये हे सीआयआय मॉडेल करिअर सेंटर करणार.

२) जपानला जाण्यासाठी आवश्यक पासपोर्ट, त्यासंदर्भातील प्रक्रिया सीआयआय मॉडेल करिअर सेंटरच्या माध्यमातून अधिक सहजसोपी, सुलभ केली जाईल.

३) जपानमध्ये तुम्हाला राहायला योग्य निवासव्यवस्था करून देण्यात सीआयआय मॉडेल करिअर सेंटर मदत करणार.

४) जगभरात तुमचं काम, तुमचं कौशल्य एक्स्प्लोअर करण्याचे कामही सीआयआय मॉडेल करिअर सेंटर करणार.

५) एखाद्या अनोळखी देशात असं एकदम, घरबसल्या नोकरी करणे म्हणजे सुरुवातीला विश्वास ठेवणे अवघडच असते. पण सीआयआय मॉडेल करिअर सेंटर विश्वासार्हता असलेली नोकरीची संधी देणार.

***काय आहे जपानमध्ये संधी?***

जपानमध्ये हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात हाऊस किपिंग, फ्रंट ऑफिस मॅनेजमेंट तसेच पाहुण्यांचे स्वागत, त्यांच्या गरजा नोंदवून त्याची पूर्तता करणे अशा नोकरीच्या संधी आहेत. त्यासाठी कोणत्याही विद्याशाखेची पदवी, उत्कृष्ट संभाषण कौशल्ये, हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील अनुभव (असल्यास, अनुभव सक्तीचा नाही) या पात्रता आहेत.

जपानधील पुढील नोकरीची संधी आहे ती केअर टेकर्सची. होय, जपानमध्ये सध्या वयोवृद्ध नागरिकांच्या कौटुंबिक, आरोग्याशी निगडित अनेक समस्या आहेत. या वयोवृद्धांची काळजी घेण्यासाठी **केअर टेकर्सची** गरज आहे. पण यासाठी फक्त युवती व महिलाच पात्र ठरणार आहेत. या वयोवृद्ध नागरिकांचे दैनंदिन रुटीन सांभाळणे, त्यांच्या आरोग्यासंदर्भात काळजी घेणे, रुग्णसेवा असे या नोकरीचे किंवा कामाचे स्वरूप आहे. यासाठी १२ वी पास किंवा पदवीधर अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. त्याचबरोबर तुमचं नर्सिंग प्रशिक्षण झाले असेल किंवा त्यासंदर्भात तुम्ही काही काम केले असेल तर आणखी चांगले. शिवाय तुम्ही स्वतः शारीरिकदृष्ट्या सक्षम, तंदुरुस्त असणे गरजेचे आहे. जपानी भाषा शिकण्याची तुमची तयारी असणे गरजेचे आहे.

जपानमधील पुढची संधी आहे ती **पॅकर, मशीन ऑपरेटर** आणि **पिकरची**. विविध उत्पादने पकिंग करणे. या उत्पादनांना विविध ठिकाणांवर जाऊन ते घेऊन येणे, जेथे ही उत्पादने तयार होतात, तेथे किंवा अन्य ठिकाणी प्रत्यक्ष मशीनवर पण काम करणे, दर्जा आणि सुरक्षा सांभाळणे असे या कामाचे स्वरुप आहे. यासाठी तुमच्याकडे पदवी असणे गरजेचे आहे. तसेच वेगवेगळ्या शिफ्ट्समध्ये काम करण्याची, जपानी भाषा शिकण्याची तयारी हवी. त्याचबरोबर तुम्ही शारिरीकरित्या तंदुरुस्त असणे गरजेचे आहे.

या संधी तुम्हाला सीआयआय मॉडेल करिअर सेंटर घरबसल्या उपलब्ध करुन देत आहे. त्यामुळे आपलं भविष्य, आपली स्वप्न साकार करण्याची हीच ती वेळ आहे मित्रांनो !!!

**दरम्यान, सीआयआय मॉडेल करिअर सेंटरने डेन्मार्कमध्येही नोकरीच्या संधी तुमच्यासाठी प्लॅन केल्या आहेत.**

डेन्मार्क हा उत्तर युरोपमधील स्कँडिनेव्हिया प्रदेशात वसलेला एक अतिशय विकसित देश आहे. याची राजधानी कोपनहेगन आहे. हा देश जगातील सर्वाधिक आनंदी देशांपैकी एक मानला जातो. डेन्मार्कचे दरडोई उत्पन्न अति उच्च आहे. हा देश दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीत जगात आघाडीवर आहे. पवन ऊर्जा (Wind Energy) निर्मितीमध्येही हा देश जगात अग्रेसर आहे. गेल्या काही वर्षांत शिक्षण आणि नोकरीसाठी अनेक भारतीय डेन्मार्कला गेले आहेत. कोपनहेगनमध्ये मोठा भारतीय समुदाय आहे. अशा या डेन्मार्कमध्ये करिअर करायला मिळणे ही मोठी बाब आहे.

तर डेन्मार्कमध्ये सीआयआय मॉडेल करिअर सेंटरने पुढील संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत..

**१. सीएनसी ऑपरेटर - सीएनसी लेथ (CNC OPERATOR - CNC LATHE)**

• ***कामकाज आणि जबाबदाऱ्या:***

• सीएनसी लेथ मशीन्स अत्यंत अचूकतेने (precision) ऑपरेट करणे.

• जॉब सेटअप (Job setup), टूल सेटिंग (tool setting) आणि ऑफसेट्स (offsets) सांभाळणे.

• कामाच्या दरम्यान इन-प्रोसेस इन्स्पेक्शन (जागीच तपासणी) करणे.

• डेन्मार्क येथे स्थलांतरित (Relocation to Denmark) होण्याची तयारी असणे.

**२. मशिनिस्ट - सीएनसी / कन्व्हेन्शनल (MACHINIST - CNC / CONVENTIONAL)**

• ***कामकाज आणि जबाबदाऱ्या:***

• सीएनसी (CNC) आणि पारंपारिक (Conventional) मशिन्स सेटअप करणे आणि ऑपरेट करणे.

• इंजिनिअरिंग ड्रॉइंग्ज (Engineering drawings) अचूकपणे वाचता येणे.

• मशिन्सची नियमित आणि वेळेवर तपासणी (Routine checks) करणे.

• डेन्मार्क येथे स्थलांतरित (Relocation to Denmark) होण्याची तयारी असणे.

**३. वेल्डर - मिग/टिग/आर्क (WELDER - MIG/TIG/ARC)**

• ***कामकाज आणि जबाबदाऱ्या:***

• वेल्डिंग आणि फिट-अप (Fit-up) ची कामे करणे.

• WPS (Welding Procedure Specification) चे पालन करणे आणि इंजिनिअरिंग ड्रॉइंग्ज वाचणे.

• वेल्डिंगच्या दर्जाची (Weld quality) डोळ्यांनी व्यवस्थित तपासणी करणे.

• डेन्मार्क येथे स्थलांतरित (Relocation to Denmark) होण्याची तयारी असणे.

पूर्ण सुक्ष्म नियोजन करुन सीआयआय मॉडेल करिअर सेंटरने या संधी तुमच्यासमोर ठेवल्या आहेत. तुम्ही किती चटकन या संधीचे महत्व ओळखता हे तुमच्यावर हे अवलंबून आहे.

# आठवा सीआयआय मॉडेल करिअर सेंटरचा





**श्री. सागर शिरसाठ**
सेंटर मॅनेजर


**श्री. सागर चौधरी**
एच.आर. टीम लीडर


**श्री. कमलेश गोसावी**
एच.आर. एम.सी.सी.सेंटर


**श्री. सतीश पवार**
एच.आर. एम.सी.सी.सेंटर


**श्री. अनिकेत निकुम**
एच.आर. एम.सी.सी.सेंटर


**अंजुम पिंजारी**
ट्रेनर, एम.सी.सी.सेंटर


**आलिया पिंजारी**
ट्रेनर, एम.सी.सी.सेंटर

**सीआयआय मॉडेल करिअर सेंटर्सची स्थापनाच मुळात विविध करिअर आणि नोकऱ्यांची संधी यांची नाळ विद्यार्थ्यांशी जोडण्यासाठी करण्यात आली आहे. विविध विद्याशाखांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे असणारी गुणवत्ता, कल्पकता, सर्जनशीलता याचा औद्योगिक क्षेत्रात प्रभावी, योग्य वापर करण्यासाठी ही सेंटर्स काम करतात. या केंद्रांमार्फत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, व्यावसायिक दृष्टिकोनातून मानसशास्त्रीय अंगाने समुपदेशन केले जाते. सॉफ्ट स्किल्सचे महत्त्वही त्यांना पटवून दिले जाते. रोजगारासाठी तर ही सेंटर्स नेहमीच प्राधान्याने प्रभावी नियोजनाने रोजगार मेळाव्यांचे आयोजन करीत असतात. सध्या देशभरातील २३ राज्यांमध्ये एकूण ५९ सीआयआय मॉडेल करिअर सेंटर्स सुरू आहेत. भविष्यात या सेंटर्सची संख्या १५० पर्यंत पोहोचविण्याचा संकल्प संघटनेने केला आहे. सीआयआय मॉडेल करिअर सेंटर्सच्या माध्यमातून १९ लाख १४ हजार विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात आलेले आहे. आयआय मॉडेल करिअर सेंटर्सच्या माध्यमातून ९ हजार रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहे. या सेंटर्सशी सहप्रायोजक म्हणून १० हजार संस्था काम करित आहेत.**

देशभरात रोजगाराच्या संधी निर्माण करणे या प्रमुख हेतूने सीआयआय सध्या जोमाने काम करत आहे. या प्रक्रियेत तीन महत्त्वाच्या टप्प्यांवर सीआयआयने लक्ष केंद्रित केले आहे.

**औद्योगिक विकास :**

देशभरात औद्योगिक विकास, रोजगार, युवाशक्तीला चालना देण्यासाठी यात सात प्रमुख बाबींचा समावेश करण्यात आला आहे. जे मनुष्यबळ सध्या उपलब्ध आहे, त्यांना काळानुरुप प्रशिक्षण देऊन अपडेटेड करणे. उत्पादनक्षमता वाढेल यादृष्टीने विद्यार्थी व इतर मनुष्यबळाची गुणवत्ता विकसित करणे ही नजीकच्या भविष्यातील उद्दिष्टे आहेत.

**युवकांचा विकास :**

सीआयआय मॉडेल करिअर सेंटर्सची स्थापना युवकांसाठीच केली गेली असल्याने या सेंटर्सचा केंद्रबिंदू युवकांचा विकास आहे. हे करताना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या युवकांना विशेष प्रशिक्षण देणे, करिअर संदर्भात समुपदेशन करणे, विविध कौशल्य प्रशिक्षणांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, ज्या जिल्ह्यांमध्ये महत्त्वाकांक्षी युवाशक्ती आहे, पोषक वातावरण आहे, अशा जिल्ह्यांमध्ये उपक्रम राबवणे. विभागीय व राष्ट्रीय पातळीवर कौशल्य शिक्षणावर आधारित स्पर्धा आयोजित करणे. जगभरात होणाऱ्या कौशल्य शिक्षणावर आधारित स्पर्धांना पाठिंबा देणे, सहकार्य करणे. रोजगार व कौशल्य प्रशिक्षणासंदर्भात शासन करत असलेल्या विविध प्रयत्नांना सीआयआय मॉडेल करिअर सेंटर नेहमीच सहकार्य करते. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या मदतीने सुमारे १००० आयटीआयचा कायापालट करण्याचे प्रयत्न या सेंटर्सच्या सहाय्याने होत आहेत. रोजगार संलग्न प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिक्षणापासून रोजगारापर्यंत अशी तब्बल १०० केंद्रे सीआयआयच्या मदतीने उभारण्यात येणार आहेत.

कौशल्य विकास मंत्री मा. श्री. मंगल प्रभात लोढा यांनी नुकतीच "नोकऱ्या भरपूर आहेत, पण युवकांमध्ये कौशल्यच नाहीये" ही खंत बोलून दाखवली आहे. त्यांच्या या वक्तव्याला महत्त्व यासाठी आहे की जर जे कौशल्य नोकऱ्यांसाठी हवे आहे, तेच नसेल तर कोणतेही सरकार येवो, मंत्री येवो, बेरोजगारी कायम राहील. त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये, युवकांमध्ये कौशल्य शिक्षण, प्रशिक्षणाचे महत्त्व पोहोचणे गरजेचे आहे. किंबहुना काळाच्या पटलावर ते अपरिहार्य ठरत जाणार आहे. या दृष्टिकोनातून सीआयआय मॉडेल करिअर सेंटर्स व मराठा विद्या प्रसारक समाज करीत असलेले प्रयत्न म्हणजेच काळाच्या पुढचे पाऊल ठरणार आहे, यात शंका नाही.

**नाशिक सेंटर :**

सीआयआय मॉडेल करिअर नाशिक सेंटरचे सर्व कामकाज मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक मुख्य इमारतीतील कार्यालयातून केले जाते. श्री. सागर शिरसाठ हे या सेंटरचे मुख्य व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्यासमवेत श्री. सागर चौधरी हे एचआर टीमलीडर म्हणून काम पाहतात. तर श्री. कमलेश गोसावी, श्री. सतीश पवार, श्री. अनिकेत निकुम हे एचआर म्हणून आणि श्रीमती अंजुम पिंजारी, श्रीमती आलिया पिंजारी या ट्रेनर म्हणून काम पाहत आहेत. शहरातील तसेच जिल्हाभरात होणाऱ्या सर्व रोजगार मेळाव्यांचे प्रभावी नियोजन करण्यात ही यंग ब्रिगेड यशस्वी ठरत आहे. काटेकोर व्यवस्था, नामांकित कंपन्यांशी अॅप्रोच होणे, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळणे, मेळाव्याच्या दिवशी सर्व प्रक्रिया शांततेत पार पाडणे यासाठी ही टीम घेत असलेली मेहनत कौतुकास्पद आहे.

**श्री. सागर शिरसाठ**
**सेंटर मॅनेजर, नाशिक**

# सीआयआय मॉडेल करियर सेंटर

## उद्योग-करिअर सेतू

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६९ कार्यालये भारतभर | ११ कार्यालये परदेशात | २९४ सहसंलग्न संस्था | ९५०० थेट सदस्य ३.५० लाख अप्रत्यक्ष सदस्य | २९१ आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार भागीदार | ३९४ सहयोगी संस्था १३३ देशांत |

## आमची यशस्वी कामगिरी



दरवर्षी **१०** लाख युवक लाभार्थी

**५,०००** कंपन्यांशी संलग्नता

**१९ लाख** १९ लाख उमेदवारांचा डेटाबेस

**४.५ लाख** युवकांचे समुपदेशन

**१.४ लाख** उमेदवारांची निवड

**१५० +** रोजगार मेळाव्यांचे आयोजन

## उद्योग सहाय्य सेवा

- उच्च उत्पादकतेसाठी गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ निर्मिती
- मनुष्यबळ भरतीचा खर्च कमी करणे
- पुनर्प्रशिक्षण व कौशल्यवृद्धी
- धोरण विषयक पाठपुरावा
- संशोधन व अहवाल सादर करणे

## सामाजिक प्रभाव

- युवकांना रोजगाराच्या संधींशी जोडणे
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांना प्रशिक्षण
- कौशल्य शिक्षणाला प्रतिष्ठा मिळवून देणे
- करिअर समुपदेशन
- महिला, अनुसूचित जाती-जमातींसाठी उपक्रम
- विकासाभिमुख जिल्ह्यांसाठी विशेष उपक्रम

## अंमलबजावणीची माध्यमे

- मॉडेल करिअर सेंटर
- बहुकौशल्य प्रशिक्षण केंद्र
- PARFI कौशल्य गुरुकुल
- CSR कौशल्य विकास प्रकल्प
- आंतरराष्ट्रीय सहयोग
- क्षेत्रनिहाय कौशल्य परिषद

## योग्य मनुष्यबळ भरती हे मोठे आव्हान का ठरते?

**५६%** भरतीकर्त्यांच्या मते भरती प्रक्रिया खूप वेळखाऊ असते.

**५२%** टॅलेंट ॲक्विझिशन प्रमुखांच्या मते योग्य उमेदवारांची निवड (स्क्रिनिंग) हे सर्वात मोठे आव्हान आहे.

**५४%** नियोक्त्यांकडे रिक्त पदे असूनही पात्र उमेदवार मिळत नाहीत.

**३५%** पदे 12 आठवडे किंवा त्याहून अधिक काळ रिक्त राहतात.

**५२%** फॉर्च्युन 500 कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते त्यांच्या कंपन्या सर्वोत्तम प्रतिभावान उमेदवारांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरत नाहीत.

**पदे भरण्यात अडचण येत असल्याचे नियोक्त्यांचे मत**




## प्रत्येक घटकासाठी सेवा सुविधा

**उद्योग / नियोक्ते**

- रिक्त पदांसाठी योग्य उमेदवार उपलब्ध करून देणे
- सुलभ व किफायतशीर भरती प्रक्रिया
- पदाच्या आवश्यकतेनुसार उमेदवारांची निवड
- अप्रेंटिसशिपसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे
- वेतन व्यवस्थापन, वैधानिक अनुपालन व तात्पुरते मनुष्यबळ

**नोकरी इच्छुक**

- प्रोफाइल नोंदणी व करिअर समुपदेशन
- रोजगारपूर्व तयारी
- वेबिनार व कार्यशाळा
- रोजगाराच्या संधी • पूर्णवेळ नोकरी
- अर्धवेळ नोकरी • अप्रेंटिसशिप
- इंटर्नशिप

**शैक्षणिक संस्था**

- उद्योग समन्वयासाठी इंडस्ट्री पार्टनरशिप सेल • विद्यार्थी विकास • प्लेसमेंट सहाय्य
- जॉब ड्राइव्ह • रोजगार मेळावे

## समुपदेशन ते रोजगार : उमेदवाराचा प्रवास

**१ नोंदणी व प्रोफाइल तयार करणे**
नोकरी शोधासाठी नोंदणी
डिजिटल प्रोफाइल / आयडी निर्मिती

**२ मूल्यमापन**
करिअर आवड चाचणी
रोजगारक्षमता कौशल्य चाचणी

**३ करिअर समुपदेशन व मार्गदर्शन**
कौशल्ये व क्षमतांची रोजगाराच्या गरजांशी सांगड

**४ कौशल्य उन्नयन**
रोजगारपूर्व तयारी
वेबिनार
कार्यशाळा

**५ इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप व रोजगार उपलब्धता**
रोजगार केंद्रे
प्लेसमेंट ड्राइव्ह
रोजगार मेळावे





# आयटीआय : स्थानिक रोजगाराचा भक्कम आधार

**" येणारा काळ हा कौशल्य शिक्षणाचा असणार आहे, यात आता शंका नाही. कारण बेरोजगारी आवासून उभी असताना देशाला फक्त डॉक्टर्स आणि इंजिनिअर्सचीच गरज नाहीये, ही महत्त्वाची बाब लक्षात घ्यायला हवी आहे. देशाला इलेक्ट्रिशियन्स, प्लंबर्स, बांधकाम मजूर आणि दैनंदिन जीवनाशी निगडीत इतर कामांसाठी कुशल कारागिरांचीही फार मोठ्या संख्येने गरज आहे. औद्योगिक क्षेत्रात देखील वाढती कुशल मनुष्यबळाची गरज वाढणार आहे. "**

ही गरज लक्षात घेऊन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्याला अनुसरून १९८४ साली नाशिक येथील उदाजी मराठा बोर्डिंग, गंगापूर रोड येथे पहिल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची (आयटीआय) स्थापना केली. तेव्हापासून आजपर्यंत संस्थेने जिल्ह्यात आठ आयटीआयचे जाळे उभारून ग्रामीण-शहरी भागातील हजारो गरजू युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराची दिशा दिली आहे. यामध्ये नाशिक, सिन्नर, भाऊसाहेबनगर (ता. निफाड), मालेगाव, सटाणा, नांदगाव, मोहाडी व ताहाराबाद येथील संस्थांचा समावेश आहे. या सर्व संस्था शासन मान्यताप्राप्त व डी. जी. टी. नवी दिल्ली संलग्नता प्राप्त आहेत.

मविप्रच्या विविध आयटीआयमध्ये रोजगारक्षम असे

- कॉम्प्युटर ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा)
- वेल्डर (संधाता )
- ड्राफ्टस्मन सिव्हिल (आरेखक स्थापत्य)
- इलेक्ट्रिशियन (वीजतंत्री)
- इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
- फिटर (जोडारी)
- मेकॅनिक मोटर व्हेईकल (यांत्रिकी मोटारगाडी)
- वायरमन ( तारतंत्री)
- सुईंग टेक्नॉलॉजी (शिवण व कर्तन)

हे ट्रेड आहेत.

या प्रशिक्षणामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना थेट नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या व अनेकांनी स्वतःचे उद्योगही सुरू केले. मविप्रच्या या चार दशकांच्या शैक्षणिक वाटचालीमुळे नाशिक जिल्हा 'कुशल मनुष्यबळाचे केंद्र' म्हणून ओळखला जाऊ लागला असून, मेक इन इंडिया व स्किल इंडिया चळवळीला त्यामुळे बळ मिळत आहे.

**शैक्षणिक पात्रता व कालावधी :**

१. पात्रता : वेल्डर, वायरमन व सुईंग टेक्नॉलॉजी या कोर्ससाठी १० वी पास व नापास तर अन्य सर्व कोर्सेस साठी १० वी पास अनिवार्य

२. कालावधी : वेल्डर, सुईंग टेक्नॉलॉजी व कोपा यांसाठी १ वर्ष व अन्य सर्व कोर्ससाठी २ वर्ष

**ग्रामीण भागात विस्तार :**

नाशिक आयटीआयच्या यशस्वी वाटचालीनंतर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळच तंत्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने मविप्र संस्थेने १९९६ मध्ये सटाणा व १९९९ पासून सिन्नर, नांदगाव, मालेगाव, ताहाराबाद, भाऊसाहेबनगर (ता. निफाड) व मोहाडी (ता. दिंडोरी) येथे आयटीआय सुरू केले. आजच्या घडीला मविप्रच्या सर्व आयटीआय मधून हजारो विद्यार्थी विविध व्यवसायांमध्ये ( ट्रेड) प्रशिक्षण घेत आहेत. सर्व आयटीआय सुसज्ज स्वतंत्र इमारतीमध्ये भरत

आहेत. जुलै २०२५ मध्ये आयटीआय सिन्नर व फेब्रुवारी २०२६ मध्ये आयटीआय नांदगाव येथे नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन उद्घाटन करण्यात आले.

आज मविप्रच्या आठही आयटीआयमधून दरवर्षी हजारो विद्यार्थी विविध ट्रेडमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. सातपूर, अंबड, सिन्नर एमआयडीसीतील अनेक कंपन्यांमध्ये मविप्रच्या सर्व आयटीआयचे विद्यार्थी नोकरी करत आहेत. कॅम्पस प्लेसमेंट, अप्रेंटिसशिप व स्वयंरोजगार मार्गदर्शनामुळे १००% विद्यार्थ्यांना प्रशिक्षणानंतर लगेच काम मिळते. मविप्र संस्थेच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील बेरोजगारी कमी होऊन 'स्थानिकांना स्थानिक पातळीवर रोजगार' या संकल्पनेला चालना मिळणार आहे.

रोजगार व स्वयंरोजगाराला चालना मिळण्यासाठी संस्थेने अनेक नामांकित कंपन्यांशी सामंजस्य करार (MOU) केल्यामुळे कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना थेट नोकरीची संधी दिली जाते. तसेच शासकीय योजनांचा लाभ घेऊन स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन, कर्ज सुविधा व व्यवसाय प्रशिक्षणही दिले जाते.

**स्मार्ट स्किल प्रशिक्षण :**

या आयटीआयमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना आपल्या ट्रेडच्या प्रशिक्षणाबरोबरच मोफत बॉश होम अप्लायन्सेस प्रशिक्षण, बॉश लीप प्रोग्रॅमअंतर्गत ऑटोमोटिव्ह सर्विस, टेक्निशियन टू व्हीलर, फोर व्हीलर, महिंद्रा अँड महिंद्रा टीडीके कॉर्नर अंतर्गत टू व्हीलर, फोर व्हीलर ट्रेनिंग कोर्स तसेच महिंद्रा अँड महिंद्रा 'हुनर' उपक्रमाअंतर्गत इंडस्ट्रियल जनरल पेंटर कोर्सचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच जगण्याच्या मूळ प्रवाहाबाहेर गेलेल्या व अर्धवट शिक्षण झालेल्या गरजू व आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना सुद्धा या प्रशिक्षणामुळे रोजगार व नोकरीच्या संधी प्राप्त होत आहेत. तसेच उषा इंटरनॅशनल व टाटा मोटर्स या कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात येऊन विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारामुख प्रशिक्षण देण्यात येत आहेत .

सदर संस्थेत रोजगारक्षम असे २ वर्ष कालावधीचे इलेक्ट्रिशियन,फिटर, वायरमन, मेकॅनिक मोटार व्हेईकल, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक व ड्राफ्ट्समन सिव्हिल आणि १ वर्ष कालावधीचे वेल्डर व कोपा हे व्यवसाय सुरू आहेत. यामध्ये दरवर्षी २७६ विद्यार्थी नव्याने प्रवेश घेतात व तितकेच परीक्षा देऊन बाहेर पडतात.

**रोजगार मेळाव्यात नामांकित कंपनींचा सहभाग** :

संस्थेच्या नाशिक आयटीआय मध्ये दरवर्षी भव्य रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये संस्थेच्या सर्व तसेच जिल्ह्यातील इतर आयटीआय मधील प्रशिक्षणार्थी सहभागी होतात. सदर रोजगार मेळाव्यात शहरातील



**-श्री. आर. बी. पाटील**
प्राचार्य, मविप्र आयटीआय, नाशिक

नामांकित महिंद्रा अँड महिंद्रा, बॉश, टीडीके, बजाजसन्स, टाटा मोटर्स, सीटीआर, एन्ट्रको, फॉक्स सोल्युशन व इतर कंपन्या सहभागी होतात. सन २०२३ मध्ये ४२९, सन २०२४ मध्ये २६७, सन २०२५ मध्ये २३८ व सन २०२६ मध्ये ३८३ असे ४ वर्षात एकूण १३१७ प्रशिक्षणार्थींना शहरातील नामांकित कंपन्यांमध्ये अॅप्रेंटिसशीप व ट्रेनी म्हणून निवड करण्यात येऊन नियुक्तीपत्रे देण्यात आली.

**सामंजस्य करार :** आयटीआय व कंपनी यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी संस्थेच्या सर्व आयटीआयने जवळपास ७५ नामवंत कंपन्यांशी समंजस्य करार (MOU) केलेले आहेत. यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांसाठी ऑन जॉब ट्रेनिंग (OJT), औद्योगिक सहल (Industrial Visit), विविध तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने तसेच कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजन आदींचा समावेश आहे.

**तंत्र प्रदर्शन सहभाग :**

नाशिक आयटीआय मधील प्रशिक्षणार्थी नेहमी प्राचार्य, गटनिदेशक व निदेशकांच्या मार्गदर्शनाखाली विविध तंत्र प्रदर्शनात सहभाग घेत असतात. यामध्ये मागील चार वर्षात प्रामुख्याने सोलर अँड विंड बेस्ट वायरलेस चार्जिंग स्टेशन फॉर इलेक्ट्रिक व्हेईकल विथ बिलींग युनिट,हायड्रोजन फ्युएल, जनरेटिंग अँड इलेक्ट्रिसिटी फ्रॉम नोन डिसपोसेबल प्लास्टिक वेस्ट व स्मार्ट अँड सेफ्टी कार पार्किंग यासारखे समाजासाठी उपयुक्त व नावीन्यपूर्ण असणारे पारितोषिक विजेते प्रकल्प जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनात सादर करण्यात आले. सदर प्रकल्पांची विभागीय व राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली. तसेच सन २०२४-२५ या वर्षात किर्लोस्कर वसुंधरा ग्रीन कॅम्पस ट्रॉफी कॉम्पिटिशन या स्पर्धेत सहभागी होऊन तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**बॉश आर्टिसन ट्रेनिंग सेंटर ( होम अप्लायन्सेस) :**

लाखो रुपये खर्च करून बॉश इंडिया लिमिटेडच्या सहकार्याने मे २०२५ मध्ये मविप्र नाशिक आयटीआय मध्ये आर्टिसन ट्रेनिंग सेंटर (होम अप्लायन्सेस) ची स्थापना करण्यात आली. सदर सेंटरमध्ये अद्यावत उपकरणे व मशिनरी असून तेथे घरगुती विद्युत उपकरणे जसे : ईस्त्री,मिक्सर, पंखा,ओव्हन, फ्रिज, वॉशिंग मशीन, डिश वॉशर, किचन हूड माऊंटेड ऑन वॉल इत्यादी उत्पादनांची निगा व दुरुस्ती तसेच नवीन उत्पादनांची निर्मिती याबाबत अद्यावत प्रशिक्षण देण्यात येत आहे. तेथे मागील वर्षात १५० जणांना प्रशिक्षण देण्यात आले.

**बॉश लिप प्रोग्राम :**

बॉश इंडिया फाऊंडेशन (लिप प्रोग्राम) यांच्या वतीने मविप्र नाशिक आयटीआय मध्ये ऑटोमोटिव्ह सेवा तंत्रज्ञ (टू व्हीलर व फोर व्हीलर), ऑटोमोटिव्ह सेल्स अँड सर्व्हिसेस अॅडव्हायझर (टू व्हीलर व फोर व्हीलर) आदी प्रकारचे रोजगारभिमुख कोर्सेस नोव्हेंबर २०२५ पासून सुरू करण्यात आले. यामध्ये आजपर्यंत १२५ विद्यार्थ्यांनी या विविध कोर्सेस मध्ये प्रशिक्षण घेतले. कंपनीच्यावतीने सदर कोर्स करता प्रवेशित विद्यार्थ्यांना मोफत ट्रेनी किट व बॅगचे वाटप करण्यात आले. तसेच या कोर्स करिता प्रशिक्षण देणाऱ्या या आयटीआय मधील ३ निदेशकांना कंपनीच्या वतीने भोपाळ येथे ३ दिवस प्रशिक्षण देण्यात आले.

**महिंद्रा टीडीके कॉर्नर :**

संस्थेच्या नाशिक, सिन्नर, भाऊसाहेबनगर व सटाणा आयटीआय मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना BS6 तसेच इलेक्ट्रिक व्हेईकल याबाबतची माहिती व दुरुस्तीचे अद्यावत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने महिंद्रा अँड महिंद्रा या कंपनीच्यावतीने महिंद्रा टीडीके कॉर्नर लॅब सप्टेंबर २०२४ मध्ये उभारण्यात आली. सदर लॅब करिता कंपनीच्यावतीने टूलकिट, स्पॅनर सेट, टॉर्क रेंज, ५५ इंच कलर टीव्ही, इलेक्ट्रॉनिक्स बेंच, कट सेक्शन इंजिन, ट्रॉली इत्यादी साहित्य देण्यात आले. सदर कोर्समध्ये एकूण १०० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**महिंद्रा अँड महिंद्रा (हुन्नर प्रकल्प ) पेंट शॉप** :

महिंद्रा अँड महिंद्रा सी एस आर फंड हुन्नर प्रकल्प अंतर्गत लाखो रुपये खर्च करून डिसेंबर २०२५ ला आयटीआय मध्ये इंडस्ट्रियल जनरल पेंटर कोर्स करिता अद्यावत अशी पेंट शॉप ची उभारणी करण्यात आली. वाढत्या औद्योगीकरणात इंडस्ट्रियल पेंटरची कमतरता लक्षात घेऊन १० वी पास व १८ ते ३० या वयोगटातील विद्यार्थ्यांना पेंट शॉप मध्ये २० दिवसांचे थिअरी व प्रात्यक्षिक यांचा समावेश असलेले प्रशिक्षण व त्यानंतर ८ दिवस कंपनीत प्रत्यक्ष पेंटिंग प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षण झाल्यानंतर कंपनीच्यावतीने "इंडस्ट्रियल जनरल पेंटर" हे प्रमाणपत्र देण्यात येते. आजपर्यंत जवळपास १०० विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षण पूर्ण केले असून त्यांना महिंद्रा अँड महिंद्रा व तत्सम कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

**टाटा मोटर्स :**

आयटीआय मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या

विद्यार्थ्यांना टाटा कार मध्ये झालेल्या आधुनिकीकरणाबाबत प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यात आला. सदर कोर्सकरिता प्रशिक्षक म्हणून काम करणाऱ्या या शाखेतील तीन निदेशकांना कंपनीच्यावतीने टाटा मोटर्स कार प्लांट पुणे येथे एक आठवडा निवासी प्रशिक्षण देण्यात आले. नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झालेल्या सदर कोर्समध्ये आत्तापर्यंत २१ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**उषा इंटरनॅशनल कंपनी :**

उषा इंटरनॅशनल कंपनीच्यावतीने मविप्र आयटीआय नाशिक येथे दि. २० ऑगस्ट २०२५ ते दि. १८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत मल्टी स्किल सर्विस टेक्निशियन ट्रेनिंग प्रोग्राम इन रिपेअर अँड मेंटेनन्स ऑफ इलेक्ट्रिक अप्लायन्सेसचे आयोजन करण्यात आले. यामध्ये उषा इंटरनॅशनल कंपनीचे उत्पादित इलेक्ट्रिक घरगुती उपकरणांची निगा व दुरुस्ती याबाबत अद्यावत प्रशिक्षण देण्यात आले. सदर कोर्समध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या ३० विद्यार्थ्यांना कोर्स कालावधीत चहा नाश्ता व १ वेळ जेवण तसेच कोर्स पूर्ण झाल्यानंतर जवळपास रु. १००००/- किमतीचे टुलकीट व प्रमाणपत्र कंपनीच्यावतीने देण्यात आले.

आजच्या स्पर्धेच्या युगात फक्त विविध प्रकारची पदवी संपादन करणे पुरेसे नाही, तर हातात कौशल्य हवे. ते कौशल्य देणारी, कमी वेळात, कमी खर्चात रोजगाराची हमी देणारी संस्था म्हणजेच मराठा विद्या प्रसारक समाजाची, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) नाशिक होय. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सातही आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दहावी उत्तीर्ण विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात. गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचीही सोय आहे. बस पास सवलती बरोबरच ओजीटी (OJT) व इंडस्ट्रियल भेट सुविधाही उपलब्ध आहे.

**पालकांनी जागरूक होणे गरजेचे**

दहावीची परीक्षा आयुष्यात महत्त्वाची मानली जाते, कारण इथूनच मुलांच्या करिअरला दिशा मिळते. तसेच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळण्याचाही हाच काळ असतो. म्हणूनच पालक आपल्या मुलांकडून खूप अपेक्षा बाळगून असतात. मुलाला इतके इतके टक्के मार्क्स मिळायला हवेत असा त्यांचा अट्टाहास देखील पाहायला मिळतो. पण प्रत्येक पाल्य वेगळा असतो. त्यांचा बुध्यांक वेगळा असतो. अशा वेळी कमी गुण मिळाले म्हणून पालक नाराज होतात, विद्यार्थी निराश होतात आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल ते उचलतात. पण इथेच पालकांनी जागरूक होण्याची गरज आहे. रोजगाराभिमुख अनेक अभ्यासक्रम आहेत, त्याचे महत्त्व समजून घ्या. आपला मुलगा / मुलगी १० वी नापास किंवा कमी मार्क्स असले तरी खचू नका. ITI मध्ये प्रवेश घेऊन १ /२ वर्षात नोकरी व स्वयंरोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा. आजच प्रवेश घ्या. ITI करा, कुशल बना, स्वावलंबी व्हा.

**मविप्र आयटीआय नाशिक मध्ये प्रवेश का घ्यावा?**

कमी कालावधी व कमी खर्चात नोकरी : १०वी / १२वी पास / नापास नंतर फक्त १ ते २ वर्षांत कमी खर्चात आयटीआय कोर्स पूर्ण केल्यानंतर सरकारी व खासगी कंपन्यांत नोकरीची संधी उपलब्ध होते. शासकीय शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत SC, ST, NT, OBC, SEBC व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सोय उपलब्ध आहे.

**भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन :**

दरवर्षी आयटीआयमध्ये रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येऊन प्रशिक्षणार्थींना १००% अप्रेंटिसशिप व नोकरी देण्यात येते. तसेच अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणार्थींना ओजीटी (ऑन जॉब ट्रेनिंग) व इंडस्ट्रियल व्हिजिटची सुविधा उपलब्ध आहे. त्यासाठी ७० नामवंत कंपन्यांशी सामंजस्य करार (MOU) करण्यात आले आहेत .

प्रवेशित विद्यार्थ्यांना स्मार्ट स्किल प्रशिक्षण : आयटीआयमध्ये आपल्या ट्रेडच्या प्रशिक्षणाबरोबरच बॉश होम अप्लायन्सेस प्रशिक्षण, महिंद्रा अँड महिंद्रा २ व्हिलर ट्रेनिंग कोर्स व महिंद्रा पेंट शॉप ट्रेनिंग कोर्सचे प्रशिक्षण देण्यात येईल.

**आयटीआय मध्ये ८०% प्रॅक्टिकल ट्रेनिंग :** उच्चप्रशिक्षित निदेशक असल्याने प्रत्यक्ष मशीनवर काम करून शिकवले जाते. त्यासाठी इलेक्ट्रीशियन, फिटर, मेकॅनिक मोटर व्हेइकल, वायरमन, इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक, सिव्हिल ड्राफ्ट्समन, वेल्डर, कोपा आदी ट्रेडसाठी अत्याधुनिक मशिनरीसह प्रशस्त कार्यशाळा उपलब्ध आहे.

**सरकारी नोकरीची संधी :** रेल्वे, आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, BHEL, ONGC, IOCL, मेट्रो, महावितरण, स्टेट ट्रान्सपोर्ट (ST) येथे ITI पास उमेदवारांसाठी हजारो जागा राखीव असतात.

MIDC मध्ये नामवंत कंपन्यांमध्ये नोकरी : नाशिक, पुणे, औरंगाबाद, मुंबई MIDC मध्ये आयटीआय प्रशिक्षणार्थींना नोकरीची कायम मागणी असते व त्यांना चांगला पगार मिळतो.

**परदेशात नोकरीची संधी :** आखाती देश जसे की दुबई, कतार, सौदी अरेबियामध्ये ITI इलेक्ट्रीशियन, मेकॅनिक मोटर व्हेइकल, फिटर, वेल्डर यांना मोठी मागणी आहे व या कामांसाठी ५०,००० ते १ लाख रुपयांपर्यंत चांगला पगार मिळतो.

**स्वयंरोजगाराचा मार्ग :** ITI झाल्यावर इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर, इलेक्ट्रिकल शॉप, वेल्डिंग शॉप, टू व्हीलर / फोर व्हीलर गॅरेज, कंपनीचे वेंडर, वर्कशॉप, कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट सुरू करू शकतात. यासाठी मुद्रा लोन व PMEGP योजनेतून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळते.

**कमवा व शिका योजना :** कंपनीमध्ये OJT (ऑन जॉब ट्रेनिंग) व ITI नंतर मोठ्या कंपन्यांत १ वर्ष अॅप्रेंटिसशिप मिळते. यादरम्यान महिन्याला १०,००० ते १८,००० रु. स्टायपेंड + अनुभव + सर्टिफिकेट मिळते. ८०% मुलांना त्याच कंपनीत कायमस्वरूपी नोकरी मिळते.

**पुढील शिक्षणाची दारे खुली :** ITI कोर्स पूर्ण झाल्यानंतर इयत्ता १२वी समकक्ष परीक्षा देता येते, त्यानंतर पदवी प्राप्त करून स्पर्धा परीक्षा देऊ शकता. दोन वर्ष कालावधीचा आयटीआय कोर्स उत्तीर्ण झाल्यानंतर डिप्लोमा द्वितीय वर्षात (Direct Second Year) थेट प्रवेश घेता येतो.

**मुलींसाठी सुरक्षित व उत्तम पर्याय :** ड्राफ्ट्समन सिव्हिल, इलेक्ट्रिशियन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, वायरमन व कोपासारखे ट्रेड मुलींसाठी फायदेशीर व नोकरीची हमी असणारे आहेत. प्रवेशासाठी मुलींना ३० टक्के जागा राखीव आहेत.

**"स्किल इंडिया"चे शस्त्र :** मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात - "Degree पेक्षा Skill ला महत्व द्या". ITI हेच स्किल इंडियाचे प्रवेशद्वार आहे.

**नोकरीसाठी नाशिक जिल्ह्यातील संधी :** नाशिकमध्ये सातपूर, अंबड, गोंदे एमआयडीसी, सिन्नर MIDC मध्ये नामवंत कंपन्यांमध्ये तसेच Mahindra, Bosch, TDK, ABB, Crompton Greaves, VIP, Glaxo सारख्या पाच हजाराहून अधिक कंपन्या आहेत. यामध्ये अप्रेंटिसशिप व ट्रेनी म्हणून मोठी संधी उपलब्ध आहे.

कर्मवीर रावसाहेब थोरात आदींनी दाखवलेल्या ‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ या मार्गावरूनच आम्ही वाटचाल करत आहोत. शहरापुरते मर्यादित न राहता खेड्यापाड्यातील मुलांच्या हाताला काम देणे, हेच आयटीआय स्थापनेचे उद्दिष्ट होते. आज द्राक्ष बागायतदाराचा मुलगा असो वा आदिवासी पाड्यातील विद्यार्थी, सर्वांना एकाच दर्जाचे कौशल्यावर आधारित तांत्रिक शिक्षण मिळत आहे. मविप्र संस्थेच्या आयटीआयमधून रोजगाराची कवाडे खुली करण्यात आली असून उद्योग क्षेत्रात युवकांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे हे आमचे ध्येय आहे. स्किल इंडियाला बळकटी देण्यासाठी आम्ही आयटीआयच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करत आहोत. आजच्या स्पर्धेच्या युगात फक्त विविध प्रकारची पदवी पुरेशी नाही, तर हातात कौशल्य हवे. आणि ते कौशल्य देणारी, कमी वेळात, कमी खर्चात रोजगाराची हमी देणारी संस्था म्हणजेच मराठा विद्या प्रसारक समाजाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून विद्यार्थ्यांना १००% अप्रेंटिस व रोजगार उपलब्ध होत आहे.

# कौशल्यविकास ते रोजगार नवी आशा-नवी दिशा



**आजच्या वेगाने बदलणाऱ्या आणि कमालीच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान किंवा पदवी मिळवणे पुरेसे राहिलेले नाही. शिक्षण प्रणालीला खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण बनवण्यासाठी त्यात 'कौशल्य विकास शिक्षणाचा' (Skill Development) समावेश करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. कौशल्य विकास म्हणजे केवळ एखादे काम शिकणे नव्हे, तर विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांना रोजगाराभिमुख आणि स्वावलंबी बनवणे होय.**




**-श्री. प्रशांत म. पाटील**
प्राचार्य, मविप्र राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक, नाशिक.


जेव्हा पारंपरिक शिक्षणाची सांगड आधुनिक कौशल्यांशी घातली जाते, तेव्हाच खऱ्या अर्थाने सक्षम, आत्मनिर्भर आणि उद्योजक पिढीची निर्मिती होते. भारताला जागतिक पातळीवर महासत्ता बनवण्यासाठी आणि तरुणांच्या हाताला हक्काचा रोजगार मिळवून देण्यासाठी कौशल्य विकास हे प्रगतीचे मुख्य साधन ठरत आहे. याच ध्येयाने प्रेरित होऊन नाशिकमधील

मराठा विद्या प्रसारक (मविप्र) संस्थेचे राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक येथे 'कौशल्य विकास, उद्योजकता विकास, इनोव्हेशन आणि स्टार्टअप मार्गदर्शन केंद्र' तसेच 'सीआयआय (CII) मॉडेल्स करिअर सेंटर'च्या माध्यमातून कौशल्य विकास ते रोजगार निर्मितीसाठी नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत. हा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण भारतासाठी एक आदर्श 'रोल मॉडेल' ठरत आहे.

**१. बॉश टेक्निकल स्किल सेंटर (BTSC) : तांत्रिक कौशल्याचे केंद्र**

'Bosch India Foundation' चा एक प्रमुख उपक्रम असलेले बॉश टेक्निकल स्किल सेंटर (BTSC) २०१७ मध्ये स्थापित झाले असून, २३ फेब्रुवारी २०२२ पासून या महाविद्यालयात सक्रियतेने कार्यरत आहे.

• उद्दिष्ट : विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढवणे आणि त्यांच्या स्वावलंबनाला चालना देणे.

• **प्रशिक्षण पद्धती :** येथे प्रामुख्याने 'इलेक्ट्रिकल ट्रेड'मध्ये उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. ज्यामध्ये सैद्धांतिक ज्ञान, प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि ऑन-द-जॉब ट्रेनिंग (OJT) यांचा समावेश आहे.

• **कोर्सेसचा कालावधी :** येथे ६ महिन्यांचे दीर्घकालीन प्रशिक्षण (३ महिने सेंटर-आधारित + ३ महिने OJT) तसेच विविध अल्पकालीन अभ्यासक्रम, कार्यशाळा आणि 'Train-the-Trainer' कार्यक्रम राबवले जातात.

• **उपलब्ध अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांचा प्रतिसाद :**

केंद्रातर्फे इलेक्ट्रिकल वायरमन स्किल्स (६ महिने), ॲडव्हान्स्ड रेसिडेन्शियल वायरिंग (५/१५ दिवस), सोलर पॅनल वायरिंग (१ दिवस), सीसीटीव्ही इन्स्टॉलेशन (१ दिवस), बेसिक ऑटोकॅड (३ दिवस) आणि ट्रेन-द-ट्रेनर प्रोग्राम्स (५/१५ दिवस) असे वैविध्यपूर्ण कोर्सेस चालवले जातात.

• **प्रशिक्षणार्थींची आकडेवारी :**

• २०२३–२४: ५१९ विद्यार्थी
• २०२४-२५: ६३४ विद्यार्थी
• २०२५-२६ (आजपर्यंत): ४७० विद्यार्थी

• **विशेष यश:** आजपर्यंत तब्बल २५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना या केंद्राच्या माध्यमातून यशस्वी प्रशिक्षण आणि प्लेसमेंट देण्यात आली आहे.

**२. उद्योजकता विकास आणि 'MUSS' नेटवर्क**

राजर्षी शाहू महाराज तंत्रनिकेतन हे 'MUSS' शी असलेल्या सक्रिय संलग्नतेमुळे उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्य बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विद्यार्थी, प्राध्यापक आणि स्थानिक व्यावसायिक यांच्यात नेटवर्किंग वाढवण्यासाठी संस्था एक प्रमुख केंद्र बनली आहे.

• साप्ताहिक बैठकांचे आयोजन : संस्थेमध्ये दर बुधवारी नियमित साप्ताहिक बैठका होतात. यात उद्योजक एकत्र येऊन आपल्या व्यवसायाची ओळख करून देतात, व्यावसायिक अडचणींवर चर्चा करतात आणि सहकार्याच्या संधी शोधतात.

• **विद्यार्थ्यांचा सहभाग :** प्रत्येक बैठकीत सुमारे ३० विद्यार्थी आणि ४ कर्मचारी उपस्थित राहतात. यशस्वी उद्योजकांशी थेट संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक आव्हानांची जाणीव होते आणि भविष्यात उद्योजक होण्यासाठी प्रेरणा मिळते.

• **शैक्षणिक फायदा :** सहभागी उद्योजक हे औद्योगिक भेटी (Industrial Visits), तज्ज्ञ व्याख्याने आणि मेंटॉरशिप सत्रांसाठी संस्थेला सहकार्य करतात, ज्यामुळे किताबी ज्ञान आणि प्रत्यक्ष कार्यपद्धती यामधील दरी मिटण्यास मदत होते.

**व्यावसायिक यश :** स्थापनेपासून आतापर्यंत MUSS च्या माध्यमातून सुमारे २४० साप्ताहिक बैठका आणि २ मोठी प्रदर्शने आयोजित करण्यात आली आहेत. या नेटवर्कच्या माध्यमातून सदस्यांनी एकत्रितपणे ६०० कोटी रुपयांची व्यावसायिक उलाढाल साध्य केली आहे. हे उपक्रम केवळ संवादाचे माध्यम नसून प्रत्यक्ष शाश्वत व्यवसायवृद्धीचे केंद्र बनले आहेत.

**३. CII - मॉडेल्स करिअर सेंटर : 'शिक्षणाकडून रोजगाराकडे' (E-2-E)**

केंद्र सरकारचे कामगार व रोजगार मंत्रालय आणि CII (Confederation of Indian Industry) यांच्या संयुक्त विद्यमाने E-2-E (Education to Employment) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवला जात आहे. मुंबईत मागील २ वर्षांत या प्रकल्पातून १ लाख युवकांना रोजगार मिळाला असून, नाशिक जिल्ह्यासाठी या प्रकल्पाची धुरा सांभाळण्यासाठी 'राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक'ची निवड करण्यात आली आहे.

• प्रकल्प स्वरूप : या अंतर्गत मोठ्या प्रमाणावर मोफत रोजगार मेळावे आणि अत्याधुनिक कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित केले जाते.

• कर्मचारी आणि निधी : प्रकल्पाच्या नियमित कामकाजासाठी CII ने १० पूर्णवेळ प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, याचा सर्व खर्च CII CSR FUND मधून केला जातो.

• प्रशिक्षण कालावधी : तरुणांसाठी ७, १५ आणि ९० दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते व त्यांच्या क्षमतेनुसार योग्य कंपनीत नोकरीची संधी दिली जाते. येथे दर आठवड्याला रोजगार मेळावा होतो.

**रोजगार मेळाव्यांचे यशस्वी आयोजन :**

मविप्र संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये 'कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर' तर्फे आयोजित मेळाव्यांतून हजारो तरुणांना रोजगार मिळाला आहे:

• मविप्र राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक – ८८३ रोजगार
• मविप्र के.टी.एच.एम कॉलेज- १००४ रोजगार
• मविप्र निफाड कॉलेज – ८७० रोजगार
• मविप्र सटाणा कॉलेज – ४७५ रोजगार
• मविप्र नांदगाव कॉलेज – २४७ रोजगार
• मविप्र वणी कॉलेज – १३७ रोजगार
• मविप्र देवळाली कॅम्प कॉलेज – ११९ रोजगार
• मविप्र चांदवड हायस्कूल -४३६ रोजगार

**भविष्यातील ध्येय:** आगामी वर्षात मविप्र संस्थेच्या प्रत्येक तालुक्यातील महाविद्यालयांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करून २५ हजारपेक्षा जास्त युवक-युवतींना उत्तम रोजगार मिळवून देण्याचा मानस आहे.

**४. इनोव्हेशन, स्टार्टअप आणि हॅकेथॉनमधील सहभाग**

नाविन्यपूर्ण संकल्पनांना चालना देण्यासाठी पॉलिटेक्निकमध्ये 'E-CELL' ची स्थापना करण्यात आली आहे.

• हॅकेथॉन (Hackathon) : प्रत्येक सेमिस्टरमध्ये विद्यार्थी नावीन्यपूर्ण संकल्पनांवर आधारित हॅकेथॉनमध्ये सहभागी होतात. यामुळे वेगवेगळ्या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना एकत्रित काम करण्याची (Teamwork) सवय लागते.

• पिअर लर्निंग (Peer Learning) : विविध स्पर्धा आणि कार्यशाळांमध्ये भाग घेतलेले विद्यार्थी 'पिअर लर्निंग' या आधुनिक संकल्पनेनुसार इतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

• **प्राध्यापकांचे सक्षमीकरण:**

नुकतेच संस्थेतील ५० प्राध्यापकांनी AICTE चा 'इनोव्हेशन अँबेसेडर' कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे, ज्यामुळे ते विद्यार्थ्यांना व्यावसायिक मॉडेल्स तयार करण्यासाठी अधिक सक्षमपणे मार्गदर्शन करत आहेत.

कौशल्य विकास, उद्योजकता वाढवणे, इनोव्हेशन, स्टार्टअप आणि सर्वांना हक्काचा रोजगार मिळवून देणे या त्रिसूत्रीवर मविप्र समाजाचे राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक वेगाने काम करत आहे. या सर्वसमावेशक उपक्रमांमुळे नाशिक परिसरातीलच नव्हे, तर राज्यातील तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाला एक 'नवी आशा आणि नवी दिशा' प्राप्त झाली आहे.




# अपना सपना :
## मविप्रने भरले स्वप्नांमध्ये बळ

**"मोठी स्वप्ने पाहण्याचा अधिकार प्रत्येक विद्यार्थ्याला आहे; मग त्याची आर्थिक परिस्थिती कोणतीही असो. " भारतातील लाखो विद्यार्थी डॉक्टर, अभियंता, शास्त्रज्ञ किंवा संशोधक होण्याची स्वप्ने पाहतात. विशेषत: अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर घडविण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी JEE आणि CET या परीक्षा यशाचे महत्त्वपूर्ण प्रवेशद्वारे मानली जातात . परंतु या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन, दर्जेदार प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरण अनेकदा महागड्या क्लासेसपुरते मर्यादित राहते. त्यामुळे असंख्य गुणवंत, मेहनती आणि होतकरू विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणींमुळे आपल्या ध्येयापासून दूर राहतात.**

अशा विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना नवे बळ देण्यासाठी मराठा विद्याप्रसारक समाजाचे कॉमर्स, मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर सायन्स (सी. एम. सी. एस. ) महाविद्यालय, नाशिक यांनी सात्त्विक कर्मा फाउंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने एक अत्यंत स्तुत्य आणि समाजाभिमुख उपक्रम हाती घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू झालेला हा "अपना सपना JEE / CET पूर्वतयारी" उपक्रम पुढील काळात अधिक व्यापक स्वरूपात सातत्याने राबविण्यात येणार आहे. या



**-डॉ. मधुकर शेलार**
प्राचार्य, मविप्र, सी. एम. सी. एस.
महाविद्यालय, नाशिक

फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने अकरावी व बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी JEE / CET परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी दोन वर्षांचा संपूर्णत: मोफत प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

**विद्यार्थ्यांच्या यशाचा भक्कम पाया :** या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड प्रवेशपरीक्षेद्वारे केली जाते. या माध्यमातून खऱ्या अर्थाने मेहनती, गुणवंत आणि जिद्दी विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना त्यांच्या क्षमतेला न्याय देणारे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांना परीक्षेत यश मिळवून देणे एवढाच मर्यादित नाही. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वैज्ञानिक दृष्टिकोन, वेळेचे व्यवस्थापन, समस्या सोडविण्याची क्षमता आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक असलेली मानसिक तयारी विकसित करणे हे देखील आहेत . IIT, NIT, IIIT तसेच देशातील इतर नामांकित अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम एक मजबूत आधारस्तंभ ठरणार आहे.

हा उपक्रम केवळ शैक्षणिक कार्यक्रम नाही; तर समाजातील शैक्षणिक विषमता कमी करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. "प्रतिभेला संधी मिळाली तर ती नक्कीच यशस्वी होते" या विश्वासाचे हे मूर्तरूप आहे.

**उज्ज्वल भविष्यासाठी एक सामूहिक प्रयत्न : शिक्षणातून सामाजिक परिवर्तनाची दिशा**

शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. समाजातील प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार संधी मिळाली पाहिजे. आर्थिक अडचणी विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या आड येऊ नयेत, या सामाजिक जाणिवेतून या उपक्रमाचा जन्म झाला आहे. ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील, मजूर वर्गातील किंवा मर्यादित उत्पन्न असलेल्या कुटुंबातील अनेक विद्यार्थी विलक्षण बुद्धिमत्ता बाळगून असतात. त्यांच्याकडे जिद्द असते, परिश्रम करण्याची

तयारी असते; मात्र आवश्यक मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ नसल्यामुळे त्यांची स्वप्ने अपूर्ण राहतात. अशा विद्यार्थ्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे हीच या उपक्रमामागील प्रेरणा आहे.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सी. एम. सी. एस. महाविद्यालय आणि सात्त्विक कर्मा फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून उभारलेला हा उपक्रम अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारा ठरेल. आज या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी उद्या देशातील प्रतिष्ठित अभियांत्रिकी संस्थेत शिक्षण घेताना दिसेल, संशोधन क्षेत्रात कार्यरत असेल किंवा समाजाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असेल, हीच या उपक्रमाची खरी यशोगाथा असेल.

**प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये:**

विद्यार्थ्यांना सर्वोत्तम दर्जाचे मार्गदर्शन मिळावे यासाठी कार्यक्रमाची रचना अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आली आहे.

- अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन
- JEE / CET अभ्यासक्रमावर आधारित नियमित अध्यापन
- JEE / CET वर आधारित ऑनलाइन परीक्षेचा संगणकीकृत सराव
- सराव परीक्षा व कामगिरीचे विश्लेषण
- वैयक्तिक व करिअर मार्गदर्शन
- अद्ययावत व दर्जेदार अभ्यास साहित्य
- नियमित शंका निरसन सत्रे
- विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण मूल्यमापन
- स्पर्धात्मक वातावरणात अभ्यासाची संधी

या सर्व सुविधा विद्यार्थ्यांना पूर्णतः मोफत उपलब्ध करून दिल्या जात आहेत, ही या उपक्रमाची सर्वात मोठी जमेची बाजू आहे.

**निष्कर्ष:**

प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात एक स्वप्न असते. त्या स्वप्नांना आकार देण्यासाठी आवश्यक असते योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधी. सी. एम. सी. एस. महाविद्यालयाने सुरू केलेला JEE / CET मोफत प्रशिक्षण उपक्रम ही अशाच असंख्य स्वप्नांना दिलेली आश्वासक साथ आहे.

आर्थिक परिस्थिती ही विद्यार्थ्यांच्या यशाची मर्यादा ठरू शकत नाही, हे सिद्ध करण्याचा हा प्रयत्न आहे. ज्ञान, गुणवत्ता, परिश्रम आणि संधी यांच्या संगमातून घडणारी ही यशाची वाटचाल भविष्यात अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा नवा सूर्योदय घडवेल, याची खात्री वाटते.

"स्वप्न मोठे असावे, परिस्थिती नव्हे; कारण यशाचा मार्ग प्रतिभा, परिश्रम आणि संधी यांच्या संगमातूनच तयार होतो. "

**कृतज्ञता:**

Apna Sapana JEE / CET मोफत प्रशिक्षण उपक्रमाची यशस्वी सुरुवात आणि वाटचाल ही अनेक व्यक्ती व संस्थांच्या सहकार्यामुळे शक्य झाली आहे.

सात्त्विक कर्मा फाउंडेशनचे संस्थापक श्री. कुलदीप कौराव व त्यांचे सहकारी श्री. गोविंद श्रीनिवार यांच्या अथक प्रयत्नाने सुरू केलेला हा उपक्रम असंख्य स्वप्नांना दिलेली आश्वासक साथ आहे.

मराठा विद्याप्रसारक समाजाचे सरचिटणीस आदरणीय ॲड. नितीनजी ठाकरे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि मा. पदाधिकारी आणि संचालक यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन यामुळे हा उपक्रम साकार होऊ शकला.

या प्रशिक्षणासाठी नियोजन, अध्यापन, मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्य करणारे सर्व प्राध्यापक, मेंटर्स आणि कर्मचारी वर्ग यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. विद्यार्थ्यांच्या यशासाठी त्यांनी दिलेला वेळ, परिश्रम आणि समर्पण हे या उपक्रमाचे खरे बळ आहे.

या उपक्रमावर विश्वास दाखवून जिद्दीने आणि मेहनतीने या संधीचे सोने करण्यासाठी पुढे आलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन. त्यांचे यश हेच या उपक्रमाचे खरे फलित आणि सर्व सहकाऱ्यांसाठी सर्वात मोठा सन्मान असेल. या उपक्रमाच्या यशामध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीप्रति आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.







# कौशल्यविकासाचा रोडमॅप:
# बॉश टेक्निकल स्किल्स सेंटर





**तुमचे वॉशिंग मशीन बिघडलेय, नळ नादुरुस्त झालाय.. ते दुरुस्त करण्यासाठी तुम्ही कारागीरांना फोन करताहेत, पण 'आता येतो', 'उद्या येतो', 'बिझी आहे'... अशी कारणे तुम्हाला पण मिळतात ना? तर त्याचे कारण म्हणजे आपल्याकडे ही कामे करणाऱ्या कारागीरांचीच वानवा आहे. कारण सर्वच जण डॉक्टर, इंजिनिअर होण्याचे स्वप्न पाहतात. पालक देखील हेच करिअर करण्यासाठी मुलांना आग्रह धरतात.आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी डॉक्टर व इंजिनिअर हे दोनच पर्याय वर्षानुवर्षे आपण मुलांना देत आलो आहोत. त्यामुळेच हे कारागीर कमी संख्येने घडतात, कमी संख्येने उपलब्ध होतात आणि मग घरात काही अशी कामे निघाली की आपली फजिती होते.**

जीवनावश्यक कौशल्यांचा समावेश शिक्षणात, आपल्या विचारात करण्यासाठी महात्मा गांधी नेहमीच प्रयत्नशील होते. म.गांधींच्या याच विचारांचा समावेश करून बॉश टेक्निकल स्किल्स सेंटरने अत्यंत दर्जेदार अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. भविष्यात जीवनावश्यक कौशल्यच रोजगाराचे सर्वात मोठे साधन ठरणार आहे. काळाची गरज ओळखून बॉश टेक्निकल स्किल्स सेंटरने कल्पकतेने हे अभ्यासक्रम डिझाईन केले आहेत.

करिअर म्हणजे केवळ डॉक्टर, इंजिनिअरसारखे प्रतिष्ठा लाभलेले अभ्यासक्रम नाही, तर तुम्हाला रोजगार उपलब्ध करून देणारे अभ्यासक्रम म्हणजे तुमचे करिअर, हा दृष्टिकोन देखील रुजवण्यासाठी हे अभ्यासक्रम सुरू आहेत. तसेच नुसतेच प्रशिक्षण दिले की बॉशची जबाबदारी संपली, असं टेक्निकल स्किल्स सेंटरचे काम नाही; तर भविष्यात विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाच्या माध्यमातून कोणताही व्यवसाय सुरू करताना आवश्यक माईंडसेट तयार करणे, संभाव्य अडचणींवर मात करण्याची तयारी त्यांच्याकडून करवून घेणे या बाबींवर देखील बॉश टेक्निकल स्किल्स सेंटर




**-श्री. नीलेश खालकर**
सहाय्यक कार्यक्रम व्यवस्थापक
बॉश टेक्निकल स्किल सेंटर - नाशिक

काम करते. रोजगार, कौशल्य प्रशिक्षण क्षेत्रात बॉश टेक्निकल स्किल्स सेंटर नक्कीच रोडमॅप ठरताना दिसत आहे.

नाशिकमधील कोणतीच शैक्षणिक संस्था असे उपक्रम राबवताना दिसत नाही. केवळ पुस्तकी ज्ञानार्जन करून या संस्था त्यांची जबाबदारी संपवून टाकतात. मात्र मराठा विद्या प्रसारक समाज (मविप्र) संस्थेने रोजगार व प्रशिक्षणाचे महत्त्व वेळीच ओळखून त्यासंदर्भात अत्यंत आखीव-रेखीवपणे दर्जेदार अभ्यासक्रम आणि त्यामार्फत रोजगाराच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

**बॉश टेक्निकल स्किल्स सेंटरची वैशिष्ट्ये :**

• **आंतरराष्ट्रीय दर्जा :** बॉश टेक्निकल स्किल्स सेंटरमधील सर्व अभ्यासक्रम हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहेत.

• **औद्योगिक तज्ज्ञांद्वारे डिझाईन :** हे सर्व अभ्यासक्रम औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी डिझाईन केलेले आहेत.

• **जागतिक प्रमाणन :** या अभ्यासक्रमांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर तुम्हाला प्रशिक्षित असल्याचा दर्जा दिला जातो.

• **व्यक्तिमत्त्व विकास :** या अभ्यासक्रमांमध्ये संवाद कौशल्ये, वेळेचे नियोजन, व्यवस्थापन, टीम वर्क, नेतृत्वगुण, समस्येचे निराकरण यांसारख्या व्यक्तिमत्त्व विकास गुणांवर देखील लक्ष केंद्रित केले जाते.

•**ग्राहक शिष्टाचार :** हे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर जेव्हा प्रत्यक्षात ग्राहकांपर्यंत पोहोचायचे असते, तेव्हा ग्राहकांना दर्जेदार सेवा, विनम्र सेवा कशी देता येईल, यादरम्यान ग्राहक शिष्टाचार कसा पाळता येईल यासंदर्भात देखील महत्त्वाच्या बाबींवर फोकस केला जातो. एक नवे ध्येय, सकारात्मकता तयार करूनच विद्यार्थी या प्रशिक्षण केंद्राच्या बाहेर पडतो.

•**सुरक्षेला प्राधान्य :**
अभ्यासक्रमांमध्ये विद्युत उपकरण दुरुस्तीसारखे किंवा इलेक्ट्रिकल संदर्भात जे जे प्रशिक्षण दिले जाते, त्यात सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. अत्याधुनिक तसेच दर्जेदार साहित्य या प्रशिक्षणासाठी उपलब्ध करून दिले जाते.

**ट्रेन द ट्रेनर (Train the Trainer) :**

विद्यार्थ्यांना अद्ययावत अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यासाठी चांगले ट्रेनर्स गरजेचे असतात. त्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून ट्रेनर्सला प्रशिक्षित केले जाते. तसेच काही अनुभवी प्रशिक्षकांचाही समावेश ट्रेनर्स टीममध्ये केला जातो.

प्रत्येक अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना व प्रशिक्षकांना प्रॅक्टिकल स्वरूपात काम करण्याची संधी दिली जाते. जेणेकरून जे प्रशिक्षण ते घेत आहेत, त्याचा प्रत्यक्ष काम करताना त्यांना उपयोग झाला पाहिजे. सर्व अत्याधुनिक साधने, यंत्रे स्वतः हाताळण्याची संधी विद्यार्थ्यांना आणि प्रशिक्षकांना दिली जाते.

**अत्याधुनिक सुविधा** :

बॉश टेक्निकल स्किल सेंटरमध्ये सर्व क्लासरुम्स या अत्याधुनिक सुविधांनी सज्ज करून देण्यात आल्या आहेत. सर्व अभ्यासक्रमांसाठी लागणाऱ्या मशीन्स या अद्ययावत तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या आहेत. अतिशय प्रगत तंत्रज्ञान, सर्वोत्तम साधने, तज्ज्ञ मार्गदर्शक, आधुनिक उपकरणे अशा सर्वच पातळ्यांवर अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र म्हणून

या केंद्राचा उल्लेख करता येईल.

**प्रशिक्षणार्थींची पात्रता व निवड :**

विद्यार्थी केंद्रित, रोजगाराभिमुख प्रशिक्षण व अभ्यासक्रम राबवताना 'या केंद्रावर कोण प्रशिक्षण घेऊ शकेल?' असा प्रश्न पडणे साहजिक आहे.

**शैक्षणिक अट नाही** : या प्रशिक्षणांसाठी कोणत्याही शैक्षणिक किंवा ठराविक गुणवत्तेचे बंधन ठेवण्यात आलेले नाही, ही या प्रशिक्षण केंद्राची सर्वात ठळक बाजू आहे.

**१० वी / १२ वी पास असणे आवश्यक नाही** : तुम्ही दहावी, बारावी उत्तीर्ण असणे बंधनकारक नाही. ही सर्वसामान्य शैक्षणिक पात्रता देखील या प्रवेशासाठी तुमच्याकडे नसली तरी चालणार आहे. एरवी सेल्समन, डिलिव्हरी बॉय यासाठी देखील किमान दहावी / बारावी पास अशी शैक्षणिक अट घातली जाते, मात्र या प्रशिक्षणासाठी ती अट देखील शिथिल करण्यात आली आहे.

- **अपेक्षित पात्रता** : विद्यार्थी हा नवनवीन तंत्रज्ञान, विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी उत्सुक हवा. या प्रशिक्षणाप्रति त्याचा सकारात्मक दृष्टिकोन हवा आणि शिकण्याची जिद्द हवी, एवढीच अपेक्षा विद्यार्थ्यांकडून आहे.

**प्रशिक्षणाचे स्वरूप :**

इतर शैक्षणिक अभ्यासक्रमांसारखे यात भरमसाठ पाठांतर, भरपूर लिखाण असे काही नाही. या प्रशिक्षण अभ्यासक्रमांचा पॅटर्न ठरवतानाच विद्यार्थ्यांना तो कंटाळवाणा न वाटता त्यातून प्रत्यक्ष शिकण्याची संधी मिळावी यासाठी डिझाईन केला गेला आहे.

- १० % थेअरी (Theory)
- १० % व्यक्तिमत्त्व विकास आणि संगणक (Personality Development & Computer)
- ३० % प्रोजेक्टनिहाय प्रशिक्षण (Project-based Training)
- १५ % जॉब प्रशिक्षण (Job Training)
- ३५ % प्रत्यक्ष काम / प्रॅक्टिकल (Practical)

**प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये :**

१. तांत्रिक कौशल्ये (Technical Skills) :

- सुरक्षा आणि दर्जा, विविध नियम, प्रॅक्टिस कोड.
- विविध यंत्रांचे सुट्टे भाग, त्यांची माहिती, विविध ॲप्लिकेशन्सची माहिती.
- वायरिंग संदर्भात विविध कौशल्ये, कामाची जबाबदारी, गुणवत्ता राखणे, व्यावसायिक मूल्ये व प्रोफेशनॅलिझम.
- टेस्टिंग म्हणजेच पडताळणी करणे, खातरजमा करणे. एखाद्या यंत्राची, त्याच्या सुट्या भागाची दुरुस्ती केल्यास तो पूर्ववत काम करत असल्याची खात्री करून घेणे. यंत्रात नेमका काय बिघाड झालाय त्याचा शोध घेणे व तो समजून घेणे.
- घरातील पंखे, एसी, दिवे, सुरक्षा यंत्रणा स्वयंचलित करणे, मोबाईल ॲपद्वारे नियंत्रित करणे.
- सीसीटीव्ही (CCTV) सारखी यंत्रणा कार्यान्वित करणे, दुरुस्त करणे.
- इमारती, कार्यालये, कॉलेज कॅम्पस, अन्य कॅम्पस येथे टेलिफोन, इंटरनेट, डेटा ट्रान्समिशनसाठी मानकीकृत केबलिंग (Standardized Cabling) करणे.
- सौर ऊर्जा (Solar Panel) पॅनेल बसवणे.




**२. व्यावसायिक कौशल्ये (Business Skills)** :

- विविध उद्योगसमूहांना प्रत्यक्ष भेटी देणे.
- कोणत्याही व्यवसायाचे प्रत्यक्ष नियोजन करताना आवश्यक असलेले भांडवल, गुंतवणूक, एकूण खर्च याचा अभ्यास करणे. तसेच ते युनिट उभारणीसाठी लागणाऱ्या कालावधीचा अंदाज घेणे.
- रोजगारक्षमतेची पडताळणी करणे. म्हणजेच जो व्यवसाय आपण सुरू करणार आहोत, त्यातून आपण आपल्याला स्वतःला व इतरांना किती रोजगार देऊ शकू याचा ताळमेळ बसवणे.

**३. सॉफ्ट स्किल्स (Soft Skills)** :

- स्वतःचा आत्मविश्वास वाढवणे, मनोबल उंचावणे. जो व्यवसाय निवडाल तो करण्यासाठी लागणारे धाडस व सकारात्मकता अंगी बाळगणे.
- भाषेचा अभ्यास करून प्रभावी संवाद साधण्याची कला आत्मसात करणे. तसेच प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सूचक शब्दांत स्वतःचे उत्पादन व कौशल्य सादर करता येणे.
- उद्योग / व्यवसायासंदर्भातील सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांची माहिती करून घेणे, त्याचा योग्य स्वरूपात साठा करून ठेवणे.
- ग्राहकांशी नेहमीच अगत्यशील, नम्र, आपुलकीचे व प्रेमाचे संबंध प्रस्थापित करणे. दर्जेदार सुविधा देण्याचा प्रयत्न करणे.

**कोणकोणते प्रशिक्षण येथे मिळेल?**

- सुतारकाम (Carpentry)
- इलेक्ट्रिकल (Electrical)
- प्लम्बिंग (Plumbing)
- दगडी बांधकाम (Masonry)

**बॉश टेक्निकल स्किल सेंटरची प्रमुख उद्दिष्टे**

बॉशच्या माध्यमातून अत्याधुनिक पद्धतीने प्रशिक्षित झालेले कारागीर तयार करणे. प्रशिक्षित प्रशिक्षकांची फळी तयार करणे, जी देशभरात अशा कौशल्यांचा पुरस्कार करेल. ग्राहक हा केंद्रबिंदू मानून अद्ययावत यंत्रणा, कामगार यंत्रणा उभी करू शकणारे व्यवसाय तज्ज्ञ  व अभ्यासक तयार करणे. सर्जनशील, नवनिर्मितीचा ध्यास असलेले उद्योजक तयार करणे.

**बॉश टेक्निकल स्किल सेंटर येथे सुरु असलेले अभ्यासक्रम :**

| अ.क्र | प्रशिक्षण अभ्यासक्रम (Training Course) | प्रशिक्षण अभ्यासक्रम (Training Course) | कालावधी (Duration) | पात्रता (Eligibility) |
|---|---|---|---|---|
| १ | दीर्घकालीन प्रशिक्षण (Long Term Training) | इलेक्ट्रिशियन- डोमेस्टिक आणि इंडस्ट्रियल (Electrician- Domestic & Industrial) | ६ महिने | आयटीआय (ITI) / १२ वी व्होकेशनल उत्तीर्ण - इलेक्ट्रिकल किंवा इलेक्ट्रॉनिक्स |
| २ | अल्पमुदतीचे प्रशिक्षण (Short Term Training) | इलेक्ट्रिकल टेक्निशियन- पॅनेल वायरिंग (Electrical Technician -Panel Wiring) | ५ दिवस | डिप्लोमा / इंजिनिअरिंग विद्यार्थी - इलेक्ट्रिकल / इलेक्ट्रॉनिक्स |
| ३ | अल्पमुदतीचे प्रशिक्षण (Short Term Training) | सोलर पीव्ही टेक्निशियन (इन्स्टॉलेशन) (Solar PV Technician) | ५ दिवस | डिप्लोमा / इंजिनिअरिंग विद्यार्थी - सर्व शाखा |
| ४ | अल्पमुदतीचे प्रशिक्षण (Short Term Training) | फिल्ड सर्व्हिस टेक्निशियन - इलेक्ट्रिकल अप्लायन्सेस (Field Service Technician- Electrical Appliances) | ५ दिवस | डिप्लोमा / इंजिनिअरिंग विद्यार्थी - इलेक्ट्रिकल / इलेक्ट्रॉनिक्स |
| ५ | अल्पमुदतीचे प्रशिक्षण (Short Term Training) | इलेक्ट्रिकल ड्राफ्ट्समन (ऑटोकॅड) (Electrical Draughtsman - AutoCAD) | ५ दिवस | डिप्लोमा / इंजिनिअरिंग विद्यार्थी - इलेक्ट्रिकल / इलेक्ट्रॉनिक्स |
| ६ | अल्पमुदतीचे प्रशिक्षण (Short Term Training) | पॉवर टूल टेक्निशियन (Power Tool Technician) | ५ दिवस | डिप्लोमा / इंजिनिअरिंग विद्यार्थी - सर्व शाखा |
| ७ | ट्रेन द ट्रेनर (Train the Trainer) | इलेक्ट्रिकल टेक्निशियन - पॅनेल वायरिंग (Electrical Technician- Panel Wiring) | ५ दिवस | आयटीआय / डिप्लोमा / इंजिनिअरिंग इलेक्ट्रिकल - शिक्षक |
| ८ | एक दिवसीय सेमिनार + प्रशिक्षण | इलेक्ट्रिकल सेफ्टी अवेअरनेस (इलेक्ट्रिकल सुरक्षा जागरूकता) | १ दिवस | ९वी / १०वी चे शालेय विद्यार्थी/ आयटीआय / १२ वी - इलेक्ट्रिकल किंवा इलेक्ट्रॉनिक्स |
| ९ | तज्ज्ञांची व्याख्याने (Expert Lectures) | कोणताही इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विषय | १ दिवस | डिप्लोमा/ इंजिनिअरिंग विद्यार्थी/ आयटीआय / १२ वी - इलेक्ट्रिकल |

**(पान क्र. ११ वरून**

**बेरोजगारी : चिंतन आणि कृतीची गरज.....)**

स्वावलंबी बनत आहेत. त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि कुटुंबाला मदत करता येते. यामुळे तरुणांमध्ये स्वतःच्या क्षमतेविषयी विश्वास निर्माण होतो आणि भविष्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक बनतो.कौशल्यसंगोपनाबरोबर मार्गदर्शन आणि समुपदेशन देखील तितकेच आवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांना पुढे कोणता अभ्यासक्रम करावा, कोणत्या क्षेत्रात करिअर घडवावे याची योग्य माहिती उपलब्ध नसते. विशेषत: ज्या पालकांमध्ये शिक्षणाचा अनुभव कमी आहे, त्या घरी वाढलेल्या मुलांना करिअर-मार्गदर्शनाची तीव्र गरज असते. योग्य वेळी योग्य दिशा मिळाल्यास विद्यार्थ्यांना आपल्या क्षमता आणि आवडीनुसार करिअरची निवड करणे सोपे जाते. म्हणून प्रशिक्षण संस्था, उद्योग आणि शैक्षणिक सल्लागारांनी एकत्र येऊन करिअर सल्ला, मानसोपचार आणि कौशल्य प्रशिक्षणाचे समन्वित कार्यक्रम राबवण्यासाठी आता आम्ही प्रयत्नशील आहोत.समाजाने बेरोजगारी या समस्येला केवळ आर्थिक दृष्टिकोनातून न पाहता त्याचे मानसिक आरोग्य आणि मानवीय पैलू समजून घेतले पाहिजेत. दीर्घकाळ रोजगार न मिळाल्याने तरुणांच्या मनात निराशा, असुरक्षितता आणि भविष्याविषयी चिंता निर्माण होऊ शकते. यांसोबतच शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मानसोपचार आधार आणि करिअर मार्गदर्शक शिबिरे अनिवार्य करावीत.निराशा आणि ताण यांना सामोरे जाण्यासाठी समाजाने आधार देणारे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. अशा वेळी कुटुंब, शिक्षक आणि समाजाकडून मिळणारा सकारात्मक आधार तरुणांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. तरुणांना केवळ नोकरी नाही तर अर्थपूर्ण आयुष्य जगण्याची संधी देणाऱ्या कार्यक्रमांची रचना करणे महत्त्वाचे आहे. रोजगाराबरोबरच स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या नव्या संधींची माहितीही त्यांच्यापर्यंत पोहोचवली पाहिजे. जेव्हा तरुणांना आर्थिक स्वावलंबनाने आत्मविश्वास येईल, तेव्हा त्यांचे मानसिक आरोग्य सुधारेल आणि समाजातील सुसंवाद वाढेल.शेवटी, बेरोजगारीवर मात करणे म्हणजे फक्त रोजगाराचे आकडे वाढवणे नाही; तरुणांच्या आत्मविश्वासाला पोषण देणे, त्यांना सन्मानाने जीवन जगायला सक्षम करणे आणि त्यांच्या कुटुंबांचे व समाजाचे आरोग्य टिकवणे हे खरे उद्दिष्ट असावे. रोजगार, कौशल्य आणि योग्य मार्गदर्शन यांची सांगड घातल्यास तरुणांच्या क्षमतेला अधिक व्यापक संधी उपलब्ध होऊ शकतात. केवळ त्यानंतरच भारताची तरुण पिढी आपली ऊर्जा वापरून देशाचा प्रगतीमार्ग घडवू शकते. या प्रक्रियेत शिक्षणसंस्था, उद्योग आणि समाज यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होणे गरजेचे आहे. तरुणांच्या कौशल्याला योग्य संधीची जोड मिळाल्यास रोजगाराच्या नव्या वाटा निर्माण होऊ शकतात. सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी तरुणाई हीच भविष्यातील भारताच्या प्रगतीची खरी ताकद ठरेल.

# सक्षम आणि गतिशील व्यावसायिक प्लॅटफॉर्म



**"सन २०१८ मध्ये स्थापन झालेल्या 'मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन' संस्थेने उद्योग, व्यवसाय या संकल्पनेला अनेक नवीन आयाम प्राप्त करून दिले. तब्बल २००० मराठा उद्योजक बांधवांना या संस्थेने एकत्र आणून विकासाची नवीन व्याख्या तयार केली आहे. एकत्रित येणे व त्यातून समाजबांधवांना विकसित करणे या मुख्य हेतूने या संस्थेची सुरुवात झाली. नाशिक जिल्ह्यातील मराठा समाजातील विविध व्यावसायिक, उद्योजक, विविध सेवा-सुविधा पुरवणारे, ट्रेडर्स, फॅक्टरी मालक यांना मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्थेने एक व्हिजन दिले. व्यवसाय व उद्योगासंदर्भातील अत्याधुनिक यंत्रणा, तंत्रज्ञान, व्यवस्थापनाची ओळख करून दिली. त्यामुळेच एक नवीन क्षितिज या उद्योजक बांधवांना मिळाले."**

महाराष्ट्रात अनेक नेटवर्किंग प्लॅटफॉर्म असले तरी ही संस्था तिच्या सामाजिक बांधिलकीमुळे वेगळी ठरते. मराठा समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, त्यांना उद्योगक्षम बनविण्यासाठी आणि त्यातून यशस्वी व्यावसायिक व उद्योगपती घडविण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली. परंपरेने मराठा समाज शेती आणि नोकरी यावर अवलंबून राहिला आहे. ज्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्रातील हा सर्वात मोठा समाज आहे. तरीदेखील आर्थिक स्थैर्यासाठी उद्योग व व्यवसाय क्षेत्राकडे वळणे ही काळाची गरज आहे. आज अनेक तरुण शासकीय नोकऱ्या किंवा खासगी क्षेत्रातील रोजगाराकडे वळतात किंवा तेच त्यांचे ध्येय असते. परंतु, स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची क्षमता असूनही धाडस करत नाहीत.

छत्रपती शिवाजी महाराजांकडून धैर्य, दूरदृष्टी, नेतृत्व या गुणांची प्रेरणा घेऊन आपण नोकरी करणारे, नोकरी शोधणारे नव्हे तर रोजगार निर्माण करणारे बनले पाहिजे अशी माझी धारणा आहे. आपण छत्रपतींचे वंशज आहोत. त्यांनी मोजक्याच मावळ्यांच्या साथीने एवढे मोठे साम्राज्य निर्माण केले. आपण समाज बांधवांनीही एकमेकांना साथ देत, एकत्र येत नवे औद्योगिक साम्राज्य निर्माण करावे असे वाटते. आगामी काळात प्रत्येक सभासदाला व्यावसायिक दृष्ट्या थेट लाभ मिळवून देणे, नेटवर्किंग, व्यावसायिक संदर्भ, यशस्वी व्यवहार आणि संयुक्त उपक्रमांच्या माध्यमातून सदस्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे हा आमचा प्रयत्न राहणार आहे.

मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था ही एक प्रभावी मंच म्हणून उभी राहील. जिथे प्रत्येक सभासद आपली उत्पादने व सेवा प्रभावीपणे सादर आणि विक्री करू शकेल. डिजिटल युगाशी सुसंगत राहण्यासाठी आम्ही संस्थेचे विशेष मोबाईल ॲप लॉन्च करणारआहोत. या ॲपद्वारे मराठा समाजातील प्रत्येक उद्योजकाला आपली उत्पादने आणि सेवा सूचीबद्ध करता येतील. यामुळे ग्राहकांना सहजपणे समुदायातील व्यवसायांशी जोडता येईल आणि एक मजबूत अंतर्गत आर्थिक साखळी निर्माण होईल.

संस्थात्मक स्तरावर वेळेचे व्यवस्थापन, शिस्त, सर्वसमावेशकता यावर भर देण्यात येईल. जेणेकरून अधिकाधिक व्यावसायिक संधी निर्माण होतील. मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था ही फक्त संस्था नसून एक सक्षम आणि गतिशील व्यावसायिक प्लॅटफॉर्म आहे. उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी शिस्त, समर्पण आणि व्यावसायिकता आत्मसात करणे अत्यावश्यक आहे.

मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था, ही एक नोंदणीकृत संघटना असून जिल्हा, राज्य आणि केंद्रीय पातळीवर संस्थात्मक केडर (संघटन) द्वारे मराठा उद्योजक, व्यावसायिक, व्यापारी, कारखानदार, सेवा पुरवठादार आणि व्यावसायिकांच्या विकासासाठी आणि मार्गदर्शनासाठी कार्यरत आहे . आमच्या संस्थेची स्थापना सन २०१८ मध्ये झाली असून तेव्हापासून आम्ही मराठा उद्योजकांसाठी व्यवसाय परिसंवाद, बैठका, प्रदर्शने, कार्यशाळा, प्रशिक्षण, मार्गदर्शन (मेंटॉरिंग), कोचिंग, नेटवर्किंग इत्यादी विविध उपक्रम आणि प्रकल्प राबवत आहोत.

आम्हाला हे सांगताना अभिमान वाटतो की, आमची नाशिक जिल्हा शाखा संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यात सर्वात प्रॉमिसिंग (आश्वासक) आणि यशस्वी शाखांपैकी एक आहे. आम्ही नाशिक जिल्ह्यातील सुमारे २००० मराठा उद्योजक, व्यावसायिक, व्यापारी, कारखानदार, सेवा पुरवठादार आणि व्यावसायिकांशी जोडले गेलो आहोत आणि त्यांना त्यांच्या व्यवसायाच्या गरजा जसे की वित्तीय साक्षरता, विक्री आणि विपणन (सेल्स अँड मार्केटिंग), अकाउंट्स आणि टॅक्सेशन, नेटवर्किंग इत्यादींमध्ये मदत करत आहोत. हे साध्य करण्यासाठी, आम्ही प्रत्येक बुधवारी सकाळी ८ ते १० या वेळेत साप्ताहिक व्यवसाय बैठक घेतो,





## -डॉ. संदीप बोरसे

अध्यक्ष, मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था, नाशिक विभाग



ज्यामध्ये आमचे सदस्य सहभागी होऊन आपल्या व्यवसायाची जाहिरात करतात आणि एकमेकांना अंतर्गत बिझनेस रेफरन्सेस (संदर्भ) देतात. वेळोवेळी आम्ही व्यावसायिक प्रशिक्षण परिसंवाद, कार्यशाळा, प्रदर्शने इत्यादींचेही आयोजन करतो.

विगत आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये, आम्ही आमच्या सदस्यांमध्ये सुमारे ७५ कोटी रुपयांची व्यावसायिक उलाढाल (टर्नओव्हर) साध्य केली आहे आणि सुमारे २०० कोटी रुपयांचे बिझनेस रेफरन्सेस एकमेकांशी शेअर केले आहेत.

'मराठा उद्योजक महाअधिवेशन' आमच्यासाठी एक मैलाचा दगड ठरले आहे, ज्याने आम्हाला संपूर्ण महाराष्ट्रात आमचा विस्तार करण्यास मदत केली. आमची पाठीराखे असणारी, मराठा विद्या प्रसारक समाज ही नामांकित शिक्षण संस्था आमच्या आतापर्यंतच्या प्रवासात आम्हाला मदत करत आहेत. त्यांनी आम्हाला आमच्या साप्ताहिक बैठकांसाठी जागा आणि इतर कार्यक्रमांसाठी सभागृहे उपलब्ध करून दिली आहेत. आम्ही विशेषत: श्री. नितीनजी ठाकरे (सरचिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज), सर्व पदाधिकारी व संचालक, आणि श्री. प्रशांतजी पाटील (प्राचार्य, राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक कॉलेज, नाशिक) यांचे अत्यंत आभारी आहोत, ज्यांच्या प्रचंड पाठिंब्यामुळे आणि मार्गदर्शनामुळे आम्ही ही नेत्रदीपक प्रगती साधू शकलो आहोत.

**आमचे व्हिजन :**

- **जागतिक पातळीवर स्पर्धात्मक बनविणे :** मराठा समाजातील उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत प्रतिस्पर्धी बनविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी, त्यांना आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेतील ट्रेंड्स आणि जागतिक उद्योग धोरणांची माहिती देणे आवश्यक आहे.
- **आर्थिक सक्षमता निर्माण करणे :** आर्थिक सक्षमता साधण्यासाठी उद्योजकांना आर्थिक व्यवस्थापन, पूंजी मिळविणे आणि ठोस आर्थिक योजना तयार करण्यास सहाय्य करणे. यामुळे त्यांच्या व्यवसायातील दीर्घकालीन यश सुनिश्चित होईल.
- **दीर्घकालीन यशासाठी सहाय्य करणे :** उद्योजकांच्या व्यवसायात स्थिरता आणि दीर्घकालीन यश प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेले संसाधन, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन प्रदान करणे. हे यशशाली व्यवसायांच्या विकासासाठी आधारभूत असेल.
- **नवीन व्यवसायांना प्रोत्साहन देणे :** नवीन व्यवसाय सुरू करण्यास इच्छुक उद्योजकांना प्रोत्साहित करणे. यामध्ये प्रारंभिक गुंतवणूक, बाजार संशोधन आणि व्यवसाय योजनेच्या विकासासाठी आवश्यक मदतीचा समावेश असेल.
- **मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करणे :** उद्योजकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे. त्यांना विविध बाजारपेठांमध्ये आपली ओळख निर्माण करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.
- **सशक्त आणि सक्षम बनवणे :** समाजातील प्रत्येक उद्योजकाला सशक्त आणि सक्षम बनवून आर्थिक विकास साधणे. त्यांच्यातील क्षमता, कौशल्य आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबविणे .
- **आर्थिक विकास साधणे :** समाजातील उद्योजकांच्या यशस्वी व्यवसायाद्वारे व्यापक आर्थिक विकास साधणे. हे प्रत्येक उद्योजकाच्या व्यवसायातील यश आणि सामाजिक व आर्थिक योगदानातून साधले जाईल.

**•आमची उद्दिष्टे :**

- मराठा उद्योजकांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे.
- मराठा समाजातील उद्योजकांच्या व्यवसायात वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.
- नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या कर्जांचा जास्तीत जास्त फायदा मराठा तरुणांना कसा मिळवता येईल याबद्दल मार्गदर्शन करणे.
- मराठा उद्योजकांना आर्थिक सक्षम बनवणे.
- विविध उपक्रमांचे आयोजन करणे.
- उद्योग व व्यावसायिक विषयावर प्रशिक्षण देणे.
- उद्योजक मेळावे आयोजित करणे.
- व्यावसायिकांच्या नियमित मिटिंग्ज घेणे.
- मराठा समाजातील लोकांना मराठा व्यावसायिकांकडून खरेदी करण्यास प्रोत्साहित करणे.
- उद्योजकांना जिल्ह्यातील स्टार्टअप हब, कक्षीय कार्यालये, फेसबुक व इन्स्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांच्या व्यवसायाचे प्रमोशन करण्यासाठी सुविधा प्रदान करणे.
- मराठा उद्योजकांना आप आपसात उद्योग-

(पुढील पानावर)



# मविप्र माजी विद्यार्थी संघः विकासाचा सेतू




**-डॉ. धनंजय चव्हाण**
(मानसोपचार तज्ज्ञ)
अध्यक्ष, मविप्र माजी विद्यार्थी, माजी कर्मचारी व हितचिंतक संघटना


शैक्षणिक संस्था ही केवळ ज्ञानदान करणारी व्यवस्था नसते; ती समाजघडणीची कार्यशाळा असते. या कार्यशाळेत घडलेले विद्यार्थी जेव्हा जीवनाच्या विविध क्षेत्रांत यश संपादन करतात, तेव्हा ते त्या संस्थेची खरी संपत्ती बनतात. अशा माजी विद्यार्थ्यांची शक्ती संघटित झाली, तर ती केवळ आठवणींच्या जपणुकीपुरती मर्यादित राहत नाही; तर संस्थेच्या सर्वांगीण विकासाची प्रभावी चळवळ बनते. मराठा विद्या प्रसारक समाजाच्या माजी विद्यार्थ्यांनी याच व्यापक दृष्टिकोनातून एकत्र येत दिनांक १५ डिसेंबर २०२३ रोजी 'मविप्र माजी विद्यार्थी, माजी कर्मचारी व हितचिंतक संघटनेची' स्थापना केली. अल्पावधीतच या संघटनेने केलेले कार्य पाहिले, तर हा संघ केवळ माजी विद्यार्थ्यांची संघटना नसून समाजहिताचे आणि शैक्षणिक विकासाचे सक्षम व्यासपीठ बनल्याचे स्पष्ट दिसून येते आणि 'मविप्र माजी विद्यार्थी संघ' असा लौकिक संघटनेने प्राप्त करीत जगभरातून प्रतिसाद मिळविला आहे.

कोणत्याही संस्थेचा खरा वारसा तिच्या इमारतींमध्ये नसतो; तो तिच्या विद्यार्थ्यांमध्ये असतो. कारण विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक,नेते, शिक्षक, संशोधक किंवा विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तिमत्त्वे बनतात. महाविद्यालयीन शिक्षणानंतर भौतिक जीवनाच्या स्पर्धेत उतरल्यानंतर त्यांचा माणूस म्हणून जगण्याचा आणि टिकण्याचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू होतो, या प्रवासात त्यांना घडविणाऱ्या संस्थेप्रति असलेली कृतज्ञता त्यांच्या कृतीतून व्यक्त झाली, तर त्या संस्थेच्या प्रगतीलाही नवी दिशा मिळते. 'मविप्र माजी विद्यार्थी, माजी कर्मचारी व हितचिंतक संघटना' ही याच भावनेचे मूर्त स्वरूप आहे.

स्थापनेपासून या संघटनेने केलेल्या कामांचा आढावा घेतला, तर त्यामागील व्यापक सामाजिक दृष्टी सहज लक्षात येते. मविप्र संस्थेच्या सेंटर फॉर कोलॅबोरेशन अँड एक्सलन्स आणि मविप्र माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ३२ शाळांमध्ये आधुनिक विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यात आल्या. विज्ञान हा केवळ पुस्तकातील विषय न राहता प्रत्यक्ष प्रयोगातून विद्यार्थ्यांच्या अनुभवाचा भाग व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार प्रयोगशाळेचा लाभ मिळाल्यामुळे त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला नवे बळ मिळाले.

शिक्षणाइतकीच स्वच्छता आणि आरोग्याची जाणीवही महत्त्वाची आहे. याच जाणिवेतून पाच शाळांमध्ये स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात आली. विशेषतः मुलींच्या शिक्षणातील सातत्य टिकवून ठेवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला आहे. याशिवाय सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून जेएनपीटीकडून दोन व्हेंटिलेटर तसेच सॅण्डोज कंपनीमार्फत तीन डायलिसिस यंत्रे आणि दोन व्हेंटिलेटर मविप्रच्या रुग्णालयात उपलब्ध करून देण्यात आले. शिक्षणसंस्थेने आरोग्यसेवेलाही तितक्याच संवेदनशीलतेने स्पर्श केल्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

ज्ञानाचा प्रसार हा केवळ वर्गखोल्यांपुरता मर्यादित नसतो. वाचनाची आवड निर्माण करणारा वाचनकट्टा, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि खगोलशास्त्राविषयी कुतूहल जागविणारा तारांगण यांसारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत मोलाचे ठरत आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते, प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित होते आणि शिक्षण अधिक आनंददायी बनते.

शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देणे हीदेखील संघटनेची महत्त्वाची जबाबदारी आहे. याच उद्देशाने ३५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. आर्थिक अडचणीमुळे गुणवत्तेला अडथळा येऊ नये, ही त्यामागील संवेदनशील भूमिका आहे. त्याचबरोबर शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यासाठी 'त्रिरश्मी फेलोशिप' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. संस्थेतील उत्कृष्ट कार्याचा गौरव होणे म्हणजे गुणवत्तेची संस्कृती अधिक दृढ होणे होय.

आजच्या काळात माजी विद्यार्थी संघटनेची भूमिका केवळ स्नेहसंमेलनापुरती मर्यादित राहिलेली नाही. ज्ञानाचे आदानप्रदान, विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, कौशल्यविकास, उद्योगक्षेत्राशी संपर्क, रोजगाराच्या संधी, संशोधनासाठी सहकार्य, उद्योजकतेला चालना, शिष्यवृत्ती, सामाजिक उत्तरदायित्व निधी मिळवून देणे अशा अनेक क्षेत्रांत ही संघटना प्रभावीपणे कार्यरत आहे. जगभर विखुरलेले माजी विद्यार्थी आपल्या अनुभवाचा लाभ विद्यमान विद्यार्थ्यांना देऊ शकतात. त्यांच्या यशोगाथा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतात.

संघटनेचे www. mvpalumni. com हे संकेतस्थळ माजी विद्यार्थ्यांसाठी नोंदणीसाठी खुले ठेवण्यात आले आहे. त्यामुळे जगाच्या

---

**(मागील पानावरून )**

व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करणे, तसेच त्यांना सर्वतोपरी सहाय्य व मार्गदर्शन करणे.

- उद्योग क्षेत्रातील नवीन योजनांचा लाभ घेण्यासाठी जागृकता निर्माण करणे.

**संस्थेच्या नाशिक जिल्हा शाखेचे महत्त्वाचे उपक्रम :**

- जिजाऊ रथयात्रा
- राजमाता जिजाऊ उद्योगरत्न पुरस्कार सोहळा
- बिझनेस एक्सपो
- मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था आणि पोलंड-इंडिया चेंबर ऑफ कोऑपरेशन यांच्यात सामंजस्य करार
- ह्युमन रिसोर्सेस प्रशिक्षण सत्र
- वन टू मेनी उपक्रम
- आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे
- औद्योगिक भेटी
- उद्योजक प्रशिक्षण आणि चर्चासत्रे
- उद्योजकता प्रदर्शन
- मराठा उद्योजक कक्षाचे महाअधिवेशन

या वर्षाचे आमचे मुख्य ध्येय आहे, प्रत्येक सदस्यासाठी अविरत संधी निर्माण करणे. येणारे वर्ष अधिक यशस्वी, समृद्ध आणि प्रगतिशील करण्यासाठी प्रत्येक सभासदाचा सक्रिय सहभाग आणि योगदान अत्यंत आवश्यक आहे. मी माझ्या परीने सर्वोत्तम प्रयत्न करीन. गेल्या अनेक वर्षांत कार्यकारी आणि कोअर कमिटी सदस्यांनी दाखवलेली निःस्वार्थी सेवा आणि मेहनत मी जवळून पाहिली आहे. आपल्या एकत्रित प्रयत्नांमुळेच आपण आपले उद्दिष्ट साध्य करु शकतो. या प्रतिष्ठित संस्थेचे नेतृत्व करण्याची संधी दिल्याबद्दल मी संबंधितांचा मनापासून आभारी आहे.



कोणत्याही कोपऱ्यात असलेला माजी विद्यार्थी संस्थेशी जोडला जाऊ शकतो. डिजिटल माध्यमामुळे संवाद अधिक सुलभ झाला असून विविध उपक्रम, रोजगाराच्या संधी, मार्गदर्शन सत्रे आणि सामाजिक उपक्रम यांची माहिती एका व्यासपीठावर उपलब्ध होत आहे.

संस्थेच्या प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आले आहेत. त्या-त्या शाखेतून घडलेले अधिकारी, उद्योजक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, शिक्षक आणि विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तींना एकत्र आणण्याचे कार्य सुरू आहे. त्यामुळे प्रत्येक शाखेचा स्वतंत्र विकास आराखडा तयार होऊ शकतो. स्थानिक गरजांनुसार विकासकामे, शिष्यवृत्ती योजना, उद्योगभेटी, करिअर मार्गदर्शन आणि सामाजिक प्रकल्प अधिक परिणामकारकपणे राबविता येतील.

या संघटनेमुळे केवळ संस्थेलाच नव्हे, तर संस्थेच्या सभासदांच्या,सेवकांच्या कुटुंबीयांनाही अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. मविप्रचे 'कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग व प्लेसमेंट सेंटर' या केंद्राच्या मदतीने नोकरीचे व्यापक दालन आता खुले झाले आहे. मविप्रच्या सभासद आणि त्यांच्या पाल्यांना, आजी-माजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना, माजी विद्यार्थी स्वतः किंवा त्यांच्या पाल्यांना आणि एकंदरीतच बहुजन समाजातील सर्वच मुलांना शैक्षणिक व करिअर मार्गदर्शन, इंटर्नशिप, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी मार्गदर्शन, कौशल्यविकास कार्यशाळा, शिष्यवृत्ती, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी संवाद अशा अनेक सुविधा भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात उपलब्ध होऊ शकतात. तसेच आरोग्य, शिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक बांधिलकी या क्षेत्रांमध्येही सभासदांच्या व सेवकांच्या परिवारांचा सक्रिय सहभाग वाढू शकतो. त्यामुळे ही संघटना एका विस्तारित कुटुंबाचे रूप धारण करते.

भविष्यात 'मविप्र माजी विद्यार्थी, माजी कर्मचारी व हितचिंतक संघटना' राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मजबूत नेटवर्क निर्माण करू शकते. जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने संशोधन, नवोपक्रम, स्टार्टअप्स, उद्योग-संस्था सहकार्य, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक देवाणघेवाण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रांत मोठी झेप घेण्याची क्षमता या संघटनेत आहे. संस्थेच्या विकासासाठी आर्थिक योगदानाबरोबरच ज्ञान, अनुभव आणि मूल्यांची देणगीही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे.

एखाद्या संस्थेची खरी ताकद तिच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये दडलेली असते. 'मविप्र माजी विद्यार्थी, माजी कर्मचारी व हितचिंतक संघटना' त्या ताकदीला संघटित करणारी, संस्थेला नव्या युगाशी जोडणारी आणि समाजहिताला प्राधान्य देणारी दूरदर्शी चळवळ आहे. भूतकाळाचा अभिमान, वर्तमानाची जबाबदारी आणि भविष्याची स्वप्ने या तिन्हींचा सुंदर संगम या संघटनेच्या कार्यात दिसून येतो. ही संघटना आगामी काळात शिक्षण, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात अधिक व्यापक योगदान देईल, अशी आशा नव्हे तर ठाम खात्री वाटते. ■



# इलेक्ट्रॉनिक विभाग म्हणजे नवनवीन प्रयोगांची शाळा

**मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक मधील इलेक्ट्रिकल विभागानेही कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच त्यासंदर्भात कार्यशाळा, चर्चासत्र आयोजित करण्यावर नेहमीच भर दिला आहे. विद्यार्थी वर्गात जे शिकत आहेत, ते शिक्षण, ती माहिती त्यांना प्रत्यक्ष काम करताना उपयोगात आणता आली पाहिजे यासाठी प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी हे उपक्रम सातत्याने सुरु आहेत. दिवसेंदिवस इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. हे बदल विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात त्याचबरोबर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यातही विभागाने पुढाकार घेतला आहे. सन २०२४-२५ या वर्षात १० विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीची संधी या विभागाने मिळवून दिली. तसेच शैक्षणिक अभ्यासक्रमाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.**

सन २०२३-२४ मध्ये इंडस्ट्रियल ऑटोमेशन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत द्वितीय व तृतीय वर्षाच्या एकूण ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रोग्रॅम करण्यायोग्य लॉजिक कंट्रोलर्सचे प्रात्यक्षिक या कार्यशाळेत प्रत्यक्ष अभ्यासता आले. याच वर्षात व्यक्तिमत्त्व विकास आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी या विषयावरील विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. द्वितीय व तृतीय वर्षाच्या एकूण ५८ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. प्रा. पी.जी.देशमुख यांनी या दोन्ही कार्यक्रमाचे संयोजन केले. संवाद साधताना आवश्यक असलेला आत्मविश्वास या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना मिळाला. संवाद कौशल्ये त्यांना कळाली. प्रभावी संभाषण हे येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मोठी भूमिका बजावू शकते, हे या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना समजले. तसेच स्वत:च्या करिअरसंदर्भात चौकस बुद्धीने निर्णय घेण्याची क्षमता कशी अंगी बाणवावी हे देखील या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी जाणून घेतले.

सशस्त्र सेनेमध्ये विद्युत उपकरणांचा कसा वापर केला जातो यासंदर्भातील अल्पकालीन प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन या विभागाने केले. द्वितीय व तृतीय वर्षाच्या एकूण ७२ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. प्राध्यापक एन.ए.गाडे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. संरक्षण क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या विद्युत उपकरणांची तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांना या कार्यक्रमामुळे मिळाली.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांचे एकच स्वप्न असते, ते म्हणजे गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळवणे. पण उद्योगाच्या अनेक संधींकडे यामुळे ते दुर्लक्ष करतात. म्हणून उद्याजेकता जागृती कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले. ६० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. विविध उद्योग क्षेत्रातील नवनवीन, कल्पक संधींची ओळख यानिमित्त विद्यार्थ्यांना झाली तसेच स्टार्ट अप म्हणजे काय? ते कसे सुरु करायचे? स्टार्टअपला कसे सतत विकसित करत राहायचे यासंदर्भात देखील विद्यार्थ्यांना कार्यक्रमात महत्त्वाचे मार्गदर्शन लाभले.

कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत सीसीटीव्ही इन्स्टॉलेशन यासंदर्भात आर्टिफिशियल इंटिलिजन्सचा वापर कसा केला जातो याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. एकूण ६६ विद्यार्थ्यांनी या विशेष सत्राचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांनी या सत्रात प्रत्यक्ष सीसी टीव्ही यंत्रणा उभारणे, त्याची देखभाल, दुरुस्ती याबाबतचे प्रात्यक्षिक अनुभवले. प्राध्यापक एन. ए. गाडे यांनी या सत्राचे संयोजन केले.

इलेक्ट्रॉनिक ऑटोमेशन डिझाईन टूल्स तसेच इलेक्ट्रॉनिक टूल्सच्या संदर्भात कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर प्रणालीची देखभाल आणि चाचणी करण्याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मिळाले. प्रा. एन.डी.आथरे यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले.

सन २०२४-२५ मध्ये कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रिंटेड सर्किट बोर्डवरील विविध घटकांचे सोल्डरिंग व डी-सोल्डरिंग याबाबतचे विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. ४५ विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरात विद्यार्थ्यांना पीसीबी बोर्ड, त्यासंदर्भातील विविध सुटे भाग प्रत्यक्ष हाताळता आले. याचबरोबर सन २०२४-२५ मध्ये माजी विद्यार्थ्यांनी देखील पायथॉन प्रोग्रॅमिंगसंदर्भात विद्यार्थ्यांना विशेष सत्रात मार्गदर्शन केले. प्रा. सी. के. भोर यांनी या शिबिराचे संयोजन केले.

सन २०२५-२६ मध्ये घरगुती उपकरणांची देखभाल कशी करावी या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले. ५२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. घरगुती उपकरणांमध्ये विद्युत संच कसे जोडलेले असतात, त्याचे काम कसे चालते, वायरिंग कसे केलेले असते, विविध भागांमध्ये बिघाड नेमका कुठे,कसा होतो, तो कसा दूर करावा? याबाबत सविस्तर व प्रात्यक्षिकासह माहिती विद्यार्थ्यांना या सत्रात मिळाली. प्रा. ए. एच. काळे यांनी या सत्राचे संयोजन केले.

बरेचदा असं पाहायला मिळतं की अकॅडमिकली विद्यार्थी खूप हुशार, चुणचुणीत असतात. पण चारचौघांमध्ये गेल्यानंतर कसं बोलावं, आपली उपस्थिती प्रभावकारक कशी असावी यासंदर्भात त्यांच्यात बुजरेपणा आढळतो. आत्मविश्वासाच्या अभावामुळे नोकरीच्या मुलाखतीदरम्यानही त्यांना भरपूर टेन्शन येते. त्याचा परिणाम अपुऱ्या संवादात होतो. विद्यार्थ्यांमधील हा न्युनगंड दूर व्हावा याच उद्देशाने कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत मुलाखतीचे तंत्र व व्यक्तिमत्व विकास या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मुलाखतीसाठी तयारी कशी करावी? संवाद कौशल्ये कसे विकसित करावे? आत्मविश्वास कसा वाढवावा याबाबत उपयुक्त मार्गदर्शन या सत्रात विद्यार्थ्यांना मिळाले. प्रा. पी. जी. देशमुख यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले.

प्रिंटेड सर्किट बोर्ड डिझायनिंग या विषयावर देखील विशेष कार्यशाळेचे आयोजन कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत करण्यात आले. सुमारे ४० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. प्रात्यक्षिकांमधून प्रिंटेड सर्किट बोर्ड डिझायनिंगबाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत मिळाली. प्राध्यापिका एस.ए.सूर्यवंशी यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले.

अशा पद्धतीने राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल विभाग नेहमीच विद्यार्थ्यांना पुस्तकी अभ्यासक्रमापलीकडे विद्यार्थ्यांना नेण्याचा सातत्याने प्रयत्न करतोय. पुस्तकी अभ्यासक्रमाची घोकंपट्टी विद्यार्थ्यांमध्ये अनेकदा ताणतणाव निर्माण करते. प्रत्येकालाच ही शास्त्रीय भाषेतील पाठ्यपुस्तके आवडतातच असे नाही, पण तेच शिक्षण प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून पोहोचवले तर विद्यार्थ्यांना दुहेरी लाभ होतो. त्यांना शिक्षण किचकट वाटत नाही आणि शिकता शिकता प्रत्यक्ष काम करण्याचा सराव देखील होतो. मविप्र पॉलिटेक्निकने नवनवीन संकल्पनांसह अभ्यासक्रम व विद्यार्थी घडवले आहेत, यात शंका नाही.

**- प्रतीक्षा शिंदे,**

**विभाग प्रमुख, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग**




# सकारात्मकता, आशा, आनंद आणि बरंच काही

मविप्र
देवळाली कॅम्प
जॉब फेअर

# नोकरीसाठी हाक त्यास मविप्रची साद

देवळाली कॅम्प येथील श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झालेला हा निमशहरी भागातील पहिला मेळावा होता. नोकरीची संधी दारात चालून आलेली असताना विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. मविप्रची टीम तसेच महाविद्यालयीन टीमने या मेळाव्याचे उत्कृष्ट संयोजन केले. या मेळाव्यात खालील नामांकित कंपन्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली. देवळाली कॅम्प महाविद्यालयातही विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड आणि कमालीची उत्सुकता, अपेक्षा, विश्वास दिसून येत होता. कोणत्याही खेटा न घालता तसेच न मागताच रोजगारासंदर्भात सर्व माहिती, संधी, त्यासंदर्भातील पुढील प्रक्रिया एका दिवसात, एका छताखाली उपलब्ध होणे हो त्यांच्यासाठी करिअरमधील खूप महत्त्वाचा टप्पा ठरणार होता.

| | |
|---|---|
| रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | २०६ |
| रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | ११९ |

## रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा अँड महिंद्रा लि. | सॅमसोनाईट साऊथ एशिया प्रा. लि. | बजाज लिमिटेड | तपारीया टूल्स लि | लुसी इलेक्ट्रिक इंडिया प्रा. लि. | नोव्हेटर इलेक्ट्रिकल अँड डिजिटल (लेग्रँड) |
| सेंट गोबेन इंडिया प्रा. लि. | मोसडॉर्फर इंडिया प्रा. लि. | मदरसन ऑटोमोटिव्ह इंजिनिअरिंग | युनायटेड स्पिरीट लिमिटेड | युनिव्हर्सल फोर्सेस इंडस्ट्रीज | हिंदुस्तान प्रेसिंग प्रा. लि. |
| एक्सलंट टूल टेक | इंडियन टेक्नो प्रा. लि | एसएमटीऑटो सोल्यूशन एलएलपी | व्हरायटी स्टील | मेटॅलिस्ट फोर्जिंग लि. | स्लाईडवेल मेल्युअर टेक प्रा. लि. |
| बेस्पास्क इंजिनिअरिंग प्रा. लि. | प्रिसिजन ऑटो इंडस्ट्रीज प्रा. लि. | डीटीएसपीएल | व्हिक्टोरा ऑटो प्रायव्हेट लि. | ग्लोरिया इंजिनिअरिंग कंपनी | अस्तेमो इंडिया प्रा. लि. |
| सद्गुरुकृपा इंजिनिअरिंग प्रा. लि. | जेके मैनी प्रिसिजन टेक्नॉलॉजी लिमिटेड | डी एम प्रिसिजन अँड स्टॅम्पिंग प्रा. लि. | धुमाळ इंडस्ट्रीज इंडिया प्रा. लि | इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह इंडिया प्रा. लि. | एमडी ऑटो कॉम्पोनंट |
| मेटाफोर्ज इंजिनिअरिंग (आय) प्रा. लि. | एमडी इंडस्ट्रीज | आनंद आय-पॉवर | डी के ऑटो इंडस्ट्रीज प्रा. लि. | वैष्णवी ऑटो (प्रा) लि. | |

मविप्र आणि सीआयआय आयोजित देवळाली कॅम्प येथील रोजगार मेळाव्यात विविध कंपन्यांमध्ये रोजगार प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली



मविप्र वणी जॉब फेअर

# मेळाव्यांची पालकांमध्येही उत्सुकता

वणी येथील मविप्र संचलित कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील नोकरी, करिअरच्या संधीबाबत जागरुक झाला असल्याची नांदी या मेळाव्यात जाणवली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळून येते. मात्र मविप्र व सीआयआय मॉडेल करिअर सेंटरने यासंदर्भात सगळ्या चौकटी मोडून काढत बेरोजगारीमुक्त अभियानाचे रणशिंगच जणू फुंकल्याची खात्री या मेळाव्याने दिली. विशेषतः आपल्या पाल्यासाठी कुठल्या कंपनीतून नोकरीचा कॉल येतो, किती पगार मिळणार, त्याची/तिची पहिली नोकरी कशी असेल ही उत्सुकता पालकांमध्ये विशेष होती. विद्यार्थ्यांचे सारखे खणाणणारे फोन्स पालकांची काळजी प्रकट करीत होते, प्रसंगी विद्यार्थ्यांच्या शिक्षकांकडेही पालक उत्सुकतेने मेळाव्याबद्दल माहिती घेत होते.

या सर्व चिंता, काळजी, उत्साह, उमेद याची फलश्रुती म्हणजे वणी येथील हा नोकरी मेळावा.

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या **३७५**

रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या **१३७**

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा अँड महिंद्रा लि. | महिंद्रा सोना प्रा. लि. | बजाज सन्स लि. | बॉश इंडिया लि. | मॉसडॉर्फर लि. | ऑटोशेल इलेक्ट्रोमेक प्रा. लि. |
| जेबीएम ऑटो लि. | टेक्नोक्रॅटस कंट्रोल सिस्टम | पॉप्युलर स्विच गिअर लि. | कनेक्टवेल इंडस्ट्रीज प्रा. लि. | इकॉनोमोड फूड इंडिया प्रा. लि. | वैष्णवी ऑटो प्रा. लि. |
| लॅंडमार्क इन्शुरन्स ब्रोकर लि. | डिस्टिल एज्युकेशन प्रा. लि. | शारदा मोटर्स लि. | बंटस टूल्स प्रा. लि. | एएलएफ इंजिनिअरिंग लि. | एएए इंजिनिअरिंग सर्व्हिसेस |
| अंबर ऑटो इंजिनिअरिंग प्रा. लि. | बोरोसिल क्लास पॅक | एलिट ऑटो इंजिनिअरिंग लि. | श्रीकांत एंटरप्रायजेस | | |

वणी येथील रोजगार मेळाव्यात विद्यार्थ्यांइतकीच उत्सुकता पालकांमध्येही दिसून आली.
आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी तेही नोंदणी प्रक्रियेत सहभागी होत प्रत्येक टप्प्यावर साथ देताना दिसले.





मुलाखतीच्या संधीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या युवकांच्या उपस्थितीने सभागृह उत्साहाने भरून गेले होते. प्रत्येक चेहऱ्यावर रोजगाराची आशा आणि नव्या भविष्याची उमेद स्पष्ट दिसत होती.



मविप्र आणि सीआयआय आयोजित रोजगार मेळाव्यात पालकांचा लक्षणीय सहभाग कौतुकास्पद होता. तुडुंब भरलेले सभागृह मेळाव्याचे यश अधोरेखित करत होते



मुलाखतीसाठी लांबच लांब रांगा असतानाही विद्यार्थी मात्र कमालीचा संयम ठेवून होते. आपल्याला नोकरीची आयती संधी चालून आल्याची भावनाही त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवत होती

मविप्र वणी जॉब फेअर




मविप्र आणि सीआयआय आयोजित रोजगार मेळाव्यात लगेचच नियुक्ती पत्रे विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यामुळे सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता

मविप्र नांदगाव जॉब फेअर

# खुले झाले रोजगाराचे भव्य दालन

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदगाव येथे दि. ५ मार्च २०२६ रोजी झालेल्या या रोजगार मेळाव्यात विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने कसे करता येईल या विचाराने गर्दी केली. हे मेळावे केवळ मविप्र समाजापुरतेच मर्यादित नसल्यामुळे खऱ्या अर्थाने मागेल त्याला नोकरी हा हेतू या मेळाव्यातून साध्य होताना दिसला. नांदगाव शहरातील तसेच आजूबाजूच्या खेड्यातील अनेक १० वी, १२ वी पास, पदवीधर व पदव्युत्तर अशा विद्यार्थ्यांच्या हातात रोजगार पोहोचवायचे हे मविप्र आणि सीआयआय मॉडेल करिअर सेंटरचे प्रयत्न शैक्षणिक विश्वात एका नव्या क्रांतीची सुरुवात ठरत असल्याची साक्ष नांदगावच्या या मेळाव्याने दिली. यातील सहभागी बहुराष्ट्रीय कंपन्यांची यादी बघितली तर ग्रामीण भागासाठी एकाच ठिकाणी, एकाच छताखाली रोजगाराचे एक भव्य दालन सभासद, त्यांचे पाल्य, मविप्र आजी-माजी सेवक पाल्य, आजी-माजी विद्यार्थी यांसह सर्वांसाठीच खुले झाल्याची अनुभूती आली.

| | |
|---|---|
| रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | ३१० |
| रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | २४७ |

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा अँड महिंद्रा लि. | महिंद्रा सोना प्रा. लि. | बजाज सन्स लि. | मॉसडॉर्फर लि. | ऑटोशेल इलेक्ट्रोमेक प्रा. लि. | जेबीएम ऑटो लि. |
| टेक्नोक्रॅट्स कंट्रोल सिस्टम | बॉश इंडिया लि. | पॉप्युलर स्विच गिअर लि. | ह्युंदाई मोटर्स लि. | कनेक्टवेल इंडस्ट्रीज प्रा. लि. | इकॉनोमोड फूड इंडिया प्रा. लि. |
| लँडमार्क इन्शुरन्स ब्रोकर लि. | डिस्टिल एज्युकेशन प्रा. लि. | शारदा मोटर्स लि. | बंटस टूल्स प्रा. लि. | एएलएफ इंजिनिअरिंग लि. | एएए इंजिनिअरिंग सर्व्हिसेस |
| हायर अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. | अंबर ऑटो इंजिनिअरिंग प्रा. लि. | बोरोसिल क्लास पॅक | एलिट ऑटो इंजिनिअरिंग लि. | श्रीकांत एंटरप्रायजेस | वैष्णवी ऑटो प्रा. लि. |
| मेमको प्रा. लि. | वोल्टास प्रा. लि. | जय हिंद इंडस्ट्रीज लि. | जेबीएम ऑटो लि. | डॅना टीएम४ इंडिया | इलेक्ट्रॉनिका टंगस्टन लि. |
| झेप्टो | ब्लिंकिट | फियाट ऑटोमोबाईल्स लि. | अल्ट्राटेक सिमेंट लि. | | |

नांदगाव येथील मेगा जॉब फेअरमध्ये निवड झालेल्या युवक-युवतींनी नियुक्तीपत्रांसह आनंद साजरा केला. त्यांच्या यशस्वी वाटचालीचा हा क्षण अनेक कुटुंबांसाठी आशा आणि अभिमानाचा ठरला.



# रोजगाराच्या नव्या क्षितिजाकडे

मविप्र नाशिक जॉब फेअर

बहुजन समाजातील प्रत्येक घटकास शिक्षण मिळावे आणि प्रत्येक तरुण विशेषतः ग्रामीण युवकाच्या हाताला काम मिळावे यासाठी आयुष्यभर प्रयत्नशील राहिलेले कर्मवीर ॲड. बाबुराव गणपतराव ठाकरे यांच्या शंभराव्या जयंतीचे औचित्य साधून मविप्र समाजाच्या के.टी.एच.एम. महाविद्यालयात १२ मार्च २०२६ रोजी झालेल्या रोजगार मेळाव्यास मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. गेल्या पन्नास वर्षांपासून केटीएचएम हे नाशिकमधील सर्वात महत्त्वाच्या महाविद्यालयांपैकी एक आहे. शिस्त व गुणवत्तेसाठी या महाविद्यालयाची ओळख महाराष्ट्राच्या शैक्षणिक पटलावर आहे. त्यामुळेच के.टी.एच.एम. महाविद्यालयात आयोजित या रोजगार मेळाव्यास आपसूकच महत्त्व प्राप्त झाले होते. नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत या मेळाव्यात उत्तमोत्तम संधी विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. नेमके आणि परिपूर्ण नियोजनामुळे हा मेळावा यशस्वी झाला. केटीएचएम चा परिसर विद्यार्थ्यांच्या उत्साहाने फुलून गेला होता. मेळाव्यासाठी नोंदणी आणि मुलाखत प्रक्रिया यासाठी प्रतीक्षा करावी लागणार होती. पण कोणत्याही प्रकारचा गडबड गोंधळ न होता अत्यंत शिस्तपूर्णरित्या हा मेळावा विद्यार्थ्यांनी आणि सी.आय.च्या टीमने यशस्वी केला. शहराच्या शैक्षणिक जडणघडणीत के.टी.एच.एम.महाविद्यालयाचे मोलाचे योगदान आहे. या रोजगार मेळाव्यात त्याची प्रचीती आली. मागेल त्याला काम आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या रोजगाराची हमी घेतलेल्या मविप्रने या जयंती वर्षांपासून १२ मार्च 'आत्मनिर्भर दिन' साजरा करण्याचे निश्चित केले. 'कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटरच्या माध्यमातून सुरू झालेला हा रोजगार मेळावा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना एका नव्या क्षितिजाकडे वाटचाल करण्यास प्रवृत्त करून गेला.

| | | | |
|---|---|---|---|
| रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | ४५०० | रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | १००५ |

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा अँड महिंद्रा लि. | टाटा मोटर्स | पोर्टर | क्युपिड फार्मा | दालमिया ग्रुप | एथर एनर्जी |
| बजाज सन्स लि. | झेप्टो | किर्लोस्कर ऑइल इंजिन लि. | ब्लिंकिट | गॅब्रिएल लि. | कोका कोला |
| हिंदुस्तान फूड लि. | भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन | फियाट ऑटोमोबाईल्स लि. | युरेका फोर्ब्स | एलजी इलेक्ट्रॉनिक्स लि. | टपारीया टूल्स लि. |
| ब्लू स्टार लि. | ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि. | अशी इंडिया ग्लास लि. | ॲपिक्स इंटरनॅशनल | आयसीआयसीआय बँक | सॅमसोनाईट साऊथ आशिया लि. |
| एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि. | डी-मार्ट | टीडीके इंडिया प्रा. लि. | पेटीएम | इनोव्हा रबर्स प्रा. लि | ह्युंदाई मोटर्स लि. |
| बोरोसिल इंडिया प्रा. लि. | अल्ट्राटेक सिमेंट लि. | व्हीआयपी इंडस्ट्रीज प्रा. लि. | एसएफओ टेक्नॉलॉजी प्रा. लि. | सीजी पॉवर | टाटा ऑटोकॉम्प सिस्टम प्रा. लि. |
| आयएसी इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट | इलेक्ट्रॉनिका टंगस्टन लि. | डेल्टा फिनोकेम प्रा. लि. | संजीव ऑटो पार्टस | स्नोसेम पेंट प्रा. लि. | एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीज लि. |
| एव्हलॉन कॉस्मेटिक प्रा. लि. | एमएसएल ड्राईव्हलाईन सिस्टीम्स लि. | एस बॉस (स्टेट बँक ऑपरेशन सपोर्ट सिस्टीम) | बजाज फिनसर्व्ह | ब्रिटिश स्कॅफोल्डिंग | ऑटो मेक इंडिया प्रा. लि. |
| वासन टोयोटा | अडेक्को इंडिया प्रा. लि. एसबीआय | एडीएफ फूड प्रा. लि. | इंडियन टूल (बिर्ला प्रिसिजन) | बीजी इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स | सोम ऑटो |
| किमप्लास | इंडियन रायटिंग इन्स्ट्रुमेंट्स प्रा. लि. | ब्लूक्रॉस लॅबोरेटरीज प्रा. लि. | आरएम ड्रीप अँड स्प्रिंकलर सिस्टीम्स लि. | हिंद रेक्टिफायर्स प्रा. लि. | पीएमईए सोलर टेक सोल्यूशन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आनंद आय पॉवर लि. | साय-टेक स्पेशालिटी | मेमको इंजिनिअरिंग प्रा. लि. | जेनोम बायोटेक | ऑटोशेल लि. | ऑरिओल फार्मा इक्विपमेंट |
| शरीन ऑटो प्रा. लि. | सिप्रा इंजिनिअरिंग | इलाईट ऑटो प्रा. लि. | निओ व्हील्स लि. | एन्ट्राको बीकेएस प्रा. लि. | हेल्दी फूड्स |
| शुअर मी मल्टिपर्पज प्रा. लि. | ग्लोब केमिकल | अल्टुइस्ट टेक्नॉलॉजीज | विंटेक फार्मास्युटिकल | इथापे इन्स्टिट्यूट | मारुति सुझुकी शॉन कार |
| सवेरा ऑटो कॉम्प्स | कोजंट ई-सर्विसेस लि. | मंजुश्री टेक्नोपॅक लि. | मिलेनिअम प्रेशिअस | वर्षा प्लास्टिक स्टायपेंड | बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (आय) लि. |
| स्पायरोमेक इंडिया प्रा. लि. | तेजस्विनी ज्वेलर्स | सॅन अँड सॅन ऑटो प्रा. लि. | सहाने किरकूड प्रा. लि. | वैष्णवी ऑटो प्रा. लि. | युनिकेअर फार्मा |
| स्लाईड वेल प्रा. लि. | ॲक्युरेट व्हॉल्व्हज् | क्लिच हेल्थकेअर | कनेक्टवेल इंडस्ट्रीज प्रा. लि. | एसकेएच एम इंडिया प्रा. लि. | हायर अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. |
| ओरिएंटल रबर प्रा. लि. | डाना टीएम४ इंडिया | झेडएफ इंडिया लि. | इलाईट ऑटो प्रा. लि. | जेबिल सर्किट प्रा. लि. | प्रीमियर सील्स इंडिया प्रा. लि. |
| | ग्लोब केमिकल | इथापे इन्स्टिट्यूट | डॅना टीएम४ इंडिया | विंटेक फार्मास्युटिकल | |




केटीएचएम महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या उमेदवाराला मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. हा क्षण एका नव्या करिअरची आणि उज्ज्वल भविष्याची प्रेरणादायी सुरुवात ठरला.

मविप्र
नाशिक
जॉब फेअर



हातात कागदपत्रे... मनात आशा... आणि डोळ्यांसमोर उज्ज्वल भविष्याची स्वप्ने! मुलाखतीच्या प्रतीक्षेत असलेल्या युवक-युवतींचा उत्साह रोजगार मेळाव्याच्या यशाची साक्ष देत होता.



रोजगाराच्या नव्या संधीच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्यासाठी विद्यार्थ्यांनी नोंदणी केंद्रावर मोठी गर्दी केली. शिस्तबद्ध आणि सुलभ नोंदणी प्रक्रियेमुळे उमेदवारांचा उत्साह अधिकच वाढला.



मविप्र आणि CII Model Career Center आयोजित रोजगार मेळाव्यात उमेदवारांनी मार्गदर्शन सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भरलेले सभागृह, लक्षपूर्वक ऐकणारे विद्यार्थी आणि पालक यांमुळे रोजगाराविषयीची जागरूकता व उत्सुकता अधोरेखित झाली.



यशस्वी विद्यार्थ्यांस कंपनीचे नियुक्त पत्र प्रदान करतांना मविप्र संचालक श्री. रमेश पिंगळे समवेत चिटणीस श्री. दिलीप दळवी व ॲड. रमेशचंद्र बच्छाव



यशस्वी विद्यार्थिनीस कंपनीचे नियुक्त पत्र प्रदान करतांना मविप्र संचालक ॲड. संदिप गुळवे समवेत उपाध्यक्ष श्री. विश्वास मोरे, संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे व इतर मान्यवर



श्री दिलीप सखाराम दळवी, चिटणीस यांच्या हस्ते कंपनीचे नियुक्ती पत्र स्वीकारतांना विद्यार्थीनी समवेत मविप्र सभापती श्री. बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती श्री. देवराम मोगल, संचालक ॲड. रमेशचंद्र बच्छाव, रमेश पिंगळे व इतर मान्यवर



रोजगार मेळाव्यात यशस्वी विद्यार्थ्यांना त्याच दिवशी नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले याप्रसंगी मंचावर उपस्थित उपसभापती श्री. देवराम मोगल, ॲड. रमेशचंद्र बच्छाव, श्री. रमेश पिंगळे, सीआयआय पदाधिकारी व इतर मान्यवर.

मविप्र
KTHM
COLLEGE
जॉब फेअर

मविप्र निफाड जॉब फेअर

# नोकरीचे रेड कारपेट

मविप्र समाजाच्या **निफाड येथील कर्मवीर गणपतदादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात** २८ मार्च २०२६ रोजी झालेल्या रोजगार मेळाव्यात तब्बल ९५ कंपन्यांनी सहभाग नोंदविला. ग्रामीण भागातील मुला-मुलींनाही आंतरराष्ट्रीय- राष्ट्रीय स्तरावरील नावाजलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये रोजगाराच्या चांगल्या संधी मिळाव्यात या उद्देशाने या मेळाव्यात सर्वच नामांकित कंपन्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ग्रामीण भागातील मुलांना जणू कॉर्पोरेट बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील संधीचे रेड कारपेट या मेळाव्याच्या निमित्ताने अंथरले गेले. विद्यार्थ्यांचा हिरीरीचा सहभाग देखील त्यांना या संधीचे महत्त्व पटले असल्याची खात्री देत होता. ज्ञानगंगा खेडोपाडी पोहचवताना रोजगार देखील खेडोपाडी पोहचले पाहिजे हा उद्देश मेळाव्याला लाभलेल्या प्रतिसाद पाहता सफल होताना दिसत आहे.

| रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | १६५५ | रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | ८७० |
|---|---|---|---|

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा अँड महिंद्रा लि. | सॅमसोनाईट साऊथ एशिया लि. | दालमिया ग्रुप | एथर एनर्जी | बजाज सन्स लि. | झेप्टो |
| किर्लोस्कर ऑइल इंजिन लि. | ब्लिंकिट | गॅब्रिएल लि. | कोका कोला | हिंदुस्तान फूड लि. | भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन |
| एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि. | डी-मार्ट | टीडीके इंडिया प्रा. लि. | पेटीएम | इनोव्हा रबर्स प्रा. लि. | युरेका फोर्ब्स |
| बोरोसिल इंडिया प्रा. लि. | टपारीया टूल्स लि. | व्हीआयपी इंडस्ट्रीज प्रा. लि. | ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि. | सीजी पॉवर | ॲपिक्स इंटरनॅशनल |
| आयएसी इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट | इलेक्ट्रॉनिका टंगस्टन लि. | डेल्टा फिनोकेम प्रा. लि. | संजीव ऑटो पार्टस | स्नोसेम पेंट प्रा. लि. | एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीज लि. |
| एव्हलॉन कॉस्मेटिक प्रा. लि. | एमएसएल ड्राईव्हलाईन सिस्टीम्स लि. | एस बॉस (स्टेट बँक ऑपरेशन सपोर्ट सिस्टीम) | बजाज फिनसर्व्ह | ब्रिटिश स्कॅफोल्डिंग | ऑटो मेक इंडिया प्रा. लि. |
| वासन टोयोटा | अडेक्को इंडिया प्रा. लि. एसबीआय | एडीएफ फूड प्रा. लि. | इंडियन टूल (बिर्ला प्रिसिजन) | बीजी इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स | सोम ऑटो |
| किमप्लास | इंडियन रायटिंग इन्स्ट्रुमेंट्स प्रा. लि. | ब्लूक्रॉस लॅबोरेटरीज प्रा. लि. | आरएम ड्रीप अँड स्प्रिंकलर सिस्टीम्स लि. | हिंद रेक्टिफायर्स प्रा. लि. | पीएमईए सोलर टेक सोल्यूशन |
| आनंद आय पॉवर लि. | साय-टेक स्पेशालिटी | मेमको इंजिनिअरिंग प्रा. लि. | जेनोम बायोटेक | ऑटोशेल लि. | ऑरिओल फार्मा इक्विपमेंट |
| शरीन ऑटो प्रा. लि. | सिप्रा इंजिनिअरिंग | इलाईट ऑटो प्रा. लि. | निओ व्हील्स लि. | एन्ट्राको बीकेएस प्रा. लि. | हेल्दी फूड्स |
| शुअर मी मल्टिपर्पज प्रा. लि. | ग्लोब केमिकल | अल्टुइस्ट टेक्नॉलॉजीज | विंटेक फार्मास्युटिकल | इथापे इन्स्टिट्यूट | मारुति सुझुकी शॉन कार |

सवेरा ऑटो कॉम्प्स | कोजंट ई-सर्विसेस लि. | मंजुश्री टेक्नोपॅक लि. | मिलेनिअम प्रेशिअस | वर्षा प्लास्टिक स्टायपेंड | बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (आय) लि.

स्पायरोमेक इंडिया प्रा. लि. | तेजस्विनी ज्वेलर्स | सॅन अँड सॅन ऑटो प्रा. लि. | सहाने किरकूड प्रा. लि. | वैष्णवी ऑटो प्रा. लि. | मारुति सुझुकी शॉन कार

मविप्र निफाड जॉब फेअर



नोकरीची नियुक्तीपत्रे मिळाल्यानंतर उजळलेले चेहरे...
निफाड रोजगार मेळाव्याच्या यशाची हीच सर्वात मोठी पावती.


मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन बाबुराव ठाकरे यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्याला कंपनीचे नियुक्तीपत्र प्रदान करताना. समवेत मविप्रचे सभापती श्री. बाळासाहेब क्षीरसागर, CII चे सेंटर मॅनेजर श्री. सागर शिरसाट तसेच अन्य मान्यवर.


हातात आवश्यक कागदपत्रे आणि मनात उज्ज्वल भविष्याची स्वप्ने घेऊन विद्यार्थी नोंदणी प्रक्रियेत सहभागी झाले. रोजगाराच्या दिशेने उचललेले हे पहिले पाऊल त्यांच्या नव्या प्रवासाची सुरुवात ठरले.


मविप्रचे उपसभापती श्री. देवराम मोगल यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थिनीला कंपनीचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मविप्रचे सभापती श्री. बाळासाहेब क्षीरसागर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.


मुलाखतीतील प्रश्नांना धिटाईने सामोरे जात, आत्मविश्वासाने उत्तरे देणाऱ्या विद्यार्थिनींनी मुलाखतीत आपली क्षमता प्रभावीपणे सिद्ध केली.


रोजगार मेळाव्यातील मुलाखती केवळ निवड प्रक्रिया नव्हत्या; त्या उमेदवारांच्या कौशल्याला योग्य दिशा देणारा संवाद ठरल्या.

मविप्र सटाणा जॉब फेअर

# कौशल्य पाठीशी, रोजगार हाताशी

म.वि.प्र. संस्थेच्या सटाणा येथील कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या रोजगार मेळावा हा तरुणांचे भविष्य आणि शिक्षण यांना एकत्र जोडणारा सेतू ठरला. जीवघेण्या स्पर्धेत नोकरी मिळवण्यासाठी युवकांची चाललेली धडपड पाहता हा मेळावा विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वाची संधी होती . या संधीचा पुरेपूर लाभ घेण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. म.वि.प्र. समाजाचे कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे यांनी त्यांच्या कार्यकाळात नेहमीच ग्रामीण भागात अद्ययावत शैक्षणिक सुविधा पुरवण्यावर भर दिला होता, म्हणूनच रोजगार मेळावे फक्त शहरातील महाविद्यालयांपुरेतच मर्यादित न राहता ते गावागावांत पोहोचत आहेत. त्यादृष्टीने ग्रामीण भागातील कौशल्य आणि गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांच्या हाताशी रोजगार संधी देण्याचे काम मविप्रने केले आहे. ग्रामीण भागात मेळाव्याचे आयोजन करतानाही सीआयआय व मविप्र टीमने सर्वच बाबतीत दर्जेदार नियोजनावर भर दिला. २५ एप्रिल२०२६ रोजी हा मेळावा संपन्न झाला.

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या **९५७**

रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या **४७५**

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा अँड महिंद्रा लि. | सॅमसोनाईट साऊथ एशिया लि. | दालमिया ग्रुप | एथर एनर्जी | बजाज सन्स लि. | झेप्टो |
| किर्लोस्कर ऑइल इंजिन लि. | ब्लिंकिट | गॅब्रिएल लि. | कोका कोला | हिंदुस्तान फूड लि. | भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन |
| एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि. | डी-मार्ट | टीडीके इंडिया प्रा. लि. | पेटीएम | इनोव्हा रबर्स प्रा. लि. | युरेका फोर्ब्स |
| बोरोसिल इंडिया प्रा. लि. | टपारीया टूल्स लि. | व्हीआयपी इंडस्ट्रीज प्रा. लि. | ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि. | सीजी पॉवर | ॲपिक्स इंटरनॅशनल |
| आयएसी इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट | इलेक्ट्रॉनिका टंगस्टन लि. | डेल्टा फिनोकेम प्रा. लि. | संजीव ऑटो पार्टस | स्नोसेम पेंट प्रा. लि. | एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीज लि. |
| एव्हलॉन कॉस्मेटिक प्रा. लि. | एमएसएल ड्राईव्हलाईन सिस्टीम्स लि. | एस बॉस (स्टेट बँक ऑपरेशन सपोर्ट सिस्टीम) | बजाज फिनसर्व्ह | ब्रिटिश स्कॅफोल्डिंग | ऑटो मेक इंडिया प्रा. लि. |
| वासन टोयोटा | अडेक्को इंडिया प्रा. लि. एसबीआय | एडीएफ फूड प्रा. लि. | इंडियन टूल (बिर्ला प्रिसिजन) | बीजी इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स | सोम ऑटो |
| किमप्लास | इंडियन रायटिंग इन्स्टुमेंट्स प्रा. लि. | ब्लूक्रॉस लॅबोरेटरीज प्रा. लि. | आरएम ड्रीप अँड स्प्रिंकलर सिस्टीम्स लि. | हिंद रेक्टिफायर्स प्रा. लि. | पीएमईए सोलर टेक सोल्यूशन |
| आनंद आय पॉवर लि. | साय-टेक स्पेशालिटी | मेमको इंजिनिअरिंग प्रा. लि. | जेनोम बायोटेक | ऑटोशेल लि. | ऑरिओल फार्मा इक्विपमेंट |
| शरीन ऑटो प्रा. लि. | इलाईट ऑटो प्रा. लि. | निओ व्हील्स लि. | एन्ट्राको बीकेएस प्रा. लि. | हेल्दी फूडस | शुअर मी मल्टिपर्पज प्रा. लि. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ग्लोब केमिकल | अल्टुइस्ट टेक्नॉलॉजीज | विंटेक फार्मास्युटिकल | इथापे इन्स्टिट्यूट | मारुति सुझुकी शान कार्स प्रा. लि. | सवेरा ऑटो कॉम्प्स |
| कोजंट ई-सर्विसेस लि. | मंजुश्री टेक्नोपॅक लि. | मिलेनिअम प्रेशिअस | वर्षा प्लास्टिक स्टायपेंड | बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (आय) लि. | स्पायरोमेक इंडिया प्रा. लि. |
| तेजस्विनी ज्वेलर्स | सॅन अँड सॅन ऑटो प्रा. लि. | सहाने किरकूड प्रा. लि. | वैष्णवी ऑटो प्रा. लि. | एसओएम ऑटो | इलेक्ट्रॉनिका टंगस्टन लि. |
| एसएमटी ऑटो सोल्यूशन एलएलपी | एडीएफ फूड प्रा. लि. | डी के ऑटो इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड | एव्हलॉन कॉस्मेटिक प्रा. लि. | | |


मविप्र आणि सीआयआय आयोजित रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रशांत पाटील समवेत व्यासपीठावर इतर मान्यवर.


सटाणा येथील रोजगार महामेळाव्याला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भरलेले सभागृह रोजगाराविषयीची जागरूकता आणि मविप्रवरील विश्वास अधोरेखित करत होते.


रोजगाराच्या नव्या प्रवासाची सुरुवात... उत्साहपूर्ण नोंदणी आणि उज्ज्वल भविष्याची आशा.

मविप्र सटाणा जॉब फेअर


मविप्र आणि सीआयआय आयोजित सटाणा येथील रोजगार मेळाव्यात रोजगार प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली यावेळी मविप्र सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मविप्र चांदवड जॉब फेअर

# डेन्मार्क, जपानमधील कंपन्यांचाही सहभाग

कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर, सीआयआय मॉडेल करिअर सेंटर व मविप्र समाज नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी चांदवड येथील श्रीमती जिजाबाई रघुनाथराव गुंजाळ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या दुष्काळग्रस्त तालुक्यात शिक्षण संस्थांचे जाळे चांगले विणले गेलेले असल्यामुळे येथे पदवीधर तरुणांचे प्रमाण विपुल आहे. त्यांच्या हाताला काम मिळावे. त्यांना सन्मानाने जगता यावे. त्यामुळे येथील सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधांबरोबरच आता रोजगार देण्यासाठीही मविप्र संस्था पुढे आली आहे. गरजू, होतकरू आणि गुणवंत बेरोजगार पदवीधरांना आवडीच्या क्षेत्रांत नोकरीच्या संधी मिळाव्यात या उदात्त हेतूने आयोजित या मेळाव्यात विद्यार्थी आणि पालकांचा अपूर्व सहभाग दिसून आला. विशेष म्हणजे चांदवडसारख्या तालुक्याच्या ठिकाणी झालेल्या या मेळाव्यात डेन्मार्क, जपान या परदेशी कंपन्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत युवकांना परदेशात रोजगाराची संधी देऊ केली. या कंपन्यांनी मेळाव्यात स्वतंत्र स्टॉल लावत विद्यार्थ्यांना या सुवर्णसंधीची दारे खुली करुन दिली.

| | |
|---|---|
| रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | १०२५ |
| रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | ४३६ |

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बजाज फायनान्स लिमिटेड | एसबीआय लाईफ इन्शुरन्स | आयसीआयसीआय बँक | ॲक्सिस बँक | एचडीएफसी बँक | अडेक्को इंडिया प्रायव्हेट लिमिटेड एसबीआय |
| एस बॉस - स्टेट बँक ऑपरेशन सपोर्ट सिस्टम | एसबीआय कार्ड | बजाज फिनसर्व्ह | भारत फायनान्स इंक्लूजन लिमिटेड | टाटा मोटर्स लिमिटेड | बॉश इंडिया |
| टपारिया टूल्स लिमिटेड | जेबीएम ऑटो लिमिटेड | रोथे एर्डे इंडिया प्रायव्हेट लिमिटेड | बजाज ऑटो लिमिटेड | मॉसडोर्फर इंडिया प्रा. लि. | एएलएफ इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड |
| टेक्नोक्रॅटस | बंटस टूल | एंड्युरन्स टेक्नॉलॉजीज | बजाज सन्स लिमिटेड | गॅब्रिएल इंडिया लिमिटेड | ब्रिटिश स्कॅफोल्डिंग इंटरनॅशनल लिमिटेड |
| एरेस हाय ड्युटी फोर्जिंग्स प्रायव्हेट लिमिटेड | निओ व्हील्स लिमिटेड | वासन टोयोटा | ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रायव्हेट लिमिटेड | जितेंद्र मोटर्स | श्रीकांत एंटरप्रायझेस प्रा. लि. |
| स्पायरोमेक इंडिया प्रा. लि. | सॅन अँड सॅन ऑटो प्रा. लि. | ऑटो मेक इंडिया प्रा. लि. | एएए इंजिनिअरिंग सर्व्हिसेस | मिलेनियम प्रिसिजन ऑटो इंडिया प्रा. लि. | सानिका ऑटो इंडस्ट्रीज |
| अंबर ऑटो इंजिनिअर्स प्रा. लि. | जेनेक्स्ट प्रिसिजन ऑटो टेक प्रा. लि. | शारदा मोटर इंडस्ट्रीज लिमिटेड प्लांट-१ | शारदा मोटर इंडस्ट्रीज लिमिटेड प्लांट-२ | अवधूत टेक्नोकार्टस प्रा. लि. | ऑटोशेल इलेक्ट्रोमेक प्रा. लि. |
| टाटा स्ट्राईव्ह | एलिट ऑटो इंजिनिअर्स | जेबीएम | जे के मैनी प्रिसिजन टेक्नॉलॉजी लि. | आनंद आय-पॉवर | एमडी इंडस्ट्रीज |
| मॅकमॅट्रिक्स | आयएसी इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट | बोरोसिल सायंटिफिक लि. क्लास पॅक लिमिटेड | जॉन्सन अँड जॉन्सन, मुलुंड | झायडस, सानंद | युनिकेअर फार्मा |
| ऑरिओल फार्मा-टेक | हिंदुस्थान फूडस लिमिटेड | हेल्दी फूड प्रा. लि. | विंटेक फार्मास्युटिकल्स लि. | बोरो क्रिस | ग्लोब केमी |

पीएमईए सोलर टेक सोल्यूशन्स लि.

पॉप्युलर स्विचगियर्स प्रा. लि.

ब्लू स्टार लिमिटेड

एंट्राको बीकेएस बसडक्टस प्रा. लि.

गांगुर्डे सोलर अँड इन्फ्रास्ट्रक्चर

मविप्र चांदवड जॉब फेअर



रोजगाराच्या नव्या संधीच्या प्रतीक्षेत चांदवड रोजगार मेळाव्यात विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त गर्दी उसळली. प्रत्येक चेहऱ्यावर उज्ज्वल भविष्याची आशा आणि आत्मविश्वास दिसून येत होता.



सुव्यवस्थित नोंदणी, तत्पर मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचा उत्साह... चांदवड रोजगार मेळाव्याच्या यशस्वी नियोजनाची ही प्रभावी झलक.



पाउस असूनही चांदवड येथे झालेल्या रोजगार मेळाव्यास विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते



शिस्तबद्ध मुलाखत प्रक्रिया आणि आत्मविश्वासाने सहभागी झालेले उमेदवार... रोजगार मेळाव्याच्या यशस्वी नियोजनाची ही बोलकी झलक.



हाच तो क्षण ...हीच ती वेळ ..नोकरीचे ऑफर लेटर हातात ..चांदवडसारख्या दुष्काळी भागातील युवकांना थेट आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मविप्र आणि सीआयआयने दिली



रोजगाराच्या संधीचे रूपांतर यशात करत निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीपत्रांसह नव्या करिअरच्या प्रवासाला सुरुवात केली. समवेत मविप्रचे पदाधिकारी, मान्यवर आणि उद्योग प्रतिनिधी.

# पॉलिटेक्निकचा पंच

१० आक्टोबर २०२५ रोजी सीआयआय मॉडेल नाशिक करिअर सेंटरची मुहुर्तमेढ मविप्रच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक येथे रोवली गेली. शैक्षणिक जगतात मविप्र संस्थेने निर्माण केलेला स्वत:चा दर्जा, दबदबा, ओळख आणि यशाचा चढता आलेख पाहूनच सीआयआयने मविप्रशी हातमिळवणी करत मागेल त्याला नोकरी या अनोख्या उपक्रमासाठी हे सेंटर सुरू केले. हे सेंटर सुरू झाल्यानंतर पहिलाच मेळावा राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक येथेच आयोजित करण्यात आला. त्यानंतर याच संस्थेत १० ऑक्टोबर २०२५, १२ डिसेंबर २०२५, ८ जानेवारी २०२६, २३ फेब्रुवारी २०२६ आणि १९ जून २०२६ अशा तब्बल पाच रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले गेले. राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक हे नाशिक शहरातील नामांकित, मध्यवर्ती पॉलिटेक्निक असल्याने येथे झालेल्या सर्वच रोजगार मेळाव्यांना शहर परिसरातील विद्यार्थी आणि पालकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. सोशल मीडिया, व्हॉट्सअप सारखी माध्यमे शहरातील विद्यार्थ्यांना अपडेट ठेवत असल्याने या मेळाव्यांची सकारात्मक चर्चा देखील या माध्यमांवर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली म्हणूनच येथे झालेला प्रत्येक मेळावा विद्यार्थ्यांनी उचलून धरला. सीआयआय मॉडेल करिअर सेंटर सुरू झाल्यानंतर वर्षभराच्या आतच या सेंटरने अतिशय धडाकेबाज कामगिरी करत सातत्याने यशस्वी रोजगार मेळाव्यांचे आयोजन शहर व जिल्हाभरात केले. राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक स्टाफ आणि सीआयआय नाशिक टीमने अतिशय नेमके आणि नेटके नियोजन, समन्वय साधत हे मेळावे आयोजित केले. प्राचार्य प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक टीमची यंग ब्रिगेड या मेळाव्यांची आखणी उत्तमरित्या करत आहे. दरम्यान या मेळाव्यात पालकांनीही सहभागी होत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

| | | | |
|---|---|---|---|
| रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | १६९१ | रोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | ८८३ |

## रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| टाटा | टाटा मोटर्स पुणे - क्वेझ कॉर्प | एचडीएफसी | ॲक्सिस बँक | जेबीएल | ॲमेझॉन |
| अपग्रेड | हिताची पेमेंटस | जेके मैनी प्रिसिजन टेक्नॉलॉजी लि. | बजाज ऑटो लि. | युनिकेअर फार्मा | फुकॉकु इंडिया प्रा. लि. |
| बॉश | टपारीया टूल्स लि. | बजाज सन्स लि. | एमडी इंडस्ट्रीज | गॅब्रिएल इंडिया लि. | रोथे एर्डे इंडिया प्रा. लि. |
| ब्लू स्टार लि. | स्पायरोमेक इंडिया प्रा. लि. | यशस्वी बोरो क्रिस | ग्लोब केमी | अकॅडमी फॉर स्किल्स | अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी |
| न्यू अपॉर्च्युनिटी एनओसीपीएल - येस बँक | एमएस एंटरप्रायझेस लि. | सोहम प्रोजेक्टस | युनिकेअर हेल्थ सेंटर | जेनेक्स्ट प्रिसिजन ऑटो टेक प्रा. लि. | शारदा मोटर इंडस्ट्रीज लि. |
| एलिट ऑटो इंजिनिअर्स (बजाज सन्स लि.) | जॉन्सन अँड जॉन्सन (मुलुंड) | टेक्नोक्रॅटस | ॲप्टिव्ह, साणंद | अवधूत टेक्नोक्रॅटस प्रा. लि. | मोसडॉर्फर इंडिया प्रा. लि. |
| एएलएफ इंजिनिअरिंग प्रा. लि. | ऑटोशेल इलेक्ट्रोमेक प्रा. लि. | बोरोसिल सायंटिफिक लि./ क्लास पॅक लि. | ब्रॅंडवर्क्स | जेबीएम ऑटो लि. | एन्ड्युरन्स (साणंद) |
| ब्रिटिश स्कॅफोल्डिंग इंटरनॅशनल लि. | अरेस हाय ड्युटी फोर्जिंग प्रा. लि. | पीएमईए सोलर टेक सोल्यूशन्स | ऑरिओल फार्मा - टेक | नो व्हील्स लि. | एचडीएफसी बँक |
| वासन टोयोटा | ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रा. लि. | हिंदुस्तान फूडस लि. | हेल्दी फूडस प्रा. लि. | विंटेक फार्मास्युटिकल्स लि. | आयसीआयसीआय बँक |
| बजाज फायनान्स लि. | एसबीआय लाईफ इन्शुरन्स | कोजंट ई - सर्व्हिसेस | अल्टुइस्ट इंडिया प्रा. लि. | वामनराव इथापे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट | ऑटो मेक इंडिया प्रा. लि. |

AXIS BANK ॲक्सिस बँक | इटरनल देवालय | BHARAT भारत फायनान्स इन्क्लुजन लि. | ANAND POWER आनंद आय-पॉवर सातपूर | SAN & SAN सॅन अँड सॅन ऑटो प्रा. लि.



मविप्र पॉलिटेक्निक, नाशिक येथे आयोजित नोकरी महामेळाव्याला युवक-युवतींचा प्रचंड प्रतिसाद; उज्ज्वल भविष्यासाठी हजारो पावलं संधीच्या दिशेने!



मविप्र नोकरी महामेळाव्यात विविध शैक्षणिक पात्रता आणि कौशल्ये घेऊन आलेल्या युवक-युवतींनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली. आपल्या क्षमतेला योग्य संधी मिळावी आणि करिअरला नवी दिशा मिळावी, या अपेक्षेने उमेदवारांची नोंदणी कक्षांवर लगबग पाहायला मिळाली.



मविप्र नोकरी महामेळाव्यात यशस्वी ठरलेल्या उमेदवारांना CII मॉडेल करिअर सेंटरचे मॅनेजर सागर शिरसाठ यांच्या हस्ते नोकरीचे ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. यावेळी मविप्र व CII मॉडेल करिअर सेंटरचे अधिकारी उपस्थित होते.



मविप्र नोकरी महामेळाव्यात निवड झालेल्या यशस्वी उमेदवारांना मविप्र समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नोकरीची ऑफर लेटर्स प्रदान करण्यात आली. शिक्षणातून रोजगाराकडे वाटचाल करणाऱ्या या तरुणांसाठी हा क्षण नव्या स्वप्नांच्या पूर्ततेची सुरुवात ठरला.



# शोध रोजगाराचा मार्ग मविप्रचा

मविप्र सिन्नर जॉब फेअर

मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित सिन्नर येथील जी.एम.डी कला, बी.डब्ल्यू वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात कर्मवीर ॲड.बाबूराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑगस्ट २०२६ रोजी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. मविप्र आणि सीआयआयचा हा तेरावा रोजगार मेळावा होता. गेल्या बाराही मेळाव्यांना मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहता या मेळाव्याबाबतही विद्यार्थी, पालकांमध्ये कमालीची उत्सुकता होती. सिन्नर हा देखील एक लहान आणि शेती बहुल तालुका आहे, मात्र नाशिक शहराला तो लागून असल्यामुळे सिन्नरमधील पालकांना आपल्या मुलांना नाशिक शहरात नोकरी मिळण्याची आशा असते, युवकांची देखील तशीच इच्छा असते. शहरात सेटल होण्याचे त्यांचे प्लॅन्स असतात. सिन्नर हे नाशिक शहराशी जोडले गेले असल्यामुळे नाशकातील नोकरीच्या संधीच्या ते शोधात असतात. मविप्र व सीआयआयने त्यांच्या याच आशांना, स्वप्नांना सत्यात उतरवण्याची संधी या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिली. म्हणूनच या मेळाव्यातही विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. सिन्नरमध्येही माळेगाव एमआयडीसी असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करुन देता येईल का या हेतूनेही अनेक नामवंत कंपन्यांनी देखील मेळाव्याला महत्त्व देत सहभाग नोंदवला.

| | |
|---|---|
| रोजगार म ा यात सहभागी झालेल्या युवकांची संख्या | १६११ |
| रोजगार म ा यात रोजगार उपलब्ध झालेल्या युवकांची संख्या | ५६० |

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कोणार्क इंजिनियर्स | एंट्राको बीकेएस बसडक्टस प्रा. लि. | युनिकेअर फार्मा | बजाज ऑटो लि. | फुकोकू इंडिया प्रा. लि. | तपारीया टूल्स लि. |
| सन अँड सन ऑटो प्रा. लि. | ऑटो मेक इंडिया प्रा. लि. | टाटा मोटर्स लि. | भारती एअरटेल लि. | वोडाफोन आयडिया लिमिटेड | अदानी ग्रुप |
| बर्जर पेंटस इंडिया लि. | एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया प्रा. लि. | शाओमी टेक्नॉलॉजी इंडिया प्रा. लि. | इंडस टॉवर्स लिमिटेड | द हिमालय ड्रग कंपनी | बाटा इंडिया लिमिटेड |
| आरएके आयटी सोल्यूशन्स | आरके एचआरडी इंडिया प्रा. लि. | एटर्नल देवालय | बॉश | फोनपे | युरेका फोर्ब्स |
| डी-मार्ट | अभिनव इन्स्टिट्यूट | ब्रिटिश स्कॅफोल्डिंग इंटरनॅशनल लिमिटेड | अॅरेस हाय ड्युटी फोर्जिंग्स प्रा. लि. | पीएमईए सोलर टेक सोल्यूशन्स लि. | ऑरिओल फार्मा-टेक |
| अॅक्युरा व्हॉल्व्हस प्रा. लि | वासन टोयोटा | ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रा. लि. | मारुती सुझुकी | जितेंद्र मोटर्स | हिंदुस्तान फूडस लि. |
| हेल्थी फूड प्रायव्हेट लि. | विनटेक फार्मास्युटिकल्स लि. | बोरो क्रिस | ग्लोब केमी | बजाज फायनान्स लि. | एसबीआय लाईफ इन्शुरन्स |
| डेटामॅटिक्स ग्लोबल सर्व्हिसेस प्रा. लि. | कोजंट ई-सर्व्हिसेस | अल्टुइस्ट इंडिया प्रा. लि. | इथापे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट | सोहम प्रोजेक्टस | आयसीआयसीआय बँक |
| एचडीएफसी बँक | सक्सेस जॉब प्लेसमेंट | जेके मैनी प्रिसिजन टेक्नॉलॉजी लि. | मित्रा अॅग्रो इक्विपमेंट्स प्रा. लि. | महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड | एनर्जोन सोल्यूशन्स प्रा. लि. |
| बजाज सन्स लिमिटेड | एमडी इंडस्ट्रीज अँड एम डी ऑटो कॉम्पोनंटस | गॅब्रिएल इंडिया लिमिटेड | युवाशक्ती स्किल इंडिया प्रा. लि. | ज्ञानज्योती सर्व्हिसेस | बजाज ऑटो अँड टाटा स्ट्राइव्ह |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मिलेनियम प्रिसिजन प्रा. लि. | जेबीएम ऑटो लि. | साहनी किर्कवूड लि. | मोसडॉफर इंडिया लि. | अंबर ऑटो इंजिनिअरिंग प्रा. लि. | सिप्रा लि. |
| फ्लाय व्हील रिंग गिअर्स प्रा. लि. | मेगाफाईन फार्मा प्रा. लि. | एस.व्ही हायटेक | तुरीन स्पेशॅलिटी इन्ग्रेडिएंटस प्रा. लि. | डब्ल्यूएनएस | बजाज फिनसर्व्ह |
| इक्विटास स्मॉल फायनान्स बँक | ब्लिंकिट | इंटरनॅशनल मोबिलिटी (जपान) | टीमलीज सर्व्हिसेस लिमिटेड | शुअर मी मल्टीपर्पज प्रा. लि. | |



ही उत्सुकता आणि नक्की काहीतरी हाती लागेल हा पालक- विद्यार्थ्यांचा विश्वास मविप्रने कमावला आहे.




तुझं उज्ज्वल भविष्य आणि उज्ज्वल करिअर तुझ्या हाती सोपवतो आहे मित्रा...




सिन्नर येथे मविप्र आणि सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन बाबुराव ठाकरे

मविप्र
सिन्नर
जॉब फेअर



मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

बहुजन हिताय बहुजन सुखाय

# प्रतिसाद, समाधान आणि बरचं काही...



# शब्द कृतज्ञतेचे स्वप्नातील करिअरची नवी दिशा

मविप्र समाज संस्थेचे कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे प्लेसमेंटर सेंटर नाशिक आणि सीआयआय मॉडेल करिअर सेंटर, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले गेलेले आजवरचे रोजगार मेळावे हे नाशिकच्याच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या शैक्षणिक इतिहासात महत्त्वाचे पान ठरले आहे. मविप्र संस्थेने सीआयआयशी हातमिळवणी करत या मेळाव्यांना फक्त रोजगाराचा नाही तर पालकांच्या विश्वासाचा, विद्यार्थ्यांच्या आशांचा मेळावा बनवले. शहर व जिल्हाभरात या मेळाव्यांचे आयोजन करताना सीआयआय टीम व मविप्र संस्था यांनी काटेकोर नियोजनाबरोबरच मागेल त्याला नोकरी हे महत्त्वाचे लक्ष डोळ्यासमोर ठेवले.या मेळाव्यांमध्ये जेव्हा विविध नामांकित कंपन्यांचा सहभाग, त्यांची मुलाखत प्रक्रिया, जागेवर देण्यात आलेले नियुक्ती पत्र हे सगळं खूप विश्वासार्ह वाटलं तेव्हा विद्यार्थी व पालकांच्या डोळ्यांत वेगळीच चमक दिसून आली. नाशिक जिल्हाभरातील तालुक्यांमध्ये, लहान गावांमध्ये शिक्षण संस्था सुरू करुन आता चालणार नाही तर शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या भविष्याची काळजी कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे यांनी ताडली आणि प्लेसमेंट सेल सुरू केला होता. त्यांच्याच या संकल्पनेने आता खूप एकसंघरूप धारण केले आहे. सीआयआयची जोड मिळाल्यामुळे हे मेळावे म्हणजे हजारो हातांना केवळ काम देणारे नाही तर अनेक कुटुंबाना आधार देणारे ठरले आहेत. जिल्हाभरात शेतकरी बांधवांना आपल्या मुला-मुलींच्या शिक्षणाची, त्यांच्या नोकरीची चिंता नेहमीच सतावत असते. कारण निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती करणे सोपे राहिलेले नाही. ढोर मेहनत, पण निसर्गाने धोका दिला तर बळीराजाच्या हातात काहीच उरत नाही. अशा परिस्थितीत आपल्या मुलांना आपल्यासारखे कष्ट करायला लागू नयेत, त्यांना एक सुरक्षित आर्थिक भविष्य लाभावे यासाठी बळीराजा मुलाबाळांना शिकवू लागला. पण आता केवळ बळीराजाच्या नाही तर इतरही सर्वसामान्यांच्या या प्रयत्नांना मविप्र आणि सीआयआयच्या मेळाव्यांनी आणखी बळकटी देऊ केली आहे. या मेळाव्यांमध्ये सहभागी झालेल्या तसेच ज्यांना नोकरी मिळाली त्या सर्वच विद्यार्थी व पालकांच्या मनात म्हणूनच कृतज्ञतेची भावना दिसून आली. त्यांनी व्यक्त केलेली कृतज्ञता...

## अत्यंत सकारात्मक अनुभव



**-गौरी जाधव**
के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक

के.टी.एच.एम.कॉलेजद्वारे आयोजित रोजगार मेळाव्यातील माझा अनुभव अत्यंत सकारात्मक होता. हा संपूर्ण कार्यक्रम अतिशय उत्तम रितीने आयोजित करण्यात आला होता, तसेच नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी आणि मुलाखतीची प्रक्रिया अतिशय सोपी आणि पद्धतशीर होती.

मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून माझी निवड झाली आहे. नियोक्त्यांशी (Recruiters) संवाद साधण्याची आणि स्वत:साठी योग्य करिअरचे पर्याय शोधण्याची ही एक सुवर्णसंधी होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांबद्दल मी मा.वि.प्र.संस्था, के.टी.एच.एम. कॉलेज, सी. आय. आय. आणि संपूर्ण आयोजन समितीचे मनापासून आभार मानते. भविष्यातही अशाच प्रकारच्या इतर प्लेसमेंट मोहिमा (Placement Drives) आयोजित केल्या जातील, अशी मी आशा करते.

## माझ्या भाषेविषयी कौशल्याचा योग्य वापर



**-ऋतुंबरा साळुंके**
के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक

मी ऋतुंबरा साळुंके TYBA (English) ची विद्यार्थिनी असून के.टी.एच.एम.महाविद्यालयात शिकत आहे. म.वि.प्र. संस्थेने आणि CII यांनी या वर्षी भरवलेल्या महारोजगार मेळाव्यात माझी प्लेसमेंट (Placement) झाली आणि माझ्या करिअरला एक योग्य दिशा देखील मिळाली. आणि मला लगेच रोजगारही मिळाला. ज्यात माझ्या English भाषेविषयी कौशल्याचा योग्य वापर होऊन माझ्या परिवाराला देखील हातभार लागला. आणि आज मी Sure Me Multipurpose Private Limited कंपनीत कार्यरत आहे. मला ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी म.वि.प्र. संस्था आणि के.टी.एच.एम.महाविद्यालयाची खूप खूप आभारी आहे.

## आयुष्यावर होणार सकारात्मक परिणाम



**-पायल चंद्रकांत गोसावी**
के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक

मी पायल चंद्रकांत गोसावी के.टी.एच.एम. महाविद्यालयात TYBA (English) ची विद्यार्थिनी होते. यावर्षी मराठा विद्या प्रसारक समाजातर्फे भरवलेल्या रोजगार मेळाव्यात मला शुअर मी मल्टिपर्पज प्रायव्हेट लिमिटेड (Sure Me Multipurpose Private Limited) या कंपनीत नोकरीची संधी मिळाली आहे. ही नोकरी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे. कारण यामुळे मला घर खर्चात आर्थिक हातभार लावता येणार आहे. या नोकरीमुळे माझ्या एकूणच आयुष्यावर सकारात्मक परिणाम होणार आहेत. माझ्या भविष्य वाटचालीला योग्य दिशा मिळाली आहे. माझा खर्च देखील मी स्वत: करू शकणार आहे. त्यासाठी आई वडिलांवर आता मला अवलंबून राहावे लागणार नाहीये. आपल्या के.टी.एच.एम महाविद्यालय, सीआयआय आणि म.वि.प्र या संस्थेने मला ही

रोजगार मेळाव्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी संस्थेची खूप खूप आभारी आहे.

## अतिशय सोपी आणि सुटसुटीत भरती प्रक्रिया



**-यश विश्वास पाडवी**
के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक

मी के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक आणि मॉडेल करिअर सेंटर यांनी इतका सुंदर रोजगार मेळावा (Job Fair) आयोजित केल्याबद्दल मनापासून आभार मानू इच्छितो. हा कार्यक्रम अत्यंत सुव्यवस्थित आणि व्यावसायिक पद्धतीने पार पडला, ज्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिया अतिशय सोपी आणि सुटसुटीत झाली.

मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून माझी "महिंद्रा अँड महिंद्रा" (MAHINDRA and MAHINDRA) कंपनीत निवड झाली आहे. नियोक्त्यांशी संवाद साधण्याची आणि माझ्या कौशल्यांचे प्रदर्शन करण्याची ही एक मौल्यवान संधी होती.

संपूर्ण आयोजन समितीच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाबद्दल त्यांचे धन्यवाद. भविष्यात विद्यार्थ्यांच्या करिअरला चालना देणारे असे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मी तुम्हाला सातत्यपूर्ण यशाच्या शुभेच्छा देतो.

## स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी प्रोत्साहन



**-लाभ जोशी**
नाशिक

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज (NDMVP) च्या गंगापूर रोड येथील आयटीआय कॉलेजमध्ये 'इलेक्ट्रिशियन' ट्रेडमधून ८७% गुण मिळवून पास होणं, हा माझ्या आयुष्यातला एक खूप भारी आणि मनाला समाधान देणारा अनुभव होता.

खरं सांगायचं तर, हे फक्त पुस्तकी ज्ञान देणारं कॉलेज नाही, तर इथल्या स्टाफने मला पावलोपावली खंबीर साथ दिली. कॉलेजचा मुख्य भर विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक (Entrepreneur) म्हणजेच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची आवड निर्माण करण्यावर असतो. आम्ही फक्त शिकलो नाही, तर नवनवीन प्रोजेक्ट्स आणि स्टार्टअप्स कसे उभे करायचे याचं प्रॅक्टिकल ज्ञान आम्हाला इथे मिळालं. कॉलेज नेहमीच विद्यार्थ्यांना स्वतःचे स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी एक उत्तम प्लॅटफॉर्म आणि पूर्ण मोटिव्हेशन देतं.

अभ्यासासोबतच मला इथे स्पोर्ट्स आणि इतर ॲक्टिव्हिटींचा मनमुराद आनंद घेता आला, ज्यामुळे माझं व्यक्तिमत्त्व आणखी खुललं. इथले शिक्षक अत्यंत अनुभवी आणि मैत्रीपूर्ण आहेत; त्यांनी दिलेल्या कोर टेक्निकल नॉलेजमुळे (Core Technical Knowledge) माझा पाया मजबूत झाला.

थोडक्यात सांगायचं तर, तांत्रिक क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करू इच्छिणाऱ्या आणि स्वतःचा उद्योग सुरू करण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी मविप्र आयटीआय हे नाशिकमधील एक परफेक्ट व्यासपीठ आहे !

## अभिनंदनीय उपक्रम



**-भारत सिताराम कुवर**
मांदाने - वणी ता. दिंडोरी

मविप्र संस्थेच्या के. आर. टी. कला, वाणिज्य महाविद्यालयात (वणी ) आयोजित करण्यात आलेला रोजगार मेळावा हा विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. पालक म्हणून आम्हाला आनंद वाटतो की, विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत रोजगाराच्या संधीची माहिती प्रत्यक्ष तज्ज्ञांकडून मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास निश्चितच मदत होईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित हे उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून त्यांच्या भविष्याला दिशा देणारे आहे. ग्रामीण भागात मुलांना योग्य करिअर मार्गदर्शन मिळाले तर ही मुलं देखील सर्वांगीण विकास साधू शकतील. पालक कमी शिकलेले असल्यामुळे या मुलांना मार्गदर्शन करायला कोणी नसतं, पण मविप्र संस्थेने पालकांच्या भूमिकेत शिरून सुरु केलेला हा उपक्रम अभिनंदनीय आहे.

## भावुक आणि सुखावणारा क्षण



**-श्री. रामदास पठाडे**
वणी, ता. दिंडोरी

माझा मुलगा संकेत, याच्या भविष्याची मला सतत काळजी वाटत होती. कारण सध्या नोकरी मिळणे हे वाटते तितके सोपे राहिलेले नाही. जग झपाट्याने बदलत आहे. नोकरी ही संकल्पनाही बदलत आहे. आजच्या युवकांचे विश्व वेगळे आहे. त्यामुळे कालसुसंगत काम मुलाला मिळालं तर त्याचे करिअर आकार घेईल असे वाटत होती. पण त्यासाठी नेमकं काय करावे? हा प्रश्न समोर होताच.

के. आर. टी. हायस्कूल, वणी येथून दहावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्याने पुढील तांत्रिक कौशल्यांसाठी आयटीआय (ITI) चा अभ्यासक्रम पूर्ण केला. आयटीआय पूर्ण झाल्यावर त्याला लवकरात लवकर एखादी चांगली नोकरी मिळावी यासाठी आमचे प्रयत्न सुरू होते, मात्र योग्य संधीची चिंता कायम होती.

अशातच, आम्हाला कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वणी येथे एका भव्य 'महानोकरी मेळाव्याचे' आयोजन करण्यात आल्याचे कळले. मी माझ्या माझ्या मुलाला म्हणजेच संकेतला मेळाव्यात सहभाग घेण्यास सांगितले.

या नोकरी मेळाव्यात संकेतने अत्यंत आत्मविश्वासाने विविध नामांकित कंपन्यांच्या मुलाखती दिल्या. आम्हा सर्वांसाठी अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे, त्याची 'बॉश' (Bosch) या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड झाली आहे. एका पालकासाठी आपल्या मुलाला इतक्या मोठ्या कंपनीत रोजगाराची संधी मिळणे, हा अत्यंत भावुक आणि सुखावणारा क्षण आहे.

अत्यंत व्यापक व दूरदृष्टिकोन बाळगत मविप्रने रोजगार मेळावा हा उपक्रम सुरु केला आहे. त्याबद्दल संस्थेचे आभार !

# प्रभावी आणि लाभदायक उपक्रम



**-श्री. नितीन कुशारे**
पिंपळगाव बसवंत, ता. निफाड

ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वणी येथे आयोजित रोजगार मेळावा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. या मेळाव्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये विविध क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या युवकांना एकाच छताखाली अनेक आणि उत्तमोत्तम पर्याय उपलब्ध झाले होते. एरवी एका कंपनीसाठी मुलाखत दिल्यानंतर त्या कंपनीचा होकार-नकार आल्याशिवाय पुढचा निर्णय घेता येत नाही, इथे मात्र पर्याय उपलब्ध होते. एकाचवेळी विविध कंपन्यांशी ॲप्रोच होता येत होते.

मेळाव्यात नोंदणी प्रक्रिया अत्यंत सहजसोपी ठेवण्यात आली होती, ज्यामुळे कुठेही गोंधळ उडाला नाही. कंपन्यांच्या आवश्यकतेनुसार मुलाखतींचे नियोजन अत्यंत चोख करण्यात आले होते. केवळ मुलाखती न घेता, विद्यार्थी, युवकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि कॉर्पोरेट जगताची ओळख करून देण्यासाठी आयोजित केलेली मार्गदर्शन सत्रे अतिशय उपयुक्त ठरली. महाविद्यालय प्रशासन आणि स्वयंसेवकांनी प्रत्येक टप्प्यावर माहिती देऊन सहकार्य केले.

एकंदरीत, हा रोजगार मेळावा केवळ नोकरी देणारे माध्यम न ठरता, विद्यार्थ्यांचे करिअर घडवणारा एक अत्यंत प्रभावी उपक्रम ठरला.

---

माझ्या मुलीने तिचे बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, तिच्या पुढील उच्च शिक्षणाची आणि त्यानंतर मिळणाऱ्या रोजगाराच्या संधींची मला सतत चिंता सतावत होती. आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य संधी मिळणे किती कठीण असते, याची मला जाणीव होती. अशातच, माझ्या मुलीकडून मला महाविद्यालयात होणाऱ्या या भव्य नोकरी मेळाव्याची माहिती मिळाली, त्यामुळे मविप्रने महत्वाच्या प्रश्नावर उपाय शोधला असा सुटकेचा नि:श्वास जणू सोडला. हा मेळावा माझ्या मुलीसारख्याच अनेक युवक-युवतींसाठी आशेचा किरण ठरणार होता.

मुलीला सोबत घेऊन जेव्हा मी वणी येथील मेळाव्याच्या ठिकाणी पोहोचलो, तेव्हा तेथील प्रचंड गर्दी पाहून सुरुवातीला मी थक्क झालो. परंतु, एवढी गर्दी असूनही महाविद्यालय प्रशासनाने केलेले नियोजन वाखाणण्याजोगे होते. नोंदणीपासून ते प्रत्यक्ष मुलाखतींपर्यंतची प्रत्येक प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध आणि

# मविप्रचे मनापासून आभार



**-श्री. रामकृष्ण कडलग**
पिंपळगाव बसवंत, ता. निफाड

सुटसुटीत होती, ज्यामुळे विद्यार्थ्यांना कोणताही त्रास झाला नाही.

या मेळाव्यात माझ्या मुलीला 'फ्लिपकार्ट' (Flipkart) या नामांकित कंपनीमध्ये नोकरीची संधी प्राप्त झाली. तिला थेट ऑफर लेटर देखील मिळाले आहे. मुलीला नोकरी मिळाल्याचा आनंद हा पालकांसाठी अधिक सुखावणारा असतो. कारण मुलगी स्वावलंबी असणे ही काळाची गरज बनली आहे. भविष्यात, लग्नानंतरही तिचे निर्णय तिला घेता यावे असे वाटत असेल तर मुलीने नोकरी करणे गरजेचे आहे. त्यामुळे हा मेळावा माझ्यासाठी खूप महत्वाचा ठरला. आता माझ्या मुलीच्या भविष्याची चिंता करण्याची मला गरज नाही.

या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल मी मनापासून आभार मानतो.

---

मी विष्णू ठाकरे, मु. पो. अभोणा (वणी) येथील रहिवासी असून, एक सुजाण पालक म्हणून माझी भावना व्यक्त करत आहे. माझी मुलगी, राणी विष्णू ठाकरे, ही जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कुंडाणे येथे शिक्षण घेत आहे. कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वणी येथे एका भव्य ' महारोजगार मेळाव्याचे ' आयोजन केले जाणार असल्याचे कळताच मी माझ्या मुलीला सोबत घेऊन १३ फेब्रुवारी २०२६ रोजी वणी येथील महाविद्यालयात उपस्थित झालो.

# मविप्रचा दूरदृष्टिकोन कौतुकास्पद



**- श्री. विष्णू ठाकरे**
अभोणा ता. कळवण

या मेळाव्यात माझ्या मुलीने वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांच्या मुलाखती दिल्या. महाविद्यालयाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे तिला कोणताही त्रास न होता सर्व मुलाखती प्रक्रियेत सहभागी होता आले. तिची ' धूत ट्रान्समिशन प्रायव्हेट लिमिटेड ' या नामांकित कंपनीत निवड झाली असून, तिला जागेवरच नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. ग्रामीण भागात आजही मुलीचे शिक्षण, तिचे लग्न, तिचे स्वावलंबन यासाठी प्रत्येक पिता चिंताग्रस्त असतोच. पण तरीही या रोजगार मेळाव्याने माझ्यासारख्या पालकांना एक भक्कम साथ दिली आहे, असे मला वाटते. कळवण हा आदिवासी भाग आहे. या भागात असे मेळावे आयोजित करणे हा मविप्र संस्थेचा दूरदृष्टिकोन कौतुकास्पद आहे. आदिवासी बहुल भाग आजही अनेक जीवनावश्यक सुविधांपासून वंचित आहे. मात्र मविप्रने नोकरी, त्यामुळे येणारे स्थैर्य, त्यातून निर्माण होणारा कौटुंबिक, आर्थिक समतोल याचे महत्व ओळखले.

# कॉर्पोरेट जगताची कार्यपद्धती समजली



**-तेजस्विनी भारत कुवर**
मांदाणे - वणी ता. दिंडोरी

मविप्र संस्थेच्या के. आर. टी. कला, वाणिज्य महाविद्यालयात (वणी ) आयोजित करण्यात आलेल्या भव्य रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. हा

माझ्यासाठी अत्यंत दिशादर्शक आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

या मेळाव्यात सहभागी झाल्यानंतर मला प्रकर्षाने जाणवले की आजच्या कॉर्पोरेट जगात यशस्वी होण्यासाठी केवळ पुस्तकी किंवा शैक्षणिक ज्ञान पुरेसे नाही; तर त्यासोबतच उत्तम संवाद कौशल्य ,वेळेचे अचूक नियोजन, अद्ययावत संगणकीय ज्ञान, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व या व्यावसायिक कौशल्यांचीही तितकीच गरज असते. या मेळाव्याने मला माझ्यात कुठे सुधारणा करावी लागेल याची जाणीव तर करुन दिलीच पण त्याचबरोबर माझ्या काही सकारात्मक बाबी देखील मला माहिती करुन दिल्या.

या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून मला 'धूत ट्रान्समिशन प्रायव्हेट लिमिटेड' (Dhoot Transmission Pvt. Ltd.) या नामांकित कंपनीमध्ये 'जॉब ऑफर लेटर' प्राप्त झाले. शिक्षण पूर्ण होताच नोकरी मिळाल्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला आहे. या मेळाव्यात एकाच वेळी अनेक नामांकित कंपन्यांनी शेकडो विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या, तसेच कंपन्यांच्या भविष्यातील भरती प्रक्रियेची आणि अपेक्षेची सविस्तर माहिती दिली. यामुळे आम्हा सर्वांनाच  कॉर्पोरेट जगताची कार्यपद्धती समजून घेता आली.

## करिअरची उत्तम सुरुवात



**-साहिल दिलीप केदारे**
के. आर. टी. महाविद्यालय, वणी

ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वणी येथे भव्य 'महारोजगार मेळाव्याचे' आयोजन केल्याबद्दल मी मनःपूर्वक आभार मानतो.

आजूबाजूच्या अनेक लहान गावांमधील विद्यार्थी व पालकांनी या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. गर्दी असूनही, सर्वांना मुलाखतीची संधी मिळेल असे उत्तम नियोजन महाविद्यालयाने केले होते. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे, येथे विविध नामांकित कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. मुलाखतींपूर्वी त्यांनी केलेले मार्गदर्शन आम्हा सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरक ठरले. कॉर्पोरेट जगतात नेमकी कशाची गरज आहे, हे त्यांच्याकडून समजले.

औद्योगिक क्षेत्रात आयटीआय (ITI), डिप्लोमा (Diploma) आणि इंजिनिअरिंग (Engineering) सारख्या तांत्रिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या युवक-युवतींना रोजगाराच्या प्रचंड संधी आज उपलब्ध आहेत. मात्र त्याची माहिती विद्यार्थी व पालकांना नसते. त्यामुळेच नोकरी-रोजगारापासून लहान लहान गावांमधील युवक वंचित राहतात. कंपन्यांचा ओढा अशा कौशल्याधारित उमेदवारांकडे जास्त असतो. माझे स्वतःचे 'आयटीआय'चे शिक्षण पूर्ण झाले असल्याने, मला या मेळाव्याचा थेट फायदा मिळाला.  माझी मुलाखत अत्यंत सकारात्मक वातावरणात पार पडली. मला पूर्ण विश्वास आहे की, या मेळाव्याच्या माध्यमातून मला हक्काचा आणि दर्जेदार रोजगार नक्कीच प्राप्त होईल.

तांत्रिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना शहरात जाऊन नोकरी शोधणे आर्थिकदृष्ट्या कधीकधी कठीण होते, अशा वेळी त्यांच्या दारात रोजगाराची संधी  पोहोचवणे कौतुकास्पद आहे.

## मोठ्या पदावर काम करण्याची संधी



**-रोहन विनोद अहिरे**
वणी ता. दिंडोरी

मी रोहन विनोद अहिरे, कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात तृतीय वर्ष कला (TYBA) शाखेत शिकत आहे.  महाविद्यालयातर्फे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या महानोकरी मेळाव्यात मी सहभागी झालो.

कला (Arts) शाखेचा विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असताना, पदवीनंतर पुढे नक्की काय करायचे आणि रोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध असतील, याबद्दल मनात अनेक शंका होत्या. मात्र, या रोजगार मेळाव्याने माझ्या सर्व शंका दूर केल्या. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना थेट कॉर्पोरेट क्षेत्राशी आणि नामांकित उद्योगांशी जोडण्यासाठी केलेले हे प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद  आहेत.

या मेळाव्यातील मुलाखतीची प्रक्रिया पार पडल्यानंतर  माझी 'टॅलेंट कॉर्प. सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड' (Talent Corp Solutions Pvt. Ltd.) या नामांकित कंपनीमध्ये 'रोबोट ऑपरेटर अप्रेंटिस' (Robot Operator Apprentice) या अत्यंत जबाबदार आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित पदासाठी निवड झाली आहे. कला शाखेचा विद्यार्थी असूनही मला तांत्रिक क्षेत्राशी निगडित एवढ्या मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळाली.

या मेळाव्याच्या आयोजनासाठी महाविद्यालय प्रशासनाचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

## करिअरच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल



**-संकेत दत्तू भुजाडे**
के. आर. टी. महाविद्यालय, वणी

मी मविप्र संचलित के. आर. टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वणी येथे प्रथम वर्ष कला (FYBA) या वर्गात आहे. महाविद्यालयातील शिक्षकांच्या माध्यमातून मला कॅम्पसमध्ये एका भव्य 'महानोकरी रोजगार मेळाव्याचे' आयोजन केले जाणार असल्याची माहिती मिळाली. कला शाखेच्या प्रथम वर्षात असतानाच अशी संधीची मिळणे, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची आणि उत्सुकतेची बाब होती.

या सुवर्णसंधीचे सोने करण्यासाठी मी माझ्या पातळीवर मुलाखतींची पूर्वतयारी सुरू केली. त्यानंतर, दिनांक १३ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या भव्य मेळाव्यात मी सहभागी झालो.

या मेळाव्यात मी अत्यंत आत्मविश्वासाने वेगवेगळ्या कंपन्यांच्या मुलाखती दिल्या. महाविद्यालयाच्या उत्तम नियोजनामुळे संपूर्ण प्रक्रिया अतिशय सोपी आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. माझी ' धूत ट्रान्समिशन प्रायव्हेट लिमिटेड' (Dhoot Transmission Pvt. Ltd.) या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आणि मला जागेवरच 'जॉब ऑफर लेटर' प्राप्त झाले. प्रथम वर्षात शिकत असतानाच एका प्रतिष्ठित कंपनीत रोजगाराची ही मोठी संधी

मिळणे, माझ्या करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

महाविद्यालयाने राबवलेला हा उपक्रम आजच्या तरुण पिढीला स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना हक्काचा रोजगार मिळवून देण्यासाठी एक अत्यंत प्रभावी माध्यम ठरला आहे.

## आयुष्याला कलाटणी देणारा मेळावा



**-लक्ष्मण कृष्णा चौधरी**
वणी ता. दिंडोरी

मविप्र संस्थेच्या कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात माझे शिक्षण सुरू आहे. कॉलेजने आयोजित केलेला ' महा नोकरी मेळावा ' माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला होता. इतक्या मोठ्या उद्योग समूहांची ओळखही यानिमित्त होणार होती. उत्सुकता होतीच पण त्याचबरोबर थोडी धाकधूक होती. इतक्या मोठ्या संख्येने जमलेल्या विद्यार्थ्यांमधून आपल्याला संधी मिळेल की नाही? पण तरीही मुलाखतीसाठी तयारी मी केली होती.

मुलाखतीला सामोरे जाण्यापूर्वी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले. रेझ्युमे कसा तयार करावा, मुलाखतीमध्ये उत्तरे कशी द्यावीत आणि आत्मविश्वासाने कसे बोलावे यासंदर्भातील अनेक महत्वाच्या टिप्स मला शिक्षकांकडून मिळाल्या. या मार्गदर्शनामुळे प्रत्यक्ष मेळाव्यात मी कोणतेही दडपण न बाळगता मुलाखतींना सामोरे गेलो.

मला 'जेबीएम ऑटो प्रायव्हेट लिमिटेड' (JBM Auto Pvt. Ltd.) या नामांकित कंपनीत नोकरीची संधी प्राप्त झाली असून झाली असून, कंपनीकडून नोकरीचे नियुक्तीपत्र प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी महाविद्यालयाचे मनापासून आभार मानतो.

## सगळं अगदी सोप्प झालं



**-पुनम बाळु मोकळ**
नांदगाव

मी पुनम बाळु मोकळ मविप्र संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदगाव येथे वाणिज्य पदवी द्वितीय वर्षात या वर्गात शिकत आहे. आमच्या महाविद्यालयाने रोजगार मेळावा हा उपक्रम आयोजित करून त्या मेळाव्यामध्ये मला महाविद्यालयाने रोजगार संधी उपलब्ध करून दिली. मी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा प्लॅन्ट नं २, नाशिक या कंपनीमध्ये नोकरी करत आहे. मुली आणि महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी हव्यात असे मला नेहमीच वाटते. त्यासाठी नोकरी शोधण्याची आमची धडपड सुरूच असते. अनेक ठिकाणी अर्जफाटे करा, तेथील संदर्भित अधिकाऱ्यांना ते बोलावतील तेव्हा वेळोवेळी भेटा, असे हे चक्र सुरु राहते. पण मविप्र रोजगार मेळव्यात हे सगळं अगदी सोप्प झालं मी महाविद्यालयाचे आभार मानते की त्यांनी मला नोकरीची संधी प्राप्त करून दिली.

## आर्थिक स्थैर्य आले



**- मोनिका महाजन**
नांदगाव

मी मोनिका शांताराम महाजन मार्च २०२६ मध्ये मविप्र संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव येथे आयोजित भव्य नोकरी मेळाव्यात सहभागी झाली होते. तेथे अनेक नामांकित कंपन्या एकाच छताखाली उपलब्ध होत्या. ज्यामुळे माझ्या करिअरला एक नवी दिशा मिळाली व आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. मी आता International Automotive Components (IAC) या कंपनीमध्ये कार्यरत आहे. मी व्दितीय वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी आहे. माझे शिक्षण सुरु असतानाच नोकरीची संधी मिळणे ही माझ्यासाठी खूप आनंदाची बाब आहे. सध्या जिकडे तिकडे बेरोजगारी वाढलेली आपण पाहतोय, पण मविप्र संस्थेने रोजगार मेळावे अत्यंत महत्वाची संकल्पना सुरु करून विद्यार्थी आणि पालकांना आधार, दिलासा दिलाय.

## मानू तितके आभार कमी



**- शुभांगी दलु गरुड**
नांदगाव

मी शुभांगी दलु गरूड. मार्च २०२६ मध्ये मविप्र संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदगाव येथे आयोजित भव्य नोकरी मेळाव्यात मी सहभागी झाले होते. मी द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी आहे. शिक्षण सुरू असतानाच अनेक नामांकित कंपन्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी देण्यासाठी उत्सुक आहेत, हे पाहून खूप आनंद झाला आणि माझा आत्मविश्वासही वाढला. नोकरीच्या संधी नाहीत असं अनेकदा म्हटलं जातं; पण प्रत्यक्षात संधी आहेत, गरज आहे ती विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठ मिळण्याची. मविप्रने 'मागेल त्याला नोकरी' हे ध्येय ठेवून आमच्यासारख्या विद्यार्थ्यांसाठी हे व्यासपीठ निर्माण केले आहे. विशेष म्हणजे महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच प्रत्यक्ष उद्योगविश्वाशी जोडले जाण्याची संधी आम्हाला या मेळाव्यामुळे मिळाली. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून करिअरची सुरुवात करण्याची प्रेरणाही या उपक्रमातून मिळाली. या नोकरी मेळाव्यामुळे आज मी International Automotive Components (IAC) या कंपनीमध्ये कार्यरत आहे. शिक्षण घेत असतानाच मिळालेली ही संधी माझ्यासाठी केवळ नोकरी नाही, तर स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहे. माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणारा मविप्रचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. यासाठी मविप्र संस्था आणि या उपक्रमासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे मी मनापासून आभार मानते.

## मानू तितके आभार कमी



**- पल्लवी वाघचौरे**
नांदगाव

मी पल्लवी विजय वाघचौरे मार्च २०२६ मध्ये मविप्र संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव येथे आयोजित भव्य नोकरी मेळाव्यात सहभागी झाली होते. मी आत्ता Mahindra & Mahindra या कंपनीमध्ये कार्यरत आहे. मी व्दितीय वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी आहे. शिक्षण करता करता नोकरी ही संकल्पना खऱ्या अर्थाने युवकांसाठी आत्मबल वाढवणारी आहे. या रोजगार मेळाव्यात अनेक कंपन्या सहभागी झाल्या होत्या.त्यामुळे उद्योग जगतातील प्रत्यक्ष कामकाज पद्धती यामुळे आम्हाला कळाली. त्यादृष्टीने स्वतःमध्ये कसे बदल करावेत याचा देखील अंदाज आम्हाला आला. मला नोकरी मिळणे ही माझ्यासाठी केवळ अर्थार्जनाची संधी नसून भविष्यात आत्मविश्वासाने निर्णय घेणे, जबाबदारी घेणे याची देखील ही मानसिक तयारी मी समजते.

## निवडीसाठी भरपूर पर्याय



**- ऋतुजा शेवाळे**
नांदगाव

मी, ऋतुजा जनार्दन शेवाळे, मार्च २०२६ मध्ये म.वि.प्र. संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य नोकरी मेळाव्यात सहभागी झाले होते. मला द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y. B.Com) या वर्गात शिकत असतानाच या मेळाव्यामुळे नोकरी शोधणे अत्यंत सोपे झाले. या रोजगार मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे अनेक नामांकित कंपन्या एकाच छताखाली उपलब्ध होत्या. एकाच ठिकाणी अनेक नामांकित कंपन्या आल्यामुळे विद्यार्थ्यांना निवडीसाठी भरपूर पर्याय मिळाले. या सुवर्णसंधीमुळे माझ्या करिअरला एक नवी व योग्य दिशा मिळाली असून, मला आर्थिक स्थैर्यही प्राप्त झाले आहे. मी सध्या International Automotive Components (IAC) या नामांकित कंपनीमध्ये यशस्वीरित्या कार्यरत आहे.

## गावांमध्ये पोहचल्या नोकरीच्या संधी

**- सोमनाथ चव्हाण**
मंगरूळ, ता.चांदवड.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्यात अनेक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना यामुळे रोजगाराची एक चांगली संधी उपलब्ध झाली. एक वेळ शहरातील मुलांपर्यंत नोकरीच्या संधी सहज पोहचू शकतात पण ग्रामीण भागातील मुले वंचित राहतात. या मेळाव्यामुळे तालुका आणि लहान गावांमधील मुलांपर्यंत यासंधी मविप्रने पोहचवल्या आहेत. संस्थेचा हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून याबद्दल आम्ही खूप आभारी आहोत.

## शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी मदत



**-स्नेहा सचिन थोरात**
वणी, ता. दिंडोरी,. जि.नाशिक

मी स्नेहा सचिन थोरात, मु.पो. वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील रहिवासी असून सध्या महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत आहे. शिक्षण घेत असतानाच मला जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या असिस्टंट हेअर ड्रेसर सलून सर्व्हिसेस या प्रशिक्षणाची माहिती महाविद्यालयाच्या व्हॉट्सअ‍ॅपवर मिळाली. त्यानंतर मी संस्थेशी संपर्क साधून या प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेतला.या प्रशिक्षणामध्ये मला फेशियल, विविध प्रकारचे हेअर कट, मेकअप, हेअर स्टाईलिंग तसेच सलून व्यवसायाशी संबंधित अनेक कौशल्यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांनी अत्यंत सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केल्यामुळे मला आत्मविश्वास मिळाला आणि या क्षेत्रातील व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करता आली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या परिसरातील महिलांचे मेकअप, हेअर कट आणि फेशियलची कामे स्वीकारण्यास सुरुवात केली. सध्या या कामातून मला दरमहा सुमारे रुपये ८,००० इतके उत्पन्न मिळत आहे. या उत्पन्नामुळे माझ्या शिक्षणाचा खर्च भागविण्यास तसेच माझ्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यास मोठी मदत होत आहे.जन शिक्षण संस्थान, नाशिक यांनी मला कौशल्य, आत्मविश्वास आणि स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली.

## हलाखीची परिस्थिती, प्रशिक्षणाने दिला रोजगार



**-कांचन केशव जाधव**
वडनेर भैरव, ता.चांदवड, जि. नाशिक

मी कांचन केशव जाधव, मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक येथील रहिवासी आहे. ग्रामपंचायत वडनेर भैरव यांच्या माध्यमातून जन शिक्षण संस्थान, नाशिक येथे सन २०२५–२६ मध्ये ब्युटी केअर असिस्टंट या प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला.या प्रशिक्षणादरम्यान मला आयब्रो, फेशियल, मॅनिक्युअर, पेडिक्युअर, विविध प्रकारचे ब्रायडल मेकअप, हेअर स्टाईलिंग, ब्लीचिंग तसेच ब्युटी पार्लर व्यवसायाशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मला या क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करता आली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी ब्रायडल मेकअप व इतर ब्युटी सेवा देण्यास सुरुवात केली. सध्या मला मेकअपच्या ऑर्डर मिळत असून त्यातून दरमहा सुमारे रुपये १०,००० ते १२,००० इतके उत्पन्न मिळत आहे. माझे वडील हयात नसून आमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. माझी आई शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. जन शिक्षण संस्थानच्या या कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे मला स्वयंरोजगाराची संधी मिळाली असून माझ्या कुटुंबाला आर्थिक

हातभार लावता येत आहे. या प्रशिक्षणामुळे माझा आत्मविश्वास वाढला असून भविष्यात स्वतःचे ब्युटी पार्लर सुरू करण्याचे माझे ध्येय आहे.

## स्वावलंबी होण्याची संधी



**- सोनाली ज्ञानेश्वर पवार**
मालेगाव, जि. नाशिक

मी सोनाली ज्ञानेश्वर पवार, मु.पो. मोतीबाग नाका, ता. मालेगाव, जि. नाशिक येथील रहिवासी आहे. जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून मी असिस्टंट ड्रेस मेकर या प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला. या प्रशिक्षणामध्ये मला शिवण मशीन हाताळण्याचे कौशल्य तसेच विविध प्रकारचे ब्लाऊज, पंजाबी ड्रेस, सलवार, जॅकेट, कुर्ती, कापडी पिशव्या (क्लॉथ बॅग) आणि लहान मुलांचे कपडे शिवण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मला शिवणकामातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करता आली आणि माझा आत्मविश्वास वाढला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या परिसरातील महिलांचे ब्लाऊज, ड्रेस व इतर कपडे शिवण्याच्या ऑर्डर स्वीकारण्यास सुरुवात केली. सध्या या कामातून मला दरमहा सुमारे रुपये ८,००० इतके उत्पन्न मिळत आहे. या उत्पन्नामुळे माझ्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागला असून मला स्वावलंबी होण्याची संधी मिळाली आहे.

जन शिक्षण संस्थानच्या या कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे मला स्वयंरोजगाराचा मार्ग मिळाला असून भविष्यात माझा स्वतःचा टेलरिंग व्यवसाय अधिक मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचा माझा निर्धार आहे.

## कुटुंबाला आर्थिक हातभार



**- कावेरी भाऊसाहेब पवार**
मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड

मी कावेरी भाऊसाहेब पवार, मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक येथील रहिवासी आहे. जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून मी असिस्टंट ड्रेस मेकर या प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला.

या प्रशिक्षणामध्ये मला ब्लाऊज, विविध प्रकारचे ड्रेस, कापडी पिशव्या (क्लॉथ बॅग) तसेच शिवणकामाशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मला शिवणकामातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करता आली आणि माझा आत्मविश्वास वाढला.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर माझ्या पतीने मला रुपये ८,००० किमतीचे नवीन शिवण मशीन घेऊन दिली. त्यानंतर मी माझ्या गावातील महिलांचे ब्लाऊज व विविध प्रकारच्या ड्रेसचे शिवणकाम करण्यास सुरुवात केली. सध्या या कामातून मला दरमहा सुमारे रुपये ७,००० ते ८,००० इतके उत्पन्न मिळत आहे. या उत्पन्नामुळे माझ्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागत असून माझा आत्मविश्वासही वाढला आहे.

## कौशल्यांचे सखोल प्रात्यक्षिक प्रशिक्षण



**- आकाश देविदास सूर्यवंशी**
मखमलाबाद, ता.जि.नाशिक

मी आकाश देविदास सूर्यवंशी, मखमलाबाद, ता. जि. नाशिक येथील रहिवासी असून बी.ए.चे शिक्षण घेत असताना जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून मखमलाबाद महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या ब्युटी केअर असिस्टंट प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला आणि हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

या प्रशिक्षणामध्ये मला ब्युटी आणि सलून व्यवसायाचे मूलभूत ज्ञान तसेच फेशियल, विविध प्रकारचे हेअर कट, हेअर स्टाईलिंग, ब्रायडल मेकअप आणि ग्राहक सेवा यांसारख्या कौशल्यांचे सखोल प्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळाले. प्रशिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मला या व्यवसायातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करता आली आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा आत्मविश्वास मिळाला.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी मखमलाबाद येथे "रॉयल हेअर सलून"या नावाने स्वतःचे सलून सुरू केले. माझ्या कामाच्या गुणवत्तेमुळे ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आणि आज माझी गावात तीन सलून यशस्वीरित्या कार्यरत आहेत. या व्यवसायातून मला दरमहा सुमारे रुपये ३०,००० ते ४०,००० इतके उत्पन्न मिळत आहे.

मी घरातील सर्वांत लहान सदस्य असून माझी आई गृहिणी आहे. माझ्या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे घरातील मोठ्या प्रमाणावरील आर्थिक जबाबदाऱ्या मी सांभाळत असून कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मोलाचे योगदान देत आहे.

## कुटुंबाच्या उत्पन्नात मोलाची भर



**- शीतल गांगुर्डे**
दात्याणे, पो. दिक्षी .ता. निफाड

मी शीतल गांगुर्डे, दात्याणे, पो. दिक्षी ,ता. निफाड, जि. नाशिक येथील रहिवासी आहे. जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून कसबे सुकेणे येथे आयोजित करण्यात आलेल्या ब्युटी केअर असिस्टंट या प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये मी प्रवेश घेतला व प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. या प्रशिक्षणामध्ये मला विविध प्रकारचे मेकअप, हेअर स्टाईलिंग, वॅक्सिंग, आयब्रो, हेअर कट, ब्लीच, फेशियल, मॅनिक्युअर, पेडिक्युअर तसेच ब्रायडल मेकअप यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मला ब्युटी पार्लर व्यवसायासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करता आली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या गावात "गौरी ब्युटी पार्लर"सुरू केले. सध्या मी विविध ब्युटी सेवा देत असून त्यातून मला दरमहा सुमारे ८००० ते १०,००० रुपये इतके उत्पन्न मिळत आहे. माझे पती पिंपळगाव टोलनाक्यावर नोकरी करतात. आमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती साधारण असल्यामुळे या प्रशिक्षणामुळे मला स्वयंरोजगाराची संधी मिळाली आणि कुटुंबाच्या उत्पन्नात मोलाची भर पडली. या कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे माझा आत्मविश्वास वाढला असून भविष्यात माझा ब्युटी पार्लर व्यवसाय अधिक विस्तारण्याचा माझा निर्धार आहे.

## आवडीचे रूपांतर व्यवसायात



**-ज्ञानेश्वर हरिदास गिते**
मखमलाबाद रोड, नाशिक

मी ज्ञानेश्वर हरिदास गिते, क्रांती चौक, मखमलाबाद रोड, नाशिक येथील रहिवासी असून माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. मला लहानपणापासून इलेक्ट्रिकल क्षेत्राची विशेष आवड होती. या आवडीचे कौशल्यात रूपांतर करण्यासाठी मी जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून लेप्रसी ट्रस्ट मिशन, पंचवटी येथे हेल्पर इलेक्ट्रिकल या प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेतला आणि यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले.

या प्रशिक्षणामध्ये मला घरगुती व व्यावसायिक वायरिंग, इलेक्ट्रिकल बोर्ड तयार करणे, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती, विद्युत प्रवाह हाताळताना घ्यावयाची सुरक्षितता, तसेच इलेक्ट्रिकल अपघातांमध्ये द्यावयाचे प्राथमिक उपचार यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचे सखोल व व्यावहारिक ज्ञान मिळाले. प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून दिलेल्या मार्गदर्शनामुळे माझे कौशल्य अधिक विकसित झाले आणि या क्षेत्रात काम करण्याचा आत्मविश्वास वाढला.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी "ओम इलेक्ट्रिकल" या नावाने स्वतःचा व्यवसाय सुरू केला. माझ्या कामाच्या गुणवत्तेमुळे ग्राहकांचा विश्वास वाढत गेला आणि व्यवसायाचा विस्तार झाला. सध्या माझ्या व्यवसायामध्ये मी पाच युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. या व्यवसायातून मला दरमहा सुमारे रुपये ३५,००० इतके उत्पन्न मिळत असून त्याद्वारे मी घरातील बहुतांश आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडत आहे.

जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या कौशल्याधारित प्रशिक्षणामुळे मला स्वावलंबी होण्याची संधी मिळाली. या प्रशिक्षणामुळे माझ्या आवडीचे व्यवसायात रूपांतर झाले तसेच स्वतः रोजगार निर्माण करून इतरांनाही रोजगार देण्याची संधी मिळाली.

## कौशल्य अधिक विकसित झाले



**-इशान किसान ढिकले**
सय्यद पिंपरी, ता. नाशिक

मी इशान किसान ढिकले, सय्यद पिंपरी, ता. नाशिक येथील रहिवासी असून माझे बी.कॉम. पर्यंत शिक्षण पूर्ण झाले आहे. माझ्या वडिलांचा इलेक्ट्रिकल व्यवसाय असल्यामुळे या क्षेत्रात अधिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी मी जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून डांग सेवा मंडळ महाविद्यालय, पेठ येथे हेल्पर इलेक्ट्रिकल या प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेतला आणि यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले.

या प्रशिक्षणामध्ये मला घरगुती व व्यावसायिक वायरिंग, इलेक्ट्रिकल बोर्ड तयार करणे, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती, विद्युत प्रवाह हाताळताना घ्यावयाची सुरक्षितता, तसेच इलेक्ट्रिकल अपघातांमध्ये द्यावयाचे प्राथमिक उपचार यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचे सखोल व व्यावहारिक ज्ञान मिळाले. प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून दिलेल्या मार्गदर्शनामुळे माझा आत्मविश्वास वाढला आणि या क्षेत्रातील कौशल्य अधिक विकसित झाले.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या वडिलांसोबत इलेक्ट्रिकल व्यवसायात सक्रियपणे काम करू लागलो आहे. आमच्या व्यवसायाचा विस्तार झाल्यामुळे आम्ही आणखी दोन युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. सध्या या व्यवसायातून मला दरमहा सुमारे रुपये २५,००० इतके उत्पन्न मिळत असून त्याद्वारे मी घरातील आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडत आहे. तसेच माझ्या वडिलांनाही व्यवसायात मोठी मदत होत आहे. जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या कौशल्याधारित प्रशिक्षणामुळे मला व्यावसायिक कौशल्य, आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची नवी दिशा मिळाली.

मला दरमहा सुमारे रुपये १५,००० इतके उत्पन्न मिळत असून त्यामुळे माझ्या गरीब शेतकरी कुटुंबाला मोठा आर्थिक हातभार लागत आहे. सध्या माझ्या शिवणकामाच्या गुणवत्तेमुळे मला चांगल्या प्रमाणात ऑर्डर्स मिळत आहेत. त्यामुळे माझे उत्पन्न वाढले असून माझे संपूर्ण कुटुंब आनंदी व समाधानी आहे.

## समाजामध्ये वाढला सन्मान



**-प्रिया अंबादास देशमुख**
मखमलाबाद रोड, नाशिक

जन शिक्षण संस्थान, नाशिक यांनी दिलेल्या कौशल्य प्रशिक्षणामुळे मला स्वावलंबी बनण्याची संधी मिळाली. विशेषतः आदिवासी व ग्रामीण भागातील महिलांनी अशा कौशल्याधारित प्रशिक्षणाचा लाभ घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करावा, जोडधंदा निर्माण करून कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावावा या उद्देशाने मी प्रिया अंबादास देशमुख, पाथर्डी फाटा, नाशिक येथील रहिवासी असून सध्या बी.ए.चे शिक्षण घेत आहे. कौशल्य विकासाच्या दृष्टीने मी जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून आरी वर्क व भरतकाम या प्रशिक्षणात प्रवेश घेतला. जन शिक्षण संस्थान, उत्तमनगर, सिडको येथे विविध कौशल्याधारित प्रशिक्षण वर्ग सुरू असल्याची माहिती आम्हाला मिळाली आणि त्यानंतर मी या प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

प्रशिक्षणादरम्यान आम्ही आरी वर्क व भरतकामाची विविध तंत्रे आत्मसात केली. तसेच देवी-देवतांची आकर्षक चित्रे, सरस्वती माता, छत्रपती शिवाजी महाराज यांचे फोटो स्केच, तसेच विविध कलात्मक डिझाईन्स तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले. आम्ही तयार केलेल्या कलाकृतींना ग्राहकांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला आणि त्यानंतर आमच्या ग्रुपला मोठ्या प्रमाणात ऑर्डर्स मिळू लागल्या.

आज या कौशल्याच्या जोरावर मला दरमहा सुमारे रुपये १०,००० पर्यंत उत्पन्न मिळत आहे. माझ्यासोबत काम करणाऱ्या इतर महिलांनाही चांगले उत्पन्न मिळू लागले आहे. जन शिक्षण संस्थान, नाशिक यांनी आम्हाला विश्व मराठी संमेलन, उदोजी मराठा बोर्डिंग कॅम्पस तसेच कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह येथे आयोजित प्रदर्शनांमध्ये स्टॉल उपलब्ध करून दिला. त्यामुळे आमच्या उत्पादनांना अधिक प्रसिद्धी मिळाली, विक्री वाढली आणि आर्थिक उत्पन्नातही वाढ झाली. यासोबतच समाजामध्ये आमचा सन्मानही वाढला.

आज आम्ही प्रशिक्षणातील महिलांनी एकत्र येऊन स्वतःचा व्यवसाय सुरू

केला आहे. या व्यवसायातून प्रत्येक महिलेला दरमहा अंदाजे रुपये १०,००० पर्यंत उत्पन्न मिळत असून त्यामुळे आमच्या कुटुंबाला मोठा आर्थिक हातभार लागत आहे. स्वावलंबी होण्याची प्रेरणा आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास आम्हाला या प्रशिक्षणामुळे मिळाला.

## संपूर्ण कुटुंब आनंदी व समाधानी



**-सौ. दीपाली उत्तम गोतरणे**
दलपतपूर, ता. त्र्यंबकेश्वर

मी सौ. दीपाली उत्तम गोतरणे, दलपतपूर, ता. त्र्यंबकेश्वर येथील रहिवासी असून माझे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झाले आहे. ग्रामपंचायतीमार्फत मला जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या दर्जी ( टेलरिंग ) ॲडव्हान्स या प्रशिक्षणाची माहिती मिळाली. स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या उद्देशाने मी या प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेतला आणि यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले.

जन शिक्षण संस्थानच्या प्रशिक्षिकांकडून मला टेलरिंग क्षेत्रातील सखोल व दर्जेदार प्रशिक्षण मिळाले. या प्रशिक्षणामुळे मी विविध प्रकारचे ब्लाउज, शालेय गणवेश, पंजाबी ड्रेस तसेच इतर कपड्यांचे उत्कृष्ट शिवणकाम करण्याचे कौशल्य आत्मसात केले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या घरातूनच टेलरिंग व्यवसाय सुरू केला.

माझी लहान मुले सांभाळणे, शेतीची कामे करणे आणि त्याचबरोबर मिळणाऱ्या मोकळ्या वेळेत शिवणकाम करणे अशा पद्धतीने मी हा व्यवसाय करत आहे. या जोडधंद्यातून मला हातभार लावावा, असे मी आवाहन करते.

---

## व्यवसायाला मिळाली नवी दिशा



**-रूपेश राजाराम राजभोज**
अभोणा, ता. कळवण, जि. नाशिक

मी इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले असून माझा केबल व इलेक्ट्रिकल क्षेत्राशी संबंधित व्यवसाय आहे. व्यवसायाचा अधिक विस्तार करण्यासाठी आणि नवीन कौशल्ये आत्मसात करण्याच्या उद्देशाने मी जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या माध्यमातून डांग सेवा मंडळ महाविद्यालय, अभोणा, ता. कळवण, जि. नाशिक येथे सोलर पी.व्ही. इंस्टॉलेशन या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

या प्रशिक्षणादरम्यान मला सोलर पी.व्ही. प्रणालीची संपूर्ण माहिती मिळाली. वायरिंग, सोलर पॅनेल इंस्टॉलेशन, घरगुती सोलर सिस्टीम बसविण्याच्या पद्धती, विद्युत प्रवाह हाताळताना घ्यावयाची सुरक्षितता, तसेच इलेक्ट्रिकल अपघातांमध्ये द्यावयाचे प्राथमिक उपचार अशा विविध विषयांचे सखोल व प्रात्यक्षिक ज्ञान प्रशिक्षकांकडून मिळाले. त्यामुळे माझ्या तांत्रिक कौशल्यांमध्ये मोठी भर पडली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या केबल व इलेक्ट्रिकल व्यवसायासोबत सोलर पी.व्ही. इंस्टॉलेशनची कामेही सुरू केली. आज माझ्या व्यवसायात दोन युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला असून त्यांच्यासोबत विविध सोलर प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करत आहे.

सध्या मला दरमहा सुमारे रुपये २५,००० इतके उत्पन्न मिळत असून त्यातून मी माझ्या कुटुंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहे. या प्रशिक्षणामुळे माझ्या व्यवसायाला नवी दिशा मिळाली, उत्पन्नात वाढ झाली आणि रोजगारनिर्मितीची संधीही उपलब्ध झाली.

सोलर पी.व्ही. इंस्टॉलेशन प्रशिक्षणामुळे माझे कौशल्य, आत्मविश्वास आणि आर्थिक प्रगती या तिन्ही बाबींमध्ये सकारात्मक बदल झाला असून हे प्रशिक्षण माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

---

## अधिकाधिक महिलांना देणार रोजगाराच्या संधी



**-सौ. रोहिणी शिवाजी कामडी**
चिखलपाडा, तालुका त्र्यंबकेश्वर

मी सौ. रोहिणी शिवाजी कामडी, चिखलपाडा (पोस्ट दलपत्तपूर), तालुका त्र्यंबकेश्वर येथील रहिवासी आहे. माझे शिक्षण केवळ इयत्ता सातवीपर्यंत झाले आहे. आमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे पुढील शिक्षण घेणे शक्य झाले नाही. आमच्याकडे शेती केवळ पावसाळ्यातील एका हंगामापुरतीच होते. उर्वरित काळात कुटुंबातील सर्व सदस्यांना उदरनिर्वाहासाठी मजुरीच्या कामासाठी इतर ठिकाणी स्थलांतर करावे लागते.

अशा परिस्थितीत मी जन शिक्षण संस्थान, नाशिक यांच्या असिस्टंट ड्रेस मेकर या कौशल्य विकास प्रशिक्षणात प्रवेश घेतला. प्रशिक्षणादरम्यान संस्थेच्या प्रशिक्षिकांनी मला टेलरिंग क्षेत्रातील सखोल व दर्जेदार प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि शिवणकलेचे व्यावसायिक कौशल्य आत्मसात करता आले.

प्रशिक्षणानंतर मला ब्लाऊज, शालेय गणवेश, परकर, कापडी पिशव्या, आदिवासी भागातील पगड्या, फडकी तसेच गोधडी (रजई) यांसारख्या विविध वस्तूंचे शिवणकाम करता येऊ लागले.

या कौशल्याच्या जोरावर मी माझ्या कमाईतून स्वतःचे नवीन शिवणयंत्र खरेदी केले. आज मी घरातूनच शिवणकामाचा व्यवसाय करत असून दिवसेंदिवस माझ्याकडे येणाऱ्या ऑर्डर्समध्ये वाढ होत आहे.

या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे माझ्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागविणे शक्य झाले आहे. तसेच कुटुंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळण्यातही मला मोठी मदत होत आहे. पूर्वी मी केवळ शेती व मजुरीवर अवलंबून होते; परंतु आज कौशल्य प्रशिक्षणामुळे माझ्या जीवनाला नवी दिशा मिळाली आहे.

माझे स्वप्न म्हणजे भविष्यात माझ्या चिखलपाडा या गावात स्वतःचे टेलरिंग दुकान सुरू करून अधिकाधिक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. सध्या मी घरातूनच व्यवसाय करत असले तरी ग्राहकांचा विश्वास आणि वाढत्या ऑर्डर्समुळे माझे हे स्वप्न लवकरच पूर्ण होईल, असा मला विश्वास आहे.

---

मी जन शिक्षण संस्थान, नाशिक अंतर्गत सहाय्यक संगणक ऑपरेटर हा कोर्स पूर्ण केला. या कोर्समुळे मला माझा संगणकावरील कामामध्ये खूप मदत झाली. मी युनियन बँक, पिंपळगाव बसवंत येथे लिपिक पदावर काम करत आहे. मला मासिक वेतन 11500/- रुपये मिळत आहे. सोबतच मी माझे कॉलेजचे शिक्षण घेत आहे. या कोर्समुळे संगणकाचे मूलभूत ज्ञान मिळाले, तसेच कॉम्प्युटर टायपिंग, एमएस वर्ड, एमएस एक्सेल, एमएस पॉवरपॉइंट, इंटरनेट, Email, आणि इतर संगणकीय कौशल्ये शिकता आली. या कौशल्यांचा मला नोकरी मिळविण्यासाठी आणि दैनंदिन कामांमध्ये खूप

## संगणकावरील कामात मदत



**-सौरभ नाना कुमावत**
पिंपळगाव बसवंत, ता.निफाड जि.नाशिक

फायदा झाला. घरील आर्थिक परिस्थिती हलाखीची असताना मी शिक्षण घेत आहे त्याच बरोबर घरातही आर्थिक हातभार लागतो.

मी हा कोर्स करण्यासाठी माझा लहान भावाला तसेच बरेच मित्र मैत्रिणींना सांगितले आहे व ते हा कोर्स करतही आहे. भविष्यातही आम्हाला अशीच नवीन नवीन कौशल्ये शिकायला आवडतील. जन शिक्षण संस्थान, नाशिक यांचे मनः पूर्वक आभार.

## अनेक कुटुंब स्थिरस्थावर



**-विजय खंडेराव बुटे**
निफाड

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्वगीण कार्य अतिशय उल्लेखनीय आहे. निफाड व परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा मिळावी व पिढ्या शिक्षित व्हाव्या या पवित्र हेतुने कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयाची स्थापना झाली. यामुळे अनेक कुटुंब शिक्षित होऊन स्थिरस्थावर झाले. निफाड महाविद्यालयाचे दोन महत्वपूर्ण उपक्रम नुकतेच पार पडले. त्यात भव्य माजी विद्यार्थी मेळावा, ज्यात १९७१ पासुन ते आजपर्यंतचे सर्व माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्यात एकत्र येऊन मेळाव्याची शोभा वाढवली. यानिमित्त सर्व आठवणींना सोनेरी उजाळा मिळाला.

दुसऱ्या उपक्रमात भव्य नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ज्यात अनेक पदवीधर युवकांना नोकरी मिळाली. माझा भाचा अनिकेत मोगल यालाही मिळालेली चांगली नोकरी या मेळाव्याचे फलीत म्हणावे लागेल.

## ग्रामीण विकासासाठी महत्त्वाचा उपक्रम

जन शिक्षण संस्थान नाशिकने वावी, मिठसागरे, माळवाडी, तालुका सिन्नर येथील ग्रामीण भागातील महिलांना ड्रेस शिवणकामाचे प्रशिक्षण दिले. सहभागी प्रशिक्षणार्थींना आधुनिक शिवणयंत्र वापरण्याचे कौशल्य शिकवण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आर.एस. फॅशन कंपनीतर्फे ड्रेस शिवण्याचे काम उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षणार्थींना घरबसल्या रोजगाराची संधी मिळाली. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झाली. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास या योजनेची मोठी मदत झाली. प्रशिक्षणामुळे सहभागींचा आत्मविश्वासही वाढला. दर्जेदार काम करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन सातत्याने देण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात स्वयंरोजगाराला चालना मिळाली. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. कौशल्य विकासामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या. जन शिक्षण संस्थानचा हा उपक्रम ग्रामीण विकासासाठी महत्त्वाचा ठरला. अशा प्रशिक्षण व रोजगाराभिमुख उपक्रमांमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यास निश्चितच मदत होत आहे . एकूण 2000 स्कूल युनिफॉर्मची ऑर्डर देण्यात आली असून हे काम कायम स्वरूपी राहणार आहे. ***जयश्री कांदळकर , रोहिणी लडकत , गायत्री भोसले , स्वप्नाली काळोखे , वर्षा वाघ , मनीषा काळोखे , माया कांदळकर स्वाती सूर्यवंशी , अश्विनी खरात*** आम्ही सर्व वावी तालुका सिन्नर येथील प्रशिक्षणार्थी असून ७०,०००/- रुपयांची फ्रॉक शिवणकामाची ऑर्डर आम्हाला मिळाली आहे. आम्हाला शिवणकामाच्या कोर्सचा खूप फायदा झाला आहे.

मविप्र समाज कार्यकारिणी सदस्य मार्गदर्शन आणि निफाड विद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, सेवक यांचे काम व विद्यार्थ्यांप्रती समर्पण भावनेतून होताना दिसते. मविप्र कर्मवीरांना अभिवादन करून धन्यवाद देतो व पुढील वाटचालीस सुयश चिंतीतो.

## खेड्यातील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी



**-कल्याणी कचरू पवार**
निफाड

मी कु.कल्याणी कचरू पवार शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निफाड या महाविद्यालयात तृतीय वर्ष कला मराठी या विषयात शिक्षण घेत आहे.

शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून बहुजन समाजाची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी कर्मवीरांनी मविप्र समाजाची स्थापना केली. या शैक्षणिक संस्थेने सामाजिक बांधिलकी स्वीकारीत समाजहिताय विविध उपक्रम राबविले. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजाचे आणि विद्यार्थ्यांचे हित जोपासले.

मविप्र समाजाने विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर नोकरीच्या संधी निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम राबविले. यामध्ये आमच्या निफाड महाविद्यालयात भव्य नोकरी मेळाव्याचे आयोजन केले. या आयोजनास विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या रोजगार मेळाव्यात मी उपस्थित होती. योग्य आणि सुनियोजित पद्धतीने या मेळाव्याचे आयोजन झाले. या मेळाव्याच्या माध्यमातून मला नोकरी मिळाली. मी आणि माझे पालक अतिशय आनंदी झालो.

खेड्यातील विद्यार्थ्यांना आपल्याच महाविद्यालयात नोकरीची संधी निर्माण करणारी संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ, कंपनी व्यवस्थापक, शिक्षणाधिकारी, प्राचार्य, रोजगार मेळावा संयोजक, प्राध्यापक आदी सर्वांचे मनापासून आभार.

## योग्य दिशा मिळाल्याची पालकांची भावना



**- आशिष बाळासाहेब निरभवणे**
निफाड

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय, निफाड येथे आयोजित करण्यात आलेला नोकरी मेळावा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि उपयुक्त ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद

साधण्याची तसेच मुलाखतीची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी या मेळाव्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले.

क्षेत्राच्या अपेक्षा आणि आवश्यक कौशल्यांविषयी सविस्तर माहिती मिळाल्याने त्यांच्या भविष्यातील वाटचालीला योग्य दिशा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पालकांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत मराठा विद्या प्रसारक समाज आणि कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयाचे मनापासून कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या क्षमतेचा विचार करून अशा प्रकारचे नोकरी मेळावे आयोजित करणे ही अत्यंत दूरदृष्टीची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या कंपन्यांशी जोडण्याचे कार्य महाविद्यालयाने प्रभावीपणे केले असून, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरला नवी दिशा मिळत असल्याचे पालकांनी सांगितले.

मेळाव्याचे उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्था, स्वयंसेवकांचे सहकार्य, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयीन प्रशासनाची तत्परता याबद्दलही विद्यार्थी व पालकांनी विशेष समाधान व्यक्त केले.

संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आवश्यक ती सर्व मदत मिळाल्याने मुलाखतीच्या प्रक्रियेत सहभागी होणे अधिक सोपे आणि आत्मविश्वासपूर्ण झाले.

मराठा विद्या प्रसारक समाज ही विद्यार्थीकेंद्रित संस्था असून शिक्षणासोबत रोजगार कौशल्य सकारात्मक प्रतिमा या उपक्रमातून अधिक दृढ झाली. कर्मवीर गणपतदादा मोरे महाविद्यालय, निफाड हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत असल्याचे या नोकरी मेळाव्यातून पुन्हा एकदा सिद्ध झाले.

भविष्यातही अशा प्रकारचे रोजगाराभिमुख उपक्रम नियमितपणे आयोजित करण्यात यावेत, जेणेकरून अधिकाधिक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्यास बळकटी मिळेल, अशी अपेक्षा विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केली.

## योग्य मार्गदर्शनामुळेच संधी



**-ललित पाचरणे**
निफाड

मी ललित शांताराम पाचरणे आपल्या कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयाचा तृतीय वर्ष विज्ञान ( BSc chemistry) शाखेचा विद्यार्थी आहे. आपल्या कॉलेजच्या प्लेसमेंट सेलद्वारे आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये माझी Distil Education and Technology pvt Ltd कंपनीत Trainee म्हणून निवड झाली असून, मला कंपनीकडून अधिकृत जॉब ऑफर लेटर मिळाले आहे.

शिक्षण सुरु असतानाच मला नोकरीची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी आमच्या विभागातील आदरणीय प्राध्यापक यांचे आभार मानतो. आपल्या कॉलेजने दिलेले दर्जेदार शिक्षण, प्रयोगशाळेतील सराव आणि वेळोवेळी केलेले योग्य मार्गदर्शन यामुळेच मला या नामांकित कंपनीत नोकरी मिळवणे शक्य झाले आहे. कॉलेजमध्ये मिळालेल्या अनुभवामुळे माझा आत्मविश्वास वाढला. मला ही संधी मिळवून दिल्याबद्दल मी कॉलेज प्रशासनाचा आणि सर्व शिक्षकांचा मनापासून ऋणी आहे.

## विद्यार्थ्यांच्या महत्वाचे भविष्यासाठी पाऊल



**- रामचंद्र शिंदे**
वनसगाव

मी रामचंद्र शिंदे आणि माझी नात समृद्धी महेश शिंदे ( मविप्र महाविद्यालय, निफाड ) येथे आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचा एक भाग होतो. या उपक्रमाचा मुख्य उद्देश अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देणे हा होता.

महाविद्यालयाच्या Training and placement center ने या प्लेसमेंट ड्राइव्हचे अत्यंत उत्तम नियोजन केले होते. या प्रक्रियेत TCS, Mahindra, TATA आणि इतर industry partners सह अनेक नामांकित कंपन्यांचा सहभाग होता. तसेच विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने आधी कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे वर्ग आयोजित केले होते, ज्याचा विद्यार्थ्यांना मुलाखतीदरम्यान खूप फायदा झाला.

ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि व्यावसायिक पद्धतीने पार पडली. यात लेखी परीक्षा, ग्रुप डिस्कशन आणि टेक्निकल मुलाखत प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांचा सहभाग, एचआर मुलाखती या टप्प्याचा समावेश होता. महाविद्यालयाच्या सर्वसमावेशक placement policy मुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्यानुसार विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी मिळाल्या.

एक पालक म्हणून, सांगावेसे वाटते, महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी घेतलेले हे पाऊल अत्यंत कौतुकास्पद आहे. प्लेसमेंट सेलने केवळ नोकऱ्या मिळवून दिल्या नाहीत, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासही मोठी मदत केली आहे.

## शैक्षणिक प्रवासातील महत्वाचा टप्पा



**-ओम वडघुले**
निफाड

कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्याचा भाग होण्याची संधी मला मिळाली, याचा मला विशेष आनंद आहे. या मेळाव्यामुळे प्रत्यक्ष उद्योगक्षेत्राशी जोडले जाण्याचा आणि विविध नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याचा अनुभव मिळाला. मुलाखतीची तयारी कशी करावी, आवश्यक तांत्रिक व संवाद कौशल्ये कोणती असावीत, तसेच सध्याच्या नोकरी बाजारात कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याबाबत सखोल माहिती मिळाली.

या मेळाव्याचे नियोजन अतिशय व्यवस्थित आणि सुनियोजित पद्धतीने करण्यात आले होते, ज्यामुळे सर्व प्रक्रिया सुरळीत पार पडली. सर्वात महत्वाचे म्हणजे, या मेळाव्यातील माझ्या सहभागामुळे मला महिंद्रा कंपनीकडून ऑफर लेटर प्रप्त झाले, जो माझ्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्वाचा टप्पा ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना केवळ रोजगाराच्या संधीच मिळत नाहीत, तर त्यांच्यात आत्मविश्वास आणि व्यावसायिक जाणीवही निर्माण होते. महाविद्यालयाने घेतलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल आणि केलेल्या सर्व मेहनतीबद्दल मी मन:पूर्वक आभार मानतो.

## संवाद कौशल्ये सुधारण्यासाठी प्रेरणा



**-समृद्धी महेश शिंदे**
निफाड

मी एस.वाय.बी.एससी.(मायक्रोबायोलॉजी) शिकत आहे. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या कॉलेजच्या जॉब प्लेसमेंट प्रोग्राममध्ये (रोजगार मेळाव्यात) सहभागी झाले होते. एक विद्यार्थिनी म्हणून, हा कार्यक्रम मला माझ्या भविष्यातील करिअरसाठी अत्यंत माहितीपूर्ण आणि उपयुक्त वाटला. वक्त्यांनी नोकरीच्या संधी, करिअरची वाढ आणि विविध उद्योगांमध्ये आवश्यक असणारी कौशल्ये याविषयी मोलाची माहिती दिली.

या कार्यक्रमाने मला भरती प्रक्रिया, बायोडाटा (Resume) कसा तयार करावा आणि मुलाखतीची तंत्रे समजून घेण्यास मदत केली. यामुळे माझा आत्मविश्वासही वाढला आणि माझी व्यावसायिक व संवाद कौशल्ये सुधारण्यासाठी मला प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून मला पदवीनंतर उपलब्ध असणाऱ्या विविध करिअर पर्यायांबद्दल माहिती मिळाली आणि नियोक्त्यांच्या (Employers) काय अपेक्षा असतात, हे अधिक चांगल्या प्रकारे समजले. उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांशी झालेला संवाद अत्यंत प्रेरणादायी आणि शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध करणारा होता. याद्वारे मला इंटर्नशिप (प्रशिक्षण भत्ता) मिळाली.

---

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ध्येय धोरण डोळ्यासमोर ठेवून कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय, निफाड येथे आयोजित केलेला रोजगार मेळावा अत्यंत स्तुत्य आणि काळाची गरज ओळखून घेतलेला निर्णय होता. ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना एकाच छताखाली रोजगाराच्या एवढ्या मोठ्या संधी उपलब्ध करून देणे, ही निफाड परिसरासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय आणि नामांकित कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीची संधी मिळाली, ज्यामुळे आमच्या परिसरातील सर्व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत झाली.

## संस्थेच्या लौकिकात भर घालणारा उपक्रम



**-परशराम मुरलीधर मोगल**
निफाड

आजच्या कठीण स्पर्धात्मक युगात केवळ पदवी न देता विद्यार्थ्यांच्या हाताला थेट काम मिळवून देण्याचे संस्थेचे हे पाऊल 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरविणारे आहे.

मी संस्थेचा सभासद म्हणून मनपूर्वक अभिनंदन करतो. निफाड महाविद्यालयाचा हा उपक्रम संस्थेच्या लौकिकात भर घालणारा ठरला आहे. भविष्यातही ग्रामीण भागातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी असे मेळावे सातत्याने आयोजित केले जावे अशी विनंती मी करतो...

## सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद



**- योगेश कापसे**
निफाड

मविप्र समाज संस्था ही शिक्षण, सामाजिक कार्य आणि विद्यार्थी विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी संस्था आहे. संस्थेच्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी, पालक आणि समाजातील अनेक घटकांना लाभ होत आहे. संस्थेची शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सातत्याने प्रगति कौतुकास्पद आहे.

भविष्यातही संस्था अशा प्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि समाजोपयोगी उपक्रम राबवून अधिकाधिक प्रगती करेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

## फिजिक्स, मॅथ्स झाले सोप्पे



**-अदिती अ. मेढे**
नाशिक

मी अदिती अ. मेढे, 'अपना सपना JEE/CET प्रोग्राम' चा एक भाग आहे. मला खूप आनंद आहे की मी खरोखरच या कुटुंबाचा एक हिस्सा आहे. माझ्यासाठी फिजिक्स (भौतिकशास्त्र) आणि मॅथ्स (गणित) सारखे विषय शिकणे खूप कठीण जात होते, पण या क्लासने ते माझ्यासाठी सोपे केले. माझ्या पालकांनाही या गोष्टीचा अभिमान वाटतो की कोणत्याही खर्चाशिवाय माझे शैक्षणिक वर्ष पूर्ण होत आहे. आणि माझ्यासारख्या विद्यार्थ्यांसाठी हे अत्यंत उपयुक्त आहे. या क्लासमधून मला खरोखरच अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. येथील सर्व स्टाफ खूप चांगला आहे, कारण या कुटुंबातील किंवा टीममधील प्रत्येक शिक्षक आपल्याला मदत करण्यासाठी नेहमी तयार असतो.

आपल्याला दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जाबद्दल शंका घेण्यास काहीच वाव नाही.

मला आशा आहे की हा प्रोग्राम असाच सुरू ठेवल्याने भविष्यात माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना मदत होईल. तुम्ही आम्हाला जे काही दिले त्याबद्दल धन्यवाद. मी वचन देते की मी खूप मेहनत करेन आणि माझ्या आगामी परीक्षेत चांगले गुण मिळवेन. शेवटचे पण महत्त्वाचे म्हणजे, तुम्ही पुरवलेले स्टडी मटेरियल (अभ्यास साहित्य) हे सर्वोत्कृष्ट आणि अत्यंत उपयुक्त गोष्टींपैकी एक आहे.

---

ज्या दिवसापासून मी या मेंटॉरशिप प्रोग्राममध्ये (मार्गदर्शन कार्यक्रमात) सामील झाले आहे, तेव्हापासून माझ्यामध्ये खूप सकारात्मक आणि स्पष्ट बदल दिसून येत आहेत. मी अभ्यासात अधिक सातत्यपूर्ण झाले आहे आणि माझ्या प्रश्न सोडवण्याच्या (problem-solving) कौशल्यांमध्येही खूप सुधारणा झाली आहे. शिवाय, येथे प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिकरित्या लक्ष दिले जाते आणि शिक्षकांद्वारे प्रत्येक शंकेचे (doubt) वेळेवर आणि सक्रियपणे निरसन केले जाते. क्लासेस आणि साप्ताहिक चाचण्या (weekly tests) वेळेवर आणि नियमितपणे घेतल्या जातात. येथील शिक्षक खूप मनमोकळ्या स्वभावाचे आहेत, ज्यामुळे

## खूप सकारात्मक बदल



**- एंजल डी. साबळे**
नाशिक

आम्हाला अभ्यासासाठी खरोखरच एक मोकळे आणि चांगले वातावरण मिळते.

आमच्यासाठी नेमलेल्या सर्व शिक्षक आणि प्राध्यापकांबाबत मी पूर्णपणे समाधानी आहे. येथील सर्व गोष्टींचे व्यवस्थापन अत्यंत उत्तम प्रकारे केले जाते. त्यांनी आम्हाला उच्च दर्जाचे अभ्यास साहित्य (study material) पुरवले आहे आणि प्रश्नांचा सराव देखील अतिशय चांगल्या पद्धतीने करून घेतला जातो. एकंदरीत, येथील अनुभव खरोखरच खूप छान आहे आणि मला इतरांनाही या मेंटॉरशिप प्रोग्रामची शिफारस करायला नक्कीच आवडेल.

## मनापासून आभारी



**- स्वरा चंदन ढेरे**
नाशिक

मी स्वरा ढेरे, 'अपना सपना मेंटॉरशिप प्रोग्राम'चा एक भाग आहे. या कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन करणाऱ्या, तसेच आमचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आम्हाला मदत करणाऱ्या प्रत्येकाची मी मनापासून आभारी आहे. JEE आणि CET परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आहे. विशेष म्हणजे हा कार्यक्रम पूर्णपणे विनामूल्य (free of cost) आहे, ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला यात सहभागी होण्याची संधी मिळत आहे, ही खूप चांगली गोष्ट आहे.

येथे शिकवणारे सर्व शिक्षक आम्हाला अतिशय उत्तम प्रकारे मार्गदर्शन करत आहेत. क्लासेस आणि परीक्षा (tests) अगदी योग्य आणि वेळेवर घेतल्या जातात. तसेच, येथे उपलब्ध असणारे मेंटॉरशिपचे (मार्गदर्शनाचे) स्वरूप आम्हाला खूप मदत करणारे ठरत आहे. अभ्यासासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे स्टडी मटेरियल (अभ्यास साहित्य) येथे उपलब्ध करून दिले जाते. यासोबतच विद्यार्थ्यांच्या शंकांचे (doubts) निरसन देखील अगदी योग्य पद्धतीने केले जाते.

या कार्यक्रमासाठी अहोरात्र काम करणाऱ्या येथील प्रत्येकाची मी अत्यंत आभारी आहे. मला या 'अपना सपना मेंटॉरशिप प्रोग्राम'चा हिस्सा असल्याचा अभिमान वाटतो. मला असे वाटते की प्रत्येक विद्यार्थ्याला या क्लासचा लाभ घेण्याची ही सुवर्णसंधी मिळाली पाहिजे.

## शिक्षकांनी दिल्या स्वतःच्या नोट्स



**-ए. एस. कोरडे**
नाशिक

मी अधिष्ठा संतोष कोरडे, 'अपना सपना' या बॅचची विद्यार्थिनी आहे. या बॅचमध्ये आम्हाला JEE/CET या परीक्षांचे उत्तम प्रशिक्षण दिले जाते. या बॅचमुळे आम्हाला अत्यंत कमी खर्चात (किंवा मोफत) या स्पर्धा परीक्षांसाठी तयार होण्यास मोलाची मदत होत आहे.

या बॅचमधील शिक्षक देखील खूप छान शिकवतात आणि प्रत्येक संकल्पना व्यवस्थित समजून सांगतात, ज्यामुळे विषय समजणे अत्यंत सोपे जाते. बाहेरील इतर क्लासेसच्या तुलनेत ही बॅच विद्यार्थ्यांसाठी खूपच चांगली आहे. तसेच, येथील वातावरण देखील एकदम मोकळे आणि सुटसुटीत आहे. शिक्षक मनावर कोणतेही दडपण न आणता खूप चांगल्या पद्धतीने शिकवतात.

त्याचप्रमाणे, येथे प्रत्येक धड्यावर (प्रकरणावर) नियमितपणे परीक्षा घेतल्या जातात. शिक्षकांनी आम्हाला स्वतः तयार केलेल्या नोट्स देखील दिल्या आहेत, ज्यामुळे आमचा अधिकाधिक सराव होतो आणि परीक्षा देणे सोपे जाते. या सर्व कारणांमुळे हा क्लास अत्यंत उत्तम आहे.

## उत्तम दर्जाचे स्टडी मटेरियल



**-इशान कुशारे**
नाशिक

मी इशान कुशारे, सध्या १२ वी सायन्सचा (Science) विद्यार्थी आहे. C.M.C.S. कॉलेजमध्ये या वर्षीपासून 'अपना सपना ' हा एक नवीन उपक्रम सुरू झाला आहे. यामुळे माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांना खूप मोठा फायदा झाला आहे.

या प्रोग्राम अंतर्गत विद्यार्थ्यांना JEE/CET चे क्लासेस पूर्णपणे मोफत दिले जात आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना क्लासची फी परवडत नाही किंवा भरता येत नाही, त्यांच्यासाठी हा उपक्रम अत्यंत उत्तम आणि वरदान ठरत आहे. ज्या विद्यार्थ्यांना पुढे इंजिनिअरिंग करायचे आहे, त्यांना या प्रोग्रामचा खूप फायदा होत आहे.

या प्रोग्राममध्ये शिकवणारे शिक्षक अत्यंत अनुभवी आहेत. ते विद्यार्थ्यांकडून खूप चांगली तयारी आणि सराव करून घेतात; तसेच येथे नियमित सराव चाचण्या देखील घेतल्या जातात. महत्त्वाचे म्हणजे, या प्रोग्राममध्ये केवळ MCQs चीच तयारी करून घेतली जात नाही, तर त्यासोबत बोर्ड परीक्षेचा (Board Exam) अभ्यासक्रमही शिकवला जातो.

आम्हाला संस्थेकडून उत्तम दर्जाचे स्टडी मटेरियल (Study materials) देखील पुरवण्यात आले आहे. कॉलेजचे शिक्षकही अत्यंत आश्वासक आणि मदत करणारे आहेत, त्यामुळे ते विद्यार्थ्यांचा अभ्यास अतिशय चांगल्या प्रकारे करून घेतात. सर्व शिक्षक अभ्यासाच्या बाबतीत योग्य प्रमाणात Strict आहेत, आणि म्हणूनच विद्यार्थ्यांची प्रगती उत्तम प्रकारे होत आहे.



# माध्यमांमध्येही उमटली रोजगारक्रांती



## महासागर

### शेकडो विद्यार्थ्यांना नोकरी देत 'एसव्हीकेटी'ने साधला सुवर्णयोग




देवळाली कॅम्प । मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प (नाशिक) सी.आय.आय. मॉडेल करिअर सेंटर संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य मेळावा अत्यंत यशस्वी ठरला.

मेळाव्यातून तब्बल ११९ थेट नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध झाल्या. या नोकरी मेळाव्याचे संस्थेचे संचालक ॲड. यांच्या हस्ते झाले. यावेळी सांगितले की, "मराठा समाज संस्था ही केवळ विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे. माध्यमातून विद्यार्थ्यांचे विण्याचे कार्य संस्था मविप्र संस्थेचे शालेय व्यवस्थापन धुर्जड, सी.आय. एचे मॅनेजर सागर शिरसाट, सुनील जाधव, गजीराम मुटाळ, प्रा. सुनीता आडके, वैभव पाळदे, प्राचार्य प्रशांत पाटील, प्राचार्य डॉ. दिलीप पवार आदींसह विविध नामांकित ५८ कंपन्यांचे एच.आर. प्रतिनिधी उपस्थित होते.

समन्वयक प्रा. डॉ. बाळासाहेब पगार यांनी प्रास्ताविक करताना मेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "आजच्या स्पर्धात्मक युगात विषयज्ञानासोबतच तंत्रज्ञान, सकारात्मक दृष्टिकोन, वेळेचे व्यवस्थापन व आत्मविश्वास आवश्यक आहे. नोकरी मेळावे हे विद्यार्थ्यांच्या गुण-कौशल्यांना योग्य व्यासपीठ देणारे माध्यम ठरतात. भविष्यात रोजगार मार्गदर्शन केंद्र उभारण्यासाठी प्रयत्न केले जातील." अध्यक्षीय भाषणात रमेश पिंगळे म्हणाले, "ग्रामीण भागातील हा पहिला आणि यशस्वी नोकरी मेळावा असून, कौशल्याधिष्ठित रोजगार देणारे मविप्र विद्यापीठ होणे ही काळाची गरज आहे." विलास धुर्जड यांनी हा मेळावा विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

**विद्यार्थ्यांना जागेवरच नियुक्तीपत्रे मिळाली**

या नोकरी मेळाव्यात महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज ऑटो, बॉश, किर्लोस्कर, डी-मार्ट, एस.बी.आय. फायनान्स, एच.डी.एफ.सी., ब्लिंकिट यांसह ५८ आघाडीच्या कंपन्यांनी सहभाग घेतला. जिल्हाभरातून ऑनलाइन पद्धतीने ६६५ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २१० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मुलाखती दिल्या. त्यातून निवड झालेल्या ११९ पात्र उमेदवारांना समारोप कार्यक्रमात जागेवरच नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. या यशाबद्दल मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक रमेश आबा पिंगळे, डॉ. सयाजीराव गायकवाड, ॲड. लक्ष्मणराव लांडगे, विलास धुर्जड, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, प्राचार्य डॉ. दिलीप पवार आदींनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता आहेर यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य संजय पाटील यांनी केले. हा नोकरी मेळावा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सकाळ

### रोजगार मेळाव्यात २४६ विद्यार्थ्यांना नियुक्तिपत्रे

■ सकाळ वृत्तसेवा

#### नांदगाव : मविप्र महाविद्यालयातर्फे रोजगार मेळावा



नांदगाव : रोजगार मेळाव्यात तालुका संचालक अमित पाटील बोरसे.

नांदगाव, ता. ५ : येथील मविप्र संचालित महाविद्यालयात मविप्र संस्था झालेल्या रोजगार मेळाव्यात २४६ हून अधिक विद्यार्थ्यांना मुलाखतीनंतर नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

मेळाव्याला महिंद्र सोना, बॉश, टाटा मोटर्स, ब्लिंकीट, किर्लोस्कर, बजाज, तापारिया टूल्स आदी नामांकित कंपन्यांसह पन्नासहून अधिक कंपन्या मेळाव्यात सहभागी झाल्या. मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून मविप्रचे संचालक अमित बोरसे पाटील होते. प्राचार्य डॉ. एन. यु. पाटील होते.

श्री बोरसे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये असलेली विविध कौशल्ये आणि त्यांना प्राप्त होणाऱ्या रोजगाराच्या संधींची असमानता आहे. रोजगार मेळाव्याचे महत्त्व लक्षात घेत विद्यार्थ्यांनी निर्भिड होऊन आत्मविश्वासाने परिस्थितीचा सामना करत आलेल्या संधीचे सोने करावे. नियुक्तीपत्रासोबतच नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याची मानसिकता तयार करावी असे आवाहन केले.

प्राचार्य पाटील यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याची पार्श्वभूमी स्पष्ट केली. दहावी, बारावी, आयटीआय, पदवी, पदव्युत्तर, पदवीधर विद्यार्थ्यांना बँकिंग, फायनान्स, मेडिकल, ऑटोमोबाईल, इंजीनियरिंग व अन्य इतर क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नांदगाव, मनमाड, मालेगाव परिसरातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी मेळावा नांदगाव महाविद्यालयात घेण्याचा आग्रह होता. मेळाव्यासाठी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. महाविद्यालयातर्फे प्रथमच मोठा रोजगार मेळावा झाल्याचे सांगण्यात आले. सागर शिरसाठ यांनी मुलाखतीस हजर राहण्याचे आवाहन केले. ज्येष्ठ नागरिक रमेश अण्णा बोरसे, योगेश भाऊराव बोरसे, आयटीआयचे प्राचार्य एच. बी. ठाकरे, मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी. गव्हाणे, होरायझन अकॅडमीच्या प्राचार्य पूनम मढे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. ए. मराठे, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. के. आर. खंदारे, प्रा. गोकूळ बोरसे, प्रा. पी. एम. आहेर, समन्वयक प्रा. एम बी आटोळे, प्रा. स्वप्निल शेळके, प्रा. बी. पी. मोरे, प्रा. आर व्हि. वाघ, प्रा. ए. बी. जाधव, प्रा. बी.एम. आहिरे, प्रा. एम. पी. मेश्राम उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. एस.एस. प्रसाद व आभार प्रा. डी. वाय. तुंगार यांनी मानले.

## देशदूत

शिल्पकार विकासाचा...

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com
27 Apr 2026 - Page 9

### ...या संधी देणार : ॲड. ठाकरे

#### ...त ४७५ उमेदवारांना नियुक्तीपत्रे



...प्र चिटणीस ..., सभापती ... उपसभापती ... डॉ. प्रसाद ...गे, विजय ...य मेधने, ...स्थापक ...ानिक ...प्रल्हाद ...दाणे, ...कार ...ांत कापडणीस, प्रा. शांताराम गुंजाळ, अरुण सोनवणे व्यासपीठावर उपस्थित होते.

> कर्मवीरांच्या विचारांचा वारसा जपत संस्था विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहे. ग्रामीण भागात शेतीची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत असताना एकाच दिवशी शेकडो विद्यार्थ्यांना नोकरी मिळणेही दिलासादायक बाब आहे. भविष्यात अधिकाधिक दर्जेदार रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे.
>
> ■ **दिलीप दळवी**, मविप्र चिटणीस

या मेळाव्यात जिल्हाभरातील तब्बल ४७५ उमेदवारांना विविध नामांकित कंपन्यांकडून नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. मेळाव्यात अनेक कंपन्यांनी सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. गुणवत्ता, कौशल्य आणि पात्रतेच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. निवड झालेल्या उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली. सभापती बाळासाहेब क्षीरसागर, चिटणीस दिलीप दळवी, डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे यांनी केले. मेळाव्यास शिक्षणाधिकारी डी. डी. जाधव, सेवक संचालक चंद्रकांत शिंदे उपस्थित होते. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ. नरेंद्र निकम, प्रा. सुनीता शेवाळे, प्रा. राहुल सोनवणे, प्रा. निलेश शेवाळे, प्रा. राहुल जाधव यांच्यासह प्राच... ...प्रयत्न केले. कार्यक्रमाचे ...लन प्रा. अमित निक... केले, तर आभार प्राचा... ...धणे यांनी मानले.

## नवभारत

Nashik | 21 June 2026 | Page 4

### 380 युवाओं को मिली नौकरी

#### तकनीकी और गैर-तकनीकी पदों के लिए हुआ चयन

■ **नाशिक, (सं.)** युवाओं के लिए करियर की राह आसान बनाने के उद्देश्य से राजर्षि शाहू महाराज पॉलिटेक्निक में एक दिवसीय रोजगार मेले का भव्य आयोजन किया गया. मविप्र के 'कर्मवीर बाबूराव ठाकरे ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल' और 'सीआईआई मॉडल करियर सेंटर' द्वारा आयोजित इस मेले में रिकॉर्ड 380 युवाओं को विभिन्न प्रतिष्ठित कंपनियों में रोजगार के अवसर प्राप्त हुए. चयनित उम्मीदवारों को मेले के दौरान ही नियुक्ति पत्र सौंपकर उनके उज्ज्वल भविष्य की शुरुआत की गई.



#### विद्यार्थियों को मुफ्त करियर काउंसलिंग व कौशल प्रशिक्षण

मेले का उद्घाटन मविप्र के महासचिव नितिन ठाकरे ने दीप प्रज्वलित कर किया. इस अवसर पर मविप्र के सभापति बालासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे सहित संस्था के अनेक गणमान्य पदाधिकारी उपस्थित थे. महासचिव नितिन ठाकरे ने कहा कि संस्था का उद्देश्य छात्रों को केवल डिग्री देना नहीं, बल्कि उन्हें आत्मनिर्भर बनाना है. उन्होंने बताया कि प्लेसमेंट सेल के जरिए छात्रों को मुफ्त करियर काउंसलिंग और कौशल प्रशिक्षण दिया जा रहा है. छात्रों को उद्योग जगत से सीधे जोड़ने के लिए इस संस्था द्वारा अब तक 10 सफल रोजगार मेलों का आयोजन किया जा चुका है.

#### 84 कंपनियों ने लिया हिस्सा

रोजगार मेले में नाशिक जिले के विभिन्न हिस्सों से लगभग 560 नौकरी के इच्छुक उम्मीदवारों ने अपनी उपस्थिति दर्ज कराई. इस मेले की मुख्य विशेषताएं निम्नलिखित रहीं- देश और राज्य की 84 नामी कंपनियों ने इस आयोजन में भाग लिया. तकनीकी और गैर-तकनीकी पदों के लिए कंपनियों ने सीधे इंटरव्यू लिए और योग्यता के आधार पर उम्मीदवारों का चयन किया. दिनभर चली चयन प्रक्रिया के बाद 380 योग्य युवाओं को नौकरी के ऑफर लेटर प्रदान किए गए.

मराठा विद्या प्रसारक समाज आणि सीआयआय सेंटर, नाशिक आणि कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर यांनी आयोजित केलेले रोजगार मेळावे हे नुसते मेळावे राहिले नाही तर मविप्रच्या हातात मुलाचं बोट पालकांनी दिल्यावर, मविप्रने मुलांचा हात हातात घेत थेट त्यांच्या हातात नोकरीचे पत्र देण्यापर्यंतचा हा एक मोठा प्रवास होता. या मेळाव्यांचे यश म्हणजे पालकांच्या डोळ्यातील अश्रू आणि मुलांचा आनंद होते. नाव नोंदणीपासून मेळाव्यात सहभागी झालेल्या मुला-मुलींची संख्या प्रचंड होती. इयत्ता दहावी -बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांपासून तर अभियांत्रिकी, आयटी शिक्षण घेणाऱ्या, घेतलेल्या विद्यार्थ्यांना मेळाव्यात नोकरी मिळाल्यामुळे मागेल त्याला काम हा उद्देश सफल होताना दिसला. या मेळाव्यांना नाशिकच्या प्रसार माध्यमांनी देखील तितकीच चांगली प्रसिद्धी दिली. त्यामुळे मेळाव्यांचे महत्त्व आणखी अधोरेखित झाले.



निफाड मविप्र महाविद्यालयात भव्य नोकरी मेळावा; ८७६ विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्रे

◆ निफाड (प्रतिनिधी):

लोकमत

मस्ट READ

सटाण्यातील रोजगार मेळाव्यात ४७५ जणांना नियुक्तीपत्रे

**दोन वर्षांत २५ हजार तरुणांना रोजगाराची संधी : ॲड. नितीन ठाकरे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**सटाणा :** मविप्र संस्थेच्या ११२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच रोजगार मेळाव्यासारखा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. त्याला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संस्था प्रत्येक तालुक्यात रोजगार मेळावा घेण्याच्या विचारात आहे, तसेच पूढील दोन वर्षांत मविप्र संस्था २५ ...

... यांनी केले. ते येथे कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व सीआयआय मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य नोकरी मेळाव्याच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र चिटणीस दिलीप दळवी होते, तर सभापती बाळासाहेब क्षीरसागर, विश्वास मोरे, शालन सोनवणे, विजय पगार, सागर शिरसाठ, प्रल्हाद सोनवणे, ॲड. पंडितराव भदाणे, भिका सोनवणे, ज्येष्ठ ...

अनेक कंपन्यांनी सहभाग नोंदवून मुलाखत घेतली. पात्रतेच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात आली.

**भविष्यात आणखी संधी निर्माण करणार : दिलीप दळवी**

मविप्र चिटणीस म्हणाले, 'कर्मवीरांच्या वि... जपत संस्था विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत रो... उपलब्ध करून देत आहे. ग्रामीण भागात शेती... दिवसेंदिवस बिकट होत असताना एकाच दिवशी शेकडो विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे दिलासादायक आहे. भवि... अधिकाधिक दर्जेदार रोजगारसंधी निर्माण ... कार्यकारिणी कटिबद्ध आहे.'

मेळाव्यात जिल्हाभर... कंपन्यांकडून नियुक्तीपत्रे ... झालेल्या उमेदवारांना मा... आली.

प्रास्ताविक डॉ. प्रसाद सोनवणे ...

पुढारी

चांदवड : रोजगार मेळाव्यात नियुक्तीचे प्रमाणपत्र वाटपप्रसंगी ॲड. नितीन ठाकरे, सयाजीराव गायकवाड, बाळासाहेब क्षीरसागर, सागर शिरसाठ, प्रशांत पाटील, खंडेराव आहेर आदी. (छाया : सुनील थोरे)

**रोजगार मेळाव्यात ४०० उमेदवारांना नियुक्तिपत्र**

**चांदवड : पुढारी वृत्तसेवा**

कर्मवीर ॲड. बाबूराव ठाकरे ट्रेनिंग प्लेसमेंट सेल, सीआयआय मॉडेल करिअर सेंटर आणि मविप्रतर्फे आयोजित रोजगार मेळाव्यात १०२५ उमेदवारांनी नोंदणी केली असून, त्यापैकी ४०० उमेदवारांना विविध कंपन्यांकडून नियुक्तिपत्रे प्रदान करण्यात आली. मविप्रच्या जिजाबाई रघुनाथराव गुंजाळ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि. ४) झालेल्या या मेळाव्याचे उद्घाटन तालुका संचालक सयाजीराव गायकवाड यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सीआयआयचे सागर शिरसाठ, पॉलिटेक्निकचे प्रशांत पाटील, शालेय समिती सदस्य खंडेराव आहेर, प्राचार्य एस. एन. लोहकरे, मुख्याध्यापक मते, जिभाऊ शिंदे, एस. पी. पाटील उपस्थित होते. समारोपप्रसंगी संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी कर्मवीरांचे स्वप्न साकारण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी संस्थेने आतापर्यंत १० रोजगार मेळावे आयोजित करीत पाच हजार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

दिव्य मराठी

रोजगार मेळावा • थोरात महाविद्यालयात १,२५० विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी

**वणीतील १३७ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी**

# कौशल्य विकास : काळाची गरज



आजचे युग हे अत्यंत गतिमान आणि स्पर्धेचे युग आहे. या बदलत्या काळामध्ये केवळ पुस्तकी ज्ञान किंवा शैक्षणिक पदवी मिळवणे नोकरी आणि व्यवसायासाठी पुरेसे राहिलेले नाही. जागतिक बाजारपेठेत तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि उद्योगांच्या बदलत्या गरजांमुळे आज तरुणांमध्ये व्यावहारिक ज्ञानाची म्हणजेच 'कौशल्याची' नितांत गरज भासत आहे. याच पार्श्वभूमीवर, तरुणांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना योग्य दिशा देण्यासाठी 'कौशल्य विकास' (Skill Development) ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. कौशल्य विकास म्हणजे केवळ नवीन गोष्ट शिकणे नव्हे, तर स्वतःला आत्मनिर्भर बनवून देशाच्या प्रगतीत हातभार लावणे होय. कौशल्य विकास म्हणजे एखाद्या व्यक्तीमधील उपजत गुणांना ओळखून, त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन विशिष्ट कामात पारंगत करणे. सोप्या शब्दात सांगायचे तर, "केवळ ज्ञान मिळवणे नव्हे, तर त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष कामात वापर कसा करावा हे शिकणे म्हणजेच कौशल्य विकास होय."

**कौशल्य विकासाचे प्रकार**

कौशल्य प्रामुख्याने दोन भागांत विभागले जाते.

1. हार्ड स्किल्स ( Hard Skills / तांत्रिक कौशल्य ) :

हे कौशल्य विशिष्ट कामाशी किंवा व्यवसायाशी संबंधित असते.

उदाहरणे : संगणक प्रोग्रामिंग (Coding), डेटा एंट्री, ग्राफिक डिझायनिंग, वेल्डिंग, प्लंबिंग, नर्सिंग, वाहन चालवणे इत्यादी.

2. सॉफ्ट स्किल्स (Soft Skills / वर्तणूक कौशल्य :

हे कौशल्य व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि संवाद साधण्याच्या पद्धतीशी संबंधित असते.

उदाहरणे : संवाद कौशल्य (Communication Skills), नेतृत्व गुण (Leadership), समस्या निवारण (Problem Solving), वेळेचे व्यवस्थापन (Time Management) आणि सांघिक भावना (Teamwork).

**कौशल्य विकासाची गरज आणि महत्त्व :**

- रोजगारक्षमतेत वाढ : पदवीधरांची संख्या मोठी आहे, परंतु कंपन्यांना हवे असलेले व्यावहारिक ज्ञान नसणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. कौशल्य विकासामुळे तरुणांना थेट नोकरी मिळण्यास मदत होते.
- आत्मनिर्भरता आणि स्वयंरोजगार : कौशल्य आत्मसात केल्यामुळे तरुण स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात. जसे की - मोबाईल रिपेअरिंग, ब्युटी पार्लर, डिजिटल मार्केटिंग एजन्सी, टेलरिंग इत्यादी.
- आर्थिक प्रगती : कुशल मनुष्यबळामुळे देशाचे उत्पादन वाढते. जेव्हा तरुणांच्या हाताला काम मिळते, तेव्हा त्यांची आणि पर्यायाने देशाची आर्थिक प्रगती होते.
- बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगतता : आज एआय (Artificial Intelligence), रोबोटिक्स आणि ऑटोमेशनचे युग आहे. या बदलत्या काळात टिकून राहण्यासाठी स्वतःला 'अपग्रेड' (Up-skill) करणे आवश्यक आहे.

**सरकारी योजना आणि उपक्रम :**

भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार तरुणांना कुशल बनवण्यासाठी विविध योजना राबवत आहेत. **(वरील तक्ता पहावा)**

| योजनेचे नाव | उद्देश |
|---|---|
| प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) | तरुणांना मोफत कौशल्याधारित प्रशिक्षण देणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. |
| प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA) | महाराष्ट्र शासनातर्फे राज्यातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगारभिमुख प्रशिक्षण देणे. |
| दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्या योजना (DDU-GKY) | ग्रामीण भागातील गरीब तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. |
| आय.टी.आय (ITI - Industrial Training Institute) | तांत्रिक क्षेत्रात (फिटर, इलेक्ट्रिशियन, मेकॅनिक) करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठीचे पारंपरिक आणि प्रभावी माध्यम. |

**कौशल्य विकास कसे साध्य करावे?**

1. स्वतःची आवड ओळखा : तुम्हाला कोणत्या क्षेत्रात रस आहे (जसे की - कला, तंत्रज्ञान, व्यवस्थापन) ते आधी निश्चित करा.

2. योग्य अभ्यासक्रम निवडा : ऑनलाईन (Coursera, Udemy, Swayam) किंवा ऑफलाईन (ITI, सरकारी केंद्र) माध्यमातून योग्य कोर्स निवडा.

3. प्रत्यक्ष सराव (Practical Knowledge) : केवळ थिअरी वाचून कौशल्य येत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष काम किंवा इंटर्नशिप (Internship) करणे गरजेचे आहे.

4. सतत शिकत राहा (Continuous Learning) : तंत्रज्ञान सतत बदलत असते, त्यामुळे नवीन गोष्टी शिकण्याची तयारी नेहमी ठेवा.

"कौशल्य हे असे धन आहे, जे तुमच्याकडून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही."

आजच्या स्पर्धात्मक युगात ' डिग्री ' सोबत ' स्किल ' असणे अनिवार्य झाले आहे. कौशल्य विकास हा केवळ वैयक्तिक प्रगतीचा मार्ग नसून, सशक्त आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीचा पाया आहे. म्हणूनच, तरुणांनी वेळेची गरज ओळखून स्वतःमध्ये नवनवीन कौशल्ये विकसित करणे अत्यंत गरजेचे आहे. ■

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना



महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता , नाविन्यता विभागामार्फत सुरू करण्यात आलेली ' मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' ही राज्यातील १८ ते ३५ वर्षे वयोगटातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी आखण्यात आलेली एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. तरुणांमधील शैक्षणिक पात्रता आणि प्रत्यक्षातील व्यावसायिक कौशल्ये यांमधील दरी भरून काढणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असून, याद्वारे युवकांना विविध उद्योग, स्टार्टअप्स तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये प्रत्यक्ष कामाचे (On-the-job) प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींच्या शैक्षणिक पात्रतेनुसार दरमहा रुपये ६,००० ते रुपये १०,००० पर्यंतचे विद्यावेतन (Stipend) थेट त्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यात जमा केले जाते, ज्यामुळे युवकांना स्वावलंबी होण्यास आणि रोजगाराच्या चांगल्या संधी मिळवण्यास मोठी मदत होत आहे.

• **उदिष्ट** – उमेदवारांना उद्योजकांकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करणे.

• **आर्थिक तरतूद** – मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरिता रु. 5500 कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

• **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूप** –

उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. अंमलबजावणी संस्था – कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.

• **योजनेचे ठळक वैशिष्ट्ये** –

• बारावी, ITI, पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर Online नोंदणी करू शकतील.

• विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प, उद्योग/स्टार्टअप, विविध आस्थापना इ. यांना आवश्यक मनुष्यबळाची मागणी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर Online नोंदवतील .

• सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणाच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील.

• सदर कार्य प्रशिक्षांचा कालावधी 6 महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.

• सदर विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येईल.

• **उमेदवारांची पात्रता** –

• उमेदवाराचे किमान वय 18 व कमाल वय 35 वर्ष असावे.

• उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता 12 वी पास/ITI/पदविका/पदवीधर/पदव्युत्तर असावी.

• उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.

• उमेदवाराचे आधार नोंदणी असावी.

• उमेदवाराचे बँक खाते आधार सलग्न असावे.

• उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी केलेली असावी.

• **आस्थापना/उद्योजकासाठी पात्रता :-**

• आस्थापना/उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.

• आस्थापना/उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्याजाकता व नाविन्यता. विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

• आस्थपाना/उद्योगाची स्थापना किमान ३ वर्ष पूर्वीची असावी.

• आस्थापना/उद्योगांनी EPF, ESIC, GST, Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधाराची नोंदणी केलेली असावी.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अथवा हेल्पलाईन क्रमांक – 1800 120 8040 वर संपर्क साधावा.

# प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना

भारतातील तरुण लोकसंख्येला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना' (Pradhan Mantri Kaushal Vikas Yojana - PMKVY) सुरू केली आहे. ही योजना भारत सरकारच्या 'कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालया 'द्वारे (MSDE) चालवली जाते आणि याची अंमलबजावणी 'राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ' (NSDC) तर्फे केली जाते.

**१. योजनेची पार्श्वभूमी** :

या योजनेची सुरुवात १५ जुलै २०१५ रोजी (जागतिक युवा कौशल्य दिनी) झाली. देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी तरुणांचे कौशल्य वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, याच विचारातून ही योजना आखण्यात आली.

- **मुख्य उद्दिष्ट :-** देशातील तरुणांना उद्योगांशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण (Skill Training) देणे, जेणेकरून त्यांना चांगला रोजगार मिळू शकेल.
- **लक्ष्य गट** : अशा तरुण-तरुणींवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते ' ज्यांनी पैशांच्या अभावी किंवा कौटुंबिक अडचणींमुळे ' आपले शिक्षण (१०वी, १२वी किंवा कॉलेज) अर्धवट सोडले आहे (School/College Dropouts) किंवा जे सध्या बेरोजगार आहेत.

२. **योजनेचे प्रमुख प्रकार** :

या योजनेअंतर्गत प्रामुख्याने तीन प्रकारांमध्ये प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र दिले जाते:

1.अल्पकालीन प्रशिक्षण (Short Term Training - STT) : यात शाळा / कॉलेज सोडलेल्या किंवा बेरोजगार तरुणांना ३०० ते ६०० तासांचे (३ महिने, ६ महिने ते १ वर्ष) मोफत प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये तांत्रिक कौशल्यासोबतच डिजिटल साक्षरता, इंग्रजी भाषेचे मूलभूत ज्ञान आणि सॉफ्ट स्किल्स शिकवले जातात.

2.पूर्वशिक्षणाची ओळख (Recognition of Prior Learning - RPL) : असे अनेक कामगार आहेत ज्यांच्याकडे आधीपासूनच कामाचा अनुभव आणि कौशल्य आहे (उदा. सुतार, गवंडी, मेकॅनिक) परंतु त्यांच्याकडे कोणतेही अधिकृत प्रमाणपत्र नाही. अशा लोकांच्या कौशल्याचे मूल्यमापन करून त्यांना सरकारी प्रमाणपत्र दिले जाते.

3.विशेष प्रकल्प (Special Projects) : दुर्गम भाग, नक्षलग्रस्त क्षेत्र, आदिवासी भाग किंवा विशिष्ट सरकारी संस्थांच्या आवारात चालवले जाणारे हे विशेष प्रशिक्षण उपक्रम असतात.

३. योजनेची वैशिष्ट्ये आणि फायदे

- पूर्णपणे मोफत प्रशिक्षण : या योजनेअंतर्गत कोर्स करण्यासाठी उमेदवाराला एकही रुपया फी द्यावी लागत नाही. सर्व खर्च केंद्र सरकार करते.
- आर्थिक सहाय्य ( Stipend ) : प्रशिक्षण कालावधीत आणि कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना प्रोत्साहन म्हणून सरकारकडून आर्थिक मदत ( सुमारे ५०० ते ८,००० रुपयांपर्यंत, कोर्सच्या स्वरूपानुसार) दिली जाते.
- देशभर मान्य प्रमाणपत्र (Skill Card & Certificate) : कोर्स पूर्ण झाल्यानंतर परीक्षा घेतली जाते. उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवाराला ' कौशल्य प्रमाणपत्र ' (Skill Certificate) आणि ' डिजिटल स्किल कार्ड ' दिले जाते, जे संपूर्ण भारतात नोकरीसाठी वैध असते.
- रोजगार मेळावे आणि प्लेसमेंट : प्रशिक्षण पूर्ण झालेल्या उमेदवारांना नोकरी मिळावी यासाठी सरकार विविध कंपन्यांसोबत मिळून रोजगार मेळावे आयोजित करते.

४. प्रशिक्षणाची क्षेत्रे

या योजनेमध्ये जवळपास ४० ते ५० वेगवेगळ्या क्षेत्रांतील कोर्सेस उपलब्ध आहेत. त्यापैकी प्रमुख क्षेत्रे खालीलप्रमाणे :

- इलेक्ट्रॉनिक्स आणि हार्डवेअर (Electronics & Hardware)
- कन्स्ट्रक्शन आणि बांधकाम (Construction)
- फूड प्रोसेसिंग (Food Processing)
- आयटी आणि आयटीईएस (IT / ITeS - कॉम्प्युटर कोर्सेस)
- ऑटोमोटिव्ह / ऑटोमोबाइल (Automotive)
- हेल्थकेअर / आरोग्य सेवा (Healthcare)
- रिटेल आणि मॅनेजमेंट (Retail)
- अपारंपरिक ऊर्जा / सोलर (Green Skills)

५. **पात्रता :**

- अर्जदार हा भारताचा नागरिक असावा / असावी.
- उमेदवाराचे वय १५ ते ४५ वर्षे या दरम्यान असावे.
- उमेदवार बेरोजगार असावा किंवा त्याने शिक्षण अर्धवट सोडलेले असावे.
- हिंदी आणि इंग्रजी भाषेचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे.

**आवश्यक कागदपत्रे :**

- आधार कार्ड (Aadhaar Card)
- रहिवासी प्रमाणपत्र / पत्त्याचा पुरावा
- बँक खात्याचे तपशील (पासबुकची प्रत - कारण आर्थिक मदत थेट बँकेत जमा होते)
- शैक्षणिक योग्यतेचे प्रमाणपत्र (असल्यास शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुणपत्रिका)
- पासपोर्ट साइज फोटो आणि चालू मोबाईल नंबर.

६. **नोंदणी कशी करावी?**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवार ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करू शकतात:

1.सर्वप्रथम अधिकृत वेबसाईट pmkvyofficial.org किंवा Skill India Digital Hub पोर्टलवर जावे.

2.'Quick Links' मध्ये जाऊन 'Register as a Candidate' या पर्यायावर क्लिक करावे.

3.फॉर्ममध्ये आपले नाव, पत्ता, मोबाइल नंबर, ई-मेल आणि शैक्षणिक माहिती अचूक भरावी.

4.तुम्हाला ज्या क्षेत्रात रस आहे आणि जो कोर्स करायचा आहे, त्याची निवड करावी.

5.त्यानंतर तुमच्या जवळचे अधिकृत ' पीएमकेव्हीवाय प्रशिक्षण केंद्र ' (Training Centre) निवडून फॉर्म सबमिट करावा.

6.नोंदणी झाल्यानंतर संबंधित प्रशिक्षण केंद्राकडून तुम्हाला प्रवेशासाठी संपर्क केला जातो.

**निष्कर्ष :**

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही देशातील बेरोजगार तरुणांना स्वावलंबी बनवणारी एक अत्यंत महत्त्वाची योजना आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, उद्योगांना नेमके हवे असणारे प्रात्यक्षिक ज्ञान (Practical Knowledge) या योजनेतून मिळत असल्याने, तरुणांना स्वतःचा व्यवसाय (Self-employment) सुरू करण्यासाठी किंवा चांगल्या पगाराची नोकरी मिळवण्यासाठी या योजनेचा मोठा फायदा होत आहे.

# दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

ही ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांतील तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना हक्काचा रोजगार मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारद्वारे सुरू करण्यात आलेली एक अत्यंत महत्त्वाची योजना आहे. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे (Ministry of Rural Development) ही योजना राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाचा (NRLM) एक भाग म्हणून राबवली जाते.

**योजनेची पार्श्वभूमी आणि ध्येय :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'स्कील इंडिया' (Skill India) आणि 'मेक इन इंडिया' (Make In India) या मोहिमेला बळ देण्यासाठी २५ सप्टेंबर २०१४ रोजी या योजनेची सुरुवात करण्यात आली. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील आणि गरीब कुटुंबांतील तरुणांना जागतिक स्तरावर मागणी असलेल्या कौशल्यांचे मोफत प्रशिक्षण देणे आणि त्यांना खाजगी क्षेत्रातील नियमित पगाराच्या नोकऱ्या उपलब्ध करून देणे, हे या योजनेचे मुख्य ध्येय आहे.

योजनेचे ब्रीदवाक्य : "कौशल्याने समृद्ध तरुण, प्रगतीपथावर ग्रामीण भारत."

**योजनेची प्रमुख उद्दिष्टे :**

• ग्रामीण गरिबी निर्मूलन : ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील तरुणांचे कौशल्य वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.

• हक्काचा रोजगार : प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना किमान ७५% प्लेसमेंट (नोकरी) सुनिश्चित करणे.

• स्थलांतर रोखणे : ग्रामीण तरुणांना त्यांच्या कौशल्यानुसार सन्मानजनक रोजगार मिळवून देऊन शहरांकडे होणारे स्थलांतर कमी करणे.

**पात्रता आणि वयोमर्यादा:**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

• वय : उमेदवाराचे वय १५ ते ३५ वर्षे दरम्यान असावे.

• विशेष सवलत : महिला, दिव्यांग व्यक्ती (PWD) आणि उपेक्षित घटकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

• कुटुंबाची पार्श्वभूमी : उमेदवार ग्रामीण भागातील असावा आणि त्याचे कुटुंब दारिद्र्य रेषेखालील (BPL) असावे किंवा अंत्योदय अन्न योजना (AAY), मनरेगा (MGNREGA) अंतर्गत किमान १५ दिवस काम केलेले कुटुंब, किंवा राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत (NRLM) नोंदणीकृत असावे.

**योजनेची मुख्य वैशिष्ट्ये आणि फायदे :**



DDU-GKY अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरकारतर्फे अनेक प्रकारच्या मोफत सुविधा दिल्या जातात.

• पूर्णपणे मोफत प्रशिक्षण : कोर्सेसचे शुल्क, पुस्तके आणि गणवेश (Uniform) यांसाठी विद्यार्थ्यांकडून एकही रुपया घेतला जात नाही.

• निवासाची सोय (Residential/Non-Residential) : प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना राहण्याची आणि जेवणाची मोफत सोय पुरवली जाते. बिगर-निवासी (Non-Residential) विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन प्रवास भत्ता दिला जातो.

• आधुनिक संगणक आणि इंग्रजी लॅब : तांत्रिक कौशल्यासोबतच प्रत्येक विद्यार्थ्याला इंग्रजी संभाषण (Spoken English), संगणकीय ज्ञान (IT Skills) आणि सॉफ्ट स्किल्स (Soft Skills) चे अनिवार्य प्रशिक्षण दिले जाते.

• प्रमाणपत्र (Certification) : प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर नॅशनल काउन्सिल फॉर व्होकेशनल ट्रेनिंग (NCVT) किंवा सेक्टर स्किल काउन्सिल (SSC) द्वारे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र दिले जाते.

• प्लेसमेंट सपोर्ट (नोकरीची हमी) : प्रशिक्षण संपल्यानंतर विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून दिली जाते. परदेशात नोकरी मिळवण्यासाठीही ही योजना मदत करते.

• नोकरीनंतरचे साहाय्य (Post Placement Support) : नोकरी लागल्यानंतर सुरुवातीच्या काही महिन्यांपर्यंत उमेदवाराला स्थिर होण्यासाठी दरमहा आर्थिक मदत (Post Placement Support Allowance) थेट खात्यात दिली जाते.

**कोर्सेस आणि कालावधी :**

या योजनेत बाजारातील मागणीनुसार ३ महिने, ६ महिने, ९ महिने आणि १२ महिने कालावधीचे शेकडो कोर्सेस उपलब्ध आहेत. यामध्ये प्रमुख क्षेत्रांचा समावेश होतो.

• रिटेल आणि सेल्स (Retail & Sales)

• हॉस्पिटॅलिटी आणि टुरिझम (Hospitality & Tourism)

• आरोग्य सेवा (Healthcare - Nursing/Lab Assistant)

• आयटी आणि डेटा एन्ट्री (IT-ITES)

• इलेक्ट्रिकल आणि ऑटोमोबाईल (Electrical & Automotive)

• टेक्स्टाईल आणि गारमेंट मेकिंग (Apparel/Garments)

**सामाजिक समावेश :**

DDU-GKY अंतर्गत समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळावी म्हणून निधी आणि जागांचे विशेष आरक्षण ठेवण्यात आले आहे.

• अनुसूचित जाती आणि जमाती (SC/ST) : ५०% जागा

• अल्पसंख्याक (Minority) : १५% जागा

• महिला (Women) : किमान ३३% जागा

**अर्ज कसा करावा? :**

ग्रामीण तरुण या योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील पद्धतींचा अवलंब करू शकतात.

१. अधिकृत पोर्टल : DDU-GKY च्या अधिकृत संकेतस्थळाला (www.ddugky.gov.in) भेट देऊन 'Kaushal Panjee' (कौशल्य पंजी) अंतर्गत आपली नोंदणी करू शकतात.

२. ग्रामपंचायत/ग्रामसेवक : आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालय किंवा ग्रामसेवकांशी संपर्क साधून या योजनेच्या चालू असलेल्या बॅचेसबद्दल माहिती मिळवू शकतात.

३. प्रशिक्षण केंद्र: आपल्या जिल्ह्यातील जवळच्या अधिकृत DDU-GKY प्रशिक्षण केंद्राला थेट भेट देऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येते.

**निष्कर्ष :**

दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्या योजना (DDU-GKY) ही केवळ एक प्रशिक्षण योजना नसून ग्रामीण भागातील तरुणांच्या पंखांना बळ देणारे एक प्रभावी माध्यम आहे. बेरोजगारीवर मात करून ग्रामीण भारताला आत्मनिर्भर बनवण्यात ही योजना अत्यंत मोलाची कामगिरी बजावत आहे.

# प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान

महाराष्ट्र शासनाची ही एक प्रमुख योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील बेरोजगार युवकांना मोफत कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे हा आहे . प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA) हे महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागांतर्गत राबवले जाणारे एक अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान आहे. केंद्र सरकारच्या 'स्कील इंडिया' (Skill India) मोहिमेला अनुसरून महाराष्ट्रात "कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र" हे ध्येय साध्य करण्यासाठी या योजनेची सुरुवात करण्यात आली.

**अभियानाची प्रमुख उद्दिष्टे :**

- कौशल्यपूर्ण युवक : राज्यातील युवक-युवतींना आधुनिक आणि बाजारपेठेच्या मागणीनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण देणे.
- रोजगार व स्वयंरोजगार : प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देणे किंवा स्वतःचा व्यवसाय (स्वयंरोजगार) सुरू करण्यासाठी साहाय्य करणे.
- कुशल कामगारांची कमतरता दूर करणे : उद्योगांना लागणारा कुशल मनुष्यबळ पुरवून राज्यातील कुशल कामगारांचा अभाव दूर करणे.
- आर्थिक सक्षमीकरण : ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे.

**पात्रता निकष (Eligibility) :**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांकडे खालील पात्रता असणे आवश्यक आहे:

- वयोमर्यादा : १५ ते ४५ वर्षे वयोगटातील सर्व युवक-युवती या योजनेसाठी पात्र आहेत.
- रहिवासी : उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- शैक्षणिक पात्रता : वेगवेगळ्या अभ्यासक्रमांनुसार (Job Roles) शैक्षणिक पात्रता किमान ८ वी, १० वी, १२ वी उत्तीर्ण किंवा पदवीधर अशी वेगवेगळी असू शकते.

**योजनेची वैशिष्ट्ये आणि फायदे :**

- पूर्णपणे मोफत प्रशिक्षण : या अभियानांतर्गत दिले जाणारे सर्व प्रकारचे प्रशिक्षण उमेदवारांसाठी पूर्णपणे मोफत असते. याचा संपूर्ण खर्च महाराष्ट्र शासन उचलते.
- थेट लाभ हस्तांतरण (DBT) : लागू असल्यास उमेदवारांचे विद्यावेतन (Stipend) किंवा प्रवास भत्ता थेट त्यांच्या आधार-लिंक असलेल्या बँक खात्यात जमा केला जातो.
- प्रमाणपत्र (Certification) : प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर आणि मूल्यमापन (Assessment) झाल्यानंतर उमेदवारांना सरकारमान्य राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र दिले जाते.
- प्रात्यक्षिकांवर भर : हे प्रशिक्षण केवळ पुस्तकी नसून पूर्णपणे प्रॅक्टिकल (प्रात्यक्षिकांवर) आधारित असते. अभ्यासक्रमाचा कालावधी साधारणपणे २०० तास ते ६०० तास (२ ते ६ महिने) इतका असतो.

**समाविष्ट असलेली प्रमुख क्षेत्रे** :

या अभियानांतर्गत विविध क्षेत्रांतील शेकडो कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाते. त्यातील काही प्रमुख क्षेत्रे खालीलप्रमाणे:

| **क्षेत्र** | **उपलब्ध कोर्सेस / जॉब रोल्स** |
|---|---|
| माहिती तंत्रज्ञान (IT/ITeS) | डेटा एंट्री ऑपरेटर, वेब डिझायनर, आयटी सपोर्ट |
| ऑटोमोटिव्ह (Automotive) | ऑटोमोबाईल मेकॅनिक, वेल्डर, फिटर |
| आरोग्य सेवा (Healthcare) | असिस्टंट नर्स, मेडिकल लॅब टेक्निशियन, जनरल ड्युटी असिस्टंट |
| हॉस्पिटॅलिटी आणि टूरिझम | फूड प्रोडक्शन, फ्रंट ऑफिस असिस्टंट, शेफ |
| इलेक्ट्रॉनिक्स आणि हार्डवेअर | मोबाईल रिपेअरिंग, होम अप्लायन्सेस टेक्निशियन |
| ॲपरल व गारमेंट मेकिंग | टेलरिंग, फॅशन डिझायनिंग असिस्टंट |

**पूर्व ज्ञान मान्यता** :

या अभियानाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे RPL मॉडेल. ज्या कामगारांकडे आधीपासूनच एखादे कौशल्य आहे (उदा. अनुभवाने शिकलेले सुतार, गवंडी, मेकॅनिक) परंतु त्यांच्याकडे कोणतेही अधिकृत प्रमाणपत्र नाही, अशा लोकांच्या कौशल्याची चाचणी घेऊन त्यांना सरकारमान्य प्रमाणपत्र दिले जाते. यामुळे त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळवणे सोपे होते.

**अर्ज कसा करावा? (How to Apply) :**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांना ऑनलाईन नोंदणी करावी लागते:

1. सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत महास्वयम (Mahaswayam) पोर्टलला भेट द्या: www.mahaswayam.gov.in
2. कौशल्य विकास' (Skill Development) या पर्यायावर क्लिक करून स्वतःची नोंदणी (Candidate Registration) करा.
3. तुमची माहिती भरल्यानंतर तुमच्या आवडीचा जिल्हा, क्षेत्र आणि जवळचे अधिकृत प्रशिक्षण केंद्र (Training Center) निवडा.
4. आवश्यक कागदपत्रे (आधार कार्ड, शैक्षणिक दाखले, बँक पासबुक, फोटो) जोडून अर्ज सबमिट करा.

- माहे सप्टेंबर २०१५ मध्ये “प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान” या योजनेची सुरुवात “कुशल महाराष्ट्र-रोजगारयुक्त महाराष्ट्र” या ध्येयपूर्तीसाठी करण्यात आली. या योजने अंतर्गत राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. सदर योजना १००% राज्य शासनमार्फत अनुदानित आहे.
- सद्यस्थितीत “प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान” या योजनेच्या अंतर्गत, निश्चित निकषानुसार स्कील इंडिया पोर्टलवर सूचीबद्ध असलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत उमेदवारांस कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून रोजगारक्षम करून रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येतो.
- सदर प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत सदर प्रशिक्षण संस्थेने उमेदवारांची जमवाजमव करून, SSC/ MSBSVET यांचेमार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार कौशल्य प्रशिक्षण देणे व प्रशिक्षणानंतर त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करणे, प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करून देवून, त्या उपरांत सहा महिन्यापर्यंत पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. सदर संपूर्ण कामकाज ऑनलाईन पद्धतीने करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे वेब पोर्टलचा वापर करण्याची सुविधा सोसायटीमार्फत उपलब्ध करून देण्यात येते. "प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान" या योजनेअंतर्गत "प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र" व "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र " या दोन उपयोजना राबविण्यात येत आहेत.

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**
**कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर**
**सभासद/ आजी सेवक / माजी सेवक यांच्या पाल्यासाठी, नात्यातील/**
**ओळखीच्या व्यक्तींसाठी नोकरीसाठी नाव नोंदणी फॉर्म**

| उमेदवाराचा पासपोर्ट साईज फोटो |
|---|

१. संपूर्ण नाव:______________________________

३. जन्मतारीख (DD/MM/YYYY):______________________________

४. लिंग: ☐ पुरुष ☐ महिला ☐ इतर

५. अर्जदाराचे मराठा विद्या प्रसारक समाजाशी नाते (असल्यास): ☐ सभासद ☐ सभासद पाल्य
☐आजी कर्मचारी पाल्य ☐ माजी कर्मचारी पाल्य ☐ माजी विद्यार्थी ☐ इतर

६. मविप्र सभासद नाव व क्रमांक (असल्यास, स्वतःचा किंवा पालकांचा ):-
१.______________________________
२.______________________________
३.______________________________

७. मविप्र सभासदाशी नाते:- ______________________________

८. सध्याचा पत्ता:
- घर क्रमांक/गल्ली: ______________________________
- गाव/शहर: ______________________________
- तालुका/जिल्हा: ______________________________
- पिनकोड: ______________________________

९. कायमचा पत्ता (जर वरच्यापेक्षा वेगळा असेल तर):

________________________________________________________________________

________________________________________________________________________

१०. संपर्क क्रमांक:

- मोबाईल (स्वतःचा) : ____________________ • पर्यायी (पालकांचा) : ____________________

११. ई-मेल: ____________________________________________________________________

१२. शैक्षणिक पात्रता (सर्वात अलीकडील वर्ग/ पदविका/ पदवी पास/प्रमाणपत्र):

- शाळा/कॉलेज/संस्था: ________________________________________________________
- पदवी/पात्रता: ____________________________________________________________
- शाखा/विषय: ____________________________________________________________
- उत्तीर्ण वर्ष: _______________ गुण/टक्केवारी: _____________________

१३. व्यावसायिक/तांत्रिक कौशल्ये (उदा. संगणक, भाषा, ट्रेड, प्रमाणपत्र): ____________________________

१४. कामाचा अनुभव :

- मागील नोकरी/कंपनी: ________________________________________________________
- पद: __________________________________
- कालावधी: ______ ते _______ (महिने/वर्ष)________________

१५. नोकरीस उपलब्धता: ☐ तत्काळ ☐ 15 दिवसांत ☐ 1 महिन्यांत ☐ ठराविक तारीख: __________

१६. प्राधान्य क्षेत्र (एक किंवा अधिक ठेवा): ☐ ऑफिस/ॲडमिन ☐ उत्पादन ☐ विक्री/मार्केटिंग

☐ IT/तंत्रज्ञान ☐ शिक्षण ☐ हॉस्पिटॅलिटी ☐ इतर: ________

१७. रोजगार प्रकाराची इच्छा: ☐ कायमस्वरूपी ☐ तात्पुरती ☐ इंटर्नशीप ☐ स्वयंरोजगार

१८. प्रवास/शिफ्टबद्दल तयारी: ☐ होय ☐ नाही; शिफ्ट: ☐ दिवस ☐ रात्र ☐ दोन्ही

१९. वाहन/ड्रायव्हिंग परवाना: ☐ आहे (☐ २ चाकी ☐ ४ चाकी ☐ कमर्शियल ) ☐ नाही

२०. संदर्भ/शिफारस (नाव व संपर्क क्रमांक):

१.________________________________________________________________

२.________________________________________________________________

२१. जोडावयाची कागदपत्रे (छायाप्रत):

- ओळखपत्र (आधार/PAN/ड्रायव्हिंग परवाना)
- शैक्षणिक प्रमाणपत्रे
- अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)
- पासपोर्ट साईज फोटो (१)

**घोषणा व संमती:**

- मी खात्रीने सांगतो / सांगते की वरील माहिती खरी व पूर्ण आहे. केंद्राला माझी माहिती व कागदपत्रे पडताळण्याचा अधिकार आहे.
- मला रोजगार संदर्भातील कॉल / ईमेल / मेसेज प्राप्त होण्यास सहमती आहे.

तारीख: / / सही: ______________________

(हा फॉर्म मविप्र पत्रिकेतून वेगळा करून, वरील कागदपत्रांची छायांकित प्रती व स्वतःचा पासपोर्ट आकाराच्या फोटोसह कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट सेंटरमध्ये जमा करावा.)

**पत्ता :** कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट सेंटर, मविप्र संचलित राजर्षी शाहू पॉलिटेक्निक, उदाजी मराठा बोर्डिंग कॅम्पस, पम्पिंग स्टेशनजवळ, गंगापूर रोड, नाशिक.

---

**(कार्यालयीन उपयोगाकरिता)**

- नोंदणी क्रमांक: ______________________________
- केंद्र कर्मचा-याचे नाव व सही: ______________________
- शेरा:

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

CII-MCC अधिकारी

प्रमुख
कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग
ॲंड प्लेसमेंट सेंटर

**माहितीसाठी :**

१. कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे प्लेसमेंट सेंटर तसेच सीआयआयतर्फे आयोजित रोजगार मेळाव्यात नोकरीची संधी ही नाशिक जिल्हा तसेच नाशिक जिल्ह्याबाहेर / राज्यात/ परराज्यात / परदेशी मिळू शकेल जेथे निवड होईल, तेथे उमेदवारास जावे लागेल.

२. नोकरीसाठी इच्छुक आणि नोकरी देणारी कंपनी यांना एकत्र, समोरासमोर आणण्याचे काम सेंटर करते. नोकरीसाठी निवड, नियुक्तीचा निर्णय हा उमेदवाराच्या गुणवत्तेनुसार संबंधित कंपनी घेते.

# आपले सदस्यत्व...

## आपल्या परिवारातील तरुणांसाठी रोजगाराची विशेष संधी!

मराठा विद्या प्रसारक समाजाचे आजीव सभासद, आजी-माजी शिक्षक-सेवक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी असा एक विशाल व आपुलकीचा परिवार आहे. या परिवारातील प्रत्येक सदस्य मविप्रसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आहे. CII व मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने सध्या जिल्हाभर विविध ठिकाणी नोकरी महामेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाचा लाभ मविप्र परिवारातील आपल्यासारख्या महत्त्वाच्या सदस्यांपर्यंत आणि आपल्या माध्यमातून गरजू व होतकरू तरुणांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने नोकरी महामेळाव्याचा हा अर्ज आपणास पाठवत आहोत.आपल्या कुटुंबातील, नात्यातील किंवा परिचयातील नोकरीच्या शोधात असलेल्या होतकरू तरुण-तरुणींसाठी हा अर्ज अवश्य भरून पाठवावा. आपण शिफारस करून पाठविलेल्या उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि उपलब्ध रोजगारसंधींच्या अनुषंगाने योग्य नोकरी मिळावी, यासाठी आम्ही प्राधान्याने आणि प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहू.मविप्र परिवारातील प्रत्येक हाताला योग्य संधी आणि प्रत्येक होतकरू तरुणाला रोजगाराची वाट मिळावी, हाच या उपक्रमामागील आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

**-ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**

सरचिटणीस, मविप्र समाज, नाशिक





# आपलं मविप्र रुग्णालय

## आधुनिक उपचारांइतकंच महत्वाचं... माणुसकीच नातं !

आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण आयुष्यात...
रुग्णालयाकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.
रुग्णालय फक्त उपचारांचं ठिकाण म्हणून मर्यादित राहून चालत नाही...
तर रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आश्वासक आधाराची गरज असते...
असा आधार, जो प्रत्येक ठिकाणी मिळतोच असं नाही.

**बहुजन हिताय, बहुजन सुखाय'** हे ब्रीद जपणाऱ्या **मराठा विद्या प्रसारक समाजाच्या** सेवाभावी परंपरेतून उभं राहिलेलं मविप्र रुग्णालय आज हजारो कुटुंबांच्या विश्वासाचं आधारस्थान बनलं आहे. येथे आधुनिक वैद्यकीय सुविधा, अनुभवी डॉक्टर, प्रशिक्षित कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे —
**प्रत्येक रुग्णाकडे माणूस म्हणून पाहण्याची संवेदनशीलता जपली जाते.**

हे रुग्णालय केवळ आर्थिक फायद्याचं ध्येय समोर ठेवून कार्यरत नाही...
तर समाजातील प्रत्येक घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचावी,
या सेवाभावी भूमिकेतून कार्य करते.
विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी येथे विशेष व्यवस्था उपलब्ध आहे.
त्यामुळे अनेक रुग्णांना उपचार मोफत किंवा अत्यंत किफायतशीर दरात उपलब्ध होतात.
**कारण इथे उपचारांसोबत विश्वास, आपुलकी आणि माणुसकीही मिळते.**

**रुग्णाकेंद्रित सेवा**
प्रत्येक रुग्णाची वैयक्तिक काळजी

**अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्स**
सर्व शाखांमधील कुशल वैद्यकीय टीम

**आधुनिक सुविधा**
प्रगत तंत्रज्ञान व उत्तम पायाभूत सुविधा

**मायेचा स्पर्श**
संवेदनशील व आपुलकीची सेवा

**विश्वास बहुजनांचा**
पिढ्यानपिढ्याच्या मनातील विश्वास

किडनी ट्रान्सप्लांट | हृदय विकार विभाग | कॅन्सर उपचार | मातृत्व व स्त्रीरोग विभाग | बालरोग विभाग | अस्थिरोग व संधीवात विभाग | आणि इतर अनेक सुविधा | 24x7 आपत्कालीन सेवा

मविप्र रुग्णालय
वसंतदादा नगर, आडगाव,
नाशिक, महाराष्ट्र ४२२००३

0253 2220500
2303802
2303923

www.drvasantraopawarmedicalcollege.com
admin@drvasantraopawarmedicalcollege.com

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

# कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट सेंटर

कौशल्य | प्रशिक्षण | रोजगार

## मागेल त्याला जागेवर नोकरी 'CII व मविप्र'ची किमया न्यारी

कौशल्य विकास | व्यक्तिमत्त्व विकास | गटचर्चा (GD) | मुलाखतीची तयारी | करिअर मार्गदर्शन

इंटर्नशिप, अप्रेन्टिसशिपची संधी • राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नोकरीच्या संधी • करिअर मार्गदर्शन व समुपदेशन
विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण • उद्योजकता व स्वयंरोजगारासाठी प्रेरणा • कौशल्य विकास, संवाद कौशल्य,
ग्रुप डिस्कशन्स, मुलाखतीची संपूर्ण तयारी • तालुक्यांच्या गावी दरमहा नोकरी महामेळाव्यांचे आयोजन

**5000+** नामांकित कंपन्यांशी सहयोग

**6000** विद्यार्थ्यांना जागेवर आतापर्यंत अपॉईंटमेंट लेटर्स दिली आहेत

**25000** विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्याचे ध्येय

**मोफत रजिस्ट्रेशन | मोफत प्लेसमेंट**

**दर शनिवारी WALK IN INTERVIEW**

स्थळ : मविप्र समाजाचे राजर्षी शाहू पॉलिटेक्निक, गंगापूर रोड, नाशिक

